. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ८५१४.
RFFBK-0000299

ग्र. स. ठाणें
निबंध
४५,४

# व अभ्यासक्रम.

( निबंधांतील चार पांच मुद्दे मुंबईच्या हेमंतोत्सव व्याख्यानमालेंत व्याख्यानरूपानें सांगितले होते. )

लिहिणार:

**वासुदेव बळवंत पटवर्धन**

पुणें, फर्ग्युसन कॉलेजांतील इंग्रजीचे अध्यापक

REFBK-0000299

पुणें येथें

"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत हरि नारायण गोखले यांनी छापून प्रसिद्ध केलें.

सन १९०६

# शिक्षण, शिक्षक व सध्याचा २९९

# अभ्यासक्रम

सुमारें एक महिन्यापूर्वीं हेमंतोत्सव व्याख्यानमालेच्या चिटणिसांचें मला पत्र आलें. ज्या व्याख्यानमालेंत कै० तेलंगसारख्या जाडच्या विद्वानांचीं व्याख्यानें व्हावयाचीं तेथें आपण व्याख्यान देण्यास उभें राहणें ह्मणजे आपल्या अधिकाराबाहेरचें आहे असें वाटलें; आणि आपल्या चिटणिसांच्या कृपापत्रास नकार देऊन त्याचा अव्हेर करावा हेंही बरें नव्हे असें वाटलें. त्यांतही मनांत कांहीं नवे विचार घोळत असून ते बाहेर पडण्यास उत्सुक आहेत अशीही स्थिति नव्हती. अधिकाराच्या माणसांच्या वाचनांत कांहीं नवीन गोष्टी आल्या आणि त्या त्यांनीं अशा प्रसंगीं लोकांस सांगितल्या तर त्यापासून लोकांचा फायदा होतो. तसें हीं माझ्यापासून कांहीं होणार नाहीं. मीं जो व्यवसाय पत्करिला आहे त्यांत माझा बहुतेक वेळ मला घालवावा लागतो त्यामुळें भराभर पुढें धांवत चाललेल्या सुधारलेल्या जगाबरोबर किंवा निदान त्याचे मागोमाग तरी धांवत राहून, भौतिक सृष्टींतील उद्यास येणारीं नवनवीं रहस्यें वाचून तीं आपल्या बांधवांकरितां चव्हाट्यावर मांडून ठेवण्याचेंही काम मजसारख्यास अशक्य आहे. सारांश, अशा ठिकाणीं आणि अशा प्रसंगीं व्याख्यान देण्यास मी किती अनधिकारी आहे हें दुसऱ्यास माझ्याइतकें प्रतीत होणें शक्य नाहीं. तरीही मीं व्याख्यान देण्याचें कबूल केलें आणि त्याप्रमाणें आज आपल्या पुढें येऊन उभाही राहिलों आहें. याचें कारण, एक तर आपल्या आज्ञेचा अव्हेर करणें मला बरें वाटलें नाहीं. दुसरें, मीं सुचविलेला विषय आपण मान्य केला आणि तिसरें मीं घेतलेल्या विषयासंबंधानें मला नवी तयारी करावयाची नव्हती. माझ्यासारख्या रेम्याडोक्या माणसांनीं आपल्यापुढें बोलावयाचें ह्मणजे आधीं कांहीं तरी वाचन वगैरे तयारी हवी. दुसरा एखादा आवडता किंवा झेपणारा विषय घेतला असता, उदाहरणार्थ ‘ तुकाराम ’ ‘ रामदास ’ ‘ मोरोपंत’ वगैरेंची कविता व लौकिक कामगिरी असला किंवा शेक्सपियर, वर्डस्वर्थ, टेनिसन किंवा ब्रौनिंग या आंग्ल कवींसंबंधानें दोन शब्द, असले विषय घेतले असते तर मला या व्याख्यानासाठीं म्हणून विशेष तयारी करावी लागती. व ते विषयही थोडेसे एकदेशीय झाले असते. कदाचित् त्यावरील माझे विचार सामान्यतः लोकमान्य विचारांशीं जुळले नसते व आपल्या सभेंत तसे विचार व्यक्त करूं दिल्याबद्दल आपल्यावर टपका आला असता. तेव्हां जो विषय मला झेपण्यासारखा वाटला, ज्याच्यासाठीं फारशी नवी तयारी मुद्दाम करावी लागणार नाहीं असें वाटलें आणि ज्यावरील माझीं मतें बऱ्याच अंशांनीं आपल्या हितचिंतकांच्या मतांशीं जुळण्याचा संभव आहे असेंही वाटलें, असा आजचा विषय मीं निवडला

आपण मान्यही केला, याबद्दल मी आपला आभारी आहें. मी आज अकरा बारा वर्षें शिक्षकाचें काम करीत आहें, व तें मीं आपण होऊन, परिस्थितीचा किंवा आप्तेष्टांचा आग्रह किंवा जुलूम नसतां स्वतःच्या हौसेनें पत्करलें आहे. आणि सध्याच्या अभ्यासक्रमांतून स्वतः बाहेर पडलेला असून तोच पुढें दुसऱ्यांच्या हातून करून घेण्याचें काम करीत आहें. तेव्हां त्यासंबंधानें आजपर्यंतच्या अनुभवावरून,अवलोकनावरून आणि मननचिंतनावरून माझे जे कांहीं बरेवाईट विचार झाले आहेत ते आपल्या परवानगीनें, आपल्या आज्ञेनें आपल्या पुढें सादर करीत आहें.— ते जेथें चुकलेले असतील, एकदेशीय किंवा एककली असतील तेथें त्यांना सर्वदेशी व समतोल करण्यास आपण समर्थ आहां.

## विषयमाहात्म्य—विषयप्रवेश.

२. मीं घेतलेला विषय नेहमींचा म्हणून आज त्याची बऱ्याच लोकांस किंमत वाटत नाहीं. 'अति परिचयादवज्ञा.' आमच्या वयाच्या पांचव्या सहाव्या वर्षापासून आमच्यामागें नेहमींच शाळा लागली असल्यामुळें आणि शाळा ही संस्था कोणत्या तरी रूपानें आज शेंकडों वर्षें आमच्या परिचयाची असल्यामुळें शाळा, शिक्षण आणि शिक्षक नेहमींच्या सरावामुळें क्षुल्लक वाटूं लागले आहेत. लौकिक मनाची वृत्ति लहान मुलाच्या मनाच्या प्रवृत्तीप्रमाणें प्रस्तुतानें आणि प्रत्यक्षानें, त्यांतही अगदीं निकटवर्ती प्रस्तुतानें आणि झळक फळक प्रत्यक्षानें सहज वेधते आणि प्रस्तुताच्या आणि प्रत्यक्षाच्या मागें दडून बसणाऱ्या गूढ गोष्टींची लौकिक मनास आठवण नाहींशी होते. असें आहे तरी विचारी आणि शहाणे लोक या लौकिकप्रवृत्तीबरोबर वाहवत नाहींत. त्यांना प्रस्तुताआणि प्रत्यक्षापेक्षां त्यांच्यामागें दडणाऱ्या परंतु खऱ्या प्रभावशाली विषयाचें महत्त्व विशेष वाटतें आणि ते त्याच्याच पाठीस लागतात. आमच्या देशांत सध्यां शिक्षणविषयाचें तसेंच झालें आहे. 'वंगभंग' 'कर्झनप्रयाण', 'सिव्हिल सर्व्हिस' 'रसो-जपानी युद्ध व तह' वगैरे गोष्टींनीं मन वेधून आमची जनता व लोकाग्रणी त्या त्या विषयांच्या मागें लागत आहेत. 'देशहित,' 'देशाभिमान,' 'देशोन्नति,' 'आमच्या देशाचा व्यापार,' 'देशी कपडा,' देशी माल,' 'देशी उद्योगधंदे' वगैरे शब्दांनीं लौकिक वातावरण दुमदुमून गेलें आहे. आणि तत्तत्प्रतिपाद्य भावनांनीं लौकिक चित्तांतही कमीअधिक गर्दी करून सोडिली आहे. परंतु या शब्दांना सार्थ करणारें, आणि या भावनांना जीवमान करणारें जें शिक्षण त्याचा आम्हांस विसर पडतां नये. वरील शब्दांचा आणि त्यांनीं उठविलेल्या लौकिक वातावरणांतील ऊर्मींचा तादृश्य उपयोग नाहीं असें माझें ह्मणणें नाहीं; परंतु खरें देशहित साधणारें, खरा देशाभिमान जागृत करणारें, देशोन्नतीचा पाया घालणारें, आमच्या देशाचा व्यापार वाढविणारें, स्वदेशी कपड्यांचा खप करणारें, देशी माल उत्पन्न करणारें आणि देशी उद्योगधंद्यांस ऊर्जित करणारें वास्तविक साधन शिक्षण आहे, हें आपण विसरतां नये. चालू चळवळीं—आणि खटपटींचा सध्यांपुरता उपयोग होईल न होईल; परंतु देश आणि राष्ट्र ह्मणजे सध्यांचे लोक आणि येथचेच लोक नव्हेत हें आपण लक्षांत धरावें. आजच्या पिढींतील प्रत्येक व्यक्ति ह्मणजे राष्ट्राच्या देहांतील एक •परमाणुवजा मांसपिंड आहे. या परमाणूंची व्यक्तींच्या शरिरांत जशी घडामोड सारखी चाललेली असते तशीच राष्ट्रांच्याही शरिरांत चालू अस-

ते. ही घडामोड शरीरपोषक व्हावी, तिनें शरिराची वाढ चांगली व्हावी म्हणून काळजी घेतली पाहिजे. आमचें राष्ट्र आणि आमचा देश उन्नत व्हावा असें वाटत असेल तर ज्यायोगें राष्ट्राच्या देहास आणि मनास कायमचें इष्ट वळण लागेल असले उपाय योजले पाहिजेत. म्हणजे राष्ट्राच्या शिक्षणाकडे लक्ष दिलें पाहिजे, राष्ट्राला योग्य तेंच शिक्षण मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. राष्ट्राची इमारत उभारण्यांत शिक्षणाची मदत फार मोठी आहे. जपान, जर्मनी, युनायटेड स्टेटस् आणि आपलें सद्दीच्या जोरांत असलेलें राजकीय भावंड इंग्लंड यांच्याकडे पहा म्हणजे शिक्षणाचें महत्त्व आपल्या लक्षांत येईल. ४० वर्षांपूर्वी जगाच्या व्यापारांत आणि बाजारांत इंग्लंडाचें वर्चस्व होतें, त्यापैकीं बरेंच आज जर्मनीनें हिरावलें आहे. ४० वर्षांपूर्वी, ढांसळून पडलेल्या मातीच्या ढेकळाप्रमाणें, अफाट समुद्रांत, शिंपल्याप्रमाणें क्षुद्र, आणि लोटावें तिकडे जाईल असें दिसणारें जपान आज जगांतील प्रमुख राष्ट्रांशीं बरोबरीच्या गोष्टी सांगत आणि मानप्रतिष्ठांचा विनिमय करीत बसलें आहे. ४० वर्षांपूर्वी उंची कापसासाठीं आणि सतेज गव्हासाठीं हिंदुस्थानाचें आर्जव करणारीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें आज उत्तम कापूस आणि कसदार गहूं इंग्लंडासारख्या देशांस पुरवीत आहेत. खुद्द इंग्लंडही जागें होऊन आपलें घर दुरुस्त करण्याच्या मार्गांत आहे, जर्मनींतील शिक्षणक्रमाचा अभ्यास करून त्या वळणावर आपला शिक्षणक्रम नेऊन बसवीत आहे आणि दीडशें वर्षांपूर्वीं फ्रेंच, डच, वगैरेंशीं व्यापारी चढाओढ करणारें तेंच इंग्लंड आज हिंदुस्थानावर आणि जगाच्या सर्व भागांतील कमीअधिक प्रदेशावर सत्ता गाजवीत आहे. मित्रहो, या सर्व प्रस्तुताच्या आणि प्रत्यक्षाच्या मागें एक अलौकिक शक्ति आहे. जपान, जर्मनी, संयुक्त संस्थानें आणि इंग्लंड यांचे व्यापारी, राजकीय किंवा इतर पराक्रम त्या एका शक्तीचे खेळ आहेत. ही अलौकिक शक्ति, ही अजब जादू म्हणजे शिक्षण होय. जर्मनीनें आणि जपानानें आपलें भाग्य केवळ शिक्षणाच्या जोरावर काढिलें आहे. ही जादूची कांडी जशी फिरवाल त्याप्रमाणें जगद्रंगावरील राष्ट्रचित्रें नाचत राहणार. आज आमच्या येथें जर खरोखरीच कशाची अत्यंत जरूरी असेल तर ती या जादूच्या कांडीची आहे. सबंध राष्ट्रांचीं राष्ट्रें मेलेलीं फिरून जिवंत करण्याचें सामर्थ्य या कांडींत आहे. अरण्यांचीं नंदनवनें बनविणें आणि जनावरांचीं माणसें करणें या कांडीला कांहींच अवघड नाहीं. एवढें शिक्षणाचें महत्त्व आहे. तेव्हां हें शिक्षण आहे तरी काय ?

## शिक्षण म्हणजे काय ?

२. शिक्षण म्हणजे काय हें सांगणें फार कठीण आहे. शिक्षणाची सर्वव्यापी आणि तत्त्वशास्त्रास तंतोतंत जुळणारी व्याख्या करण्याचा प्रयत्न आजवर पुष्कळांनीं केला आहे, परंतु तो सर्वांशीं सफल झाला आहे असें म्हणतां येणार नाहीं. वस्तुतः पहातां मानव प्राण्याचें शिक्षण त्याच्या जन्माच्या आधींपासून तों मरेपर्यंत एकसारखें अखंड सुरू असतें. त्याच्या आईबापांचे स्वभाव, मनोवृत्ति व पूर्वजांचे प्रकृतिधर्म उपजत्या मुलांमध्यें थोड्याफार अंशानें उद्भूत होतात. जन्मल्यापासून त्याच्या बाहेरच्या शिक्षणास सुरुवात होते आणि आपणा सर्वांचा नेहमींचा शिक्षक जो निसर्ग तो आपला अंमल त्यावर प्रतिक्षणीं बसवीत असतो. अगदीं क्षुल्लक वस्तूपासून बलवान्

मानव प्राण्यापर्यंत जडाजड विश्वाचा जेवढा भाग मुलाच्या आसमंतांत येतो तो सर्व त्याच्या शिक्षणाचें काम बजावीत असतो; परंतु हें निसर्गाचें किंवा आसमंताचें शिक्षण आपल्या ताब्यांतलें नसतें. तें आपणांस फिरवितां येणें, किंवा आपल्या इच्छेप्रमाणें वळवितां येणें फारसें शक्य नाहीं.आपणांस आज विचार करावयाचा आहे तो मनुष्याच्या हातीं असणाऱ्या शिक्षणाचा आणि मानवी शिक्षकांचा. तेव्हां तेवढ्यापुरता आपण शिक्षण-विषयाचा संकोच करूं या. अशा दृष्टीनें पाहतां ' शिक्षण म्हणजे मनुष्याच्या शारीरिक व मानसिक शक्तींच्या उद्भव—विकास—परिपोष—परिपाकांचे मानवी उपाय आणि त्यांचा बुद्धिपुरस्सर अवलंब ' असें म्हणावें. ही शिक्षणाची व्याख्या म्हणून मी आपणांस सांगत नाहीं, तरी पण आपल्या कामापुरता शिक्षणाचा वरील अर्थ धरून चालण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

## सापेक्ष-निरपेक्ष शिक्षण.

४. मनुष्याच्या शारीरिक व मानसिक शक्तींचा उद्भव-विकास-परिपोष-परिपाक करण्याचे मानवी उपाय आणि त्यांचा बुद्धिपुरस्सर अवलंब ही आपली शिक्षणाची तात्पुरती व्याख्या आहे. पण ही सुद्धां सर्वांशीं माझ्या उपयोगाची नाहीं. ही व्याख्या व्याप्तीनें संकुचित आहे, तरी ही कांहीं अंशीं निरपेक्ष आहे. कालदेशवर्तमानाप्रमाणें शिक्षणाच्या कल्पनेंत, विशिष्ट देशांत, विशिष्ट परिस्थितींत, विशिष्ट कार्याकरितां जे फेरफार होतात किंवा करावे लागतात त्यांचा अंतर्भाव वरील व्याख्येंत नाहीं. आम्ही लोक विशिष्ट कालदेशवर्तमानानें बांधलेले आहों. सर्व मानव जातीचें एक सामान्य कुटुंब होऊन केवळ मनुष्यतेचा विकास—परिपोष—परिपाकच शिक्षणाचें साध्य होईल तो दिवस अत्यंत इष्ट असला तरी अत्यंत दूर, केवढ्याही पल्ल्याच्या दूरदृष्टीच्या आटोक्याबाहेरचा आहे. तेव्हां विशिष्ट कालदेशवर्तमानानें बांधलेल्या लोकांचे शिक्षणादर्श विशिष्ट कालदेशवर्तमानानें सापेक्ष झालेले असणार हें उघड आहे.

आपण हिंदी लोक,— हिंदू नव्हे, आतां केवळ हिंदूंचा हिंदूपुरता विचार करण्याचा काळ राहिला नाहीं असें मी समजतों— आपण हिंदी लोक हल्लीं कांहीं विशिष्ट प्रकारच्या परिस्थितींत आहों. या परिस्थितींत आमच्या शारीरिक व मानसिक संवर्धनास अनुकूल तसेच प्रतिकूलही विषय आहेत. आमच्या शिक्षणाचा आदर्श ठरवावयाचा तो परिस्थितींतील अनुकूल विषयांचा संग्रह व उपयोग व प्रतिकूलांचा परिहार करणारा ठरविला पाहिजे. शिक्षण सर्वत्र निरपेक्ष— कालदेशवर्तमानातीत राहण्याचा केवळ मनुष्यतेस हवें तसेंच राहण्याचा आणि तसेंच ठेवण्याचा काल येईपर्यंत तें सापेक्षच असणार.

## आम्हाला सापेक्ष शिक्षण हवें.

५. हिंदुस्थानाला आज हवें असणारें शिक्षण सापेक्ष होय. मागेंपुढें, सभोंवार आणि मग स्वतःकडे पाहून, आसमंताशीं स्वतःची तुलना करून, स्वतःस काय हवें तें उद्भूत करण्याकडे हिंदुस्थानानें लक्ष्य दिलें पाहिजे. वसुधैवकुटुंबकतेच्या मधुर स्वप्नांतच लागू पडणारें निर्गुण, निर्विकार, निरपेक्ष शिक्षण आजच्या हिंदुस्थानास नको आहे. तत्त्वज्ञानाच्या काल्पनिक विश्वांत बसून त्या विश्वांतील प्राण्यांकरितां घालून दिलेला अभ्यासक्रम आमच्या कामाचा नाहीं. म्हणजे मनुष्याच्या शारीरिक व मानसिक श-

क्तींचा सामान्येंकरून विकास—परिपोष-परिपाक करणारें शिक्षण आम्हांस आज नको. मनुष्याच्या शारीरिक मानसिक शक्तीं-पैकीं कांहीं विशेष शक्तींचा विशेषेंकरून परिपाक करणारें शिक्षण आम्हांस हवें. हिंदुस्थानाच्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक स्थितीचा विचार करून, ती सुधारण्याकरितां ज्या ज्या शारीरिक व मानसिक शक्तींचा विकास होणें अवश्य आहे, त्या त्या शक्ती वाढविण्यावरच आमच्या शिक्षणाची भिस्त हवी. अर्थात् हिंदुस्थानांतील शिक्षण हिंदुस्थानाच्या कालवर्तमानाप्रमाणें ठरविलें पाहिजे. तें सापेक्ष पाहिजे.

## आम्हास हवें तें सापेक्ष शिक्षण कोणतें?

६. आतां हिंदुस्थानास अवश्य असणारें सापेक्ष शिक्षण कोणतें याचा विचार करूं. हिंदुस्थानावर इंग्रजांचें साम्राज्य झाल्यापासून हिंदुस्थानाची आंतर्बाह्य स्थिति अगदीं पालटली आहे, मुलाच्या बाळपणांत सर्व कांहीं यथास्थित आहे, त्याला हवें तें आयतें मिळण्याची व्यवस्था आहे, त्याच्याकरितां चालणारे—त्याच्याकरितां संकटाशीं तोंड देणारे दुसरेच आहेत, त्यानें सांगितलें काम करावें, दिलें खावें, ठेवलें तेथें व तसें रहावें, आणि स्वतःच्या हातापायांस नाका-डोळ्यांस—डोक्यास कोणतीही तसदी न देतां दुसऱ्याच्या पायांनीं चालावें, दुसऱ्याच्या हातांनीं जेवावें, दुसऱ्याच्या डोळ्यांनीं पहावें दुसऱ्याच्या कानांनीं ऐकावें, सुखदुःखाचें ज्ञानही दुसऱ्याच्या मेंदूकरवीं घ्यावें आणि दुसऱ्याच्या डोक्यानें विचार करावे, असें झालें ह्मणजे त्या मुलाच्या शारीरिक--मानसिक-शक्तींची जी व्यवस्था होते तशी हिंदुस्थानाच्या शारीरिक—मानसिक सामर्थ्याची आज झाली आहे. प्रसंग नसल्यानें त्याच्या शक्ती लुप्तप्राय झाल्या आहेत. त्याचें डोकें विलायती, हातपाय परदेशी, नाकडोळे इंग्रजी झाले आहेत. त्यामुळें तो स्वतः सावयव असूनही लुला, पांगळा व थोटा झाला आहे आणि सेंद्रिय असून मुका, आंधळा व बहिरा झाला आहे. दयाळू सरकारानें आमच्या आंतर्बाह्य शत्रूंचें निर्दालन करण्याचें काम स्वतः पत्करिलें असल्यामुळें संकट आल्याबरोबर घाबरण्याचें आणि लटलटण्याचें काम मात्र आमच्याकडे राहिलें आहे; परंतु संकटांशीं टक्कर देण्यासाठीं अस्तन्या वर सारण्याचें आणि डोकें खर्च करण्याचें काम आमचें सरकार किंवा आमचे गोरे बंधु करीत आहेत. तान्ह्या मुलाप्रमाणें आमची सर्वांशीं परतंत्र स्थिति झाली आहे. आमचें खाणें-पिणें, राहणें वावरणें हरएक बाब थोड्या फार अंशांनीं दुसऱ्यावर अवलंबून राहते. दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय आह्मांस किती झाली आहे याची साक्ष प्रत्यहीं आमच्या सामाजिक, राजकीय, औद्योगिक चळवळींत येत आहे. आमची बुद्धि परतंत्र, आमची वृत्ति परतंत्र आणि आमची इच्छाही परतंत्र झाली आहे. येथें मी राजकीय परतंत्रतेचा विचार करीत नाहीं. राजसत्ता ही स्वायत्त किंवा परायत्त असणें हें जितकें माणसाच्या, तितकेंच मानवातीत शक्तींच्या हातीं असतें आणि अनेक दृष्टींनीं आमची हल्लींची राजकीय परतंत्रता आमच्या कल्याणाचीच आहे असा माझा दृढ विश्वास आहे. परंतु त्या परतंत्रतेनें असो किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें असो, आम्हीं मनानें दुर्बल—लंगडे आणि शरिरानें लुस्कान बनलों आहों. औषधांच्या आणि काठीच्या आधारावांचून आम्हांला आमचें शरीर सांवरत नाहीं. पुस्तकांच्या—इंग्रजी पुस्तकांच्या आणि

विदेशी गुरूंच्या मदतीशिवाय आमच्या मनाला चालवत नाहीं. आमच्या अंगीं महत्त्वाकांक्षा नाहीं, धमक नाहीं, जोम नाहीं, निर्धार नाहीं, दम नाहीं, धीर नाहीं; कामक्रोधादि षड्रिपूंस जिंकून आम्ही तेवढ्यापुरते साधू बनून आज कित्येक वर्षे झालीं आहेत. मायावादाच्या आश्रयानें आपलें समाधान करून घेण्याची संवय आमच्या मनास आज कित्येक शतकांची आहे. अंगांत पराक्रम नसल्यामुळें पराक्रमाचें वैयर्थ्य आणि दैवाचें व पूर्वकर्माचें अनिवार सामर्थ्य आमच्या हृदयांत कायमचें ठसलें आहे. दुसऱ्यांनीं हालविल्याशिवाय हालण्याचें आणि बोलविल्याशिवाय बोलण्याचें आमचें बळ लयास गेलें आहे. ' सद्दी, ' ' भवितव्यता ' ' देवाची मर्जी ' ' अदृष्ट ' ' होणार ' ' दैव ' ' नशीब ' ' ग्रह ' वगैरे शब्दांची आमच्या भाषेंत आणि तन्निदर्शित अव्यक्त—अस्पष्ट भावनांची आमच्या चित्तांत मोंगलाई माजली आहे. थोरवृत्ति, थोरकल्पना, विशाल बुद्धि, नवीन युक्ति, अपूर्व क्लृप्ति आणि अनावर स्फूर्ति यांची आमची फारकत झाली आहे. क्षुद्र विचार, खोटे कुतर्क, हलकट वासना, गचाळ रागलोभ आणि डळमळीत बेत यांनीं आमचीं मनें निकामीं करून टाकिलीं आहेत. आमची दृष्टि कोती झाली आहे स्वार्थ—तोही अगदीं तूर्तातूर्तचा स्वार्थ—आमच्या क्रियाव्यापारांचें सर्व क्षेत्र आक्रमून बसला आहे. दांडगे विचार, तितकेच दांडगे विकार आणि त्यांचे हुकूम पाळणारी व त्यांना आवरणारी त्यांचेपेक्षां शतपट दांडगी इच्छा आमचे अंगांत राहिली नाहीं. सत्याकरितां,न्यायाकरितां,प्रेमाकरितां कडकडीत निर्धारानें आप्तस्वकीयांच्या आळविण्यास आणि परकीयांच्या दरडावण्यास भीक न घालणारी कसलेली इच्छाशक्ति आम्हांस नाहीं. हिंदुस्थानांत राहणारा तेवढा एकाच भूमातेचा पूत, असला विचार वाचला म्हणजे बरा वाटतो. परंतु तो आपण होऊन आमच्या मनांत आविर्भूत होत नाहीं. आणि झाल्यावर त्याच्यायोगें आमच्या वर्तनांत हवी तशी उलथापालथ घडून येत नाहीं. याचें कारण मुळीं, करार, दृढ निश्चय वगैरेंच्या मुळाशीं असणारी आमची इच्छाशक्तिच दुबळी. ही आमची शारीरिक—मानसिक परभृतवृत्ति ज्यायोगें जाईल असलें शिक्षण आम्हांस हवें.

शिवाय आजचा आमचा देश म्हणजे पूर्वीप्रमाणें महाराष्ट्रीयांचें महाराष्ट्र,गुजराथ्यांचें गुजराथ,बंगाल्यांचा बंगाल,मद्राश्यांची मद्रास पंजाब्यांचा पंजाब, रजपुतांचा रजपुताना असा नसून प्रत्येकाचा सर्व आहे. मराठे, गुजर, बंगाली, मद्रासी, पंजाबी, रजपूत हे कोणीही हिंदुस्थानाच्या हिंदुस्थानांत कोठेंही गेले तरी तो स्वदेश म्हणण्यास हरकत नाहीं अशी आजची स्थिति आहे. आज आमचा बंधुभाव आमच्या घरापुरता किंवा गांवापुरता असतां नये, आमच्यासारखा पोषाख करणारापुरता, आमच्यासारखे कुलाचार, धर्माचार करणारापुरता,आमच्यासारखेच विचार व्यक्त करणारापुरता असतां नये. तो फैलावला पाहिजे. त्याचा पाया सर्व हिंदुस्थानाच्या विस्तारावर पडला पाहिजे. आमचें राष्ट्रीय कुटुंब आज जितकें वाढलें आहे तितका आमचा बंधुभाव वाढला पाहिजे व त्याकरितां आमच्या शिक्षणांत आमच्यांतील सध्याचे व पूर्वीपासून चालत आलेले भेदभाव नष्ट होतील अशी व्यवस्था केलेली असली पाहिजे. आमचें शिक्षण राष्ट्रीय पाहिजे. जातीजातींतील हेवेदावे व भेद, जमातीजमातींतील अलगभाव जेणेंकरून दृष्टीआड होईल, धर्माचा, समजुतींचा, इतिहा-

साचा, परंपरेचा, चालीरीतींचा निराळेपणा जेणेंकरून क्षुल्लक वाटूं लागेल 'भाई भाई भेद नाहीं' अशी वृत्ति आमच्या अंतःकरणाच्या-हिंदुस्थानापुरती-संवईची होईल अशी तजवीज आमच्या शिक्षणांत झाली पाहिजे. या एक दोन गोष्टी मीं केवळ मासल्याकरितां म्हणून दिल्या आहेत. तेवढ्यावरून आमच्या कालदेशवर्तमानाप्रमाणें शिक्षणाची निरपेक्षता कशी व किती मर्यादित करावयास हवी हें समजून येईल अशी आशा आहे. आमचें शिक्षण राष्ट्रीय असलें पाहिजे. अशा रीतीनें निरपेक्ष शिक्षणाचा संकोच करून तें विशिष्टकाळीं विशिष्ट प्रकारचें बनविल्याचीं इतिहासांत उदाहरणें आहेत. स्पार्टा आणि स्पार्टन हे शब्द इतिहासांत आणि वाङ्मयांत अजरामर झाले आहेत. ते स्पार्टन शिक्षणपद्धतीच्या सापेक्षतेमुळें आणि राष्ट्रीय विशेषामुळें नव्हेत असें कोण ह्मणेल ? अथेनियन लोकांचें शिक्षण त्यांच्या चारित्र्यांत किती उत्तम रीतीनें प्रतिबिंबित झालें होतें. स्पार्टानें प्रत्येक स्पार्टनास दिलेलें शिक्षण तेवढ्यापुरतें राष्ट्रीय होतें आणि त्यानें स्पार्टनाचें चारित्र्य कांहीं विशिष्टगुणान्वित केलें, हें ग्रीकांचा इतिहास परिचित आहे अशांस पुनः सांगावयास नको. राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेकरितां कालारण्यांत इतकें लांब हिंडावयास नको. गेल्या शंभर वर्षांत जर्मनीनें राष्ट्रीय शिक्षणानें केवढें काम केलें आहे तें पहा. जर्मन साम्राज्याचें नांव कांहीं वर्षांपूर्वी आजच्या अर्थानें तरी कोणास ठाऊक नव्हतें; परंतु आज तेंच जर्मन राष्ट्र इंग्रजांना सुद्धां कंस कृष्ण, न्यायानें - प्रतिस्पर्धी झालें आहे. याला बऱ्याच अंशीं कारण जर्मनींतील राष्ट्रीय शिक्षण पद्धति होय, हें आपणांस माहीतच आहे. खुद्द इंग्लंडांतही या राष्ट्रीय शिक्षणाचा प्रभाव किती आहे तो इंग्लंडांतील शाळांचीं वाचनालयें, वस्तुसंग्रह, अभ्यासक्रम, पाठ करावयाच्या कविता वगैरे प्रत्येक गोष्टीवरून आणि लहानापासून थोरापर्यंत प्रत्येक इंग्रजाच्या मनःप्रकृतीवरून दिसून येतो. याही पेक्षां ठळक उदाहरण म्हटलें म्हणजे सांगावयाचाच अवकाश कीं, आपणा सर्वांस चटदिशीं पटण्यासारखें आहे. तें आपण आधींच ताडलें असेल. कालदेश वर्तमानाप्रमाणें देशांतील शिक्षणाचें सुकाणूं फिरवून राष्ट्राचें चरित्र आणि जीवित किती उत्तम तऱ्हेनें बदलतां येतें, सुधारतां येतें हें जपानानें जगाच्या प्रतीतीस आणून दिलें आहे. तेव्हां, आमचें शिक्षण राष्ट्रीय असावें; हिंदुस्थानच्या आजच्या व पुढच्या गरजा आणि हिंदमातेचें नांव डोळ्यांपुढें ठेवून आमचा शिक्षणक्रम ठरविला पाहिजे. आह्मांस काय व्हावयाचें आहे, काय करावयाचें आहे आणि काय काय समजून घ्यावयाचें आहे हें पाहून तें तें साध्य करण्याकडे आमच्या शिक्षणक्रमाचें धोरण ठेविलें पाहिजे. व्हावें, करावें आणि समजावें ही शिक्षणाच्या उद्देशाची त्रयी आहे. प्रत्येक मुलानें, आपण कांहीं व्हावें, कांहीं करावें आणि कांहीं समजून घ्यावें हाच शिक्षणाचा हेतु आहे. हें 'कांहीं' मात्र राष्ट्रीय परिस्थितीप्रमाणें ठरवावयाचें. आमच्या शिक्षणक्रमांत खालपासून वरपर्यंत यांपैकीं पहिल्या दोहोंचा बहुतेक अभाव आहे आणि तिसरें नीट होत नाहीं, आणि होतें तेंही हिंदुस्थानाच्या विशिष्ट परिस्थितीस अवश्य तसें व त्या तऱ्हेनें होत नाहीं.

## शिक्षण आणि सरकार यांचा संबंध.

७. राष्ट्रीयशिक्षण हा राष्ट्राचा प्रश्न आहे. राजशासनाच्या ग्रंथांत लोकशिक्षण हा एक राजधर्म सांगितला आहे. प्राचीनकालीं हें काम

राजाच्या अवश्य कर्तव्यांपैकीं होतें कीं नव्हतें तें मला सांगतां येत नाहीं. अलीकडील भूतकाळीं तरी आमच्या देशींचे राजे लोकशिक्षणाचें काम स्वतःच्या धर्माकर्मांपैकीं एक समजत नव्हते असें वाटतें. मुसलमानी रियासतींत किंवा मराठा रियासतींत लोकशिक्षणाची बाब सरकारी बाबींपैकीं होती असें इतिहासानें नमूद केलेलें माझ्या वाचनांत नाहीं. प्राचीन काळींही निरनिराळ्या मठांतून व आश्रमांतून अध्ययन चाले, त्या त्या मठाधिपतींस किंवा ऋषींस राजाचा आश्रय असला तर तो लोकशिक्षण हा एक राजधर्म आहे असें समजून असे असें म्हणतां येईल कीं नाहीं कोण जाणे. तें कसेंही असो; अलीकडे पाश्चिमात्य राजशास्त्र विवेचकांनीं राजा आणि प्रजा यांतील संबंधाचें जें स्वरूप ठरविलें आहे त्याप्रमाणें लोकशिक्षण हें राजाच्या कामांपैकीं एक ठरलें आहे. राजा किंवा सरकार हे, एकंदर लोकांच्या सामान्य हितसंबंधांचे, सामान्य व्यापारांचे आणि सामान्य जीवनाचे आदर्श असून, जीं जीं कामें लोकांस व्यक्तिशः किंवा वर्गशः करतां येण्यासारखीं नाहींत,पण जीं लोकांच्या सुस्थितीला अत्यंत अवश्य आहेत तीं तीं सर्व, सरकार; या लोकांतूनच निर्माण झालेल्या स्वतंत्र संस्थेनें करावयाचीं. समाज हा एक देह कल्पून त्याचे प्राणसंरक्षक—जीवपोषक—आणि आयुष्यसंवर्धक सर्व व्यापारांचें श्रमविभागाच्या तत्त्वावर वर्गीकरण करून, त्यांपैकीं, सर्व लोकांस सामान्यपणें लागू पडणारीं सर्व कामें, सामान्य शांतता आणि सामान्य संरक्षण ह्या बाबी अर्वाचीन राजशास्त्रविवेचकांनीं सरकारचे माथीं मारल्या आहेत. आणि इंग्रज लोकांचें राज्य आमचेवर झाल्यापासून येथील राज्यकारभार वरील तत्त्वास अनुसरूनच होऊं लागला आहे. इंग्रज सरकारानें प्रथमतः देशांतील लोकशिक्षण आपले हातीं घेतलें; आणि हळूहळू तें येथील लोकांचे ताब्यांत देऊन आपण फक्त सल्ला मसलत देण्याचें आणि देखरेख करण्याचें काम पत्करून, लोकशिक्षणास पैशाची मदत देऊन तें येथील लोकांचे हातून चालविण्याचें धोरण १८८२-८३-८४ सालच्या कमिशनाच्या शिफारशीवरून ठरविलें होतें. हल्लीं या धोरणांत फरक झाला आहे. लोकशिक्षण हें सरकारचेंच काम आहे व तें आजपर्यंत सरकारानें करावें तसें केलें नाहीं तरी यापुढें तें सरकारानें आपल्याच हातीं ठेविलें पाहिजे असें आपल्या मावळत्या व्हाइसरायांनीं नुकतेंच सांगितलें. गेल्या ४।५ वर्षांतील सरकारी शिक्षणधोरण या दिशेचें होतें. तें तसेंच असावयास हवें असें नामदार लॉर्डसाहेबांचें म्हणणें आहे, व तें अर्वाचीन राजशासन शास्त्राप्रमाणें बरोबर आहे; पण त्यांत दोष इतकाच आहे कीं, स्वतंत्र देशांतील स्वतंत्र लोकांत उत्क्रांत झालेल्या राजशास्त्राचे सिद्धांत, जसेचे तसे, जेथें सरकार आणि प्रजा यांचा संबंध लढायांनीं जमवून आणिला आहे,तेथें लागू करण्याचा हा प्रयत्न आहे. इंग्रज सरकाराचा आणि हिंदी प्रजेचा संबंध स्वाभाविक उत्क्रमणानें घडून आलेला नाहीं, तो अखेरीस आमच्या कल्याणाचाच आहे, याविषयीं वाद नाहीं; परंतु आमच्यावर राज्य करणारे आमच्यांतलेच, आमच्यांतच वाढून वर चढलेले आणि आमच्या खुषीनें अधिकारसंपन्न झालेले नाहींत. ह्मणजे आमच्या देशांत सरकार हीं -संस्था श्रमविभागानें आमचीं सामान्य कामें सांभाळण्याकरितां उत्पन्न झालेली नाहीं. ती निराळ्याच उत्पातिक कारणांनीं आमच्या

येथें आलेली आहे. हा भेद लक्षांत ठेविला ह्मणजे येथील शिक्षण सर्वांशीं सरकारी हातांत राहणें, हें एकंदरींत आमच्या कल्याणाचेंच आहे असें ह्मणतां येणार नाहीं. इंग्रज सरकार हें सुधारलेलें आहे आणि सुधारलेल्या राज्यकर्त्यांप्रमाणें त्यांनींही लोकशिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे; परंतु तें सर्वांशीं आपल्या तंत्रानें चालविणें हें मात्र बरोबर नाहीं.

## हिंदुस्थानाची विशिष्ट परिस्थिति.

८. हिंदुस्थानाची स्थिति या बाबतींत कांहीं अंशीं विलक्षण आहे. येथील लोकांस बरेच दिवस राष्ट्रीय शिक्षण ह्मणजे काय हें ठाऊक नव्हतें व अजून बऱ्याच लोकांस त्याची चांगलीशी कल्पना नाहीं; तथापि लोकशिक्षणाचे कामीं सरकारानें आजपर्यंत केलेल्या प्रयत्नांनीं आज देशांतील बुद्धिमान् लोकांना आत्मज्ञान झालें आहे आपल्या स्थितीची ओळख पटली आहे आणि आपल्याला काय पाहिजे आहे व तें कसें प्राप्त करून घ्यावें हें समजूं लागलें आहे. आमचें सरकार परकी असल्यामुळें आमची सामाजिक स्थिति, समाजरचना, आमची मनःप्रकृति, आमचे उद्योग वगैरे गोष्टी सरकारास आमच्यासारख्या कळत नाहींत, त्यामुळें आमच्या सरकाराचे शिक्षणप्रयत्न पुष्कळदां इंग्लंडांतील शिक्षणप्रयत्नांची फारच अल्प प्रमाणावर नक्कल होतात. व त्यांतही प्रजेविषयीं सरकारचें मन अलीकडे असावें तितकें निष्कलुष राहिलें नसल्यामुळें आमच्या शिक्षणक्रमाचा नैसर्गिकपणा जाऊन त्याला कृत्रिमपणा येतो. आमची राजकीय स्थिति याप्रमाणें चमत्कारिक असल्यामुळें आमच्या सरकारास लोकशिक्षणाची रहावी तितकी आंच रहात नाहीं. येथील शिक्षणक्रम सर्वांशीं आपल्या सूत्राप्रमाणें हलणारा असला ह्मणजे झालें येवढेंच आमच्या सरकाराचें म्हणणें असतें. वास्तविक पाहतां आमच्या देशांत अज्ञानाचें जेवढें छत आहे तेवढें सुधारलेल्या कोणत्याही देशांत नाहीं. इंग्लंड, जर्मनी, अमेरिका वगैरे देश शिक्षणाचे बाबतींत इतके पुढें गेलेले असूनही तेथें सक्तीचें शिक्षण सुरू आहे. आमच्या येथें दर दहा माणसांपैकीं नऊ अक्षरशत्रु आहेत. केवढा अंधार हा ! येथें ज्ञानापेक्षां अज्ञानाचें साम्राज्य नऊपटीनें मोठें आहे. यामुळें येथील लोकशिक्षणाचा प्रश्न फार निकडीचा, पण मोठा कठीण आणि मोठा जोखमीचा झाला आहे. रशियाच्या बागुलबोवामुळें आणि राजद्रोहाच्या काल्पनिक भिण्यापायीं आमच्या सरकारास हा प्रश्न तितक्या नेटानें अजून हातीं घेतां आला नाहीं.

## येथें लोकांच्या प्रयत्नाची अवश्यकता.

९. अशा स्थितींत लोकशिक्षणाचे कामीं सरकारी प्रयत्नांस लोकांच्या प्रयत्नांची पुस्ती पाहिजे. आणि ही पुस्ती जोडून घेण्यास सरकारानेंही तयार झालें पाहिजे. प्राथमिक व दुय्यम शिक्षण सारें देशी लोकांच्या खाजगी प्रयत्नांकडे सोंपविण्यास सरकार तयार नसलें तरी तें पाहिजे तितकें पुरविण्याची आज सरकारची तयारी नाहीं. सरकाराची संशयग्रस्त वृत्ति कमी झाली नाहीं तोंवर ती होणें शक्य नाहीं. तेव्हां या कामीं देशी खाजगी संस्थांस सवलती देऊन त्यांचा उपयोग करून घेणें अवश्य आहे. यायोगानें सरकाराचा दुहेरी फायदा होईल. एक तर थोड्या खर्चांत विद्याप्रसार पुष्कळ केल्याचें श्रेय येईल;

आणि दुसरें, लोकांच्या शिक्षणसंबंधीं उणीवा काय आहेत आणि त्या भरून काढण्यास काय केलें पाहिजे, हें लौकिक दृष्टीनेंही सरकारास पाहतां येईल. असें होण्यास दर सरकारी शाळेस पांच खाजगी शाळा झाल्या पाहिजेत. आणि अशा रीतीनें सर्व देशभर प्राथमिक शाळांचें घनदाट जाळें पसरलें पाहिजे. हिंदुस्थानाची पहिली नड शिक्षणाच्या प्रसाराची आहे. तें शिक्षण यथाशास्त्र करण्याची नाहीं. इंग्लंडांतील शिक्षण यथाशास्त्र होण्यास आतां आतां आरंभ झाला आहे. तरीही इंग्लंड या कामीं जर्मनीच्या पुष्कळ मागें आहे असें तीस वर्षांमागें आर्नोल्डसाहबांनीं तसेंच हल्लींच्या शिक्षणाधिकाऱ्यांनीं कबूल केलें आहे. तेव्हां जी गोष्ट इंग्लंडासही अजून साधली नाहीं ती साधण्याच्या मागें लागून जें आज करतां येण्याजोगें आहे तें कां करूं नये ? शिक्षणपद्धति शास्त्रशुद्ध करण्याचे आणि चांगले शिक्षक पैदा करण्याचे प्रयत्न हवेतच; पण लिहिणेंवाचणें शिकविणाऱ्या प्राथमिक शाळा दरएक खेड्यांत उभ्या करणें हेंच काम त्यापेक्षां अधिक जरूरीचें आहे. यायेगें वाचतां येणाऱ्यांची संख्या वाढेल, आणि आज अज्ञानाच्या साम्राज्यांत नांदणाऱ्या शेंकडा नव्वद लोकांस ज्ञानाच्या राज्याचे दरवाजे मोकळे होतील. असें करण्यास सरकारापाशीं हवा तितका पैसा नाहीं हें कबूल आहे, म्हणूनच सरकारानें या कामीं खाजगी संस्थांची मदत घ्यावी, खाजगी प्राथमिक शाळा काढण्याचे कामीं लोकांस सवलती याव्या आणि सढळ हातांनीं मदत करावी, आणि प्रथमतः सर्व प्राथमिक शिक्षण—खेड्यापाड्यांतून—फुकट देण्याची सुरुवात करावी, असें मी म्हणतों.

शिक्षणाचे कामीं सरकारी प्रयत्नांस लोकांच्या खासगी प्रयत्नाची पुस्ती अवश्य आहे असें म्हणण्यास आणखीही कारणें आहेत. जगांतील शिक्षणप्रगतीचा इतिहास पाहिला म्हणजे असें दिसून येईल कीं, शिक्षणाचे पद्धतींत आणि क्रमांत सुधारणा प्रायः खासगी प्रयत्नांनींच झाली आहे. या कामीं जेसूट लोकांचे जगावर फार मोठे उपकार आहेत. जेसूट लोकांनीं या कामीं केलेले प्रयत्न सर्वांशीं खासगी आणि स्वतंत्र होते. जर्मनी, स्वित्झरलंड, फ्रान्स, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें व कांहीं अंशीं खुद्द जपान या सर्व देशांतील शिक्षणाचा इतिहास माझ्या म्हणण्याची साक्ष देत आहे. शिक्षणसुधारणा प्रथम स्वतंत्र माणसांस सुचून, त्या खासगी शाळांच्याद्वारा आणि खासगी प्रयत्नांचेयोगें इष्ट आहेत असें स्थापित झाल्यावर, त्या त्या देशांतील राज्यकर्त्यांनीं त्या उचलाव्या असेंच चोहोंकडे झालें आहे. हें बरोबर आहे. स्वतंत्र देशांतील सरकार म्हणजे "स्थितिस्थिर" शक्तीचें निदर्शक असतें. आहे तें कायम ठेवण्याकडेच सरकाराचा कल असणें स्वाभाविक असतें. कारण तेथें सरकार म्हणजे राष्ट्राचें सामान्य मुख. राष्ट्राची सामान्य प्रवृत्ति नेहमीं स्थितिशील असते; त्यामुळें सरकारही तसेंच असतें. समाजाच्या कांहीं प्रगतिशील घटकांनीं नवीन कल्पनांचें उपयुक्तत्व प्रयोगांनीं सिद्ध करून लोकांच्या प्रत्ययास आणून दिल्यावर सरकार त्यांचा स्वीकार करणार. स्वतंत्र देशांतील ही स्थिति आमच्या हिंदुस्थानांत तर विशेषच नडते. येथील सरकार अनेक कारणांनीं स्थितिशील असावयाचें, आहे. जगाच्या शिक्षणांत नव्यानव्या सुधारणा होऊन त्या शिळ्या झाल्या म्हणजे त्या आमच्या इकडे मरावयालाच जणूं यावयाच्या. बालो-

धान, वस्तुपाठ, शास्त्रप्रयोग, तयार केलेले शिक्षक वगैरे गोष्टी आमचे इकडे आतां आतां सुरू होत आहेत. आमच्या खासगी संस्थांस अधिक उत्तेजन दिलें, त्यांना शिक्षणप्रयोग करण्याची, नवीं नवीं क्रमिक पुस्तकें काढण्याची, अभ्यासक्रम हवे तसे बदलून पहाण्याची, आणि येथील शिक्षणाच्या गरजा आणि इतर देशांतील शिक्षणाची साधनसामग्री यांचा प्रत्यक्ष ज्ञानानें मेळ घालण्याची मोकळीक ठेवून त्यांच्या प्रयोगाचा फायदा घेतल्यास सरकारच्या शिक्षणखात्याचा बराच कार्यभाग होईल. मला वाटतें हिंदुस्थानांतील लोकांच्या शिक्षणविषयक गरजा समजणें आमच्या सरकारापेक्षां आम्हांसच अधिक शक्य असल्यामुळें येथें खासगी प्रयत्नांची मदत घेणें हिंदुस्थान सरकारास अवश्य आहे.

## आजची स्थिति.

१०. अशी मदत सरकारानें घेतली नाहीं असें नाहीं;पण ती इतकी अल्प आहे कीं, ती जमेस न धरली तरी चालण्यासारखें आहे. आमच्या येथील शिक्षणाची आजची स्थिति फार शोचनीय आहे. येथें सरकारी शाळा आहेत आणि त्यांच्या जोडीला थोड्याफार खाजगी शाळाही आहेत, परंतु आमच्या सरकारी शाळा आणि खाजगी शाळा यांत शिक्षणासंबंधानें तत्त्वतः किंवा रूपतः फरक नाहीं. आज सगळ्या हिंदुस्थानांत एकंदर शाळा आहेत त्यांचा तपशील १९०१ सालच्या सेन्सस रिपोर्टप्रमाणें पाहतां येणेप्रमाणें आहे. सरकारी शाळा, आर्टस कॉलेजें, हायस्कुलें, प्राथमिक शाळा आणि धंदेशिक्षणाच्या संस्था धरून एकंदर एक लाख सत्तेचाळीस हजार शायशी व खाजगी बेचाळीस हजार तीनशें त्रेचाळीस.

| शाळा. | हिंदुस्थान | मुंबई. | बंगाल. | मद्रास. |
|---|---|---|---|---|
| सरकारी... ... | १०४७४३ | ९६१७ | ५२०६६ | २१२[illegible]५ |
| खासगी... ... | ४२३४३ | २५१५ | १००७६ | ५७[illegible]१ |
| एकंदर... ... | १४७०८६ | १२१३२ | ६२१४२ | २६१२६ |
| खर्च | | | | |
| दर १००० माणशीं | २६ रु. | १०७ रु. | ११ | २५ |
| दर १००० विद्यार्थ्यांस | १८७२, | ३,८३१ | ६६७ | १५२६ |

या आंकड्यांवरून सध्यां खासगी शाळांचें प्रमाण किती लहान आहे आणि शिक्षणाचे कामांत खासगी संस्थांची मदत सरकार कितीं थोडी घेतें तें स्पष्ट होतें. त्यांतल्या त्यांत खर्चाचे आंकडे विचार करण्यासारखे आहेत. बंगाल इलाख्यांत दर मुलामागें सरकारास सरासरीनें अकरा आणे खर्च येतो. तोच मुंबई इलाख्यांत सुमारें पावणेचार रुपये येतो म्हणजे आमच्या इकडच्यापेक्षां बंगाल्यांत शिक्षण सुमारें पांच पटीनें स्वस्त आहे. याचें कारण सेन्सस रिपोर्टांत जें दिलें आहे तें धरल्यास माझे म्हणण्यास बळकटी येते.बंगाल्यांत ग्रांट-इन-एड पद्धति विशेष जारीनें सुरू असल्यानें

तेथें सरकारास थोड्या खर्चांत पुष्कळ विद्यार्थ्यांस शिक्षण देतां येतें. आणि आमच्या इलाख्यांत शिक्षण बहुतेक सरकारी व्यवस्थेखालीं असल्यामुळे येथें, बंगाल्यांत जेवढ्या खर्चांत सहा मुलांचें शिक्षण होतें तेवढा एकाच्याच शिक्षणास लागतो; याचें कारण खासगी संस्थांकडे शिक्षणाचें काम सोपविण्याचे कामीं आमचे येथें हात फार आखडता धरला आहे हें होय. लिहिणें वाचणें, हिशोब करणें एवढें तरी येणारांची संख्या जितकी वाढेल तितकी वाढविणें अवश्य आहे. आणि ती वाढविण्यास आजच्या स्थितींत सरकारनें खाजगी मदत घेववेल तितकी घेतली पाहिजे. ह्मणजे सरकारी शाळेंत दर मुलागणिक जितका खर्च सरकारास येतो त्याचे निम्मे खर्च दर माणसामागें सरकारानें ग्रँट म्हणून खाजगी शाळांस द्यावी. जेथें आधींच शाळा चांगल्या चालू आहेत, तेथें फी कमी करण्याकडे आणि जेथें शाळा चालत नाहीं अशा ठिकाणीं मोफत शाळा चालविण्याकडे प्रवृत्ति अधिक ठेविली पाहिजे. खाजगी शाळांस मदत सढळ हातानें दिल्यास सरकारच्या प्रयत्नांत भर घालण्यास बऱ्याच खासगी संस्था उभ्या राहतील. आज तरी शिक्षणप्रसाराचे कामीं व्हावे तितके मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होत नाहींत ही दुःखाची गोष्ट आहे. दर दहा माणसांत ९ नऊ माणसें अक्षरशत्रु असावीं ही स्थिति, इंग्रजी राज्य हिंदुस्थानावर आज जवळ जवळ शंभर वर्षें अबाधित चालू असून अजून रहावी ही गोष्ट आमच्या सरकारास लाजिरवाणी आहे.

## आजच्या प्रयत्नांतील दोष.

### अपुरेपणा.

११. आजच्या सरकारी व खाजगी प्रयत्नांतील मुख्य दोष म्हटला म्हणजे त्यांचा अपुरेपणा आहे. विद्याप्रसाराचें प्रमाण अज्ञानाच्या दार्ढ्याचे व विस्ताराचे मानानें फारच अल्प आहे. आणि हें जितकें अल्प तितके शिक्षणाचे प्रयत्न अधिक जोराचे आणि विस्तृत प्रमाणावर झाले पाहिजेत. आज शाळांची संख्या अत्यंत कमी आहे. आमच्या इलाख्यांतील शाळाशाळांतील अंतर सरासरीनें ४·४ मैल पडतें. म्हणजे सुमारें पांच मैलांस एक शाळा आहे. मुलांस शाळेंत जावयाचें म्हणजे ४।५ मैल चालून जावयाचें अशी आज स्थिति आहे. ही स्थिति जाऊन दर खेड्यास तेथील लोकसंख्येच्या मानानें एक लहानमोठी शाळा निघाली पाहिजे. खेड्यांतील एखादा तात्या पंतोजी गांठून त्याचेकडून तेथील मुलांस घरांपासून जवळच लिहिणें, वाचणें शिकतां आलें पाहिजे. तसें आज येत नाहीं, यामुळें खेड्यांतील शाळांतील मुलांची हजिरी बरोबर नसते. आमच्या खेडवळ लोकांची स्थिति अगदीं गरिबीची. घरांतील प्रत्येक माणसानें दिवसभर खपावें तेव्हां कशीबशी पोटाची खळगी भरणार. मुलगा पांच सहा वर्षांचा होतांच तो आईबापांबरोबर कामावर जावयाचा. तो शाळेंत गुंतला आणि तोही, शाळेंत जावयास घंटा दीड घंटा, तेथें चार पांच घंटे आणि घरत यावयाला घंटा दीड घंटा, मिळून दिवसाचे आठ नऊ घंटे गुंतला, ह्मणजे त्याच्या कामाचा खोळंबा आणि त्यानें मिळवावयाच्या मजुरीचा चट्टा, दोनीही आईबापांस सोसावीं लागतात. यामुळें खेड्यांतील शाळांत मुलें जमण्याची मारामार पडते.

## शिक्षणाची महर्घता.

हल्लींच्या प्रयत्नांतील दुसरा दोष ह्मटला ह्मणजे तें फार महाग आहे हें होय. आणि

चमत्कार हा आहे कीं, तें आहे ह्याहीपेक्षां महाग करण्याचा सरकारचा कल स्पष्ट दिसत आहे. युरोपांतीळ सुधारलेल्या देशांशीं ताडून पाहतां आमच्या देशांतील हा प्रकार उळटा दिसतो. तिकडे शिक्षण सुलभ किंवा स्वस्तें करण्याकरितां शिक्षणाचा कांहीं भाग तरी फुकट देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बऱ्याच ठिकाणीं प्राथमिक शिक्षण तरी मोफतच मिळतें. आमच्या येथें त्याचे उलट प्रकार कां दिसावा? आमचें सरकार सुधारलेल्या सरकारांत अग्रेसर शोभणारें आहे, मग आमचे येथें शिक्षण महाग करण्याचा हट्ट कां? माझ्या मतें खेड्यापाड्यांतून आणि तालुक्यांतून शिक्षणाची फी देणाराच्या खुषीवर ठेवावी. दिली द्यावी, न दिली न द्यावी. असें केल्यास शिक्षकांचें इमान कसास लावण्याचे प्रसंग फार येण्याची व पैशासंबंधीं भानगडी उपस्थित होण्याची भीति आहे असें कोणी ह्मणेल, आणि त्यांत तथ्य नाहीं असेंही नाहीं; परंतु तसें न होऊं देतां शिक्षणाच्या खर्चाचा बोजा प्रत्यक्षपणें गरीब खेडवळांवर न पडे अशी व्यवस्था वरील तऱ्हेनें किंवा शिक्षण अगदींच मोफत ठेवून करतां येण्यासारखी आहे. किंबहुना या बाबतींत आमच्या जुन्या पद्धतीचा थोडाफार उपयोग करून घेतां येईल. पूर्वींच्या काळीं जसे दरगांवाचे बारा बलुते होते, तसा "गुरुजी" हा एक बलुत्या ठरवून त्यानें गांवातील लोकांनीं दिलेल्या डाळतांदुळावर निर्वाह करून त्यांच्या मुलांस शिकविण्याचें काम करावें, आणि त्याकरितां सरकारांतून त्याला कांहीं ठरीव नेमणूक मिळावी. कोणत्याही रीतीनें शिक्षण स्वस्त किंवा मोफत झालें पाहिजे. तें तसें नाहीं, हा आजच्या प्रयत्नांत मोठा दोष आहे.

## खाजगी प्रयत्नांचा अभाव.

हल्लींच्या प्रयत्नांतील तिसरा दोष म्हटला म्हणजे खासगी स्वतंत्र प्रयत्नाचा अभाव किंवा अगदींच तोटकेपणा. खासगी इंग्रजी शाळांप्रमाणें खासगी मराठी शाळा आज नवीन पद्धतीवर निघालेल्या फार थोड्या आहेत. पूर्वींच्या गांवठी शाळा उत्तरोत्तर बुडत आहेत. आतां त्यांच्या जागीं नवीन पद्धतीच्या खासगी शाळा निघत नाहींत,याचें कारण,सरकार खासगी शाळांस सरकारी शाळांपेक्षांही अधिक करड्या तऱ्हेनें वागवितें हें असल्यास न कळे. कदाचित् खासगी शाळांस सरकारी मदत अगदींच दरिद्री असेल. सरकारी व खासगी प्रयत्न बरोबरीनें सुरू असले म्हणजे एक प्रकारची प्रशस्य स्पर्धा लागते आणि दोहोंचाही फायदा होऊन शिकणारांचें हित होतें. अशा शाळांचा अभाव हा दोष खेड्यांतील शाळांचा चांगुलपणा कमी करण्यास कारण होत असला पाहिजे.

## शिक्षकांचे पगार फारच हलके.

हल्लीं शिक्षकांचे पगार फारच हलके असतात, हा एक सध्यांच्या सरकारी व खासगी प्रयत्नांचा महत्त्वाचा दोष आहे. सात रुपये मिळविण्याकरितां महिन्याचे तीस दिवस रोज पांच सहा तास शाळेंत खपावयाचें, आणि तेवढे पुरले नाहींत तरी त्यांत भर घालण्याकरितां दुसरें कांहीं करावयाचें नाहीं,ही आजच्या प्राथमिक शिक्षकांची स्थिति आहे. ही सगळ्यांची स्थिति नाहीं हें मला ठाऊक आहे. तरी सर्व शिक्षकांच्या पगाराची सरासरी माणशीं नऊ दहापेक्षां अधिक नाहीं. नऊ दहा रुपयांत, सध्याच्या काळांत, धारण दरवर्षीं महाग होत जात असतां, कुटुंबाचा निर्वाह कसा व्हावा! शिक्षक म्हणजे कांहीं एकटाच

एक फटिंग भाई नसतो व तो तसा नसावाही. कुटुंबवत्सल शिक्षकांतच शिक्षकास अवश्य लागणाऱ्या मनोवृत्ति विकास पावतात. आणि त्या मानानें तो शिक्षणाचे कामास अधिक योग्य होतो. शिक्षक कुटुंबवत्सल असणें जर अवश्य आहे तर त्याच्या कुटुंबाचा नीटपणें निर्वाह होण्याइतपत त्यावें वेतन असलें पाहिजे. आमच्या सरकारच्या सोल्जरालाही आमच्या शिक्षकाच्या दुप्पट पगार मिळतो. रेल्वेवरच्या टिकेट कलेक्टरालाही आमच्या शिक्षकाच्या पांच सहापट पगार असतो. मग सरकारची भावी प्रजा तयार करण्याचें काम करणाऱ्या शिक्षकाला सरकारानें उपाशीं ठेवावें काय? सरकाराची खंबिरी प्रजेच्या संतोषावर आणि प्रजेचा संतोष–विशेषतः खेड्यापाड्यांतील अडाणी लोकांचा संतोष–शिक्षकाच्या संतोषावर बराच अवलंबून असतो. सरकाराची भावी प्रजा कार्यक्षम आणि कर्तबगार बनविण्याचें, अर्थात् राष्ट्राचें व म्हणूनच सरकाराचें उद्यांचें जीवित सुखाचें करण्याचें काम ज्याचे हातीं त्याला नऊ दहा रुपड्यांवर रखडत ठेवून सरकारानें स्वस्थ बसावें काय? मला वाटतें सरकाराच्या शिक्षणविषयक प्रयत्नांवर प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे हलके पगार हा एक मोठा डाग आहे.

## शिक्षणाचा कवायती ठरीवपणा.

शिक्षणप्रसारार्थ हल्लीं चालू असलेल्या प्रयत्नांत सर्वांत मोठा दोष अजून सांगावयाचा आहे. तो शिक्षणप्रयत्नांचा कवायती ठरीवपणा होय. अमकीं पुस्तकें वाचावयाचीं, अमुक शिकवावयाचें, इतकें शिकवावयाचें, इतक्या वेळांत शिकवावयाचें आणि अमुक तऱ्हेनेंच शिकवावयाचें हें सरकारानें ठरवून टाकलेलें असतें.आणि त्याबाहेर एक रेसभर ही जाऊं न देण्याची खबरदारी घेण्यांत येते. या बाबतींत इतर देशांत शिक्षकांस व शाळांचे चालकांस बरीच स्वतंत्रता असते. जर्मनींत, फ्रान्सांत, अमेरिकेंत शाळांचा फर्मा याप्रमाणें ठरलेला नसल्यामुळें, ठायींठायींच्या विशेष नडी व अडचणी लक्षांत घेऊन तेथें योग्य होईल त्या रीतीनें अभ्यासक्रम,शिक्षणपद्धति आणि वाचनपुस्तकें स्वीकारण्याची शाळांच्या चालकांस मुभा असते. व त्यामुळें तेथील शाळांत एक प्रकारचे स्पृहणीय वैचित्र्य आणि व्यक्तिवैशिष्ट्य आलेलें असतें, तसें आमचे येथें येण्यास मार्गच उरत नाहीं. त्यामुळें आमच्या येथें शिक्षणाची एके प्रकारें कवाईत होते. याचें ताजें उदाहरण आपल्या सर्वांच्या डोळ्यांपुढें आहे. मराठी क्रमिक पुस्तकांची सुधारणा करण्याकरितां सरकारानें कमिटी नेमून नवीन पुस्तकें काढण्यास सुरुवात केली आहे. असें करण्याचें प्रयोजन काय होतें? पूर्वींचीं क्रमिक पुस्तकें गचाळ होतीं याविषयीं मतभेद नाहीं. परंतु तींतील दोष कोणते व ते कसे दूर करावे हें ठरविणें सरकारानें आपणांकडे कां घ्यावें? इंग्लंडांत क्रमिक पुस्तकांच्या निरनिराळ्या कंपन्यांनीं काढिलेल्या माला पाहिल्या आणि त्यांतील गुणावगुण पाहिले म्हणजे अशा कामांत खुली चढाओढ सुरू ठेवण्यांत केवढें हित आहे हें कळण्यासारखें आहे. एकट्या मॅकमिलन कंपनीनें जवळ जवळ सात आठ क्रमिक पुस्तकांच्या माला काढिल्या आहेत. लांगमन्स, ब्लॅकी, नेल्सन, चेंबर्स, बेल,वॅार्डलॉक वगैरे कंपन्यांचीं नांवें आम्हांस माहीत आहेत. त्यांच्या व दुसऱ्या, आपणांस नांवानें माहीत नाहींत अशांच्या,दर वर्षीं नव्या पुस्तकमाला निघत आहेत व त्यांत नवनवे गुण आहेत. इंग्लंडांतील विद्याखा-

त्यानें जर आपणच एक ठराविक पुस्तकमाला काढिली असती व तीच जबरीनें चोहोंकडे चालू केली असती तर तिकडील क्रमिक पुस्तकांत दर वर्षी घडून येणाऱ्या अंतरंग—बहिरंग सुधारणा खात्रीनें घडून येत्याना. आणि शिक्षणाच्या प्रगतीचें तितकें नुकसान झालें असतें.सरसहा एकच फर्मा लष्करी कामांतसुद्धां मानिला आहे,तितका अवश्य आहे कीं नाहीं हा प्रश्न अजून युद्धविद्याविवेचक विचारीत असतात. आणि बोर युद्धापासून त्याविषयीं बरेच लोक साशंक झाले आहेत. शिक्षणाचे कामीं असली कडक एकरूपता अत्यंत हानिकारक होते; परंतु आमच्या सरकारास ही हानि दिसत नाहीं; किंवा स्पर्धेला मुक्तद्वार ठेविल्यानें हिजपेक्षांही मोठी हानि होईल असें वाटतें. नवीन क्रमिक पुस्तकांपैकीं दोनच बाहेर पडलीं आहेत आणि तीं मीं अजून नीटशीं पाहिलीं नाहींत. तरी पण माझ्या एका मित्राच्या हातांतून तीं घेऊन मीं त्यांतलीं जीं प्रथमच वाक्यें पाहिलीं त्यावरून हीं पुस्तकें पूर्वींच्यांस बरीं म्हणविलतील अशी भीति वाटते. ' गवतें रुजतात ' 'धान्यें पिकतात' असलीं वाक्यें व्याकरणाच्या नियमाप्रमाणें शुद्ध असलीं तरी कानाला अपरिचित लागतात. आणि असलीं वाक्यें पहिल्या किंवा दुसऱ्या पुस्तकांत घालणें म्हणजे क्रमिक पुस्तकांचें कार्य काय आहे हें विसरणें आहे. मला सांगावयाचें इतकेंच आहे कीं, शिक्षणाचे कामांत लष्करी ठरीवपणा आमच्या सरकारानें ठेविला आहे व तो अत्यंत घातक आहे. इतिहासाचीं पुस्तकें, भूगोलाचीं पुस्तकें, गणिताचीं पुस्तकें, फार तर काय अक्षर वळविण्याचे कित्तेही सरकारानें ठरविले असतील तेच सर्व शाळांतून चालले पाहिजेत,असा आमच्या सरकाराचा निदान विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांचा अलीकडे कडक कटाक्ष आहे. असला बांधलेपणा जसा शारीरशास्त्रांत तसाच शिक्षणशास्त्रांत निश्चयेंकरून विघातकच होतो. आमच्या सरकाराला हें आह्मी सांगावयास हवें असें नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका येथील शिक्षणांचे प्रयत्न, त्यांचे इतिहास, त्यांची विलक्षण यश:प्राप्ति आणि त्यांचें सध्याचें धोरण आमच्या सरकारास पाहिल्यास दिसणारें आहे. सगळें जग शिक्षणाचे कामांत सरकारी दोऱ्या, सरकारी तिजोऱ्यांप्रमाणें अधिकाधिक सैल, अधिकाधिक ढिल्या अधिकाधिक मोकळ्या करीत आहे. आणि आमच्या येथें त्याच अधिकाधिक घट्ट खेंचण्याचा आणि आंवळण्याचा मनसुबा होत आहे. याला काय म्हणावयाचें ? सगळें जग चुकलें आहे आणि आमच्या सरकारास शिक्षणरहस्यांची गठडी हिमाचलाच्या एखाद्या दरींत सांपडली आहे असें असल्यास कोण जाणे. एरव्हीं हा आमच्या येथील शिक्षणप्रयत्नांत अत्यंत दुष्ट दोष आहे.

## हल्लींचा शिक्षणक्रम.

१२. खाजगी असो किंवा सरकारी असो, आमच्या हल्लींच्या शाळांतील अभ्यासक्रम एकच एक ठरलेला आहे. तो क्रमशः कसा आहे तो पाहूं.

आमचा प्राथमिक शिक्षणक्रम म्हणजे सामान्यतः देशभाषेंतील शिक्षणक्रम असें म्हणावयाचें.बिगर यत्तेच्या वर्गापासून मराठी सातवे यत्तेपर्यंत सर्व वर्गांचा यांत समावेश होतो असेंच समजलें पाहिजे. कां कीं, इंग्रजी शाळांतील पहिली, दुसरी व तिसरी या यत्ता, मराठी पांचवी, सहावी व सातवी यांच्या तोडीच्या समजून त्यांस प्रायमरी-सेकंडरी किंवा मिडल्स्कूल यत्ता म्हणण्याचा विद्याखात्याचा परिपाठ

आहे असें वाटतें. म्हणजे पांचव्या यत्तेपासून मराठीच्या जोडीला इंग्रजी आलें कीं आमच्या प्रायमरी किंवा प्राथमिक शिक्षणांत सेकंडरीचा संचार झाला असें म्हणावयाचें. इंग्रजी चवथ्या यत्तेपासून सातवीपर्यंत सेकंडरी आणि तेथून पुढचें हायर किंवा वरिष्ठ शिक्षण, याप्रमाणें आमच्या येथील शिक्षणाच्या पायऱ्या आहेत. या पायऱ्यांच्या योग्यायोग्यतेचा आपण हळू हळू विचार करूं.

## प्राथमिक शिक्षण.

प्राथमिक शिक्षणांत महाराष्ट्रांत मराठी भाषेचें मराठी क्रमिक पुस्तकांनीं होणारें सर्व ज्ञान, मराठी भाषेचें व्याकरण सर्व,व्युत्पत्ति सर्व, अंकगणित सर्व, भूमितीचे युक्लिडाचें पहिलें पुस्तक, सर्व जमाखर्चाची माहिती, सगळ्या जगाचा राजकीय, व्यापारी व भूपृष्ठी आणि सृष्टिविषयक भूगोल, हिंदुस्थानाचा सर्व इतिहास, निबंधलेखन, आरोग्य शास्त्र आणि वस्तुपाठ किंवा वाटल्यास शास्त्रीय माहिती येवढा सर्व अभ्यास असतो. मुलगा शिकण्यास आरंभ करतो तेव्हां सरासरी सहा वर्षांचा असतो. तेरा वर्षांचे आंत त्याला वरील सर्व विषय अवगत करावयाचे असतात. आणि हे सर्व सरकारी पुस्तकांतून शिकावयाचे असतात. विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेस यापेक्षां अधिक अभ्यास म्हटले म्हणजे बीजगणित, भूमितीचीं आणखी तीन पुस्तकें, इंग्लंडाचा इतिहास, मराठी ऐवजीं संस्कृत हवें तर आणि इंग्रजी. प्राथमिक अभ्यासक्रम संपल्यावर तीन चार वर्षे मुलांस तसेंच रखडत रहावें लागतें. कारण सातव्या यत्तेच्या परीक्षेस त्याचें वय सतरा वर्षांचें तरी असावें लागतें. म्हणजे मुलाच्या वयाचीं तीन चार वर्षे फुकट जातात.

## दुय्यम शिक्षण.

प्राथमिक व दुय्यम शिक्षणाची जोड करून जो आमचा दुय्यम अभ्यासक्रम बनला आहे तो तर याहीपेक्षां मजेचा आहे. मीं वरतीं सांगितल्याप्रमाणें मराठी चार यत्तांपर्यंत सर्व मुलांचा सारखाच अभ्यास होतो. येथून पुढें दुय्यम शिक्षणाकडे जाणाऱ्या मुलांच्या बोकांडीं पांचवी, सहावी, सातवीच्या अभ्यासांखेरीज आणखी इंग्रजी येऊन बसतें आणि शाळेच्या एकंदर वेळाचा जवळ जवळ दोनपंचमांश वेळ एकटें इंग्रजीच खाऊन टाकतें. इंग्रजी तिसरी यत्ता संपतांच आमचे विद्यार्थी मराठीचे पंडित झाले. येथपासून त्यांची आणि त्यांच्या जन्मभाषेची फारकत झाली कीं, एम. ए. पर्यंत त्यांची पुनः गाठ पडण्यास आमच्या अभ्यासक्रमांत कोठें जागा नाहीं ! एम. ए. परीक्षेंतही विद्यार्थ्यानें वाटल्यास तिची भेट घ्यावी, नाहीं घेतली तरी हरकत नाहीं, असें होतें. येथपासून पुढचें सर्व शिक्षण इंग्रजींतून चालावयाचें. प्राथमिक क्रमांत झालेला भूगोल, इतिहास, अंकगणित, येथून पुढें इंग्रजींतून व्हावयाचीं. जणो काय मराठी भूगोल आणि इंग्रजी भूगोल हे दोन निराळे आहेत ! मराठींतलें इंग्लंड बेट असलें तर इंग्रजींतलें खंड होतें कीं काय कोण जाणे !

यापुढें युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमास सुरुवात होते; पण त्याचा विचार मी आज करीत नाहीं.

## जर्मनींतील शिक्षणक्रम.

१३. आपल्या इकडील प्राथमिक व दुय्यम अभ्यासक्रमांची आपण आतां पाहणी केली. आतां जर्मनींतील प्राथमिक व दुय्यम अभ्यासक्रम कसा आहे तो पाहूं. म्हणजे तुलनेनें आमच्या येथील शिक्षणक्रमाचे गुणावगुण ठरवितां येतील.

जर्मन साम्राज्यांतील शिक्षणक्रम सरकाराच्या देखरेखीखालीं आहे तरी तो इतका बहुरूपी आहे कीं, आमच्या येथील छापील फर्म्याप्रमाणें त्याचें वर्णन करतां येणें अशक्य आहे. तेथें ' किंडरगार्टन ' किंवा ' बालोद्यान ' शाळा निराळ्या; 'तयारी' च्या किंवा ' प्रिपरेटरी ' शाळा निराळ्या; ' एलिमेंटरी ' किंवा ' ओनामा ' च्या शाळा निराळ्या; 'जिमनाशियम' किंवा ' प्राचीन ' पंथी शाळा निराळ्या, ' रीलस्कूल्स ' किंवा 'अर्वाचीन' पंथी शाळा निराळ्या; ' रील जिमनाशिअम' किंवा 'प्राचीनार्वाचीन' पंथी शाळा निराळ्या; ' पीपल्स स्कूलस् ' ऊर्फ 'लोकशाळा' निराळ्या; ' बर्गर्सस्कूलस ' ऊर्फ ' जानपदशाळा' निराळ्या; ' मिलिटरी स्कूलस् ' ऊर्फ 'लष्करी शाळा' निराळ्या;' डलर्ड्स्स्कूलस' ऊर्फ 'ढ' च्या शाळा निराळ्या; याशिवाय ' युनिव्हर्सिटीज् ' ट्रेड्स् स्कूलस किंवा धंद्यांच्या शाळा, मुलींच्या शाळा, शिक्षक तयार करणाऱ्या शाळा; वगैरे अनेक तऱ्हेच्या शाळा जर्मनींत आहेत. या सगळ्या समुद्राला आळा घालून त्यांतून आपल्याला हवी ती माहिती सामान्यपणें काढणें कठीण आहे. तरी पण आपल्या सध्याच्या कामापुरती ती काढून तिकडील शिक्षणाची आणि आपल्या इकडील शिक्षणाची तुलना करण्याचा मी प्रयत्न करितों.

जर्मनींत साधारणपणें मुलास शाळेंत घालण्याचें वय सहा वर्षांचें आहे. सहा वर्षांपासून नवव्या वर्षापर्यंत मुलाचे शिक्षणाचा ओनामा होतो. यांत अक्षरओळख, लिहिणें आणि साध्या संख्यांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार येवढ्यांचा समावेश होतो. पहिले वर्षीं 'वीस' अंकांपर्यंतच अंकगणित, दुसऱ्या वर्षीं 'शंभरापर्यंत' आणि तिसरे वर्षीं १००० पर्यंत. एक हजारांपेक्षां अधिक संख्या उत्तरांत येईल असा गुणाकारही येथें दहा वर्षांच्या आंत शिकवीत नाहींत. हें मी आपल्या पदरचें सांगत नाहीं. ' नोट्स् ऑन् जर्मन स्कूलस् ' नांवाचें विंच् साहेबांचें एक पुस्तक आहे त्यावरून, आन्तरराष्ट्रीय शिक्षणग्रंथमालेपैकीं जर्मनी संबंधाच्या पुस्तकांवरून आणि जर्मन शाळांसंबंधीं माहिती देणाऱ्या इतर पुस्तकांतून गोळा करून ही माहिती सांगत आहें. दहाव्या अकराव्या वर्षीं दहा लक्षांपर्यंत संख्या आणि अकरा बाराव्या वर्षीं त्यापुढें जावयाचें. दहाव्या अकराव्या वर्षापूर्वीं त्यास 'विविध' शिकवीत नाहींत. आणि व्यवहारी अपूर्णांक बाराव्या तेराव्या वर्षीं येतात. हें जसें अंकगणिताचें, तसेंच इतर विषयांचें आहे. भाषाविषयास चित्रांपासून आरंभ होतो. चित्राचें नांव, तें नांव सांगणारें वाक्य, बोलणें—वाचणें—पत्त्यांच्यायोगें जोडणें व या रीतीनें अक्षरओळख करून घेण्यांत मुलाचें पहिलें वर्ष जातें. दुसऱ्या वर्षांत वाचन आणि लेखन यांची जोडी होते. तिकडील वर्णवटिका आपल्यासारखी साधी नसल्यामुळें शब्दांची अक्षररचना बसवून द्यावी लागते. ती पहिल्या दोन वर्षांत ध्वनींच्या अनुरोधें व पुढें ध्वनींचें श्रवण—उच्चारण व लेखन या तिहींच्या संयोगानें करतात. मूल अकरा बारा वर्षांचें होईपर्यंत त्याला अभियुक्त वाङ्मय वाचावयाला देत नाहींत किंवा दिलें तरी तें भाषाशास्त्राच्या दृष्टीनें सोपपत्तिक शिकवीत नाहींत. व्याकरण दहा वर्षांचे आंत ओढीत नाहींत. दहाव्या वर्षापर्यंत इतिहासाचें आणि नवव्यापर्यंत भूगोलाचें नांव नसतें. सारांश, नऊ वर्षें संपून मुलगा शिकण्यासारखा होईपर्यंत त्याची विद्या अगदींच साधी—सहज खेळतां खेळतां होण्यासारखी— असते. तींत थोड्या वयांत मोठी मजल मारण्याची हांव कोठें दिसून येत नाहीं. ' हॅंबर्ग ' येथील प्राथमिक शाळांतील वेळापत्रक खालीं उतरून घेतों त्यावरून तेथील अभ्यासक्रम लक्षांत येईल.

## प्राथमिक शाळा.

आठवड्याचे तास.

| यत्ता. | धर्म. | जर्मन. | इंग्रजी. | वस्तुपाठ. | इतिहास. | भूगोल. | सृष्टि॰ | शास्त्र. | गणित. | भूमि॰ | लेखन. | चित्र. | गाणें. | व्यायाम. | बेरीज. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिली, वय सात. | २ | १० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ५ | ० | ० | ० | १ | २ | २४ |
| दुसरी, वय आठ. | २ | ९ | ० | २ | ० | ० | ० | ० | ५ | ० | २ | २ | २ | २ | २६ |
| तिसरी, वय नऊ. | २ | ९ | ० | ० | ० | २ | २ | ० | ५ | ० | २ | २ | २ | २ | २८ |
| चवथी, वय दहा. | २ | ९ | ० | ० | २ | २ | २ | ० | ५ | ० | २ | २ | २ | २ | ३० |
| पांचवी, वय अकरा. | ३ | ६ | ४ | ० | २ | २ | २ | २ | ४ | ० | १ | २ | २ | २ | ३२ |
| सहावी, वय बारा. | ३ | ५ | ४ | ० | २ | २ | २ | २ | ४ | २ | १ | २ | १ | २ | ३२ |
| सातवी, वय तेरा. | २ | ६ | ४ | ० | २ | २ | ० | ४ | ४ | २ | १ | २ | १ | २ | ३२ |

## दुय्यम शाळा.

| | धर्म. | जर्मन. | फ्रेंच. | इंग्रजी. | भूगोल. | इतिहास. | गणित. | अंक. | शा. | सृ. क. | चि. | ले. | गा. | कवा. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| यत्ता पहिली, वय ११ | २ | ६ | ६ | ० | ० | २ | ० | ५ | ० | २ | ० | २ | २ | २ | २९ |
| यत्ता दुसरी, वय १२. | २ | ५ | ६ | ० | ० | २ | ० | ४ | ० | २ | २ | २ | २ | २ | २९ |
| यत्ता तीन, वय १३. | २ | ४ | ६ | ४ | २ | २ | ० | ४ | ० | २ | २ | १ | २ | २ | ३३ |
| यत्ता चार, वय १४. | २ | ४ | ५ | ४ | २ | २ | ५ | १ | ० | २ | २ | १ | (२) | २ | ३२<br>३४ |
| यत्ता पांच, वय १५. | ३ | ३ | ५ | ४ | २ | २ | ५ | १ | ३ | २ | २ | ० | (२) | २ | ३३<br>३५ |
| यत्ता सहा, वय १६. | २ | ३ | ५ | ४ | २ | २ | ५ | १ | ५ | ० | २ | ० | ० | २ | ३३ |

यावरून असें लक्षांत येईल कीं, जर्मनींत प्राथमिक शिक्षण ह्मणजे खरोखर आरंभींचें शिक्षण आणि दुय्यम शिक्षण ह्मणजे सामान्य सढळ शिक्षण. दुसऱ्याचे जर्मनींत पुष्कळ प्रकार आहे. पहिल्या प्रकारांत मुलाला युनिव्हर्सिटीकरितां तयार करण्याचा उद्देश असतो. दुसऱ्या प्रकारांत संसाराच्या संग्रामाकरितां त्याची तयारी होते. तिसऱ्या प्रकारांत व्यावहारिक, उपयुक्त कला आणि कसबें शिकवितात. मुलाला व्यापाराला आणि उद्योगधंद्याला उपयोग होईल असे नवीन शोध लावण्याचें शास्त्रीय अनुभवज्ञान चवथ्यांत मिळतें. पांचव्यांत कांहीं सामान्य शिक्षण आणि कांहीं वैशेषिक शिक्षण यांची जोड केलेली असते.

## जर्मन व हिंदी प्राथमिक अभ्यासक्रमांची तुलना.

१४ जर्मनींतील प्राथमिक अभ्यासक्रमाची आमच्या येथील प्राथमिक अभ्यासक्रमाशीं तुलना करून पाहतां असें दिसून येईल कीं, आमच्या येथें ज्या गोष्टी दुय्यम अभ्यासक्रमांत जावयाच्या त्या प्राथमिक अभ्यासक्रमांत कोंबल्या आहेत. नऊ वर्षांच्या मुलाला खरोखर व्याकरणाच्या व्याख्या आणि शंभरांपेक्षां किंवा हजारांपेक्षां अधिक संख्या समजेल अशी अपेक्षा कां करावी? आमच्या येथील मराठी तिसऱ्या चौथ्या यत्तेच्या अभ्यासांची खेंचाखेंच झाली आहे. 'औटें' 'अकरकें' 'एकोत्रें' मुलाला समजत नसतां तीं याच्यापूर्वींच त्याचेकडून पाठ करून घेतलेलीं असतात. पैशा-आण्याशीं त्याचा संबंध येण्यापूर्वींच त्याला रेघांचा गुणाकार-भागाकार आणि 'विविध' गणित शिकविण्यास आरंभ होतो आणि नऊ वर्षांचे वयाचे आंत त्याचें विविध गणित व्हावें लागतें. मुलगा चवथींत जातांच म्हणजे दहा वर्षांचा होतो न होतो तोंच त्याच्यामागें व्यवहारी अपूर्णांक लागतो. भाषेसंबंधानें हीच तऱ्हा आहे. सब्जेक्ट, (उद्देश्य) आब्जेक्ट, (कर्म) प्रेडिकेट (विधेय) यांची कल्पना येणें अशक्य असतां मुलाला कर्तरी कर्मणी प्रयोगाची ओळख व्हावी लागते. व्याकरण भाषेच्या बहिरंगाशीं तसेंच अंतरंगाशींही संबद्ध असतें. शब्दांचीं रूपें आणि अर्थ दोनही कळण्यापूर्वीं व्याकरण शिकविणें वेडेपणाचें आहे. तरी आमच्या प्राथमिक शाळांत चवथ्या पांचव्या यत्तांत ग्रंथावरून व्याकरण बहुतेक व्हावें लागतें. प्राथमिक शाळांची परीक्षा घेणाऱ्या एका असिस्टंट डेपुटींनीं चवथ्या यत्तेच्या मुलास एक तोंडचा हिशोब घातलेला नुकताच माझ्या आढळांत आला आहे. 'पावणे' एकोणीस रुपये खंडी तेल, तर पावणे तीनशेर अर्धा छटाकाचे दाम काय? ही आमच्या इन्स्पेक्टरांची स्थिति! इतिहास-भूगोलाची तीच कथा! वास्तविक पहातां प्राथमिक यत्तांना शाळेभोंवतालच्या आवाराशिवाय आणि, फार झालें तर, गावाशिवाय इतर भूगोलाची जरूरच नाहीं. अगदीं आरंभास अवश्य तेवढेच विषय तेथें शिकवावयाला हवेत. लायप्झिक् येथील प्राथमिक शाळेच्या तिसऱ्या—चवथ्या यत्तेंतील मुलांस दिलेला भूगोलाचा धडा विंच साहेबांनीं आपल्या पुस्तकांत दिला आहे तो पाहिला आणि आमच्या येथें त्याच यत्तेला ठेवलेला भूगोल त्याशीं ताडिला म्हणजे आमच्या अभ्यासाची खेंचाखेंच किती आहे तें लक्षांत येईल. तेथील दुय्यम शाळेच्या पहिल्या किंवा प्राथमिक शाळेच्या तिसऱ्या—चवथ्या यत्तेंतील मुलें सरासरी दहा वर्षांचीं होतीं. त्यांना गांवांतील शाळागृहांचा भूगोल शिकवीत होते. बारा वर्षांच्या मुलांस जर्मनी

म्हणजे त्यांचा देश सुमारें मुंबई इलाख्या-येवढा, यांतील ठळक शहरें विचारीत होते. आमच्या येथें त्याच वयाच्या मुलांस सगळें जग पुस्तकांतून तरी पालथें घालावें लागतें. लायप्झिग येथें नऊ वर्षांच्या मुलास फक्त लायप्झिगचाच इतिहास शिकवितात. आमच्या येथें दहा वर्षांच्या मुलास हिंदुस्थानाचा निदान महाराष्ट्राचा इतिहास शिकवितात. तिकडे इतिहास—भूगोलांत संगति असते. एकाचा दुसऱ्याशीं संबंध असतो. इकडे... ? सारांश कोणता वाटेल तो विषय घेतला तरी आमचे येथें प्राथमिक शिक्षणांत तो कोंबून कोंबून भरलेला आढळेल.

## जर्मन व हिंदी दुय्यम शिक्षणाची तुलना.

हीच स्थिति आमच्या दुय्यम शिक्षणाची आहे. शहरांतील मुलांशिवाय इतरांचे नशिबीं दुय्यम शिक्षण नाहींच म्हणावयाचें. आमच्या येथील दुय्यम शिक्षणांत तर विषयांची कोंबाकोंब फारच विलक्षण झालेली असते. सगळ्या जगाचा भूगोल,हिंदुस्थानाचा व इंग्लंडाचा संपूर्ण इतिहास, अंकगणित, बीजगणित, रेखागणित, संस्कृत व्याकरण सर्व,आणि वाङ्मय बरेंच;इंग्रजी रसायनशास्त्र, यंत्रशास्त्र,ज्योतिषशास्त्र,आणि सृष्टव्यापारांची माहिती इतके विषय आमच्या दुय्यम शिक्षणांत येतात. पण जर्मनींतील दुय्यम शिक्षणांत शेवटपर्यंत जर्मन भाषेचा अंतर्भाव झाला आहे. तो आमचे येथें मुळींच नाहीं. इंग्रजीला वरच्या चार यत्तांत आठवड्यांतून चार तासच जर्मनींत देतात. आमच्या येथें सबंध सातही यत्तांत रोज दोन दोन तास—म्हणजे आठवड्यांतून बारा तास इंग्रजीला मिळूनही, युनिव्हर्सिटी कमिशनापुढें आमच्या कालेजांतील आचार्यांची तक्रार आहेच कीं—कालेजांत येणाऱ्या विद्यार्थ्यांस इंग्रजी समजत नाहीं ! जर्मनींत इतिहास विषयांत ग्रीस—रोमांच्या इतिहासांतील ठळक गोष्टी आणि जर्मनांचा इतिहास असतो, त्याचे जागीं सबंध हिंदुस्थानाचा व इंग्लंडाचा इतिहास आम्हांस शिकावा लागतो. भाषा विषयांत आमच्या इकडे इंग्रजीच्या जोडीला संस्कृत असते; तिकडे खालच्या वर्गांत फ्रेंच शिकवितात व वरतीं इंग्रजी किंवा लॅटिन असतें. सारांश, जर्मनांतील अभ्यासक्रम उपयोग आणि मनाचा विकास या दोहोंचा विचार करून ठरविलेला दिसतो. आमच्या येथील अभ्यासक्रमांत कोणता विचार दिसतो कोण जाणे !

## असा फरक कां ?

१५. असा फरक आमच्या येथें पडण्याचें कारण आमचे येथें इंग्रजी शिक्षणाला आलेलें फाजील महत्त्व होय. आमच्या शिक्षणक्रमांत अन्तिम फल दृष्टीपुढें ठेवून अभ्यास ठरविलेले आहेत असें वाटत नाहीं. सरसहा एकच शिक्षणक्रम ठरविण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. ज्यांना इंग्रजी शिकावयाचें नाहीं त्यांना दुय्यम प्रतीचें शिक्षण नाहींच अशी आमच्या येथें स्थिति आहे ! तीच बरोबर आहे असें आमच्या येथील शिक्षणाधिकाऱ्यांस वाटत असल्यास नकळे ! आम्हांवर इंग्रजसरकाराचें राज्य असल्यामुळें आणि व्यापारादि व्यवहारांच्या सोईकरितां व अपरिचित विषयांच्या ज्ञानाकरितां आम्हांस इंग्रजीचें ज्ञान जरूरीचें आहे हें निर्विवाद आहे; परंतु तेवढ्यामुळें ज्याला इंग्रजी शाळेंत जातां येत नाहीं त्याला दुय्यम प्रतीचें शिक्षण नाहींच असें कां व्हावें ?

जर्मनींत तसें होत नाहीं.इतर कोणत्याही देशांत तसें होत नाहीं. आमच्या येथें मात्र तशी स्थिति आहे. विश्वविद्यालयांत जाणा-

ऱ्या विद्यार्थ्यांना जें शिक्षण हवें असतें तें सगळ्यांना नको असतें. पण आमच्या दुय्यम प्रतीच्या शाळांत तेवढेंच मिळण्यासारखें असतें. हाच आमच्या व जर्मनींतील शिक्षणक्रमांत मुख्य फरक आहे व तो आमच्या शिक्षणाचे अन्तिम उद्देश स्पष्टपणें डोळ्यांपुढें न राहिल्यामुळें पडला आहे असें वाटतें.

## सध्याच्या शिक्षणक्रमांतील दोष.

१६. आमच्या सध्याच्या शिक्षणक्रमांतील दोष येणेंप्रमाणें आहेतः– ( १ ) आजच्या शिक्षणक्रमांत–प्राथमिक यत्तांत फाजील अभ्यास घातले आहेत. ( २ ) देश–भाषांचा–महाराष्ट्रांत मराठीचा–अभ्यास व्हावा तसा व तितका होत नाहीं. देश भाषांस गौणस्थान मिळालें आहे. ( ३ ) विषयांच्या कठिण-सुगमतेचा व्हावा तसा विचार झालेला दिसत नाहीं.( ४ ) मुलांच्या उद्देशभेदांप्रमाणें शिक्षणक्रमभेद केलेला नाहीं. (५)व्यावहारिक उपयोग आणि शिक्षण यांची सांगड घातलेली नाहीं. ( ६ ) शिक्षण शास्त्राच्या सिद्धांतांचेंहि बरोबर अवलंबन केलेलें नाहीं. ( ७) मुलांच्या बुद्धीचा स्वतंत्रपणा कायम ठेवण्याऐवजीं तो मारण्याकडे सध्याच्या अभ्यासक्रमाची प्रवृत्ति आहे. ( ८ ) आजच्या शिक्षणक्रमांत मुलांचें कर्तृत्वास कोठेंच अभ्यास मिळत नाहीं. ( ९ ) मुलांच्या मानसिक शक्ती–वृत्ती–बुद्धीचा सर्वांगानें विकास होण्यास साधन नाहीं. ( १० ) व्यक्तीकडे लक्ष पुरत नाहीं. ( ११ ) गाणें कोठेंच नाहीं. याशिवाय सध्याच्या शिक्षणांत शिक्षणपद्धतीमुळें आलेले दोष आहेत, त्यांचा विचार योग्य ठिकाणीं होईल. सध्यां अभ्यासक्रमाचा सोपान रचण्यांत जे दोष आहेत त्यांचा एकेकशः विचार करतों.

## फाजील अभ्यास घातले आहेत.

( १ ) जर्मनींतिल प्राथमिक अभ्यासक्रम सांगितला तेव्हां तो किती साधा आणि खरोखर आरंभींचा ऊर्फ एलिमेंटरी आहे तें मीं दाखविलें आहे. आमच्या येथें बालोद्यान, वस्तुपाठ आणि नेहमींचा अभ्यासक्रम यांची खिचडी केली आहे तशी जर्मनींत नाहीं. खुद्द इंग्लंडांतही ही खिचडी ठाऊक नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. इंग्लंडांत बालोद्यानांत येणाऱ्या बाळांचें वय तीन वर्षांपासून सात वर्षांचें असतें. आणि तेथून पुढें बालोद्यानाचें रूपान्तर होऊन ‘ ओनाम्या ’च्या शाळांस सुरुवात होते. आमच्या येथें बालोद्यान आणि ओनाम्याची शाळा एकच होतात. इतर विषयांची अशीच गर्दी केलेली असते. शाळेच्या चार विषयांखेरीज दोन विषय कोणते तरी घेतलेच पाहिजेत असे असतात. अशी अभ्यासांची गर्दी केल्यामुळें पुष्कळ मुलांस ते झेंपत नाहींत आणि त्यांच्या मेंदूस अवेळीं आहाराबाहेर काम पडल्यामुळें त्यांची लांबी-रुंदी उंची, पिढ्यानुपिढ्या आंत येत आहे हें मागें प्रि. गोळे यांनीं आपल्या ‘ ब्राह्मण आणि त्यांची विद्या ’ या अमोलिक पुस्तकांत सिद्ध केलें आहे. मुलांच्या मेंदूला अधिक काम पडल्यामुळें त्यांच्या जीवनशक्तीचा बराच भाग शरिराच्या वाढीकडून निवृत्त होतो. जर्मनींत शाळांतील मुलें वयाच्या मानानें अंगापेरानें मोठीं दिसतात. अशी साक्ष त्या शाळा पाहून आलेले बहुतेक लोक देतात. आमच्या येथें याच्या अगदीं उलट प्रकार असतो. आमचीं मुलें वयानें मोठीं पण दिसावयाला लहान असतात असेंच म्हणावें लागतें. आमच्या येथेंच युरोपियन शाळांतील मुलें आणि आमच्या शाळांतील मुलें यांच्या शरीराकारांत केवढी तफावत असते हें दरवर्षीं इंटरस्कूलस ॲथलेटिक स्पोर्टस टुर्नमेंटाचे वेळीं सगळ्यांचे नजरेस पडतें. तरी त्यांना प्राच्य देशांतील

उष्णकटिबंधाची हवा प्रतिकूल असते. आम्ही या हवेंत मुरलेले आहों तसे ते नाहींत. शरीराकाराच्या या तफावतीस दुसरीं कारणें आहेत हें मी विसरत नाहीं. खाण्यापिण्याचा नेमस्तपणा व मुबलकपणा, आईबापांची प्राग्वैवाहिक शरीरसंपत्ति, घरांतील एकंदर आरोग्यव्यवस्था आणि लहानपणींची जोपासना वगैरे अनेक गोष्टींचा शरिराच्या वाढीवर परिणाम होतो हें खरें. तरी आमच्या मुलांच्या शरीरहानीस इतर कारणांबरोबर अभ्यासाची गर्दी आणि कुत्तरओढ यांचीही बरीच मदत होत असली पाहिजे, असें मला वाटतें. सध्याच्या अभ्यासक्रमानें हा आमचा फार मोठा तोटा होत आहे.

## कठिण सुगमतेचा विचार नाहीं.

( २ ) दुसरें असें आहे कीं या अभ्यासाच्या खेंचाखेंचींत अभ्यासाच्या कठिणसुगमतेचा विचार झालेला दिसत नाहीं. व्याकरणासारखा कठिण अमूर्त विषय दहा वर्षांचे आंत शिकवूंच नये. पण आमच्या मुलांस तिसऱ्या यत्तेंतच नाम, सर्वनाम वगैरे शब्दांच्या जाती समजाव्या लागतात आणि शब्दांचा नामांप्रमाणें व क्रियापदांप्रमाणें प्रयोग करतां यावा लागतो. एक लक्षांपर्यंत संख्या लिहिणें वगैरे दुसऱ्या यत्तेंतच होतें ! पाऊणकीं, सवायकीं, दिडकीं, अडीचकीं, होऊन मुलगा नऊ वर्षांचा होतो न होतो तों टांक, शेर, मण पायली, आणे वगैरे उजळणी व्हावी लागते ! एक कोटीपर्यंत संख्या यावी लागते ! या उजळणीचा अर्थ काय आणि ती उजळणी कशी कोणाला ठाऊक? जर्मनींत 'लेखनाला' आरंभ कोठें कोठें नववे वर्षी होतो. आमच्याकडे पहिल्या यत्तेपासूनच त्याला सुरुवात होते. तरी आमचें स्पेलिंग किंवा शब्दवटिका जर्मनीच्या सारखी कठिण नाहीं. जिल्ह्याचा राजकीय भूगोल व तत्संबंधीं भूपृष्ठ विद्येची माहिती, इलाख्याच्या मराठी जिल्ह्यांचा सामान्य भूगोल आणि इलाख्याच्या नकाशांत मुलांनीं गांवें वगैरे भरणें, इतका भूगोलिक प्रवास आमच्या मुलांनीं नऊ वर्षांचे आंत आटपावयाचा असतो ! बिचारीं दमून थकून जावीं आणि पिळून निघावीं यांत त्यांचा काय दोष ?

## वस्तुपाठ व बालोद्यान.

वस्तुपाठांचें लचांड जर्मनींत दुसऱ्या यत्तेनंतर मुळींच नसतें. आमच्या येथें तें दर यत्तेबरोबर वाढत जातें. आणि मुलांच्या डोक्यांस ओझें होऊन बसतें. मला वाटतें बालोद्यान आणि वस्तुपाठ यांची हल्लींची जी आमच्या प्राथमिक शाळांतून कवाईत होते ती होऊं देणारांस बालोद्यानाचें आणि वस्तुपाठांचें महत्त्वच बरोबर उमजलें नसावें. खरोखर, इतिहास भूगोल जसे आमचे इकडे पाठ करावयाचे विषय होऊन बसले आहेत, तसेच बालोद्यान आणि वस्तुपाठही झाले आहेत, इतकेंच नव्हे तर ते तसेच व्हावे असाच त्या विषयांत परीक्षा घेण्याच्या पद्धतीचा रोंख असतो. या बाबतींत खरें काय असेल कोण जाणे, बाकी बाह्यत: पहाणारास तरी, आम्ही इतर देशांच्या मागें नाहीं येवढें सिद्ध करण्याकरितांच या विषयांचा, इतक्या घाईनें आणि गर्दींतगर्दी करून, आमच्या अभ्यासक्रमांत विद्याखात्यानें अंतर्भाव केला आहे असें वाटल्यास त्याचा दोष आहे असें म्हणावयाला मी तरी तयार नाहीं. या वस्तुपाठांसंबंधानें आमच्या विद्याखात्याचा हावरेपणा इतका आहे कीं, त्यांनीं प्रत्येक यत्तेंत वीस वीस वस्तुपाठ दडपून दिले आहेत, इतकेंच नव्हे तर प्रत्येक यत्तेस कोणकोणते वस्तुपाठ द्यावे हेंही, मला वाटतें, पर्यायानें ठरवून टाकलें आहे. वस्तुपाठांच्या उद्देशाला हद्दपा

करण्याची यापेक्षां अधिक सफळ युक्ति मला तरी माहीत नाहीं. वस्तुपाठांचा उद्देश जर मुलांची चौकसबुद्धि, अवलोकनशक्ति आणि ग्रहणशक्ति तीक्ष्ण व जिवंत ठेवण्याचा आणि उत्तरोत्तर विकसित करण्याचा असेल, आणि तोच आहे असें बऱ्याच शिक्षणशास्त्र्यांचें मत आहे, तर मुलांचे पुढें, त्यांच्या नेहमींच्या पाहण्यांत न येणारे पदार्थ मांडून त्यांवर पुस्तकांतील ठरीव प्रश्न विचारल्यानें आणि ठरीव उत्तरें घेतल्यानें व तीच कवाईत परीक्षकांपुढें केल्यानें तो उद्देश कसा सिद्धीस जावा ? उलट तसें केल्यानें मुलांस चौकसबुद्धि असली तर ती नाहींशी मात्र व्हावयाची. आमच्या प्राथमिक शिक्षणांत वस्तुपाठ आणि बालोद्यान हीं इतर विषयांच्या गर्दींत आणखी घुसलेलीं लंचाडें आहेत. ' बालोद्यान ' शिक्षणाचें तत्त्व ज्यांना उत्तम कळलें आहे अशा शिक्षकांचे हातीं ' बालोद्यान ' ह्मणजे ज्ञानकुसुमांनीं फुललेली सुंदर बाग होईल. परंतु हल्लीं बिचाऱ्या फ्रोबेल साहेबांची ही अमोघ देणगी इतकी सोपी आणखी इतकी स्वस्त झाली आहे कीं, ती हवी त्यानें आणि हवी तशी वापरावी. ती अभंग ! घेणारा-देणारा-कोणासच कांहीं ती देत नाहीं.नाहीं म्हणायला बिचाऱ्या मुलांस मात्र कांहीं वाक्यें व उत्तरें आणखी पाठ करावीं लागतात. बालोद्यान आणि वस्तुपाठ यांची अशी थट्टा उडविण्यापेक्षां तीं शिक्षकांच्या खुषीवर आणि योग्यतेवर ठेवलीं तर खरोखर मोठा उपयोग होईल.ज्या शिक्षकांस किंवा परीक्षकांस गुलामांप्रमाणें बालोद्यानाच्या पुस्तकांच्या आणि वस्तुपाठांवरील पुस्तकांच्या तंत्रानें चालावें लागतें त्यांनीं शिक्षणाच्या या दोन पवित्र वाटा पिटाळाव्या कां ? या कामीं सरकाराच्या विद्याखात्याची विनाकरण घाई होत आहे व त्यामुळें बालोद्यान व वस्तुपाठ यांविषयीं लोकांचे मनांत अनादर उत्पन्न होत आहे.

## फ्रोबेलियन शिक्षणपद्धति.

फ्रोबेलियन शिक्षणपद्धति लहानपणीं तरी फार हितावह यांत शंका नाहीं. प्राथमिक व दुय्यम दोनही शिक्षणक्रम फ्रोबेलियन तत्त्वानुसारें ठरविल्यास आजच्या शिक्षणक्रमांतील बरेच दोष मावळतील, आणि आमच्या पुढील पिढ्यांच्या स्मरणशक्तीबरोबर इतर शारीरिक—मानसिकशक्तींचा प्रमाणशीर विकास होऊन मुलें स्वावलंबी होतील असा संभव आहे; पण सध्या तसें होण्याची आशा दिसत नाहीं. फ्रोबेलसाहेबांनीं ठरविलेल्या देणग्या जशाच्या तशा शब्दशः इकडे आणून त्यांची कवाईत मुलांकडून घेणें म्हणजे बालोद्यान—शिक्षणपद्धति असा आज बहुतेकांचा समज दिसतो, पण तो चुकीचा असावा असें वाटतें. ' व्यक्तिभेद ' आणि ' सामान्य जातिगुण ' या दोहोंचाही बरोबर परिपोष करून व्यक्तींच्या मनोधर्माचें विशेष न गमावितां त्यांचा विकास घडवून आणणें आणि अनेक व्यक्तींच्या सहव्यापारानें मनुष्यजातीच्या सामान्य मनोधर्मांचीही त्याबरोबरच जोपासना करणें हा बालोद्यान शिक्षणपद्धतीचा दुहेरी हेतु आहे. मुलांच्या अंगच्या शक्ति त्यांच्या एकेकट्यांच्या खटपटीनें कांहीं वाढतात; व कांहीं तीं एकमेकांच्या संगती एकमेकांच्या साहाय्यानें आपापले व्यापार करीत असलीं म्हणजे वाढतात. बऱ्याच मुलांना एकमेकांच्या संगतींत आनंद वाटतो. जन्मतः एकलकोंड्या वृत्तीचीं मुलें नसतात असें नाहीं.पण तशीं विरळा.तेव्हां त्यांना एकमेकांच्या संगतींत ठेवून त्यांच्या समाजपोषक मनोवृत्ति दृढ करावयाच्या आणि सगळ्यांच्या हातभारानें काम उठवायाचा अभ्यास

त्यांना करूं द्यावयाचा. तसेंच आपलें दुसऱ्यावांचून नडतें कसें, कोठें व किती हें त्यांच्या प्रत्ययास आणून देऊन त्यांना उपदेशावांचूनच संहतिप्रिय आणि परादरशील बनवावयाचें. आपल्या रागलोभांनीं आपलें नुकसान आणि सगळ्यांचा विरस होतो या अनुभवानें त्यांना शहाणें करून सोडून म्हणजे सर्वांच्या एकोप्यानें सर्वांस बरोबर व्यवहार करावे लावून त्यांना व्यवहारज्ञान शिकवावयाचें, हा बालोद्यान पद्धतीचा अन्य-सापेक्ष उद्देश आहे.केवळ व्यक्तीपुरता असाही त्या पद्धतीचा उपयोग आहे. हात, पाय आणि शरिरांतील स्नायू, यांच्या व्यापारांस व पंचेंद्रियांच्या व्यापारांस मुक्तद्वार ठेवून मुलांच्या अंगांतील जीवनपोषक तत्त्वांना खुलें खेळूं द्यावयाचें, आणि अशा रीतीनें त्यांच्या नैसर्गीक बलास अभ्यास घडवून वृत्ति–मति–प्रेरणांचा प्रादुर्भाव आणि परिपोष करावयाचा; आपण कर्तृत्वशाली आहोत; आपल्या मणगटांत, अंगांत आणि डोक्यांत, सामर्थ्य, बळ आणि युक्ति आहे; आपल्या भोंवतालच्या विश्वापुढें अगदींच निमूटपणें न वंगतां त्यावर आपली छाप बसविणें आपणांस शक्य आहे असें त्यांचें त्यांस समजूं लावावयाचें. जुन्याची मोड करण्याच्या प्रवृत्तीबरोबर मुलांच्या अंगांत गुप्त असलेली नव्याची जोड करण्याची शक्ति, ही उदित करावयाची; तिचीच योजना त्यांस वरचेवर करणें भाग पाडून मोडण्यांतल्या आनंदापेक्षा मांडण्यांतील व जोडण्यांतील आनंदच त्यांस विशेष आवडेसा करावयाचा. याप्रमाणें त्यांच्या शारीरिक-मानसिक शक्तींचा उपयोग त्यांस शिकवून निसर्गाची-सृष्टि-स्थिति-लय शक्ति त्यांच्या अंगीं असल्यामुळें त्यांच्या मोठेपणाचें भान त्यांचे हृदयांत स्फुरूं द्यावयाचें आणि स्वावलंबन-नवीनकर्तृत्व व दृढनिश्चय या गुणांचें बीं पेरावयाचें. असा दुहेरी फलभार बालोद्यानांत सिद्ध करावयाचा असतो. बालोद्यान आणि वस्तुपाठ या सुरधेनु आहेत. या कामदुघा आहेत. मात्र यांचें दोहन करणारे गोप आणि दुग्ध प्राशन करणारे बालगोपाल यांच्या योग्य हवेत. नाहीं तर वोढाळांप्रमाणें त्यांच्या गळ्यांत लोढणें आणि त्यांच्या वाटेस जाणाऱ्यांच्या वांट्यास शिंगांचा मार असें व्हावयाचें. सध्या तरी असें होण्याची जबरदस्त भीति आहे.

'बालोद्यान' व 'वस्तुपाठ' यांचें शिक्षण सध्या इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतरांवरून होतें. आमचें शिक्षण जर कधीं फलदायी व्हावयाचें असेल तर त्याचा व असल्या भाषांतराचा कायमचा काडीमोड झाला पाहिजे. इंग्रजींतील या विषयावरील ग्रंथसामग्री आमच्या शिक्षकांच्या परिचयाची असणें अवश्य आहे.परंतु आमचें शिक्षण आमच्या येथील मुलांचा आणि कालदेशवर्तमानाचा विचार रात्रंदिवस करणाऱ्या स्वतंत्र डोक्याच्या माणसांच्या हातून–नाहीं तर त्यांच्या देखरेखीखालीं झालें पाहिजे. त्यांत भाषांतरें नकोत, पुस्तकें सुद्धा नकोत. आमच्या मुलांच्या शिक्षकांस मुलांत खेळूं द्या, मुलांत वावरूं द्या, स्वतः फिरून मुलेंच होऊं द्या आणि मुलांच्या मनाला आणि प्रकृतीला जुळेल त्याप्रमाणें शिक्षणाचे धडे आणि अभ्यासाचा क्रम ठरवूं द्या; आणि हळू हळू आपल्या अनुभवाचें टिपण ठेवून तें विस्तारानें शिक्षकवर्गाच्या पुढें ठेवूं द्या; म्हणजे आमचे शिक्षणक्रम, ज्ञानाचे जीवंत झरे होतील आणि आमचीं बालोद्यानें खरोखरींच मुलांच्या बागा होतील. आमचे वस्तुपाठ तोंडपाठ होण्याचे ऐवजीं सम्यगवगत ज्ञानाचे भाग होतील.

## देशभाषांची उपेक्षा.

( ३ ) आमच्या शिक्षणक्रमांतील तिसरा दोष त्यांत देशभाषांच्या अभ्यासाची व्हावी तशी सोय नाहीं हा होय. हा दोष किती मोठा आहे हें सांगणें कठिण आहे. या दोषाचा दुष्टपणा फुगवून सांगणें शक्य नाहीं. इंग्रजीकडे ह्मणजे दुय्यम शिक्षणाकडे जाणाऱ्या मुलांचा देशभाषेशीं परिचय सारा चार वर्षांचा. सात वर्षांचा नांवाला ! इंग्रजी शाळांत पहिल्या तीन यत्तांत देशीभाषांचा अन्तर्भाव आहे; परंतु शाळेच्या पांच तासांपैकीं दोन तास इंग्रजीला गेल्यावर बाकीचे तीन तास इतिहास, भूगोल, चित्रकला, कवाईत, अंकगणित, मोडी-बाळबोध व इंग्रजी अक्षरलेखन आणि देशभाषा इतक्या विषयांस वांटून द्यावयाचे असतात हें लक्षांत ठेवलें ह्मणजे देशभाषेच्या वांट्यास त्यांतला किती वेळ येत असेल याचा विचार कोणासही करतां येण्यासारखा आहे. या नऊ विषयांत तीन तासांची वांटणी करतांना गणिताला सबंध एक तास द्यावा लागतो, व अक्षरलेखनास तसाच एक जातो. बाकी राहिलेल्या एक तासांत इतिहास—भूगोल—चित्रकला—कवाईत—आणि देशभाषा यांनीं चैन करून घ्यावी ! त्यांत देशभाषांतील गद्य—पद्य—व्याकरण—शब्दसिद्धि—भाषणचमत्कार, काय हवें तें, हवें तितकें, करून घ्यावें, कोणाची ना नाहीं ! पहिल्या चार वर्षांत मुलांचें वय लहान—त्यांचा वकूबच कमी म्हणून मुलांचा देशभाषांचा अभ्यास होत नाहीं. आणि पुढच्या ह्मणजे इंग्रजी शाळांतील तीन वर्षांत वेळाची चंगळ ! म्हणून होत नाहीं. मिळून देशभाषांवर सध्याच्या शिक्षणक्रमांत बहिष्कारच आहे ह्मणावयाचा. असें असतांही देशभाषांच्या उपेक्षेबद्दल सेनेटच्या पोट—कमिटींत तक्रार केली असतां आमच्या सध्याच्या विद्याखात्याच्या शिरोमणींस ती खपली नाहीं असें म्हणतात. त्यांच्या मतें इंग्रजी शाळांतील पहिल्या तीन यत्ता धरून एकंदर सात वर्षे देशभाषांच्या अभ्यासास, विद्याखात्यानें ठरविलेल्या यत्तापत्रकानें दिलीं आहेत, आणखी काय पाहिजे ! खरेंच आहे ! आणखी काय पाहिजे ? जर्मनींत प्राथमिक आणि दुय्यम शाळांत असा वर्ग नाहीं कीं, जेथें जर्मन भाषेस मुख्य मान मिळत नाहीं—आठवड्याच्या प्रत्येक दिवशीं एक तास तरी मिळत नाहीं. अगदीं वरच्या यत्तांत सुद्धां म्हणजे ज्या वर्गांतील मुलांचें वय सोळापासून अठरा वर्षांचें असलें पाहिजे असा निर्बंध आहे तेथें सुद्धां आठवड्यांतून निदान चार तास जर्मन भाषेस मिळतात. कोणत्याही देशांत मुलाला जर कांहीं शिकविणें अवश्य असलें तर ती त्याची जन्मभाषा होय. ती भाषा म्हणजे तो व त्याचे पूर्वज, वर्तमान व भूत, तो व त्याचे शेजारी, तो व त्याचा समाज, यांचें एकत्व ठरविणारें नातें असतें. महाराष्ट्रांतील प्रत्येक मुलास महाराष्ट्राची भाषा शिकावावयाची नाहीं तर काय शिकावावयाचें ? आमच्या अंगांत जसें आमच्या सर्व पूर्वजांचें अंशतः वास्तव्य आहे, त्याचप्रमाणें आमच्या जन्मभाषा म्हणजे आमच्या पूर्वजांच्या अंतरात्म्यांचे निःश्वास आहेत. त्यांचे विचार, त्यांचे विकार, त्यांचे राग, त्यांचे लोभ, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्या प्रेमाचे धागे, त्यांच्या कल्पनांचे तरंग, त्यांच्या बुद्धीचें वैभव, त्यांच्या प्रतिभेचें तेज, त्यांच्या मनाच्या भराऱ्या, त्यांच्या हृदयांच्या उड्या, त्यांच्या स्नायूंतील स्फुरण, त्यांच्या मणगटांतील जोर, त्यांच्या अभिमानाचें सार, त्यांच्या धर्माचे प्राण, त्यांच्या भक्तीचे भाव, जें जें कांहीं त्यांचें होतें, त्या सर्वांनीं त्या खचलेल्या आहेत. आम्हांस आमच्या

पूर्वजांशीं बांधून टाकणारे ज्ञानरज्जू हे ! हे तोडण्याचा प्रयत्न जो शिक्षणक्रम करतो तो आमचा घात करणारा होय. आमच्या पूर्वजांशीं आमचा एक जीव करण्याचें साधन आमच्या भाषेशिवाय आतां दुसरें नाहीं. आमच्या भाषेचा अभ्यास ह्मणजे पूर्वजांशीं संवाद होय. तो जितका होईल तितका थोडा. त्याशिवाय आमचें शिक्षण कधींच पुरें म्हणतां येणार नाहीं. आमचे अंगांत ज्यांचें रक्त खेळत आहे त्यांचे उद्गार, त्यांचेच विक्रमशाली शब्द आणि तेजस्वी विचार आमच्या तोंडांत आणि चित्तांत खेळले पाहिजेत. शेक्सपिअरची, मिल्टनची, वेलिंग्टनची, नेल्सनची, म्हणून जसा इंग्रजी भाषेचा इंग्रजांस अभिमान आणि तिच्या अध्ययनाची गोडी, तशीच ज्ञानेश्वराची, एकनाथाची, तुकारामाची, पंडितांची, पंतांची, शिवाजीची, रावबाजीची, नानाफडनविसाची, महादजी शिंद्याची जी मराठी भाषा तिचा आम्हां महाराष्ट्रीयांस अभिमान वाटला पाहिजे, तिचें अध्ययन आम्ही आवडीनें केलें पाहिजे. आणि आमचीं मुलें तिचा अभ्यास करतात कीं नाहीं, आमच्या शाळांत तिचा अभ्यास होतो कीं नाहीं तें आह्मी आवर्जून पाहिलें पाहिजे. जर्मनीच्या शिक्षणक्रमांतून जर्मन भाषेस, इंग्लंडांतील शिक्षणक्रमांतून इंग्रजीस हद्दपार केलें, तर जर्मनांस आणि इंग्रजांस काय वाटेल ! मग आमच्या जन्मभाषेस आमच्या शिक्षणक्रमांतून फांटा कां ? देशभाषा म्हणजे राष्ट्रीय जीविताचा प्राण होय. तिची हयगय म्हणजे राष्ट्रीय जीविताची हयगय होय. आमचें खाणेंपिणें, पोषाक करणें इंग्रजी होवो हवें तर! पण आमच्या जिव्हाळ्याच्या माणसांशीं आमचें बोलणें—अंतरंग उघडें करणें—हीं इंग्रजीच होऊं देण्यास आज तरी आमची तयारी नाहीं. आम्ही आपल्या कुळाचें नांव टाकण्यास जसे राजी होणार नाहीं, तशीच आह्मीं आपली भाषा टाकण्यास राजी होतां नये. जन्मभाषेचा पाश तोडून आम्ही काय करणार ? ना देश, ना गोत, ना राष्ट्र, असें आम्हांस व्हावयाचें आहे काय ? सुकाणूं उडून गेलेल्या गलबताप्रमाणें संसाराच्या अफाट दर्यांत मायापाशहीन होऊन, आम्हांस वारा आणि लाटा लोटतील तिकडे वहावयाचें आहे काय ? विद्याखात्यास तरी आमची अशी स्थिति करावयाची आहे काय ? आज आमचा व इंग्रज प्रभूंचा संबंध जुळला आहे, त्यामुळें आम्हांस आमच्या प्रभूंची भाषा आणखी शिकावी लागेल हें बरोबर आहे. परंतु ती शिकण्यासाठीं आह्मीं स्वभाषेसही मुकावें काय ? तसें करण्यापासून आम्हांस काय लाभ ? इंग्रजी सारस्वतांत ज्यांचा पूर्वकाल रसरसलेला आहे त्यांचा तो पूर्वकाल आमचा ह्मणणें, ह्मणजे आमच्या स्वतांच्या पूर्वजांस सोडून देऊन वेलिंग्टनास आणि शेक्सपीअरास पूर्वजांचे स्थानीं बसविणें आह्मांस पतकरेल काय ? तसें करणें शक्य आहे काय ? क्लाइव्ह साहेबांचे पोवाडे वाचून इंग्रज छाव्यास चढणारें स्फुरण आह्मांस चढणें शक्य आहे काय ? मग इंग्रजीच्या नादास लागून देशभाषांची उपेक्षा कां ? देशभाषांच्या अभ्यासाबरोबर इंग्रजी शिका; परंतु देशभाषेस सोडूं नका. आमच्या शिक्षणक्रमांत खालपासून वरपर्यंत ‘ ओनाम्या ’ पासून ‘एम.ए.’ पर्यंत देशभाषांचा अंतर्भाव होईल तो सुदिन. पण तसें होईपर्यंत निदान प्राथमिक व दुय्यम शाळांत तरी त्यांना अग्रस्थान मिळालें पाहिजे.

### शिक्षण फळ धरीत नाहीं.

केवळ मनोवृत्तीची आणि अभिमानाची बाजू सोडून विचार केला तरीही देशभाषां-

ऱ्या अभ्यासाची योग्य तितकी व्यवस्था आमच्या शिक्षणक्रमांत नाहीं हा फार मोठा दोष, फार मोठा कमीपणा आहे असेंच दिसून येईल. मला वाटतें सध्यांच्या शिक्षणक्रमाचा वांझपणा पुष्कळ अंशीं या कमीपणाचेंच फळ आहे. भाषा हें ज्ञानवाहन होय. भाषा चांगली समजत असल्यावांचून ज्ञानाचें ग्रहण होत नाहीं. इंग्लंडांत, जर्मनींत, अमेरिकेंत विद्या जीं फळें देते तीं आमच्या येथें ती देत नाहीं. आमच्या येथील शिक्षण निरुपयोगी होतें, फळ धरीत नाहीं—मेल्यासारखें पडतें, असा नेहमींचा आक्षेप आहे. आणि तो कांहीं अंशीं खरा आहे. त्याचें एक मुख्य कारण माझ्या मतें देशभाषांची उपेक्षा हेंच आहे. ज्ञानवाहन जी भाषा ती बरोबर अवगत झाल्यावांचून कितीही वर्षें अध्ययनांत घालविलीं तरी ज्ञानसंपादन होतच नाहीं. आमच्या शिक्षणक्रमांत देशभाषांची हेळसांड झाल्यामुळें आमच्या मुलांस जन्मभाषा बरोबर समजत नाहींत.मराठींत बोललेलें किंवा लिहिलेलें यथार्थपणें कळतें अशीं मुलें कॉलेजांतही थोडीं असतात. मराठीचें इंग्रजी भाषांतर शिकविण्याचें काम मीं कांहीं वर्षें केलें आहे. प्रवेशपरीक्षेस जाणाऱ्या मुलांस मराठी वाक्यें कळत नाहींत हें मला अनुभवानें माहीत आहे. जन्मभाषेची अशी स्थिति असल्यावर जन्मभाषेच्याद्वारेंच शिकलेल्या इंग्रजीची काय स्थिति असेल तें सांगणें नको. मराठी समजत नाहीं, इंग्रजी त्याहूनही कळत नाहीं. त्यामुळें आमच्या मुलांकडे ज्ञान वाहून आणणाऱ्या नळ्या नाहींत असें होतें. मराठी समजत नाहीं म्हणून मराठींत सांगितलेलें समजत नाहीं. व इंग्रजी त्याहूनही समजत नसल्यामुळें इंग्रजींत सांगितलेलें समजणें अशक्यच असतें. मुलांना कविता किंवा गद्याचा एखादा भाग शिकवीत असतां ‘ सर हें इंग्रजींत समजलें, मराठींत नीटसें समजलें नाहीं, आतां मराठींत सांगा,’ असे मुलांचे उद्गार पुष्कळांनीं ऐकले असतील. याचा अर्थ, ‘ समजणें ’ म्हणजे कांहीं शब्दध्वनी आपलेसे करणें, पुनः काढतां येतील इतके धरून ठेवतां येणें, अशीच मुळीं आमच्या मुलांची समजूत असते. शब्दांच्या अंतरीं असणारा अर्थ, मारुतीला दिलेल्या हिऱ्याच्या हारांतील मण्यांमधील रामाप्रमाणें, त्यांना कोठेंच सांपडत नाहीं. मारुतीला रामहीन हिऱ्यांचा उपयोग नव्हता, आमच्या मुलांना अर्थहीन शब्दांचा परीक्षेंत उपयोग होतो ! अवरंगझेबानें ‘झीजिया’ कर बसविला येवढें लिहिलें म्हणजे इतिहासाच्या त्या प्रश्नांत पास होण्यास हरकत नसते; मग ‘ झीजिया ’ आणखी ‘ कर ’ दोनही शब्दांनीं कशाचेंच ज्ञान न होईना ! आमच्या मुलांच्या शिक्षणाची ही स्थिति अगदीं मराठी यत्तेपासून इंग्रजी सातव्या यत्तेपर्यंत अशीच असते हें कोणाही डोळस पहाणाराच्या लक्षांत येईल. औटकीं शिकून शिकून मुलांचा जीव हैराण झाला तरी ‘ औट ’ ची किंमत त्यांना कळत नाहीं. तीसपर्यंत पाढे आणि आकरकीं एकोत्रीं शिकण्यांत चार वर्षें घालविल्यावरही गुणाकारांत प्रत्येक एकेरी अंकानें गुणल्याखेरीज उदाहरण करतां येत नाहीं, व वर्गमूळांचीं उदाहरणें बरोबर करणारीं मुलें थोडींच निघतात. चारशें वर्षांपूर्वीचा अदिलशहा तोंडीं असला तरी दोन वर्षांपूर्वीची आठवण नसते. कोणता हवा तो विषय घ्या—त्याच्या शब्दांची ओळख आमच्या मुलांस झालेली असते,त्या विषयाची मुळींच नसते असेंच अनुभवास येईल.

देशभाषांचा अभ्यास नीट न झाल्यामुळें आमच्या मुलांस देशभाषांत लिहिलेलें तंतोतंत कळत नाहीं, आणि त्यामुळें त्यांना खऱ्या आणि शांत बुद्धीनें लिहिलेल्या ले-

त्यांपेक्षां खोडसाळ लेखच बरे वाटतात. त्यांची अभिरुचि व्हावी तितकी संस्कृत होत नाहीं. परंतु ही हानि एवढी मोठी म्हणतां येत नाहीं. आज आमच्या मुलांच्या वयांतील बहुतेक उत्तम काळ शब्दग्रहणाच्या मृगजळाच्या पाठलागांत जातो या हानीएवढी दुसरी हानिच नाहीं. मुलांच्या अंगांत जोम आहे—हिंमत आहे तोंवर त्यांना रोज नवनवे चमत्कार दिसले आणि त्यांचें अवलोकन करून त्यांतील ज्ञानाचा शोध लावण्यांत—आणि तें आपलेंसें करण्यांत त्यांच्या नैसर्गिक जिज्ञासेला आणि ग्राहकतेला शिक्षण मिळालें म्हणजे त्यांस मिळालेला प्रत्येक ज्ञानकण रुजत घातलेल्या बीजासारखा मूळ धरतो आणि त्याचा फलभार कालान्तरानें फार मोठा होतो. खरें ज्ञान नुसतें पडून रहावयाचें नाहीं. तें मनःसृष्टींत चळवळ उत्पन्न करतें. मागच्या संचिताला दृढ तरी करितें, नाहीं तर त्याचें संशोधन करण्याचें काम करतें. त्यांतील किल्मिष काढून टाकून तें नवीनाशीं मिळून मिसळून जाण्यास योग्य बनवितें. असलें जीवंत ज्ञान विपुलप्रसव आणि प्रभावशाली व्हावयाचेंच. पण आज आमच्या मुलांना मिळणारे ज्ञानाचा त्यांचेवर काय परिणाम होतो ? ज्योतिषशास्त्रांतील पृथ्वीच्या वार्षिक प्रदक्षिणेचा धडा शिकून आल्यावर मुलाला मुख्य प्रश्न पडतो तो हा कीं, या गतीला रेव्होल्यूशन म्हणावयाचें कीं 'रोटेशन' म्हणावयाचें ? त्याला पृथ्वीच्या प्रदक्षिणेची किंमत नसते. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरो किंवा सूर्य पृथ्वीभोंवती फिरो. त्याला त्याचेपेक्षां 'ॲन्युअल रेव्होल्यूशन' ( वार्षिक प्रदक्षिणा ) आणि 'डायर्नल रोटेशन' ( दैनंदिन गति ) या शब्दांच्या व्याख्या पाठ होण्यांतच विशेष अर्थ वाटतो. आमच्या मुलांचा शब्दग्रहणाकडे कल किती असतो याचा उत्तम मासला भूमितींत मिळतो.' 'भूमिती—हा विषय केवळ अनुमानगणिताचा; यांत दिलेल्या गोष्टींवरून निघतें काय व तें कसें, हें पहावयाचें असतें किंवा तें काढावयाचें असतें. अमुक एका ठिकाणापासून आरंभ केल्यास सांखळीच्या दुव्याप्रमाणें शेवटच्या सिद्धान्तास जाऊन पोंचण्यांत होणारा बुद्धीचा—अनुमान—प्रमाणबुद्धीचा अभ्यासच भूमितीचा विशेष होय व त्याचीच किंमत आहे. पण तो आमच्या मुलांपैकीं कितीना होतो ? ज्ञानवाहनच आमच्या येथें भलतें आहे. सारांश, देशभाषांची आमच्या हल्लींच्या शिक्षणक्रमांत होणारी उपेक्षा आम्हांस अक्षरपंडित परंतु ज्ञानशून्य करण्यास कारण होते.

इंग्लंड, जर्मनी, वगैरे देशांत देशभाषा अभ्यासपत्रकांत असून सर्व विषय शिकविण्याचें द्वारही असतात, त्यामुळें त्यांचा दुहेरी अभ्यास होतो. ग्रंथवाचनानें अभियुक्त ग्रंथकारांशीं परिचय होऊन भाषेचा इतिहास, व्याकरण, शब्दसिद्धि वगैरेंचा अभ्यास यत्तेप्रमाणें होतो. आणि सर्व विषय देशभाषांचेद्वारेंच शिकवीत असल्यामुळें मुलांचे प्रश्न, वादविवाद आणि शिक्षकांचें वक्तृत्व सर्व त्या भाषांच्या अध्ययनास पोषक होतात. आमचे येथें सर्वच उलटा प्रकार आहे. देशभाषेस आमच्या यत्तापत्रकांतही असावें तेथें आणि तितकें स्थळ नाहीं. आणि आमचें दुय्यम प्रतीचें म्हणजे महत्त्वाचें सारें शिक्षण परभाषेच्याद्वारें होतें. त्यामुळें आम्हांस हेंही नाहीं आणि तेंही नाहीं अशी स्थिति होते. परभाषेचें वाहन असल्यामुळें ज्ञानाला आमच्याकडे यावयाला उशीर लागतो, त्रास पडतो, आम्हांला व्हावे त्यापेक्षां श्रम अधिक होतात. त्यामुळें आम्ही लवकर थकतों, आणि पुनः ज्ञानलाभ होत नाहीं तो नाहींच. बरें इंग्रजी तरी उत्तम यावें. तेंही

होत नाहीं. रोज दोन तासप्रमाणें सात वर्षे इंग्रजी शिकत असतां प्रवेश परीक्षेस जाणाऱ्या मुलांस एखाद्या आया किंवा बटलराइतकें-ही इंग्रजी येत नाहीं. प्रवेश परीक्षेंत इंग्रजींत नापास होणाऱ्या मुलांची संख्या पाहिली म्हणजे माझ्या ह्मणण्याची साक्ष पटेल. एकंदर संख्येपैकीं शेंकडा पन्नास तरी मुलें इंग्रजींत गळतात असा अनुभव आहे. असें कां व्हावें ? येथें झावियर कॉलेजांत जर्मन आचार्य आहेत, त्यांना सर्व शिक्षण येथें इंग्रजीच्याद्वारें द्यावें लागतें. ते तें तसें देतातही. आणि मला वाटतें आम्ही इंग्रजीच्याद्वारें शिकवीत असतां जितपत इंग्रजी बोलतों तितपत तेही बोलतात. पण आह्मी इंग्रजीच्या अभ्यासांत घालविलेला काळ आणि त्यांनीं घालविलेला काळ यांत महदंतर आहे. त्यांच्या शाळांत इंग्रजीला फार तर आठवड्यांतून चार तास मिळतात आणि तेही एकंदर शिक्षणक्रमांत तीन किंवा चार वर्षे मिळतात. असें असून त्यांच्या व आमच्या इंग्रजीच्या ज्ञानांत फारसें अंतर नसतें. याचें एक तरी कारण देशभाषांची आह्मी उपेक्षा करतों, आणि ते तिचाच मुख्यतः अभ्यास करतात हें असावें असें मला वाटतें. त्यांना दोन गोष्टी एकदम कराव्या लागत नाहींत. भाषाही शिकावयाची आणि ज्ञानही मिळवावयाचें. दोनही कामें एकदम करण्याच्या भानगडींत पडून ते दोनही हातचीं घालवीत नाहींत. ते देशभाषांचा प्रथम उत्तम अभ्यास करतात. मग देशभाषेच्याद्वारें उपयुक्त ज्ञान मिळवितात. आणि नंतर आन्तरराष्ट्रीय उपयोगाकरितां इंग्रजीचा अभ्यास करतात. तो करण्यास अर्थातच त्यांना फारसा काळ व श्रम लागत नाहींत. आम्हांला दोन कामें व तींही अवघड कामें एकदम व अवेळीं करावीं लागल्यानें आमची फारच त्रेधा उडते. यापेक्षां आमचें सर्व ज्ञानार्जन देशभाषांचेद्वारा होऊन मग आम्हीं नुसत्या इंग्रजीचा अभ्यास केला तर आम्हांस दोनही हल्लींपेक्षां चांगलीं साधतील आणि सहज साधतील ! श्रम थोडे पडून आमचीं डोकीं पिकून जाणार नाहींत. कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर, कै. केरूनाना छत्रे यांचीं उदाहरणें याच तऱ्हेचीं होत. प्रथम मराठी, गणित, संस्कृत वगैरेंचें जुन्या तऱ्हेनेंच अध्ययन करून मग ही मंडळी इंग्रजी शिकली. त्यांनीं इंग्रजीला आरंभ केला तेव्हां त्यांचें वय अठरा एकोणीस वर्षांचें होतें असें सांगतात. आणि त्यांनीं दोन तीन वर्षांत, इंग्रजींत जितकी प्रवीणता मिळविली, तेवढी आम्हांस दहा वर्षांच्या अभ्यासानेंही पुष्कळदा मिळत नाहीं. शिक्षणशास्त्राच्या मुख्य सिद्धातांपैकीं एक असा आहे कीं, मुलाचें चित्त एकाच वेळीं द्विधा होऊं देऊं नये. आणि विषय समजून घेतांना त्याला भाषा समजून घ्यावी लागूं नये. त्याचें सर्व लक्ष एका वेळीं एकाच विषयाचें ग्रहण करण्यांत गुंतलें पाहिजे. आमचें दुय्यम शिक्षण सर्व या सिद्धांताच्या अगदीं विरुद्ध होत असतें. आणि त्याचीं कडू फळें आज आम्ही इतके दिवस चाखून फेंकून देत आहों तरी अजूनही आम्हांस तो विषवृक्ष उपटून टाकण्याची अर्थात् भाषाग्रहण आणि ज्ञानग्रहण हीं वेगळीं करण्याची बुद्धि होत नाहीं ! आमच्या मुलांचीं शरीरें वठून आणि डोकीं पिकून गेलेलीं आम्हीं आपल्या डोळ्यांनीं पहातों, जिवापाड मेहनत करून परीक्षेंत आमचीं मुलें शेंकडा साठसाठांनीं नापास झालेलीं आम्ही पाहतों; जर्मनींत, इंग्लंडांत, अमेरिकेंत जेवढी ज्ञानाची पुंजी मिळवावयाला पांच किंवा सहा वर्षांपेक्षां अधिक काळ लागत नाहीं तेवढी ज्ञानाची तर नाहींच, पण ज्ञानहीन शब्दांचीही पुंजी

मिळवावयाला आमच्या मुलांचीं निदान अकरा वर्षें वेंचलेलीं आम्हांस दिसतात; तरी आह्मी त्याचा विचार करीत नाहीं ! आणि आमच्या सरकारासही या स्थितीचें निदान करून त्यांतील जो मुख्य दोष तो नाहींसा करण्याची बुद्धि होत नाहीं ! हें आमचें दांडगें व निष्ठुर भवितव्य आहे म्हणावयाचें दुसरें काय ? विश्वविद्यालयीन परीक्षांच्या निकालांत नापासांची संख्या येवढी जंगी पाहून आमच्या मायाळू व्हाइसरायांची दृष्टि तिकडे गेली आणि ही संख्या कमी करण्याचा उपाय म्हणून त्यांनीं 'युनिव्हर्सिटीज' कायदा केला. पण रोगाचें मूळ एक आणि औषध भलतेंच,असेंच हें झालें नाहीं काय ? नापासांची संख्या मोठी असण्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांतील प्रमुखांपैकीं एक ज्ञानवाहनाचा परकेपणा हें आहे. शिक्षणद्वार इंग्रजी असल्यामुळें आधीं बऱ्याच विद्यार्थ्यांस विषयग्रहणच होत नाहीं. आणि ज्यांना थोडेंबहुत झालेलें असतें त्यांतील बऱ्याचजणांस आपलें ज्ञान इंग्रजींत मांडतां येत नाहीं, त्यामुळें त्यांना नापास व्हावें लागतें. तेव्हां देशीभाषांची उपेक्षा हा सध्याच्या शिक्षणक्रमांत अत्यंत मोठा दोष आहे असें मी म्हणतों.

### कठिणसुगमतेकडे लक्ष कमी.

( ४ ) आमच्या अभ्यासपत्रकांत विषयांच्या कठिणसुगमतेचा व्हावा तसा विचार झालेला नाहीं. मुलाला पूर्णांकाची चांगलीशी कल्पना येऊन तो पूर्णांक गणित करूं लागण्यापूर्वींच आह्मी त्याला अपूर्णांकाचे पाठ देतों. अंकांची किंमत कळण्यापूर्वींच आह्मी त्याचेकडून पाढे घोकून घेतों. साधी बेरीज ठाऊक होण्यापूर्वींच बेरजेचें संक्षिप्त स्वरूप जो गुणाकार तो, पाढ्यांचे रूपानें पूर्णांकाचा आणि उजळणीचे रूपानें अपूर्णांकाचा, ज्ञानहीनपणें तयार करवितों. शिकणें म्हणजे ज्ञान मिळविणें नसून कांहीं ध्वनिमाला यथानुक्रम लक्षांत ठेवणें आणि मागतील तेव्हां बाहेर काढणें असा आमच्या मुलाचा ग्रह आतांच होतो. मूर्त वस्तूंशीं त्याची ओळख होण्याचे आधींच अमूर्त वस्तूंचीं खेळणीं आम्ही त्याला जुलमानें देतों. नाणीं, वजनें—मापें यांचा उपयोग त्याला ठाऊक होण्यापूर्वींच आम्ही त्याचेकडून विविधाचीं उदाहरणें करवितों. इतिहासाचें असेंच आहे. काल, परवां, एक आठवड्यापूर्वीं, एक महिन्यापूर्वीं, एक वर्षापूर्वीं, काय झालें याचें स्मरण ठेवण्याची ताकद त्याचे अंगीं येण्यापूर्वींच सहाशें वर्षांपूर्वींचा अल्लाउद्दीन आणि तीनशें वर्षांपूर्वींचा अकबर व शिवाजी यांची कथा त्याला सांगतों. इतिहासाचें ज्ञान हें कालाची अभंग संगति व संतति मुलांच्या मनांत भरविण्याकरितां, भूतवर्तमानांचा कारणकार्यभाव ओळखतां येण्याकरितां, प्रत्यक्षाप्रमाणें अप्रत्यक्ष संसाराचें चित्र पाहून त्यावरून येणाऱ्या अनुभवानें शहाणे होण्याकरितां मुलांस द्यावयाचें असतें. आठ नऊ दहा वर्षांच्या मुलांस दोन वर्षें आणि दोनशें वर्षें यांतील अंतर प्रतीत होणें जर फारसें शक्य नाहीं, तर त्यांना अल्लाउद्दीन आणि औरंगजेब यांच्या कथा कां सांगतां ? त्यांना प्रस्तुतावरून हळूहळू मागें न्यावें ते दोनशें वर्षांच्या किंवा सातशें वर्षांच्या मागून पुढें कां आणितां ? परंतु आमच्या यत्तापत्रकांत याचा विचार कोठें केला आहे ? भूगोल, व्याकरण व भाषा या विषयांची हीच स्थिति आहे. स्थलावकाशाचे संबंध व धर्म नीट अवगत व्हावे, त्यांचें साहाय्य संसारांतील व्यवहारांत स्थानमाहात्म्य ठरवितांना व्हावें, यासाठीं भूगोल शिकावयाचा. पण तो शिकण्याला आरंभ होण्यापूर्वीं मुलाला सभोंवतालच्या वस्तूंचे

स्थानधर्म आणि वस्तूंच्या स्थानान्तरानें आसमंतांत होणारा फरक समजे, व तो टिपतां येई, इतकी त्याच्या समजुतीची वाढ झाली पाहिजे. जर्मनींत नऊ वर्षांपर्यंत मुलाला भूगोल हा विषयच नसतो. अकरा बारा वर्षांपासून खऱ्याखऱ्या भूगोलाला सुरुवात होते असें दिसतें. आमच्या येथें आठव्या वर्षापासूनच भूगोलांतील शहरें पाठ करण्याचा घाणा सुरू होतो आणि 'पं' च्या खालीं तीन बोटें लाहोर याप्रमाणें नकाशा पाठ करण्याचाही आरंभ होतो.

व्याकरण व भाषा यांच्या अभ्यासास बहुतेक अक्षरओळखीपासूनच उपक्रम होतो म्हणावयास हरकत नाहीं. आठ वर्षांच्या मुलाला वाचलेल्या भागाचा आणि शब्दांचा अर्थ समजावा लागतो. प्रत्येक शब्दाचा अर्थ सांगतां येणें किंवा बरोबर समजणें मला वाटतें मोठमोठ्या माणसांस सुद्धां कठिण जातें. आठ वर्षांच्या मुलांस शब्दांचा अर्थ विचारणें म्हणजे घोकंपट्टीस उत्तेजन देणें होय. 'आई' म्हणजे कायरे? 'माता,' 'ब्राह्मण' म्हणजे रे? 'विप्र,' या पोपटपंचीचा उपयोग काय असेल कोणास ठाऊक? एकंदर धड्याचा मथितार्थ मुलाला समजला आणि त्याला उच्चार स्पष्ट व स्वच्छ करतां आला म्हणजे या वयाच्या मुलाचा भाषेचा अभ्यास पुरेसा झाला असें समजण्यास कांहीं हरकत नाहीं. नवव्या वर्षीं मुलाला नाम, सर्वनाम वगैरे शब्दांच्या जाती ओळखाव्या लागतात हें मागें सांगितलेंच आहे. व्याकरणासारखा विषय तर बारा वर्षांच्या आंत मुलांना शिकविण्याचा प्रयत्नच करूं नये; पण आमच्या येथें तो नवव्या वर्षींच म्हणजे मराठी तिसऱ्या यत्तेंतच होतो. मुलाच्या बुद्धीची ऐपत आणि विषयाची कठिणता यांचा मेळ बसविणें हा अभ्यासपत्रकाचा विशेष गुण असतो. तो जेथें साधलेला नाहीं तेथें तें यत्तापत्रक व्यर्थ होय. त्यानें शिक्षणाला मदतीपेक्षां अडथळाच होतो व व्हावयाचा.

## सरसकट एकच शिक्षण.

( ५ ) आमच्या शाळांत सगळ्या मुलांना सरसकट एकच शिक्षण मिळतें. आमचें प्राथमिक शिक्षण जर्मनींतल्याप्रमाणें अगदीं साधें, मनुष्यमात्रास हवें इतकेंच असतें तर प्राथमिक शाळांचा शिक्षणक्रमही सगळ्यांस सारखा असलेला कदाचित् चालता; पण आमचें प्राथमिक शिक्षणही साधें नाहीं. मनुष्यमात्रास हवेत त्या विषयांपेक्षां बऱ्याच जास्त विषयांचा ह्मणजे दुय्यम शिक्षणांतील बऱ्याच विषयांचा त्यांत समावेश झालेला आहे. आणि आमचें दुय्यम शिक्षणही सर्वांस सारखेंच झालें आहे. जणूं काय आमचीं सर्व मुलें विश्वविद्यालयाच्या पदव्या मिळविण्यांतच आपला काळ घालविणार आहेत. त्यामुळें आमच्या शाळांतून बाहेर पडलेल्या तरुणांस कोठें तरी कारकुनीच्या जागेकरितां अर्ज करण्याखेरीज किंवा कायद्याचें मंथन करीत बसण्याखेरीज अन्य मार्ग रहात नाहीं. दुय्यम शिक्षण पुरें होऊनही आज आमच्या मुलांस 'काय करावें' 'कसें करावें' हा प्रश्न सोडविणें कठिण जातें. 'पुढें काय' तें त्यांचें त्यांना ठाऊक नसतें. कोठें तरी अर्ज करावा, मास्तरीची, कारकुनीची, कसली तरी नोकरी मिळाली तर पहावी, नाहीं तर उमेदवार राहून आपलें नशीब उघडण्याची वाट पहावी, असेंच त्यांना करावें लागतें. याचें कारण आमच्या शाळांनीं त्यांना एकाच तऱ्हेचें शिक्षण दिलेलें असतें. शिक्षणाचा फर्मा एक आम्हांस ठाऊक आहे. आणि तो कार-

कून तयार करणारा.कारकूनही त्यानें चांगलेसे तयार होत नाहींत म्हणा. जगांत करावयासारखे धंदे पुष्कळ आहेत व त्यांपैकीं आपल्याला सहज करतां येण्यासारखा अमुक आहे असें त्याच्या मनांत यावयालासुद्धां आमच्या शिक्षणांत कोठें वाव नसतो.जर्मनींत प्राथमिक शिक्षण मात्र एक तऱ्हेचें असतें. पण तें अमुकच तऱ्हेनें संपादिलें पाहिजे असें नसतें. दुय्यम शाळांत मुलगा घ्यावयाचा तो त्याला अक्षरओळख आहे कीं नाहीं, साधारण साध्या संख्यांचे हिशोब करतां येतात कीं नाहीं, येवढें पाहून घ्यावयाचा असतो. त्याला लिहितां यावें लागतें, वाचतां यावें लागतें, अगदीं साधे हिशोब यावे लागतात आणि त्याचें वय नऊ वर्षांचें असावें लागतें. इतकें पाहून मुलाला शाळेंत घेतलें म्हणजे तेव्हांपासून दोन तीन वर्षें त्याचें शिक्षण सामान्यतः सर्वांसारखेंच होतें. तथापि तेथील शाळाच इतक्या निराळ्या प्रकारच्या आहेत कीं, मुलाला कोणत्या शाळेंत घालावें हें ठरवितांनाच पालकाला मुलाचा पुढचा धंदा बहुतेक ठरवावा लागतो. कारण तो ज्या शाळेंत जाईल तेथला अभ्यासक्रम आणि इतर शाळांतील अभ्यासक्रम एक असत नाहींत- मीं मागें सांगितल्याप्रमाणें तेथें युनिव्हर्सिटीकरितां विद्यार्थी तयार करणाऱ्या शाळा वेगळ्या; कारकून वगैरे तयार करणाऱ्या वेगळ्या;व्यापार—उदीम वगैरेकडे जाणारीं मुलें तयार करणाऱ्या वेगळ्या; विदग्ध कलांपैकीं एखादी शिकून तींत प्रावीण्य मिळविणारांकरितां निराळ्या; वैद्यक, कायदा वगैरेकडे जाणारांकरितां वेगळ्या; उद्योगधंद्यांत लागणारे पदार्थ तयार करण्याचे कामीं नवीन शोध करणारांच्या निराळ्या; सुतार, लोहार, रंगारी, वगैरे होणारांकरितां, आणि व्यापारोपयोगीं, रसायन—पदार्थ—विज्ञान—शेतकी—भूगर्भसंपत्ति वगैरेंचा स्वतंत्रपणें अभ्यास करणारांकरितां शाळा वेगळ्या. या सर्व शाळांचा समावेश दुय्यम प्रतीच्या शाळांत होतो. सगळ्यांना सामान्य असे कांहीं विषय असतात. परंतु प्रत्येकीचे विशेष म्हणून वेगवेगळे विषय असतात. दुय्यम शाळा, युनिव्हर्सिटीकरितां विद्यार्थी तयार करणाऱ्या असोत किंवा इतर तऱ्हेच्या असोत, प्राचीन पंथी असोत किंवा अर्वाचीन पंथी असोत, जर्मनींत देशभाषेचा अभ्यास सर्व शाळांत प्राधान्येंकरून चालतो. देशभाषेच्या जोडीला प्राचीन पंथी शाळांत ग्रीक, लॅटिन येतें, अर्वाचीन पंथींत फ्रेंच, इंग्रजी येतें. बाकीच्या विषयांत मात्र निरनिराळ्या शाळांत विलक्षण वैचित्र्य दिसून येतें. कोठें भूगोल—भूगर्भास प्राधान्य मिळतें, तर कोठें हातकामाच्या शिक्षणास प्राधान्य मिळतें. ' शहरांचा, प्रांताचा व देशाचा, सामान्य इतिहास बहुतेक सर्व शाळांत शिकवितात, पण तो आमच्या इकडच्याप्रमाणें सातन् चार अकरा वर्षें शिकावा लागत नाहीं. दोन किंवा तीन वर्षें आठवड्यांतून त्यास दोन तीन तास दिल्यानें तेथें तो शिकून होतो. सामान्यतः अर्वाचीन पंथी शाळांत शास्त्रविषयांकडे विशेष लक्ष देतात. आमच्या येथें युनिव्हर्सिटीच्या परीक्षेखेरीज दुसरें कांहीं साध्य डोळ्यापुढें नसल्यामुळें किंवा शाळांनीं न ठेविल्यामुळें आमच्या शिक्षणांत रुचिभेदाला, उद्देशभेदाला, सामर्थ्यभेदाला, व्यक्तिभेदाला, वावच राहत नाहीं. आणि मुलगा संसारास प्रारंभ करण्याच्या वयांत आला तरी आपण कोण होणार आणि काय करणार हें ठरविणें त्याला कठीण होतें. कर्तव्याचा नवीणपणा नष्ट होतो. परस्वाधीनता फार वाढते आणि आह्मी सर्वस्वी पंगु, 'मुके—आंधळे—पांगळे—आणि थोटें' या वर्गांत साजण्यासारखे बनतों.

## शिक्षण व उपयोग यांची फारकत.

( ६ ) आमची पराधीनता वाढण्याचें कारण आणखी एक आहे. आम्हांला मिळणारें शिक्षण आणि ' व्यावहारिक ' उपयोग यांची आमच्या शाळांत सांगड घातलेली नाहीं. माझ्या मतें हा आमच्या शिक्षणांत अगदीं मूळभेदी दोष आहे. शिक्षणाचे उंची उंची हेतु कांहीं असले तरी प्रथम त्याचेयोगें मनुष्याला आपलें आयुष्यवर्धन आणि जीवितपोषण करतां आलें पाहिजे. काव्यसकरंदाचें सेवन करतां येण्यापूर्वीं संसारगद्याच्या वाळवंटांत त्याला सफलपणें दिवस कंठितां आले पाहिजेत. 'मी जगणार आधीं मग आपल्या जगण्याचा दुसऱ्याला उपयोग करणार' अशीच प्राणिमात्राची उपजत बुद्धि असते आणि तिचें समाधान प्रथम झालें पाहिजे. 'निर्वाह करतां येत नाहीं, पोटाची खळगी भरतां येत नाहीं, देहाची वाजवी भूक भागविण्याचाही मगदूर अंगांत नाहीं ' अशी ज्याची स्थिति त्याचे हातून देशाची कामगिरी काय होणार ! ज्ञानाचे नवे शोध काय लागणार ! आणि सरकाराची सेवा किंवा लोकांचें हित कसें साधणार कोण जाणे ! असंतुष्ट बी. ए. ची संख्या वाढल्यामुळें ते, एक राजकीय संकटच आहेत असें वाटल्यामुळें युनिव्हर्सिटी शिक्षणाच्या सुधारणेचें काम हातीं घेणाऱ्या नामदारांचें लक्ष जर आमच्या दुय्यम शिक्षणांतील या मुख्य दोषाकडे गेलें असतें तर बरें होतें. आज आमच्या मुलांस मिळणारें शिक्षण व्यवहारांत आणि संसारसंग्रामांत त्यांच्या कोठेंही उपयोगी पडत नाहीं. दुसऱ्या हेनरीची कारकीर्द तोंडपाठ असली आणि ' एलडोरेडो ' भूगोलाच्या अमक्या पानांत आहे हें आठवलें तरी त्यानें कंदील मोडला आहे तो नीट कोणापासून करून आणावा हें कांहीं समजत नाहीं. आमचे व्यवहार, संसारसमरांत आम्हावर येणारे प्रसंग, त्यांत टिकाव धरण्यास लागणारी सामग्री आणि आम्हांस मिळणारें शिक्षण यांचा मेळ बसला पाहिजे. आमच्या शिक्षणक्रमांत—दुय्यम शिक्षणक्रमांत व्यवहारोपयोगी शिक्षणाची तजवीज झाली पाहिजे. व्यवहाराला आज आम्ही नादान बनतों तसे न बनतां काव्येतिहासांतील रहस्य समजण्याचें थोडेंबहुत सामर्थ्य अंगीं असूनही निरस आणि रेताळ जगांतील व्यवहारांतही सुखानें नांदण्याचें सामर्थ्य आमचे अंगीं येईल असें आमचें शिक्षण झालें पाहिजे.

## शिक्षणशास्त्राच्या सिद्धान्ताची उपेक्षा.

( ७ ) आमच्या शिक्षणक्रमांत शिक्षणशास्त्राच्या सिद्धान्तांचेंही अवलंबन केलेलें दिसत नाहीं. त्या शास्त्राचे मुख्य सिद्धान्त असे आहेत कीं, ( अ ) मुलाला प्रस्तुतांतून अप्रस्तुताकडे, व्यक्तांतून अव्यक्ताकडे, ज्ञातांतून अज्ञाताकडे, दृश्यांतून अदृश्याकडे, आणि जडांतून अजडाकडे शिक्षणानें हळू हळू न्यावें व नेतांना शिकणारास कोलंबस बनवावें. ( आ ) शरीर आणि मन यांचें परस्पराश्रयाचें नातें सर्व शिक्षणांत कायम राहिलें पाहिजे. आणि ( इ ) मुलाला जे पाठ द्यावयाचे ते एकमेकाशीं गुंतविलेले असले पाहिजेत. आमच्या शिक्षणांत एका विषयाचा दुसऱ्याशीं संबंध नसतो, आणि ज्यांचा संबंध नसतो अशाच विषयांचा अभ्यास आम्हांस करावा लागतो. आमच्या तिसऱ्या यत्तेंत हंड्रेडवेटांचें उदाहरण हटकून असावयाचें. वास्तविक पहातां शारीरिक व मानसिक शक्तींचा आमच्या शिक्षणांत मिलाफ झाला पाहिजे. तो कोठेंच नाहीं. आमच्या हातांपायांस, प्रेरक प्रवृत्तींस आणि योजकतेस कोठेंच स्थळ नसतें. ( ई ) शिक्षणविषय आणि मुलाचें वय यांचें अ-

न्योन्य साधर्म्य असलें पाहिजे तें आमच्या येथें मुळींच नाहीं. ( उ ) दुसरें असें. भूक लागली म्हणजे खावें हा जसा शारीर शास्त्राचा नियम तसाच 'समजावें ' अशी इच्छा झाली म्हणजे ' समजून द्यावें किंवा समजावून द्यावें ' हा शिक्षणशास्त्राचा सिद्धान्त आहे. या सिद्धान्ताचें स्मरण आमच्या शिक्षणक्रमाला प्राय: तो उल्लंघितांना होत असावें. अमूक कोठें आहे हें समजण्याची मुलाला इच्छा होईल तेव्हां त्या अमक्याचा भूगोल त्याला शिकवावा. शरिराला अन्न नको असेल तेव्हां आणि नको असेल तितकें दिल्यानें शरिराला अपकारच व्हावयाचा. मुलाच्या मनाला नको असेल तेव्हां आणि नको असेल तें व तितकें ज्ञान दिल्यानें अपकारच झाला पाहिजे. अमक्या यत्तेंत अमुक विषय झाले पाहिजेत, येवढी एकच गोष्ट आमच्या यत्तापत्रकांच्या रचनाकालीं लक्षापुढें होती असें दिसतें. ज्ञानाची भूक लागल्याशिवाय ज्ञानाचा रतीब लावण्याचा आमचा परिपाठ आहे. आणि आमचा रतीबही ज्या पदार्थांचा असतो ते पदार्थ एकमेकांस मारक किंवा पाचक होणारे नसतात. भुईमुगाच्या शेंगा खाल्ल्यावर ताक पिण्याची आमच्या वाडवडिलांची चाल होती असें सांगतात. तींतील तत्व शिक्षणाधिकाऱ्यांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भुईमुगाचे दाणे तैलस असल्यामुळें त्यांतील तेलाचा किंवा चरबीचा अंश विराविण्यासाठीं—पचेसा करण्यासाठीं—ताकांतील अम्लाचा त्यावर प्रयोग करावयाचा. तसें आमच्या शिक्षणांत झालें पाहिजे. आमचा भूगोल, आमचा इतिहास, आमचें गणित आणि आमची भाषा हीं सर्व एकमेकांस पोष्यपोषक झालीं पाहिजेत. विशेषत: लहान मुलांच्या शिक्षणांत—म्हणजे प्राथमिक शिक्षणांत तरी सध्याची विषयांची काटेतोल विभागणी उपयोगाची नाहीं. इतिहास, भूगोल, गणित, भाषा सर्व विषयांचें ज्ञान लहान मुलाला एकमेकाशीं संलग्न असेंच सांपडलें पाहिजे. पृथक्करण आणि विभाग पुढें तो जसजसा मोठा होईल तसतसा आला पाहिजे. परंतु आमच्या शिक्षणक्रमाला शिक्षणशास्त्राच्या सिद्धान्तांपेक्षां लष्करी फर्मा ऊर्फ युनिफार्मिटीच विशेष प्रिय व इष्ट आहे. तासाची घंटा झाली कीं, विषयाची बदली झाली. ही व्यवस्था अभ्यासक्रम पुढें जों जों विशेष क्लिष्ट आणि भारी होतो तों तों विशेष सक्तीनें अंमलांत येणें इष्ट आहे; परंतु खालीं तरी मुलांचें शिक्षण मुलांचे जिज्ञासेनें ठरविलें पाहिजे. प्राथमिक शाळेची मांडणीच अशी असावी कीं, रोज कांहीं तरी, नेहमींच्या जगांतलीच पण नवी, अशा वस्तूकडे मुलांचें चित्त वेधावें आणि त्यांनीं तिचेविषयीं शिक्षकास नानातऱ्हेचे प्रश्न विचारावे. ती वस्तु त्यांनीं हातांत घेऊन उलथी पालथी, आडवी तिडवी करून तपासावी; ती कोठून आली, कशी आली, कोणीं आणली, कोणाची, कशी झाली, एकटीच आहे कीं, तशा पुष्कळ आहेत, वगैरे प्रश्नांची मुलांनीं गर्दी करावी आणि त्यांचीं उत्तरें काढण्यांत किंवा शिक्षकांकडून काढून घेण्यांत त्यांना भूगोल-इतिहास—भाषा गणित सर्व कांहीं शिकतां यावें. अशा रीतीनें सामान्य गोळाबेरजी ज्ञानापासून शिक्षणाला आरंभ व्हावयाचा. मागितल्यावांचून देण्याची आणि विचारल्यावांचून सांगण्याची आजची पद्धति पुष्कळ अंशीं चुकीची आहे. मुलें शाळेंत आलीं कीं, त्यांनीं शिक्षकाला विचारीत आणि आपल्या अकलेनें आणि शिक्षकाच्या मदतीनें आपल्या मनांतील प्रश्नांचा उलगडा करण्याची खटपट करीत राहिलें पाहिजे. अशा

रीतीनें सर्व विषयांचा ओनामा प्राथमिक शाळांत झाल्यावर दुय्यम शिक्षणांत हळू हळू वेळाची व विषयांची वांटणी झाली पाहिजे. तरीही ' भूक आधीं मग खाणें ' हें तत्त्व होतां होईल तों सोडतां कामा नये.

## बुद्धीचा स्वतंत्रपणा कायम राहत नाहीं.

( ८ ). वरील तत्त्व सोडल्यामुळें हल्लीं-च्या शिक्षणक्रमांत मुलाच्या बुद्धीचा स्वतंत्रपणा कायम ठेवण्यापेक्षां मारण्याकडेच प्रवृत्ति विशेष आहे. मनुष्यजातीच्या घटकांत सर्वसामान्य गुण आहेत तसेच व्यक्तिविशिष्ट गुण आहेत. या सामान्य–विषमांत निसर्गा-च्या विस्ताराचें बीज आहे. मनुष्यसमाजास आज जें वैचित्र्य आलें आहे आणि मानवी संस्कृतीचे निरनिराळ्या स्थळीं आणि निरनिराळ्या काळीं जे निरनिराळे प्रकार प्रकट झाले त्या सर्वांचें रहस्य या समविषमांच्या चित्रविचित्र मिश्रणांत आहे. प्रत्येक मनुष्य दुसऱ्या प्रत्येकासारखा आहे. तो तसा नसता तर त्याला मनुष्यच म्हणतां येतेंना. परंतु प्रत्येक दुसऱ्याहून भिन्न आहे. साम्य आणि वैषम्य याप्रमाणें जेथें तेथें दृष्टीस पडतें. शिक्षणाला या दोहोंचेंही बरोबरच पोषण करावयाचें असतें. प्रत्येक मुलाला अधिक पूर्णतेनें मनुष्य बनवावयाचें जसें शिक्षणाचें काम आहे, त्याचप्रमाणें त्याला विशेष कोणी तरी तयार करणेंही त्याचें काम आहे. ' कृष्णा ' मनुष्यतेच्या सामान्य गुणधर्मांनीं युक्त होणें जितकें जरूर तितकेंच तो 'कृष्णा' राहिला पाहिजे हेंही आहे. या भिन्न गुणांच्या प्रकर्षापकर्षावर आणि त्यांच्या आसमंतावरील प्रभावावरच निसर्गाचा उत्क्रांतिनियम अवलंबून आहे. व्यक्तीच्या ज्या विशेष गुणांमुळें त्याची जीवयात्रा सफल किंवा निष्फल होते, त्याचें जीवित कृतकार्य होतें किंवा फसतें त्या विशेष गुणांच्या संतानानें किंवा नाशानेंच जातीची उत्क्रान्ति व्हावयाची असते. मनुष्यजातीच्या संस्कृतीचा इतिहास डोळ्यांखालीं घातला, निदान प्रारंभीं-च्या पशुतुल्य स्थितीपासून आजच्या स्थितीपर्यंत मनुष्यजातीनें केलेला प्रवास नुसता विहंगम दृष्टीनें जरी पाहिला तरीही त्यांत व्यक्तिभेदानें आणि व्यक्तिविशेषांनीं केलेलें कार्य फार मोठें दिसेल. व्यक्तींचे विशेष जर आसमंताच्या सामान्य गोळा बेरजेंत लोपून जाते तर मनुष्याचे आजचे आधिदैविक किंवा अध्यात्मिक गुण आज दृष्टीस पडतेना. बंधुप्रीति, वैवाहिकनीति, न्याय, भूतदया, प्रेम, धर्मनिष्ठा, सत्यप्रीति, साधुवृत्ति वगैरे ज्या गुणांनीं आज संसाराला रमणीयता आणि पवित्रता आलेली आहे त्यांचा उदयच होताना. ह्या सर्व गुणांचा उद्भव व्यक्तिभेदाच्या विशेष धर्मांनीं झाला आहे. व्यक्तींचें व्यक्तित्व लुप्त झालें नाहीं, इतकेंच नाहीं, तर तें विशेष प्रसंगीं विशेषानें विकसित झालें त्यामुळेंच आजची संस्कृति आपणांस लाभलेली आहे. आपणास याही पुढें जावयाचें आहे. मनुष्याचे अंगचें आध्यात्मिक शारीरिक दोनही प्रकारचें कर्तृत्व आम्हांस वाढवावयाचें आहे. आमच्या राष्ट्रीय परिस्थितींत तसें करण्याची आज अत्यंत जरूरी आहे. आमचे मेलेले हातपात, अंधळे बनलेले डोळे, बहिरे झालेले कान, बधिर झालेली त्वचा, रसभान हरवून बसलेली जिव्हा, गंधज्ञानास मुकलेलें नाक, आणि या सर्वांहून विशेष, दिलें तेवढें घेण्यांत संतुष्ट राहणारी बुद्धि, निरुपाय होऊन बसलेली प्रवर्तक शक्ति आणि दुबळी वृत्ति हीं सर्व आम्हांस पुनरुज्जीवित करावयाचीं आहेत. यांच्यांत नवीन चैतन्य खेळू लावावयाचें आहे. आम्हांस तर व्यक्तिविशेष चिरडून टाकून चालावयाचेंच नाहीं. व्यक्तिभेद

आमच्या सामान्य कार्यास घातक होऊं द्यावयाचे नाहींत हें उघडच आहे. आणि ज्या व्यक्तिधर्मांनीं मनुष्याच्या सामान्य एकजातित्वाचा विसर पडेल, किंवा जे आमच्या राष्ट्रीय प्रगतीस बाधक होतील ते जितके लवकर खुडतां येतील तितके खुडण्याची आमच्या शिक्षणांत व्यवस्था अवश्य हवी. परंतु यापलीकडे व्यक्तीची स्वतंत्रता आम्ही घालवितां नये. मुलाला स्वतांच्या बुद्धीचा आणि सामर्थ्याचा उपयोग करावा लागेल आणि त्याचे विशेष गुण विकसित होतील अशी तजवीज आमच्या शिक्षणांत कोठेंच नाहीं. एका साच्यांत घातल्याप्रमाणें आमच्या मुलांचीं मनें एका ठरलेल्या अभ्यासाच्या ठोकळ्यांतून बाहेर निघावयाचीं असतात. यानें आमच्या मुलांचें स्वावलंबन नष्ट होतें आणि तीं दुसरा वागेल तसें वागणारीं आणि करील तसें करणारीं होतात. आपलें ह्मणून कांहीं निराळें असें त्यांचें राहत नाहीं. अभ्यास करण्याच्या रीती, उदाहरणें सोडविण्याच्या पद्धति, सर्व कांहीं एकसारखें. मुलानें नवीन काढलेलें—स्वतंत्रपणें केलेलें असें फार थोडें. प्रत्येक नव्या ठिकाणीं शिक्षकानें बोट धरून न्यावें तेव्हां. स्वतः अज्ञात प्रांतांत उडी घालून तेथून कांहीं नवीन ज्ञानरज घेऊन किंवा पूर्वीचे हारवून येण्याचा त्याला कधीं प्रसंग येत नाहीं, त्यामुळें तें त्याला सुचत नाहीं. आणि अखेरीस तो सर्वस्वी नदीच्या पात्रांतील गुळगुळीत दगडाप्रमाणें वाटोळा होऊन बसतो. हा मोठा कमीपणा आहे. ही कीड आहे. ही आमच्यांतलें स्वत्व सर्व पार नाहींसें करीत आहे.

**कर्तृत्वाला शिक्षणांत जागा नाहीं.**

( ८ ) शिवाय आजच्या शिक्षणांत मुलांच्या कर्तृत्वास कोठेंच जागा मिळत नाहीं. लहान मुलांच्या चळवळींचें आणि खटपटींचें ज्यांनीं निरीक्षण केलें आहे त्यांना ठाऊक असेल कीं, लहान मुलें प्रथमतः जें हातास येईल तें तपासून पहाण्याचा, खाण्याचा आणि मोडण्याचा प्रयत्न करीत असतात. प्रथम प्रथम तर त्यांच्या ह्या विनाशक चपलाईनें माणूस भंडावून जातो. आणि पुष्कळदां त्यांचा आपल्याला त्रास होऊं नये म्हणून, आणि त्यांच्या या संहारचापल्याचा दंड भरतां भरतां नाकीं नऊ येऊं नयेत म्हणून, आह्मी त्यांच्या या अल्लड चेष्टांस चवदाव्या रत्नाच्या प्रभावानें दाबून टाकतों किंवा झोडपून मारतों. ‘ चांगला मुलगा ’ म्हणजे ‘ शांत, जागचेजागीं बसणारा, विचारल्याशिवाय न बोलणारा, हातापायांचे व्यापार आवरून धरून, सांगितलेलें ऐकून निमुटपणें करणारा, दिला मार खाणारा, कधींही वर तोंड न करणारा, इत्यादि इत्यादि असाच आमचा समज असतो. आपल्यास सध्या विशेषसा त्रास पडूं नये, आणि आपल्या बुडास विशेषसा धक्का किंवा पदरास विशेषसा खार लागूं नये येवढ्याच दृष्टीनें वरील विशिष्ट गुणान्वित मुलगा ‘ चांगला ’ असें आपण म्हणतों; परंतु हा कोता—केवळ स्वतापुरतें पाहणारा, आणि आतांपुरती दृष्टि ठेवणारा—विचार सोडून दिला तर चांगल्या मुलाचें लक्षण आपण असेंच करूं काय ? मला जर कोणीं विचारिलें, चांगला मुलगा कोणास म्हणावें ? तर मी तर म्हणेन, ‘ जो अतिशय द्वाड, अति चपळ, एक जागीं कधीं बसावयाचा नाहीं, ज्याचे हातपाय, डोळे, कान, जीभ वगैरे सर्व नेहमीं चालू असावयाचीं, आपल्या खटपटींनीं आणि उपद्व्यापांनीं जो आपल्या सर्व वडील माणसांस बेजार करून सोडतो, कोणताही पदार्थ, कोणतीही चीज ज्याचे तडाक्यांतून धडपणें सुटावयाची नाहीं, जो घटकेंत दहादां पडेल

आणि ःभरदां अडमडेल; राग, त्रास, आनंद, दुःख, प्रेम, द्वेष, माया, अभिमान, इत्यादि मनोविकार ज्याचे मनांत आणि तोंडावर एकसारखी पाठशिवाशिवी चालवीत असतील, उतावळेपणा आणि घाई हे ज्याचे विशेष, हट्ट घेतला ह्मणजे ज्याचा नाद अनिवार, आपलें ह्मणणें जो सोडायाचा नाहीं, हरयुक्तीनें आपल्या मनांतलें सिद्धीस नेल्याशिवाय ज्याला चैन पडावयाचें नाहीं, इत्यादि, इत्यादि, तोच मुलगा चांगला. ' त्याच्या अंगीं मनुष्यतेला सांगतेस नेणाऱ्या सर्व शक्तींचे अंकुर आहेत. त्या शक्तींची नीट जोपासना करणें आणि त्यांच्या विनाशक स्वभावाचें रूपान्तर संवातक प्रकृतींत करणें हें शिक्षणाचें काम आहे. मोडणारास जोडणारा बनविणें हें निसर्गाचें तसेंच शिक्षणाचें काम आहे. तें आज होत नाहीं. आज मुलाचें विनाशक चापल्य नष्ट होतें; पण त्याचें रूपांतर होत नाहीं, त्याचा लय होतो. मुलाचें चापल्य जातां कामा नये. त्याच्या हातापायांनीं निष्क्रिय बनतां कामा नये. त्याच्या शारीरिक स्नायूंची शक्ति नष्ट होतां कामा नये. तिचा विनियोग जोडण्याकडे झाला पाहिजे. मोडलेलें जोडण्यांत, किंवा नवें करण्यांत त्यांना आनंद वाटला पाहिजे. आज त्यांचें मोडणें बंद होतें व करण्याचा प्रसंगच येत नाहीं. त्यामुळें कित्येक बैराग्यांच्या वाळविलेल्या हाता किंवा अवयवांप्रमाणें मुलांचें क्रियासामर्थ्य नष्ट होतें. आजचें शिक्षण या दृष्टीनें केवळ एकदेशीय आहे.प्राथमिक व दुय्यम शिक्षणांत हा एकदेशीयपणा राहतां कामा नये. दुय्यम शिक्षणांत थोडेंसें वर्गीकरण होऊन युनिव्हर्सिटीकडे जाणारे विद्यार्थी निराळ्या तऱ्हेनें व संसारसंग्रामांत शिरणारे निराळ्या तऱ्हेनें तयार झाले पाहिजेत, व तेवढ्यापुरते दुय्यम शिक्षणांत फरक केले पाहिजेत. परंतु कोणत्याही तऱ्हेचें शिक्षण असलें तरी मुलाच्या कर्तृत्वाला, हातापायांच्या क्रियांना वाव मिळून तीं नुसतीं गोष्टी सांगणारीं होतात तेथें गोष्टी सांगणारीं, तशींच काम करणारीं, होतील अशी योजना हवी. ती आज नाहीं.

## मनोवृत्ति व प्रेरणा यांची उपेक्षा.

( १ ) मनुष्याच्या मानसिक जीविताचे भाग पाडिल्यास सामान्यपणें भान-ज्ञान-प्रवर्तन Feeling, Knowing, willing, असे तीन पडतात. सर्व मनोविश्व या तीन प्रकारच्या मानसिक व्यापारांचें झालेलें आहे. निदान या व्यापारांनीं तें भरलेलें—व्यापिलेलें आहे असें मानसशास्त्रज्ञांनीं ठरविलेलें आहे. फीलिंग ऊर्फ भान, नोइंग् ऊर्फ ज्ञान आणि ' विलिंग् ' ऊर्फ ' प्रवर्तन ' या तीन तत्त्वांचें किंवा अध्यात्मिक महाभूतांचें किंवा मौलिक व्यापारांचें मिळून मन होतें. आणि मनाच्या प्रत्येक व्यापारांत या तीन तत्त्वांचें कमीजास्त अंशानें वास्तव्य असतें. प्रकाशाचा, शब्दाचा, गंधाचा, रुचीचा आणि स्पर्शाचा ठसा दृष्टि, श्रुति, घ्राण, रसना आणि त्वचा यांवर उठून त्यांचा संदेश वर मेंदूत पोंचला ह्मणजे जो अनुभव येतो तें भान होय. याला कोणी ' संवेदन ' ही म्हणतात; भावना किंवा वृत्ति असेंही म्हणावें हवें तर. परंतु या ' भान ' व्यापारांत संदेशस्वीकाराशिवाय आरंभीं कांहीं नसतें, निदान बाहेरचें कांहीं नसतें. संदेशस्वीकाराची क्रिया त्यानें मनाच्या पृष्ठावर उठविलेल्या तरंगांनीं होते. ते सुखमूलक किंवा तापमूलक असतात. अर्थात् पेन व प्लेझर, किंवा दुःख—सुख यांच्या ओनाम्याच्या या अनुभवास भान म्हणावयाचें. याचेंच निरनिराळे परींनीं परिणमन होऊन त्यांचा मनोविकार—वृत्ति—भावना— उद्गार— उद्वेगादि

सोपान तयार होतो. याचप्रमाणें नोइंग्– ऊर्फ ज्ञान या प्राथमिक अनुभवाचेंही असेंच होतें. नव्या 'भानां'च्या जुन्यांशीं सारखेपणा किंवा त्यांहून वेगळेपणा ओळखणें हें ज्ञानाचें पहिलें स्वरूप होय. आणि येथून त्याचें निरनिराळें रूपान्तर किंवा विकसन होतें. आणि प्रतिभान-वर्गीकरण, जातिवेद-आगम-निगम स्मृति–धृति–युक्ति वगैरे ज्ञानसोपान उभा राहतो. हीच गोष्ट प्रवर्त्तनाला लागू आहे. भानस्वीकार होतांच मज्जाप्रवर्त्तन होतें. हा प्रवर्त्तनाचा आरंभ. येथून त्याची वाढ होऊन त्याचाही चालन-नियंत्रण-निरोध-प्रचोदन-निर्धार-निश्चयादि सोपान थाटतो. मनाच्या या तात्त्विक व्यापारत्रयींपैकीं हल्लींच्या शिक्षणांत एकाची मात्र सध्यां काळजी घेतात. तीही त्याच्या सर्व अंगांची घेत नाहींतच मनाच्या ज्ञानांगापैकीं स्मृतिधृति या बाजूंचें सध्याच्या शिक्षणक्रमांत बरेंच काम पडतें, व त्यामुळें त्यांचें पोषण थोडेंफार होतें. बाकीच्यांचें यथातथाच होतें. आगम-निगम किंवा 'प्रमाणानुमान' या बाजूंचें पोषण व्हावें म्हणून गणित विषय शिक्षणक्रमांत असतो;परंतु मीं मागें दाखविल्याप्रमाणें सध्या त्याचाही उपयोग स्मृतीच्या पोषणापुरताच होतो म्हणावयाचा. विशेषांवरून सामान्यांचें प्रणयन किंवा सामान्यांवरून विशेषाचें अनुमान करण्याच्या शक्तींचा विकास करण्याकडे आमच्या अभ्यासविषयांपैकीं कोणत्याचाही सध्या उपयोग होत नाहीं. अंकगणित–संज्ञागणित–रेखागणित– कोणतेंही गणित म्हटलें कीं, त्यानें सामान्यावरून विशेषाचें, निदान दिलेल्या प्रतिज्ञांवरून, ओघानें येणाऱ्या सिद्धान्ताचें अनुमान काढण्याचेंच शिक्षण मिळालें पाहिजे. एका पायरीवरून दुसरीवर, दुसरीवरून तिसरीवर असा प्रमाणशुद्ध प्रवास करण्याचा युक्तीला अभ्यास झाला पाहिजे. पण तो किती मुलांच्या युक्तीला होतो ? तथापि स्मृति–धृति–युक्ति या बाजूंनीं अंशतः तरी आमच्या ज्ञानांगांचें पोषण करण्याचें काम सध्याचें शिक्षण करतें. परंतु आमचें मन त्रिमूर्तीसारखें आहे. त्याच्या तीन मूर्तींपैकी भान आणि प्रवर्तन ' किंवा ' वृत्ति ' आणि ' प्रेरणा-इच्छा ' या दोन अंगांची वाट काय ? मनुष्य सांग बनावयास–आणि मनुष्यास सर्वांगानीं पूर्ण वाढविणें हेंच शिक्षणाचें अन्तिम फल असलें पाहिजे–ज्ञानांगांबरोबर त्या दोन अंगांचेंही पोषण यथायोग्य होणें जरूर आहे: पण तें आजच्या शिक्षणक्रमानें होत नाहीं. इतिहास, काव्य आणि संहतव्यापार, या तीन उपायांनीं तें करावयाचें असतें. परंतु आमच्या शिक्षणक्रमानें पहिल्या दोहोंस जितकें निर्विकार करवेल तितकें करण्याचा–निदान प्राथमिक शिक्षणांत तरी–कडेकोट बंदोबस्त केला आहे. आणि दुर्दैवानें दुय्यम शिक्षणांतही तेंच करण्याचा उद्योग सुरू आहेशी भीति आहे. आमच्या इतिहासांतला शिवाजी नष्ट करणें शक्य नसल्यामुळें नाइलाज आहे. नाहीं तर तोही कदाचित् नष्ट करणें इष्ट वाटलें असतें. बाकी आमच्या इतिहासांतील शिवाजी, आमच्या इतिहासांतला अकबर, आमच्या इतिहासांतला राजाराम, हे आज नुसते स्मृतिविषयच होतात. त्यांच्या कथानकानें आमच्या मनांत इष्ट मनोभाव जागृत होऊन आमच्या मनाचें भवनांगही पुष्ट होण्याची अपेक्षा नको. कां कीं, या कथानकांत नुसत्या तारखा आणि वर्तमानसार यांशिवाय कांहीं असत नाहीं व असावयाचें नाहीं. ही प्राथमिक शिक्षणांत जशी, तशीच दुय्यम शिक्षणाची स्थिति. विद्याखात्यानें पसंत केलेलींच पुस्तकें शाळांत शिकवावयाचीं असतात, आणि त्या पुस्तकांत आमच्या

महाराष्ट्राच्या किंवा या देशींच्या थोर पुरुषांचा थोरपणा कमी करवेल तितका कमी केलेलाच असतो. या रीतीनें आमच्या मनोवृत्तीचें पोषण व देशभक्ति, स्वदेशांतील थोर पुरुषांविषयीं पूज्यबुद्धि आणि अभिमान, न्यायनिष्ठा, कर्तव्यजागृति, सत्यप्रेम, भूतदया, स्वार्थत्याग वगैरे थोर भावनांचा उदय—विकास आणि परिपाक होण्यास आमच्या शिक्षणांत जागा नाहीं. कोरड्या वाळवंटांतील वाळूच्या कणाप्रमाणें, आमच्या इतिहासांत नीरस तारखा आणि निर्गुण वर्तमान यांची रेलचेल असते आणि तीच शिक्षणक्रमास इष्ट असते. नाहीं म्हणावयास अलीकडे लीवार्नेर साहेबांचें पुस्तक नेमून आणि मार्सडेनसारख्या साहेबांनीं केलेलीं पुस्तकें सुरू करून आमच्या अंगच्या स्वामिभक्तीस पाणी घालण्यास सुरुवात झाली आहे. परंतु असला प्रयत्न किती विपथगामी असतो आणि विपरीतपरिणामी होतो हें नव्यानें सांगावयास नको. मानसशास्त्राच्या सिद्धांताची ज्याला थोडी तरी ओळख आहे, त्याला या प्रयत्नांचा पोकळपणा तेव्हांच समजेल.

( १० ) शिवाय प्राथमिक शाळांतील काव्यांना सोंवळे करण्याची पराकाष्ठा झाली आहे. या कविता म्हणजे पिळपिळीत, मिळमिळीत आजीबाईचीं गाणीं झालीं आहेत. जोर—जोम—पराक्रम-निर्धार-साहस—वगैरे भावांनीं भरलेलीं काव्यें आमच्या पुस्तकांतून मिळावयाचीं नाहींत. पिपीलिकेची गोष्ट सांगण्यांतच आमची क्रमिकपुस्तकांतील कविता दंग असावयाची, क्रमिक पुस्तकांतील कविता ह्मणजे छंदोबद्ध गद्य होय. काव्यांत अत्यंत नीरस काव्य ह्मणजे स्पष्ट उपदेशाचें. आणि आमच्या शिक्षणांत असल्याच काव्यांचे मासले फार. उपदेशाचे घोंट सारखे आमच्या घशाखालीं उतरत असतात. हा उपदेश ह्मणजे एका गालांत बसतोंच दुसरा पुढें करण्यास सांगणारा असावयाचा. निसर्गाचे उग्र—उदात्त—उत्तुंग—भैरव—मधुर—रमणीय—मनोहर विलासवर्णन करणारे, विशालांचा विस्तार आणि प्रचंडांचा प्रभाव मूर्तिमंत उठविणारे, विचित्रांचें वैचित्र्यआणि सदृशांचें सादृश्य, रंजितांचे रंग आणि कंपितांचे कंप, हंसितांचें हंसें, प्रसन्नाचा प्रसाद, रुदिताचें रुदन, चलाचें चलन, अचलाचें स्थैर्य प्रतीत करणारे, प्रतिभाशाली कवींचे बोल आमच्या शाळांत ऐकावयास मिळत नाहींत. स्वर्गीचे गानध्वनि घुमणाऱ्या कवीस आमच्या शाळांत कोठेंही शिरकाव नाहीं. हृदयाचे दोरे हालविणाऱ्या, स्नायूंस स्फुरण आणणाऱ्या, डोळे विस्तृत करविणाऱ्या, श्वासनिश्वास स्तंभित करणाऱ्या, वीररसाकरितां आमच्या शाळा नाहींत. आंतड्यांस पीळ पाडणाऱ्या, डोळ्यांस टिपें आणणाऱ्या, अंतःकरण सद्गदित करणाऱ्या, करुणरसाचा परिपोष आमच्या नाजूक प्रकृतीच्या मुलांस मानवत नाहीं! संसारास मधुर करणाऱ्या, जीवितास गोडी देणाऱ्या, मृगजळासही प्रत्यक्ष बनविणाऱ्या, जन्माला—जगाला—ऐहिक वास्तव्याला—पुरुष पराक्रमाला- सर्व उद्योगांना आनंदाचें- सुखाचें-अन्तःसमाधानाचें मंदिर करून सोडणाऱ्या, सर्व कंटकांवर गुलाब पसरणाऱ्या, वाळवंटावर ओहळांचा झुळझुळ शब्द चालविणाऱ्या, अरण्यास वनश्रीनें मढविणाऱ्या आणि मरणावर अमृतसिंचन करणाऱ्या प्रेमरसाचें आमच्या मुलांस तर उघड उघड कुपथ्य! सारांश ज्या ज्या म्हणून काव्यांत कविता असेल असल्या काव्यांचा आमच्या शिक्षणास विटाळ चालत नाहीं. मग त्यांच्यायोगें आमच्या मनोवृत्तींस शिक्षण मिळण्याचें नांव कशाला?

याच अंगाला शिक्षण देणारा तिसरा मार्ग म्हणजे संहत व्यापार; पण त्याचा आम-

च्या शिक्षणांत कोठेंच अंतर्भाव नाहीं. नुसत्या एकाकी कर्तृत्वालाही अभ्यास नाहीं. तेव्हां संहत व्यापाराचें बोलावयास नको.

याप्रमाणें आमच्या शिक्षणक्रमांत आमचे 'भावना'गाची अजी उपेक्षा होते. हीच स्थिति 'प्रवर्तना'ची आहे. कदाचित् या तिसऱ्या अंगाची सगळ्यांत अधिक हेळसांड होते. या अंगालाही शिक्षण हवें असतें हें आमच्या शिक्षणक्रमाच्या गांवींही नसावेंसें दिसतें. 'इंटलेक्ट' ऊर्फ 'बुद्धि'ला जसें शिक्षण हवें तसेंच 'विल' किंवा 'प्रेरणा-इच्छा' याही अंगास शिक्षणाची जरूर आहे. बुद्धीनें बांधलेलें धोरण, भावनेनें जागृत झाल्यावर इच्छेनें किंवा प्रेरणेनें अंमलांत आणावयाचें—सिद्धीस न्यावयाचें असतें. यालाही अभ्यास लागतो. नाहीं तर मनांत विचार आहे—भावना आहे—परंतु प्रसंग आला असतां अवसानघात ठेवलेला असें व्हावयाचें. हल्लींच्या शिक्षणांतून बाहेर पडलेल्या प्रत्येक शिक्षिताची थोडीफार अशी अवस्था आहे. ज्यानें त्यानें आपलें चरित्र प्रामाणिकपणें तपासून पहावें ह्मणजे मी म्हणतों हा प्रकार वारंवार घडल्याचेंच आढळून येईल. आमच्या प्रेरणेंत जोर नाहीं, दम नाहीं आणि करार नाहीं. आम्हांला समजतें-आमच्या मनाला लागतें—पण आमच्या हातून होत नाहीं, आह्मांला करवत नाहीं. आमच्या विचारांची—ज्ञानाची—आणि भावनांची ताकद आमच्या इच्छाशक्तींत नाहीं—प्रेरणेंत नाहीं. त्यामुळें आह्मी आज दुबळीं माणसें बनलों आहों. परशुरामभाऊ पटवर्धन, नाना फडणीस, बापू गोखले, शिवाजी महाराज, यांसारख्या कर्त्या पुरुषांचे वंशज आह्मी-पण अवसानघातकी, नादान, नेभळे! अंगांत करामत नाहीं—अर्थात् आमच्या प्रवर्तनांगाला—प्रेरणाशक्तीला शिक्षण मिळालें नाहीं. ही हल्लींच्या शिक्षणांतील केवढी उणीव आहे!

## गाणें नाहीं.

( ११ ) चमत्कार आहे—आमच्या शिक्षणक्रमांत 'गाणें' कोठेंच नाहीं. जर्मनींत 'गाणें' शिकवीत नाहीं अशी शाळा नाहीं असें सांगतात. आमच्या येथें त्याचा ठिकाण नाहीं. आमचें चित्रशिक्षणही सदोष आहे. गाण्याचा समावेश आमच्या शिक्षणांत कां नाहीं? मला वाटतें सृष्टींतील संयोग-संगमाचें गाणें हें उत्तम उदाहरण आहे. भिन्न भिन्न स्वरांचा संगम ह्मणजे भिन्न भिन्न प्रवृत्तींचा मनोहर संयोग होय. गायनानें मनुष्याच्या कोमल भावाचें पोषाण होतें. सूर-स्वर—शब्द यांचें सामर्थ्य समजतें. आणि मनोव्यापारांची एकतानता जाऊन मनाला नवीन जीव येतो. परंतु यापेक्षां गाण्याच्या शिक्षणानें कोमल—कठोरादि सुरांचें बळ, त्यांचे भिन्न भिन्न योग केल्यानें होणारे भिन्न भिन्न परिणाम, आणि स्वरसंगमांचें भावसंगमास होणारें अज्ञात साहाय्य समजतें व त्याचीच किंमत विशेष आहे. आपल्या इकडे अजून त्याची कोणास वाण भासत नाहीं. बुद्धीशिवाय इतर अंगांचा परिपोष करण्यास गाण्याचा बराच उपयोग आहे, तो करून मात्र घेतला पाहिजे.

## मुलांकडे व्यक्तिशः लक्ष नसतें.

१२. आज प्राथमिक व दुय्यम शाळांत सर्व शिक्षण यत्तावारी आणि वर्गवारी होतें. अमक्या यत्तेला किंवा वर्गाला अमके विषय आणि त्यांचा इतका भाग असें आज नेमलेलें असतें. आणि शिक्षकही वर्गाचे किंवा यत्तेचे अभ्यास पुरे करून घेत असतो. शिक्षकाला वर्षाचे अभ्यास ह्मा-

लेखें दाखवावयाचे असतात. वर्षांत एकंदर यत्तेला नेमलेले अभ्यास झालेच पाहिजेत असा इन्स्पेक्टरांचा कटाक्ष असतो. त्यामुळें शिक्षकास वर्ग यत्तापत्रकांतील सर्व अभ्यासांतून ओढून न्यावा लागतो. शिक्षकांचें शिकविणें—किंवा खरें म्हटलें तर अभ्यास झाले आहेत कीं नाहींत ते पहाणें हें वर्गाचें होतें. वर्ग ह्मणजे अनेक मुलांस एकवटणारा समुदाय. शिक्षकाचें लक्ष सबंध वर्गाकडे असतें. त्यामुळें प्रत्येक मुलाकडे लक्ष असत नाहीं, आणि व्यक्तिशः मुलांची कमाई त्याला कळत नाहीं. तो उदाहरणें घालतो.ज्यांचीं बरोबर असतात त्यांना मार्क मिळतात. ज्यांचीं चुकतात त्यांना मिळत नाहींत. झालें, यापेक्षां जास्त शिक्षकांचेकडून कांहीं होत नाहीं. व्यक्तिशः मुलांकडे त्यांचें लक्ष जात नाहीं. एकंदर बोलक्यांत ज्यांच्या अंगांत स्वभावतः विशेष ताकद—विशेष तरतरी—विशेष चपळाई—असेल ते पुढें सरतात. परंतु अशा मुलांपेक्षां जीं स्वभावतः तितकीं पुढें सरणारीं—मुसंडी मारणारीं नसतात, त्यांनाच शिक्षकाच्या साहाय्याची जरूर असते. आज अशीं मुलें वर्गाच्या गर्दीत चेंगरून जातात. त्यांचा स्वतांचा प्रयत्न इतरांच्याप्रमाणें आपलेंच तट्टू पुढें दवडणारा नसतो. मुद्दाम बाहेर आणिल्याशिवाय किंवा बाहेर पडावें लागल्याशिवाय, तो प्रकट होत नाहीं. त्याला अभ्यास मिळत नाहीं. अशी स्थिति वर्गांतील निम्या तरी मुलांची असते. मराठी पहिल्या यत्तेपासून तों तहत इंग्रजी सातवीपर्यंत व पुढेंही कांहीं मुलें कांहीं विषयांत एकसारखीं मागें पडतात—पडलेलींच रहातात. कांहीं व्यक्तींच्या विशेष व्यंगाकडे—न्यूनतेकडे हल्लींच्या शिक्षणपद्धतींत लक्षच पोंचत नाहीं. वर्षावर्षाच्या वर्गवारी यत्ता—सर्व विषयांच्या एकत्र ठरविलेल्या असल्यामुळें सरसकट वर्गांत सुमारें एक—तृतीयांश मुलें पास होण्याची तयारी करण्यांतच सध्याच्या पद्धतीमुळें—यत्तावारीमुळें वर्गाच्या शिक्षकास सर्व काल घालवावा लागतो. शिक्षणांतील या उणेपणामुळें मुलांचें कायमचें नुकसान होतें. मुलांच्या कांहीं बाजू विशेष तयार तर कांहीं अधू असें नेहमीं असणार. मुलें शाळेंत आल्यावर शिक्षकानें त्यांचे विशेष गुणदोष ओळखून काढिले पाहिजेत. आणि त्यांच्या ज्या बाजू अधू किंवा कमकुवत असतील त्यांवर मेहनत करून त्यांस इतरांच्या बरोबरीस आणून सोडिलें पाहिजे. पहिल्या पांच सात वर्षांतच—मुलाच्या सहाव्या वर्षापासून तेराव्या चवदाव्या वर्षापर्यंतच—हें व्यक्तिविशेषाचें मान विशेष पहावयास हवें असतें. प्रत्येक मुलाकडे व्यक्तिशः लक्ष देऊन, त्याच्या ज्या थोड्या मानसिक शक्ति असतील त्या लुप्त—मृत होऊं न देण्याची काळजी लहानपणींच विशेष घेणें अवश्य असतें. तो एकदां सर्व बाजूंनीं वाटेला लागला ह्मणजे मग त्याला विशेष साहाय्य लागत नाहीं. आपल्या मगदुराप्रमाणें तो मजल मारीत राहातो. सुरुवातीलाच त्याच्या त्याच्या संवगड्यांमध्यें अंतर राहूं देतां कामा नये. पण आज व्यक्तिशः मुलाची बहुधा कोणी पर्वा करीत नाहीं. वर्ग मोठे असतात त्यामुळें प्रत्येक मुलाची काळजी घेतां येत नाहीं हें खरें. पण त्याबरोबरच यत्तेचे अभ्यास वर्गाचे करून घ्यावयाचे, प्रत्येक मुलाचे नव्हे, असा शिक्षकाचा सामान्य समज सध्याच्या यत्ताव्यवस्थेनें करून दिलेला असतो हेंही खरें. मुलांचा सगळ्या विषयांचा वर्ग एकच ठेवण्याची जी आजची रीत आहे तींत वरील दोषांचें बीज आहे. मुलाची ज्या विषयांत जितकी गति होईल तितक्या मानानें त्या विषयाचा त्याचा वर्ग ठरावा. आमच्या

शाळांत सर्व विषयांत मुलगा एकाच यत्तेंत बसला पाहिजे. त्यामुळें गणित–भाषा–इतिहास–भूगोल वगैरे–विषय त्या त्या यत्तांचे मुलांना शिकवावयाचे असतात. मुलाची सर्व विषयांत सारखी गति कशी असणार ? ती तशी नसली तरी तशीच समजून शिक्षक पुढें जातो. विषयाच्या ज्ञानाप्रमाणें मुलास त्या त्या विषयापुरता निरनिराळ्या यत्तांत घालण्याची पद्धति हवी.खालच्या वर्गांत तरी मुलांकडे व्यक्तिशः लक्ष हवें तें आज नसतें.

## मुलांच्या वाढीशीं शिक्षणाचा संबंध

१७. शिक्षणक्रमाची योग्यायोग्यता ठरवितांना प्रथम पहावयाची गोष्ट म्हटली म्हणजे शिकणारांच्या मनाच्या आणि शरीरांच्या वाढीशीं त्याचा मेळ आहे कीं नाहीं ही होय. मुलांचें वय आणि वाढ यांना अनुरूपच त्यांना मिळणारें शिक्षण असलें पाहिजे. मुलांच्या मनाची वाढ कशी होते, याचें अवलोकन बऱ्याच मानसशास्त्रविवेचकांनीं केलें आहे व त्यावरून त्यांनीं शिक्षणाचे विषय केव्हां कोणते असावे याविषयीं कांहीं सिद्धांतही ठरविले आहेत. सहा वर्षांपासून तों नऊ दहा वर्षांपर्यंत ठळक –इंद्रियगोचर आणि मूर्त पदार्थांचें रूपरसगंधशब्दादि गुणांचें ज्ञान होण्याची मुलांची ताकद असते आणि तें सांठविण्याची त्याची प्रकृतीच्या व परिस्थितीच्या मानानें धडपडही सुरू असते. याच वेळीं त्यांची कल्पनाशक्ति–म्हणजे आधींच मिळालेल्या भानांचें प्रतिभान, आणि त्यांचीच अनेक तऱ्हांनीं जुळणी मांडणी करून नवीन नवीन चमत्कार निर्माण करण्याची आणि स्वीकारण्याची शक्तिही प्रबळ असते. किंबहुना या वयांत त्यांच्या मनोव्यापारांत त्या शक्तीचेंच प्राधान्य असतें. तेव्हां प्रत्येक नवीन पदार्थ, प्रत्येक नवीन गोष्ट, प्रत्येक नवीन कल्पना, यांत त्यांच्या दृष्टीला नवल भरलेलें असतें. हें नवल ज्ञानाचें पूर्वस्वरूप किंवा पूर्वरंग म्हणावयाचा. पदार्थांत किंवा विषयांत–इंद्रियगोचर विषयांत–जें जें नवें नवल तें तें मुलांचें चित्त वेधून घेतें. मुलाला अवसर सांपडल्यास व त्याचें आसमंत तसेंच रचलेलें असल्यास नवलाचें हळू हळू रूपांतर जिज्ञासेंत होतें आणि जिज्ञासेनें त्या त्या विषयाचें अंतरंग पाहण्याची प्रेरणा होते. शरीराच्या अवयवांतही या वयांत विलक्षण जोम असतो. ते हवेतसे–हवे तेव्हां–वांकवितां येतात. त्यांच्या शिरांतून रक्त धावत असतें आणि स्नायूंत बळ धुमसत असतें. कोणत्याना कोणत्या तरी वाटेनें तें बाहेर पडावयाला पहात असतें. या वयांत स्वस्थ हात जोडून बसणें हें मुलांच्या प्रकृतीच्या विरुद्ध असतें. म्हणून या वेळच्या त्यांच्या शिक्षणांत पुढील गोष्टींचें मुख्यतः धोरण ठेविलें पाहिजे. ( १ ) त्यांना शिकवायाचे विषय इंद्रियगोचर हवेत; ( २ ) त्यांच्या कल्पनेला काम मिळालें पाहिजे. ( ३ ) चमत्कार आणि ज्ञान यांचा अनुक्रम राहिला पाहिजे. ( ४ ) चमत्कारानें जागृत झालेल्या जिज्ञासेचें समाधान करून घेण्याकरितां त्याचा पाठलाग करण्याची प्रेरणा होऊं दिली पाहिजे. आणि त्या प्रेरणेचें चीज त्यांना कंटाळा न येतां झालें पाहिजे. ( ५ ) त्यांच्या हातापायांच्या चळवळींस मनमुराद वाव मिळाला पाहिजे. (६) शेवटीं, इंद्रियें, कल्पना, आणि शरीरचापल्य यांचा संगम झाला पाहिजे. त्यांच्या अभ्यासाच्या मांडणींत हीं तीन वेगळीं न होतां सगळीं बरोबरच कामीं आलीं पाहिजेत. शिक्षणाचा निसर्गाशीं किंवा स्वाभाविक प्रवृत्तीशीं

विरोध असतां कामा नये. स्वभावाला—निसर्गाच्या क्रमाला शिक्षणानें मदत करावयाची येवढेंच शिक्षणाचें काम; फार झालें तर आनुवंशिक दोषानें किंवा दुष्ट परिस्थितीनें मुलाच्या यथायोग्य जीवितयात्रेस विघातक होणारे जे गुणधर्म अंकुररूपानें मुलांत असतील ते खुडून निसर्गाच्या प्रयत्नास हातभार लावावयाचा. मुलाचा अभ्यास त्याच्या शरीराच्या व मनाच्या वाढीच्या मानानें आहाराबाहेरचा असल्यास त्याचेयोगानें; त्याच्या जन्माचें मातेरें होतें. दोन महिन्य।च्या तान्ह्या मुलांस अनरसे खावयाला देऊन त्याला मारण्यांतलाच हा प्रकार आहे. येथें मृत्यु होतो तो कित्येक मानसिक शक्तींचा.तो दिसत नाहीं. तो झाल्याचें कोणास बहुधा समजत नाहीं. आणि त्याकरितां कोणी रडत बसत नाहीं. तरी तो मृत्यूच. शारीरिक मृत्यूपेक्षांही खडतर मृत्यु. कां ? कीं, शारीरिक मृत्यूनें एक घाव दोन तुकडे तरी होतात; यानें त्या मुलाच्या जन्माचें रूप बदलतें आणि त्याच्या आयुष्यक्रमांतील विपत्ति अनेक पटींनें वाढल्यामुळें हरघडीस तो मरतच रहातो. या दृष्टीनें विचार केला म्हणजे आजच्या शिक्षणक्रमांतून आमच्या पोरांना बाहेर काढणारे आह्मी किती निर्घृण—किती दुष्ट आहोंत ! किती मुलांची जीवितयात्रा कष्टप्रद केल्याचें पातक आमच्या माथ्यावर आहे ! आम्ही लहान मुलांस शाळेंत घालतों, त्यांस निरनिराळे विषय शिकवितों. भीमाशंकराच्या पहाडावर आणि कुंभारलीच्या घाटांत त्यांच्या स्मृतीला ओढून नेतों, हंड्रेटवेटाच्या भाराखालीं त्यांची बुद्धि दडपून टाकतों, आणि पांच पांच तास शाळेंत बसवून त्यांच्या शरीराची हानि करतों. तेव्हां निसर्गाचा आणि ज्यानें हे निष्कलंक कोंवळे जीव आमच्या स्वाधीन केले आणि त्यांची योग्य जोगवण करून जगाच्या प्रगतीला ते साहाय्यभूत होतील असे तयार करण्याचें जोखीम आमचेवर टाकलें त्याचा आह्मी केवढा अपराध करतों ! रक्तबंबाळ हात धुवून टाकण्यास पाहणाऱ्या लेडी मॅकबेथनें फक्त एकच खून केला होता; आह्मी प्रत्यहीं असले—बिन रक्ती खून किती करीत आहों ! याबद्दल आम्हांस विचारणार कोणीच नाहीं काय ? याबद्दल झाडा आम्हांस द्यावा लागूं नये काय ? मुलांच्या पालकांनीं यासंबंधीं शिक्षकांस जाब कां विचारूं नये ? पण जेथें अंधळ्या अंधळ्यांची गांठ पडली तेथें कोण कोणाला विचारणार आणि कोणकोणाचा जाब घेणार ! आमच्या सरकारानें या कामीं डोळसाचें काम करावयास हवें; पण त्यानें आंखलेला प्राथमिक अभ्यासक्रम पाहिला म्हणजे सरकारानें तें केलें नाहीं, निदान करावयाचें तसें केलें नाहीं असें म्हणावें लागतें, आणि याचें कारण आमचें दुय्यम शिक्षण आहे.

आमच्या दुय्यम शिक्षणांतही मुलांचें वय-मनाची वाढ—यांचेकडे दृष्टि ठेवून आणि शिक्षणशास्त्राचे जे कांहीं सिद्ध।त मार्गे सांगितले तेही डोळ्यांपुढें ठेवून अभ्यासक्रम ठरविलेला नाहीं. दुय्यम शिक्षण म्हणजे इंग्रजी शिक्षण येवढें प्रथम ठाम ठरवून मग तदनुरोधें आमच्या दुय्यम शाळांतील अभ्यासक्रम तयार केलेला आहे. वस्तुतः दुय्यम शिक्षणाचा अभ्यासक्रम प्राथमिकाच्या पुढचा आणि बाल्याची अखेर व पौरुषावस्थेचा आरंभ या दोहोंच्या मधल्या वयास शोभेसा असावयास हवा. परंतु आमच्या येथें दुय्यम शिक्षणाचा कांहीं भाग प्राथमिकांत गोंवलेला आहे. आणि प्राथमिकाचा कांहीं भाग दुय्यमांत ओढलेला आहे. याचें कारण मीं वर सांगितल्याप्रमाणें

दुय्यम शिक्षण म्हणजे इंग्रजी शिक्षण असें प्रथमच गृहीत धरून चालणें हें होय.

## शिक्षणाचे भाग शास्त्रशुद्ध नाहींत. विषयांची खेंचाखेंच.

१८. आमचें सध्या नडतें तें येथेंच. आमच्या शिक्षणाचा आद्यंतक्रम मुलाचें वय, त्याच्या मनाची वाढ, संसारांतील अवश्यकता, राष्ट्रीय परिस्थिति आणि विषयांचें महत्त्व इत्यादींचे धोरणानें न ठरवितां 'इंग्रजी शिक्षणाचा वर्ग एक—निवळ मराठीचा वर्ग एक आणि युनिव्हर्सिटीचा वर्ग एक असे तीन वर्ग आमच्या शिक्षणाचे केवळ दांडगाईनें पाडिलेले आहेत. आणि दुय्यम शिक्षणाच्या क्रमाला सात वर्षे सांपडावींत म्हणून प्राथमिक म्हणजे मराठी शिक्षणांत अभ्यासांची—विषयांची—पोरांच्या वयाकडे आणि विषयांच्या सुगम-कठिणतेकडे न पाहतां, खेंचाखेंच केली आहे. जर्मनींत-इंग्लंडांत-खुद्द हिंदुस्थानांतही युरपीअन शाळांत जे विषय ज्या वयाच्या मुलांस कधींही शिकवीत नाहींत, ते विषय त्या वयाच्या मुलांस आम्हांस शिकवावे लागतात. इंग्रज, जर्मन किंवा हिंदुस्थानांत शिकणाऱ्या युरपीअन मुलांस जे विषय बारावे तेरावे वर्षी शिकावे लागतात ते आमच्या मुलांस नववे दहावे वर्षी शिकावे लागतात. आरंभापासून प्रवेश परीक्षेपर्यंतचा किंवा शाळा सोडण्यापर्यंतचा सर्व प्रवास त्यांचा नऊ वर्षांत व आमचा अकरा वर्षांत होतो. अर्थात् आम्हांस कांहीं विषयांची पुनरावृत्ति करावी लागते. आम्हांला दोनही संधानें साधावीं लागतात. आमचा दुय्यम क्रम युनिव्हर्सिटीशीं जुळवून घ्यावा लागतो, व त्याप्रमाणें यत्तापत्रकांत विषयवारी अभ्यास घातलेले असतात. फरक इतकाच कीं, आमच्या मुलांचें सर्व शिक्षण प्रायः—इंग्रजीद्वारा—परभाषेच्याद्वारा व्हावयाचें असतें आणि त्यांचें त्यांच्या जन्मभाषेच्याद्वारां होतें. त्यामुळें त्यांच्या मुळांत कोठेंच ताण बसत नाहीं. आणि विषयही अवेळीं त्यांना शिकवावे लागत नाहींत.

१९. आमच्या येथें सारेंच विपरीत. भाषाग्रहण आणि ज्ञानसंपादन हीं आम्हांला बरोबरच करावीं लागतात. त्यामुळें भाषाग्रहण हेंच पुष्कळदां ज्ञानसंपादनाची जागा आडवून बसतें. ही अडचण इंग्रज मुलांस किंवा इतर कोणास नसते. जगाच्या पाठीवर हिंदुस्थानांतच हा निसर्गविपर्यास दृष्टीस पडतो. पुढें सारें इंग्रजींत व्हावयाचें, यासाठीं दहा वर्षांच्या आंत एकदां व्याकरण, इतिहासादि आणि अपूर्णांक विविधादि बरेंच उरकून घ्यावयाचें, भूक लागण्याच्या किंवा पचविण्याचें सामर्थ्य अंगीं येण्याच्या आधींच कांहीं विषय मुलांस शिकावे लागतात. त्यामुळें त्यासंबंधानें एकदां त्यांचे मनांत जी आढी बसते, किंवा नुसत्या कवायतीची संवय लागते, किंवा अज्ञान नव्हे, भलतें ज्ञान माजतें तें शेवटपर्यंत तसेंच राहतें. कां कीं, मुलांचें वय तितकें मोठें झाल्यावर तेच विषय त्यांस इंग्रजींत पुनः करावयाचे असतात. तेव्हां इंग्रजी शब्द, इंग्रजी भाषेची मोडणी आणि परिभाषा हीं शिकितां शिकतांच त्यांचे दिवस आणि सामर्थ्य खर्चीं पडतात.

## अभ्यासक्रम फार श्रमाचा होतो.

२०. यामुळें आजचा अभ्यासक्रम आमच्या मुलांस फार श्रमाचा होतो. त्यांना न समजतां बऱ्याच गोष्टी नुसत्या शब्दस्मृतीनें धरून ठेवाव्या लागतात आणि त्यासाठीं श्रम फार करावे लागतात. वास्तविक पहातां ज्ञानार्जनाचीं साधनें आतां इतकीं उपलब्ध असतां तें काम अगदीं सोपें गेलें पाहिजे.

**परंतु** आमच्या मुलांस तें अत्यंत कठीण जातें. ज्ञानार्जनाऐवजीं शब्दार्जनच फारकरून होतें. तेंही फार महाग पडतें. त्याला रक्त फार आटवावें लागतें; इतर सर्व व्यापार बंद करावे लागतात. अहोरात्र त्याशिवाय दुसरें कांहींही करतां येत नाहीं.सहा सात वर्षांचीं मुलें झोंपेंत पाढे म्हणतांना,दहा बारा वर्षांचीं झोंपेंतच इतिहास भूगोल घोकतांना आणि पंधरा वर्षांचीं पास नापास करून हसतांना किंवा रडतांना, पुष्कळांस आढळलीं असतील. आमच्या मुलांच्या स्वप्नांत सुद्धां अभ्यास—नि—परीक्षा येतात, इतका त्यांचा पगडा त्यांचेवर बसलेला असतो. तरी त्यांची कमाई पैशाच्या दृष्टीनें बोलायालाच नको. ज्ञानाच्याही दृष्टीनें अगदीं कुचकामाची आणि अत्यंत अपुरी असते अशी चोहोंकडून ओरड येते. ही ओरड फारशी खोटी नाहीं. आमच्या मुलांची मेहनत व कष्ट आज तरी खरोखर व्यर्थ खर्च होत आहेत. अभ्यास आणि परीक्षा यां पायीं त्यांना खेळ सुचत नाहीं. मौज सुचत नाहीं. माया-ममता सुचत नाहीं. दिवाळी असो दसरा असो, आज युवराज-युवराज्ञींच्या आगमनाच्या शुभ प्रसंगामुळें सर्व मुंबई फुलून गेली आहेना? उत्सव आणि थाट याशिवाय आज या नगरीला दुसरें कांहीं माहीत नाहीं; पण आमचे कित्येक विद्यार्थी शेक्सपीयरच्या नोटा आणि बेकनचें सार घोटीत बसले असतील! काय करतील बिचारे! लहानपणापासून आतांपर्यंत त्यांस रोज, दर आठवड्यास, दरमहा, दरसाल परीक्षाच देत बसावें लागलें आहे! अर्थात् परीक्षा हेंच जन्माचें—निदान स्वोदरपूर्ती स्वतां करूं लागेपर्यंतच्या जन्माचें—इतिकर्तव्य वाटत आहे. खरोखर विषय ज्याला समजला आहे त्याला त्यांतच परीक्षा झाल्यास कांहीं फारसें वाटत नाहीं. परंतु आमच्या मुलांस विषयग्रहणच होणें कठीण पडतें. तीं बुद्धीनें स्वभावतःच मंद असतात असें नव्हे. सरळ भावानें आणि सारख्या साधनसामग्रीनें त्यांस जगांतील कोणत्याही मुलांबरोबर परीक्षेस बसविल्यास तीं कोणास हार जाणार नाहींत. पण आजच्या परीक्षांत तो सरळ भाव नाहीं. इंग्रजांच्या इंग्रजीचें,गणिताचें किंवा शास्त्राचें ज्ञान इटालियन भाषेच्याद्वारा पारखून पहावयाचें ठरवून इटालियनाबरोबरच त्याला इटालियन भाषेंत प्रश्नाचे कागद दिले म्हणजे काय होईल? परिस्थिति एकाला अनुकूल आणि एकाला प्रतिकूल अशीच तकार होईल कीं नाहीं? नुसत्या ज्ञानाचीच परीक्षा असती तर तिला कोणीं भीक घातली नसती.आणि तिची तयारी करावयाला आमच्या विद्यार्थ्यांस इतके श्रमही पडले नसते; परंतु आमच्या येथें सगळाच उलटा प्रकार. आम्हांला आधीं ज्ञान मिळविणें कठिण जातें; कारण तें वाहून आणणारी भाषा त्या ज्ञानापेक्षांही आम्हांस नवखी असते. तिची आर्जवें करण्यांतच आमची सर्व शक्ति खर्चीं पडते. ( १ ) अवेळीं भलतेच विषय शिकावे लागल्यामुळें ते विनाकारण कठिण होतात, ( २ ) स्वभाषेचें ज्ञान होण्यापूर्वीं किंवा स्वभाषेनें सर्व व्यवहार बरोबर करतां येऊं लागण्यापूर्वीं आम्हांस परकी भाषा शिकावी लागते, ( ३ ) सर्व महत्त्वाचे किंवा दुय्यम शिक्षणांतील विषय आम्हांस इंग्रजीद्वारा ग्रहण करावे लागतात, ( ४ ) अर्थात् ज्ञान मिळविणें आणि भाषा समजून घेणें दोनही एकदम करावीं लागतात ( ५ ) व आमचें ज्ञान दाखविण्याचें कामही, आम्हांस परकी भाषेनेंच करावें लागतें. इतक्या पांच कारणांमुळें आमच्या मुलांस

इंग्लंडांत किंवा जर्मनींत जे विषय सहा किंवा सात वर्षांत होतात तेवढेच आट-पण्यास म्हणजे नुसते स्मृतिगत करण्यास अकरा वर्षें पुरत नाहींत. आणि या अकरा वर्षांतही अतिशय कष्ट करावे लागतात.

## शिक्षण बुद्धिविघातक होतें.

२१. आमचें शिक्षण फाजील श्रमाचें होण्यास जें कारण तेंच तें बुद्धिविकासक हो-ण्याचे ऐवजीं बुद्धिविघातक होण्याचेंही आहे. आज आमच्या येथें जितकीं मुलें शिकतात, आजपर्यंत जितकीं शिकून गेलीं त्यांपैकीं ज्यांच्या बुद्धीचा सध्याच्या शिक्षणानें कमी-अधिक घात झाला नाहीं अशीं किती ? इतके श्रम—इतक्या अडचणी—सोसून ज्यां-च्या बुद्धीचें सामर्थ्य—तेज—वैभव -आणि कुशाग्रत्व कायम राहिलें असे फार थोडेच सांपडणार नाहींत काय ? रानडे, तेलंग, मेथा, गोखले, भांडारकर, टिळक, परांजपे, बोस, भट्टाचार्य, राय,दत्त, अय्यर,अय्यंगार, नायर,गौर, धार वगैरे माणसें, एकंदर शिकून बाहेर पडणारांच्या मानानें किती थोडीं ? हींच माणसें इंग्लंडांत, जर्मनींत किंवा दुसऱ्या एखाद्या देशांत जन्मतीं तर त्यांना विद्यारण्य आक्रमण्यांत आणि त्याशीं झटापट करून आपलें बुद्धिमत्त्व सतेज करण्यास जेवढे आयास पडले तेवढे पडते काय ? आणि त्याच आयासांचा उपयोग इतर रीतीनें स्वतंत्र व्यासंग करून जगाच्या ज्ञानभांडारांत आणि संस्कृतीविशेषांत भर घालण्यांत झाला नसता काय ? आजच्या शिक्ष-णानें मुलांच्या बुद्धीची दिशाभूल होते. स्पेसिफिक ग्रॅव्हिटी किंवा विशिष्ट गुरुत्वाच्या अर्थापेक्षां त्यांच्या व्याख्येकडेच ती धांव घेते. तिला घ्यावी लागते. फळें-फुलें पुढें आलीं म्हणजे तीं तपासून त्यांचें रासायनिक, औषधिक आणि औद्भिज धर्म शोधण्या-पेक्षां त्यांची ‘ ऑर्डर ’ आणि ‘ डिस्क्रिप्शन ’ किंवा ‘ वर्ग ’ आणि ‘ वर्णन ’ इंग्रजींत दिलेलें असेल तें मुखोद्गत करण्यांत मुलांचें सारें लक्ष असतें. आणि तें सध्याच्या स्थि-तींत अगदीं रास्त होय असें म्हणावें लागतें. बुद्धीचें लक्ष विषयरहस्यावरून काढून विषयपरिभाषेवर बसविण्याचें पातक सध्याच्या शिक्षणक्रमाचे हातून होत आहे आणि त्यामुळें आमच्या बुद्धीचा, समविषमांची निवड करणाऱ्या, त्यांचे वर्ग पाडणाऱ्या, त्यांची संगती लावणाऱ्या, त्या-पासून अनुमानें काढणाऱ्या आणि युक्ति-श्रेणी रचणाऱ्या शक्तीचा विकास न होतां घात होत आहे. तिचें एक अंग—स्मरण मात्र भारवाही होत आहे. तिच्यावरील बोजांत साखर असेल. परंतु ती त्या मुलांच्या किंवा त्यांच्या बंधूंच्या कांहीं उपयोगाची नाहीं. कारण यांना साखर प्राप्त कोठें होत आहे ?

## कर्तृत्वाचा नाश.

२२. आमच्या मुलांच्या कर्तृत्वाचा नाश दोन तीन वाटांनीं होत आहे. एक तर मौलिकच दोष आहे. तत्त्वांतच दोष आहे. आमच्या ‘ भावना ’ व ‘ प्रेरणा ’ या दोन अंगांस मुळीं शिक्षणच मिळत नाहीं, यामुळें मुळापासून आमच्या कर्तृत्वाचा लोप होतो. शाळेबाहेरच्या आसमंतांत जे व्या-पार आमच्या मुलांकडून होतात त्यांनीं त्यांच्या अवयवांत थोडी फार शक्ति आली असली तर तीही रिकामी पडून राहते. शाळेच्या आवारांत आणि शाळेच्या शिक्ष-णाचे तासांत तिचें काम लागावयाचें नाहीं अशी स्थिति आहे, त्यामुळें ती पुष्कळ अंशीं निरुपयोगामुळें मरते. अनभ्यासानें शक्ति लुप्त होते असा शारीर शास्त्राचा नियम आहे. त्याचें प्रत्यंतर आमच्या येथें

हवें तितकें येतें. तिसरें, शारीरिक करामतीस शाळेच्या बाहेर वेळ मिळत नाहीं. संध्याकाळीं तास सवा तास खेळावयाला काढण्याचें सुद्धां शेंकडा साठ मुलांच्या जिवावर येतें, इतकें अभ्यासाचें ओझें त्यांचे डोक्यावर असतें. ज्या शाळांस व्यायामाचीं मैदानें जोडलेलीं आहेत, तेथील मुलाची मोजणी केली आणि व्यायामास शाळेच्या जागेंत जाणारांची संख्या आणि न जाणारांची संख्या ताडून पाहिली म्हणजे माझें म्हणणें प्रत्ययास येईल. एक तर सकाळीं अभ्यास करून, दुपारीं शाळेंत अकारापासून पांचपर्यंत पुनः शिकून बाहेर आलें ह्मणजे त्यांच्या अंगांत तकवाच नसतो आणि मनाला हुशारीच नसते. त्यांना कोठें तरी स्वस्थ बसावेंसें वाटतें. याचा अनुभव सर्व शिक्षकांस असेल. शेंकडा पन्नास मुलांच्या ठिकाणीं तरी, त्यानंतर त्यांना शरीरश्रम करायाला लावणें ह्मणजे वाजवीपेक्षां फाजील कष्ट देऊन त्यांचें मरण उद्याचें आज आणण्यासारखें असतें. बाकीच्या पन्नास मुलांपैकीं बऱ्याच मुलांस, म्हणजे अभ्यासाची कळकळ बाळगणाऱ्या बऱ्याच मुलांस—स्वस्थ बसावेंसें वाटतें, त्यांना शरीरश्रम करायाला लाविलें तर अगदींच जीवापाड होतात, असें नसलें तरी तें वेठीचें काम होतें, त्यांना त्यांत हौस, हुरूप नसते. आजचे अभ्यास त्यांना झेंपत नाहींत किंवा ते झेंपण्यांत त्यांच्या जीवनशक्तीचा बराच वेंच होतो याची ही साक्षच आहे. इतके श्रम कां पडतात त्याचीं दोन कारणें मागें सांगितलीं आहेत आणि तिसरें एक कारण आहे. त्याचा विचार मी ' शिक्षक ' या भागाशीं येईन तेव्हां करीन. वस्तुस्थिति अशी असते असें माझें मत झालें आहे. आणि तें बऱ्याच वर्षांच्या अवलोकनानें झालें आहे. मानसिक कर्तृत्त्वाची मूलतः उपासमार आणि शारीरिक करामतीचा दुसऱ्या रीतीनें अभाव व अभ्यासक्रम सर्वांशीं वाङ्मयात्मक. तेव्हां विद्यार्थ्यांच्या कर्तृत्त्वाचा विकास होणार कसा ! शिवाय चवथें, शारीरिक श्रमाच्या कामांविषयीं एक प्रकारचा अनादर या अभ्यासक्रमानें उत्पन्न होतो. विहिरीचें पाणी ओढणें, लांकडें फोडणें, बाजारांतून सामान आणणें, घरांतच अडलेलें कांहीं अंगमेहनतीचें काम करणें, ह्मणजे वेळाचा दुरुपयोग करणें, अशी आमच्या मुलांची सध्याच्या शिक्षणक्रमांतील परीक्षा आणि मार्कांनीं समजूत झालेली असते. तीं वाचन, पठण आणि श्रवण हाच वेळाचा सदुपयोग असें समजतात; क्वचित् कांहीं मुलांच्या मतीं लेखनांत गेलेला काळ फुकट जात नाहीं. परंतु त्या व्यतिरिक्त इतर कांहीं करणें म्हणजे त्यांचा वेळ व्यर्थ जातो. हा समज आमच्या येथें आहे असेंच नाहीं. इंग्लंडांतही हा कोठें कोठें आढळतो. इंग्लंडांतही ज्या विद्यार्थ्यांस युनिव्हर्सिटींत विशेष प्रतिष्ठा मिळवायाची असते त्यांची क्वचित् समजूत अशी असते असें वाटतें. तथापि प्राथमिक व दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांची असली समजूत हिंदुस्थानाखेरीज इतरत्र फारच क्वचित् सांपडेल. प्राथमिक शाळांत तर मुलांना अभ्यास म्हणून कांहीं नेहमींच्या बालिश क्रीडांपेक्षां निराळें आहे असें वाटण्याचें कारणच नसावें व जर्मनींत व अमेरिकेंत तसें बऱ्याच ठिकाणीं वाटत नसतेंही. दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांसही त्या देशांत शाळेच्या बाहेर अभ्यासाचें फारसें देणें नसतें. आमच्या इकडेच शाळेच्या बाहेरही मुलांच्या मागें अभ्यासाचा ससेमिरा इतका असतो कीं, त्यामुळें इतर कामांत किंवा उद्यो-

गांत घालविण्यास त्यांना वेळच मिळत नाहीं. शाळेंतील अभ्यासाचें महत्त्व वाजवीपेक्षां फाजील वाढतें, आणि शाळेंतील धडे वाचण्यांत गेलेला वेळ तेवढाच कामीं लागला, बाकीचा सर्व फुकट गेला असें त्यांचें मन त्यांना सांगत असतें. या तीन चार कारणांमुळें आमच्या मुलांचें कर्तृत्व लुप्तप्राय होतें.

## दोष घालविण्याचे सरकारी प्रयत्न.

२३. हे सगळे दोष घालविण्यासाठीं आज सरकाराचे कोठें कोठें पुसट पुसट प्रयत्न चालले आहेत. सर्व प्राथमिक व दुय्यम शाळांचें यत्तापत्रक सुधारून बदलण्याचा प्रयत्न सरकारनें नुकताच केला आहे. परंतु तो नीटसा सफल झाला नाहीं. मीं दाखविलेले दोष नवीन अभ्यासक्रमांतही बहुतेक राहिले आहेत. सरकाराचा मुख्य प्रयत्न प्राथमिक शाळांत होत आहे. बालोद्यान शिक्षणपद्धति आमच्या इकडे सुरू करण्याचा एक जंगी प्रयत्न सरकार सध्यां करीत आहे. आणि सर्व प्राथमिक शाळांत फ्रोबेलच्या देणग्या मुलांस शिकविण्याचा उपक्रम सरकारानें केला आहे. वस्तुपाठही सर्व शाळांत सुरू होण्याची सक्त खटपट सरकार आज करीत आहे. सर्व जुन्या शाळांतील हेडमास्तरांस विशेषतः ट्रेन्ड हेडमास्तरांस आणि मास्तरांस आळीपाळीनें एकेकदा पुण्याच्यासारख्या ट्रेनिंग कॉलेजांत वस्तुपाठांचे आणि बालोद्यानांचे शिक्षणासाठीं महिना पंधरा दिवस दरवर्षी सरकार रवाना करीत आहे. आणि या सबंध महिना पंधरा दिवसांत मास्तरांस सृष्टिशास्त्रीय, रसायनशास्त्रीय, जीवशास्त्रीय, वनस्पतिशास्त्रीय, शारीरशास्त्रीय, सर्व शास्त्रीय वस्तुपाठ शिकविण्याची गुरुकिल्ली, शेतकऱ्यांच्या मुलांस शेतकीचें शिक्षण देण्याकरितां कृषिविद्यांचें रहस्य, अपघाताचे वेळीं करावयाच्या उपाययोजनेचा वैद्यकीय मंत्र, वगैरे सर्वांचा कर्णोपदेश मिळण्याची सरकारानें कसून तजवीज चालविली आहे. शालोपयोगी प्रदर्शनें लहानशा प्रमाणानें भरवून तीं सर्व जिल्ह्यांतील डेप्युटी इन्स्पेक्टरांच्या व त्यांच्या मदतनिसांच्या नजरेखालून सरकार घालवीत आहे. इंग्लंडांत—जर्मनींत बालोद्यान आहे, आमचे इकडेही बालोद्यान सुरू झालें आहे. इंग्लंडांत वस्तुपाठ आहेत, आमचे येथेंही वस्तुपाठांची प्रत्येक यत्तेस पुस्ती लाविली आहे. अशा रीतीनें सरकार अर्थात् सरकाराचें विद्याखातें आपल्याकडून खटपट करीत आहे. आणखीही पुष्कळ गोष्टी सरकार करणार आहे, अशा दाट वदंता आहेत. प्रत्येक जिल्ह्यांत एकेक ‘ नमुन्याची’ शाळा तयार करून तींत भरपूर शिक्षकवर्ग सरकार ठेवणार आहे, तेथें सर्व ट्रेन्ड शिक्षकच नेमणार आहे. उपकरणसामग्री अवश्य तेवढी सर्व पुरविणार आहे आणि जिल्ह्यांतील अन्ट्रेन्ड शिक्षकांस तेथें आळीपाळीनें नेऊन ट्रेन्ड शिक्षकांच्या हाताखालीं त्यांस ‘ शागीर्द ’ म्हणून काम करावयास लावून सगळ्यांना थोडे फार ट्रेन्ड बनविणार आहे. इन्स्पेक्टरांची संख्या वाढविणार आहे, आणि त्यांचा पगार चढविणार आहे, वगैरे बऱ्याच गोष्टी आणखी सरकाराचे हातून होणार आहेत असें म्हणतात. या सर्व झाल्या तर बरेंच आहे; परंतु तेवढ्यानें प्राथमिक शिक्षणांतील दोष जाण्याची फारशी आशा नाहीं. कारण शिक्षणक्रमाला मूळ रोग एक आणि त्याच्यावर औषधयोजना निराळीच असा हा प्रकार आहे. रोगामुळें उत्पन्न होणाऱ्या लक्षणांस दडपण्याचा हा सारा प्रयत्न होणार आहे. तापानें तलखी होते घाल वारा; कपाळ दुखतें ठेव पाण्याची घडी; अशांतलें हें आहे. हें नको आहे असें

म्हणणें नाहीं. हें हवेंच, पण यानें ताप जाण्याची आशा व्यर्थ होय. ताप घालविण्यास पोटांत तो ज्यामुळें आला असेल त्यावरच कांहीं औषध दिलें पाहिजे. तसें वरील प्रयत्नांत कांहींच नाहीं. 'बालोद्यान' चोहोंकडे आहे म्हणून आमच्या इयत्तापत्रकांत तो एक विषय आणखी घातल्यानें काम कसें भागावें? फुलझाडांची बाग तयार करणें सुद्धां काम सोपें नाहीं. वर्षांतील सर्व ऋतूंत फुलझाडीं फुलें फुलून बाग नेहमीं कुसुमाभरणांनीं भूषविलेली ठेवणें, ऋतुमानानें बदलणाऱ्या हवापाण्यास न जुमानतां सर्व झाडांची जोगवण करणें, शास्त्र आणि शोभा या दोहोंचा मिलाफ जमवून आणणें, रुग्ण तरुलतांची शुश्रूषा बरोबर ठेवून त्यांचें व एकंदर बागेचें आरोग्य साधणें वगैरे गोष्टी दिसावयास क्षुल्लक दिसल्या तरी फार महत्त्वाच्या आणि अवघड आहेत. मग बालोद्यान तयार करणें तर किती तरी अवघड असलें पाहिजे. 'मुलांची बाग' थाटणें आणि तीं उत्तम रीतीनें संभाळणें हें काम महत्प्रयासाचें, अत्यंत दक्षतेचें, फार जबाबदारीचें आणि मोठ्या कुशलतेचें आहे. ते करणारे माळी तशाच योग्यतेचे हवेत. महिना पंधरा दिवसांच्या उपऱ्या शिक्षणानें ती योग्यता आमच्या देशभाषांच्या शाळांतील शिक्षकांस प्राप्त होईल असें जर कोणास वाटत असेल तर त्याला जगांत असंभवनीय असें कांहींच नसलें पाहिजे. अंतराळीं उभें राहून एक लांब कळक हातांत घेऊन भूगोलास सूर्यमालेंतून हांकून देणें या प्रचंड आशावंतांस अशक्य नाहीं. सरकारास असें वाटत असेल असें मी म्हणत नाहीं. जर सरकारास तसें वाटत नाहीं तर सरकारानें 'बालोद्यान' पद्धत असल्या शिक्षकांचे हातीं टाकावी कां? 'कवाईत' 'फर्मा' 'ठरीव रुळी' यांतून बाहेर निघून मुलांच्या प्रकृत्यनुरूप त्यांना शिक्षणामृत पाजणें, अथवा खरें म्हटलें तर त्यांनीं ज्ञानामृत सेवन केलेलें पहाणें हेंच बालोद्यानाचें रहस्य आहे. फ्रोबेल तर म्हणतो मुलांस नवीन असें ज्ञान द्यावयाचेंच नसतें. त्यांच्या अन्तःकरणांत जें ज्ञान सुप्त असतें तें प्रकट—आविर्भूत—करावयाचें असतें. व त्याकरितां तें ज्यायोगें बाहेर पडेल तसे पदार्थ आणि त्यांची तशी मांडणी याच गोष्टी महत्वाच्या आहेत. व अशी मुलांच्या आसमंताची रचना करणें हेंच बालोद्यानाचें कसब आहे. शिक्षणांत मुलाची मानसिक व शारीरिक प्रकृति म्हणून कांहीं विचार करण्यासारखा भाग आहे हें ज्यांच्या स्वप्नींही नसतें; मुलगा शाळेंत आला म्हणजे त्याला धडा देणें व तो त्यानें केला कीं नाहीं पाहणें येवढीच ज्यांची शिक्षणाची कल्पना; 'गोल' 'दंडगोल,' 'वन', वगैरे सेंगें कशाला हाच ज्यांचा प्रश्न सुटलेला नाहीं, अशा मास्तरांकडून सरकार ही अघटित घटना करविण्याच्या फंदांत कां पडतें आहे? हा प्रयत्नच चुकलेला आहे. शिक्षणसुधारणेचा खरा प्रयत्न म्हणजे अभ्यासक्रम निरनिराळ्या कार्यांकरितां निरनिराळा ठरवून हल्लींच्या शिक्षकांकडून जुन्या तऱ्हेचा शिक्षणक्रम शिकवून घ्यावयाचा, आणि नवीन शिक्षणक्रमाकरितां नवीन शिक्षणपद्धतीचा सोपपत्तिक आणि सानुभव अभ्यास केलेल्या योग्य शिक्षकांची योजना करावयाची हाच आहे. यानें पेनाच्या एका फराट्याबरोबर सगळ्या इलाख्यांत बालोद्यानें उठलेलीं दिसणार नाहींत हें खरें आणि बालोद्यान शिक्षणपद्धति आमचेकडे चोहोंकडे सुरू आहे असें वार्षिक रिपोर्टांत म्हणतां येणार नाहीं हेंही खरें आहे; परंतु बालोद्यान शिक्षणपद्धतीचा खरा खरा आरंभ होईल.

आणि हलुहलु ती चोहोंकडे पसरून ती फलदायी होईल. आजच्या प्रयत्नांचें फल प्रत्येक शाळेंत पहावयास मिळेल. फ्रोबेलच्या देणग्यांचीं इंग्रजीवरून मराठींत झालेलीं भाषांतरें बाजारांत आलीं आहेत. तीं विकत घेऊन त्या अनुरोधें देणग्यांवरील प्रश्नोत्तरांची सवायकीं, दिडकीं प्रमाणें रोज उजळणी झालेली दिसेल. पण ही बालोद्यान शिक्षण-पद्धति नव्हे आणि हें सशास्त्र शिक्षणही नव्हे. यापेक्षां आमचें जुनें तात्या पंतोजीचें शिकविणें कांहीं बाबतींत बरें असें म्हणण्याची पाळी येते. आमच्या जुन्या पद्धतींत गोल नव्हता, दंडगोलही नव्हता. धूळपाटी आणि कामटीची लेखणी होती. ‘ श्री श्री श्री श्री ’ आणि ‘ एकी एकी एक बे बे चार ’ यांचा गोंगाट होता. पण मुलगा शाळेंत आल्यापासून दोन तीन वर्षांत त्याला तोंडचे हिशोब उत्तम येत, मोडी अक्षर उत्तम लिहितां येई आणि कागदपत्र वाचतां येई. व्यवहारापुरतें—त्या काळाच्या गरजेप्रमाणें—मुलाचें शिक्षण होई. तात्या पंतोजीला फारसा खर्च येत नसे. आईबापांसही सणावाराच्या पानसुपारीपेक्षां अधिक कांहीं द्यावें लागत नसे. मुलांत चौकसपणा—अवलोकन—वगैरे वाढविण्याचा त्यांचा उद्देश नसे, तरी एकसारखें तासचे तास मांडीवर मांडी मोडून घालून अक्षर वळवीत किंवा उजळणी घोकीत बसावें लागे. त्यामुळें हल्लींच्या कवायती बालोद्यानानें मुलांचे अंगीं येणारा उठवळपणा येत नसे. एकसारखें नेटानें मेहनत करण्याची मुलांना संवय होई. आणि विषयबाहुल्य आजच्यासारखें नसल्यामुळें चित्ताची व्यग्रता आणि आयासही कमी होत. ‘ मळमळींत सौभाग्यापेक्षां झळझळीत वैधव्य बरें ’ या म्हणीचा उच्चार करण्याची पाळी सध्याच्या वायकुती प्रयत्नांनीं येत आहे याचें वाईट वाटतें. मी कोणत्याच बाबतींत जुन्याचा अवास्तव पक्षपाती नाहीं. तरी नव्यानें जर आमची स्थिति ‘शिव शिव न हिंदुर्न यवनः ’ होत असेल तर मला नव्याचा तिरस्कार व्यक्त केल्यावांचून राहवणार नाही.

## क्रमिक पुस्तकें.

शिक्षणक्रमांतील हल्लींचे दोष दूर करण्याचा सरकारानें दुसरा एक जंगी प्रयत्न केला आहे. तो तर सरकारानें इतक्या थोड्या अवकाशांत केला कीं, सरकाराच्या सामर्थ्याची आणि कर्तबगारीची तारीफच करीत राहिलें पाहिजे. हा प्रयत्न सर्व क्रमिक पुस्तकांचें म्हातारपण घालवून त्यांस पुनर्नवता देण्याचा होय. याकरितां सरकारानें प्रत्येक भाषेकरितां एक अशा सरकारी कामगार मंडळींची कमिटी नेमिली होती आणि तिजकडून सर्व क्रमिक पुस्तकें पुनः वाचवून त्यांची सुधारून नवी आवृत्ति काढण्याचें काम करून घेतलें. या कमिटीनें काम फार चपळाईनें आणि जोरानें केलें असावें. कारण एक वर्षभरांत तिनें सातही यत्तांचीं क्रमिक पुस्तकें तपासून नवीं केलीं. हीं नवीं पुस्तकें कशीं काय झालीं आहेत हें सांगण्याचें आज माझेजवळ साधन नाहीं. तथापि तीं व्हावीं तशीं झालीं नसावीं अशी भीति वाटावयास कारण आहे. आज जीं एक दोन पुस्तकें बाहेर पडलीं आहेत, तीं तरी प्राथमिक शाळांतील क्रमिक पुस्तकें जशीं असावीं तशीं नाहींत असें म्हणण्याचें धाडस मी करतों. हें धाडस फार मोठें आहे हें मी जाणून आहें. विद्याखात्याच्या सध्याच्या शिरोमणींनीं ज्या पुस्तकांस सर्वोत्तम म्हटलें आहे,अशीं पुस्तकें जगांत दुसरीं कोठेंही सांपडणार नाहींत असा ज्यांवर त्यांचा शेरा आहे असें सांगतात, तीं पुस्तकें प्राथमिक शिक्षणास

२९९

हवींत तशीं नाहींत म्हणणें मोठें जोखमाचें आहे; तरीही मला तसें म्हणावें लागतें याचें वाईट वाटतें. ' गवतें रुजतात ' ' तोच पाऊस पाडतो ' वगैरे वाक्यें ज्या पुस्तकांत आरंभींच आहेत, तीं पुस्तकें मुलांच्या उपयोगीं नाहींत असें मी साफ म्हणतों. मुलांचीं क्रमिक पुस्तकें मुलांच्या विषयांवरच हवींत. त्यांचे खेळ, त्यांच्या खोडया, त्यांचे उद्योग, त्यांचे विचार, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्या कल्पना, हींच त्यांच्या वाचावयाच्या पुस्तकांत प्रतिबिंबित झालीं पाहिजेत. पुस्तकांतलें जग आणि आपलें जग हीं निराळीं आहेत, असें पदोपदीं त्यांच्या प्रत्ययास आणून देणारीं पुस्तकें त्यांच्या कामाचीं नाहींत. हुकूम करणाऱ्या धन्यापाशीं, मुखस्तंभ बापापाशीं, संसारास विटलेल्या आईपाशीं, नेहमीं पथ्यापथ्याचा विचार करून खाणें ठरविणाऱ्या वैद्यापाशीं, किंवा ' आं-कायरे ? ', म्हणून ओरडणाऱ्या त्यांच्याच मास्तरापाशीं जशीं तीं परक्यासारखीं आणि अंतर्मुख होऊन बसतात, तशींच या पुस्तकांपाशीं बसावयाचीं. अशा पुस्तकांनीं त्यांच्या जिवाचा खुलास व्हावयाचा नाहीं; त्यांवर दडपण पडावयाचें; त्यांच्या हर्षकौतुकादि कोंवळ्या विकारांस पालवी फुटावयाची नाहीं; अशा पुस्तकांनीं त्यांचीं मनें फुलावयाचीं नाहींत; त्यांची कळी उमलावयाची नाहीं; ' असें करूं नको. ' ' तसा बस ', तें अमकें आहे ' असें सांगणाऱ्या आजीबाईच्या गोष्टींची—उपदेशाची ज्ञानाची—आणि शिकवणीची त्यांना काय किंमत ? अशा पुस्तकांनीं त्यांचा कोंडमारा होतो. तो होऊं न देणें, ही तर लहान मुलांच्या शिक्षणाची पहिली किल्ली आहे. पुस्तकांचा सहवास—संवगड्यांच्या सहवासासारखा त्यांना हवासा वाटावा. सृष्टींतील रहस्यांप्रमाणें आणि नियमांप्रमाणें त्यांतील उपदेश वगैरे अगदीं झांकलेला असावा; त्यांतील धड्यांत त्यांना आपल्या अनुभवाच्या गंमती, चमत्कार सांपडावे; आपल्याच विचारांना वाचा फुटलेली त्यांना ऐकूं यावी आणि आनंद व्हावा. भाषेच्या अपुरेपणामुळें जे विचार—विकार त्यांच्या मनांत येतात जातात, पण जे त्यांस व्यक्त करतां येत नाहींत ते तेथें ओळखीच्या शब्दांनीं सांगितलेले असावे.

शिवाय, क्रमिक पुस्तकें म्हणजे भाषेचीं पुस्तकें. त्यांनींच भूगोलाचें, भूगर्भविद्येचें, रसायनशास्त्राचें, वर्तमानपत्रांचें, इतिहासाचें आणि उद्योगधंद्यांच्या शिक्षणाचेंही काम करावें काय ? असे सतरा उद्देश एकत्र करणें ही शिक्षणशास्त्रदृष्ट्या मोठी चुकी आहे. भाषाविषयावरील पुस्तकांचा मुख्य उपयोग म्हणजे अनुभवांना वाचा देणें हा आहे. उपयुक्त ज्ञान मिळविण्याचीं साधनें क्रमिक पुस्तकें नव्हत, होतां नये. तीं तशीं आहेत असें समजून त्यांत इतर विषयांचे मुद्दाम धडे घालणें तत्त्वाच्या विरुद्ध आहे. शास्त्रीयज्ञान पुस्तकांनीं मिळवायाचें या चुकीच्या कल्पनेचें पर्यायानें हें पुष्टीकरण आहे. प्रयोग—अवलोकन—अनुभवांनीं मिळवायाचें ज्ञान पुस्तकांनीं, विशेषतः भाषाविषयाच्या पुस्तकांनीं, देण्याचा घाट काटकसरीचा असेल, परंतु शास्त्रशुद्ध नाहीं. त्यामुळें क्रमिक पुस्तकें हे एक लहानसे सर्वज्ञानकोशच बनतात आणि मुलांना त्यांचा तिटकारा येऊं लागतो. क्रमिक पुस्तकांचा, अर्थात् भाषा विषयाच्या क्रमिक पुस्तकांचा, घाट एकच असला पाहिजे. त्यांनीं मुलांस जें जें वाटतें तें तें बोलून दाखविलें पाहिजे. मुलांनीं ज्ञान मिळविणें, माहिती गोळा करणें वगैरे इतर विषयांचे वेळीं करावयाचें. क्रमिक पुस्तकांनीं मुलांना आपलें मनोगत दुसऱ्यास कळविण्याचें काम

शिकवावयाचें, आणि त्यांचे विकार—विचार—आचार त्यांचेपुढें मांडून त्यांच्या अन्तःचक्षूंचा प्रकाश त्यावर पडेल व दुसऱ्यांस त्यांचें वर्तन जसें दिसतें तसेंच त्यांच्याही नजरेस तें सहज पडेल असें करावयाचें. त्यांच्या अनुभवांतील प्रसंग त्यांचे पुढें नव्यानें ठेवून त्यांच्या सदसद्बुद्धीस चालन द्यावयाचें. सद्वृत्ति, सद्भाव, सद्गुण, सदाचरण, वगैरेंचीं त्यांच्या परिचयाचीं चित्रें देऊन त्यांना त्यांची ओळख न सांगतां पटवून द्यावयाची. शब्दांतील स्वरमाधुर्य, अर्थांतील मौज, व हर्ष—खेद—आश्चर्य, चमत्कार—अभिमान, वगैरे मनोभाव त्याचे पुढें उघड मांडावयाचे. त्यांना समजूं न देतां त्यांच्या नैतिक वृत्तींचें पोषण करावयाचें, त्यांच्या भोंवतालच्या बोलक्या जगाशीं त्यांचा परिचय करून द्यावयाचा. रसज्ञता आणि अभिरुचि यांचा विकास करावयाचा आणि त्यांना सहृदय आणि वाचस्पति बनवावयाचें, हेंच भाषाविषयक क्रमिक पुस्तकांचें कर्तव्य आहे. तेंच त्यांनीं करावयाचें. याव्यतिरिक्त कामें त्यांजकडून करविणें म्हणजे सुतारास स्वयंपाक आणि सोनारास बांधकाम करूं लावणें होय. या दृष्टीनें सध्याचीं क्रमिक पुस्तकें काय किंवा नवीं होणारीं क्रमिक पुस्तकें काय सगळीं कुचकामाचीं होत. नव्यासंबंधानें मी आज भाताशिताच्या न्यायानें बोलत आहे हें उघड आहे.

## खुली मुभा हवी.

क्रमिक पुस्तकें चांगलीं पैदा होण्याकरितां शाळामास्तरांस आवडतील तीं पुस्तकें सुरू करण्याची मुभा असावयास पाहिजे. आमच्या देशांत अशी बेकैद मुभा देणें सध्याच्या स्थितींत हितकर होईल कीं नाहीं हा प्रश्न आहे. आणि तो सहज तडकाफडकीं फेंकून देण्यासारखा नाहीं, हें मला कबूल आहे. आमचें राष्ट्र आज बनावयाचें किंवा बनत आहे. अशा वेळीं प्रत्येक पाऊल फार जपून टाकावयास हवें. तथापि पुस्तकें निवडण्याच्या स्वातंत्र्यास एकच निर्बंध निघून स्वैर स्वातंत्र्यापासून होणारें नुकसान फारच कमी करतां येईल, आणि त्यानें होणारा फायदा मात्र अनेक पटीनें वाढवितां येईल. शिक्षणशास्त्राचा अभ्यास करून अनुभवानें किंवा परीक्षेनें स्वतःची शिक्षणविषयक योग्यता जे स्थापित करतील त्यांस आपणांस हवीं तीं क्रमिक पुस्तकें आपल्या शाळांत व वर्गांत शिकविण्याची मोकळीक ठेवावी, म्हणजे दोन कामें होतील. एक विद्याखात्याला आपल्याकडे सर्वज्ञतेचा मक्ता घेण्याचा प्रसंग येणार नाहीं, क्रमिक पुस्तकांचा एकच एक सांचा ठरवावा लागणार नाहीं आणि इंग्लंडांत, अमेरिकेंत जशीं, तशीं येथेंही चढाओढीनें उत्तरोत्तर अधिकाधिक चांगलीं पुस्तकें निर्माण होतील.

इन्स्पेक्टरांची संख्या व पगार वाढविणें हा सरकारचा आणखी एक नवीन प्रयत्न आहे. त्यासंबंधानें मला कांहीं सांगावयाचें नाहीं. ‘ इन्स्पेक्टर ’ जर खरोखर इन्स्पेक्टरच राहतील व तसेच वागतील, शाळांच्या चालकांस सल्ला मसलत देऊन त्यांचे गुणदोष त्यांचे नजरेस आणून देतील, शाळांची शिक्षण विषयांतील करामत नेहमीं चढती ठेवण्याकडे चालकांची प्रवृत्ति राहण्यापुरतीच त्यांची देखरेख राहील, सरकारी व खाजगी शाळांत पंक्तिप्रपंच न करतां—दोहोंस ते सारख्या भावानें लेखतील आणि ते स्वतां शिक्षणशास्त्राचें परिशीलन आणि शिक्षणविषयक प्रश्नांचा सावलोकन विचार करीत राहतील तर त्यांची संख्या वाढल्यानें नुकसान व्हावयाचें नाहीं. त्यांच्या

पगाराच्या वाढीबद्दल तर मी त्यांचें नेहमींच अभिनंदन करीन. येवढेंच कीं, तो सरसकट वाढला ह्मणजे बरा. आणि तो वाढल्यानें गरीब बिचाऱ्या प्राथमिक शिक्षकांचे पगार वाढविण्याची बुद्धि त्यांस व्हावी ह्मणजे झालें. बाकी त्यांच्या खिशांत चार पैसे ज्यास्त पडल्यानें त्यांचा हेवा कोणास वाटावयाचा नाहीं. निदान मला तरी वाटणार नाहीं. इन्स्पेक्टरांसंबंधें मला जें कांहीं म्हणावयाचें आहे, तें माझ्या विषयाच्या दुसऱ्या भागांत मी म्हणणार आहें.

शिक्षणसुधारणेचा सरकाराचा सर्वांत महत्त्वाचा—खरोखरीं उपयोगी होणारा प्रयत्न आतां सांगतों. तो ट्रेनिंग कालेजांची जास्त प्रमाणावर सोय करणें हा होय. दुय्यम शाळांतील अर्थात् इंग्रजी शाळांतील शिक्षक तयार करण्याकरितां एक स्वतंत्र ट्रेनिंग कॉलेज काढण्याचें सरकारानें ठरविलें असून पुढील वर्षापासून तें सुरू होईल. हें एक काम मात्र योग्य दिशेचें आणि शास्त्राच्या तत्त्वास धरून होत आहे. शिक्षणक्रमाच्या मांडणीच्या खालोखाल महत्त्वाचा प्रयत्न शिक्षणपद्धतीचा आणि योग्य शिक्षकांचा आहे. त्याकडे मी लवकरच वळणार आहें.

## लोकांचे प्रयत्न.

२४. शिक्षणक्रमांतील दोष काढण्यासाठीं आज सरकार काय करीत आहे याचें येथपर्यंत प्राथमिक व दुय्यम शिक्षणापुरतें अवलोकन केलें. आतां या कामीं लोक आज काय करीत आहेत हें पाहूं. लोकांचे या बाजूचे प्रयत्न पाहूं गेलें म्हणजे बरीच निराशा होते हें कबूल केलें पाहिजे. केवळ राष्ट्राच्या शिक्षणात्मक हितासाठीं म्हणून खाजगी प्रयत्न आजपर्यंत आमच्या इकडे फारसे झाले नाहींत, ही दिलगिरीची गोष्ट आहे. आमच्यासारख्या परसत्तानियंत्रित लोकांनीं शिक्षणाचें महत्व अजून ओळखावें तसें ओळखूं लागूं नये आणि शिक्षणाचे बाबतींत आपली जबाबदारी त्यांस समजूं लागूं नये हें आश्चर्यांतलें आश्चर्य आहे. सरकारानें अमुक केलें नाहीं, तमुक केलें नाहीं, तमकें केलें तें आमच्या हितास घातक आहे; सरकारी शाळा म्हणजे निवळ नोकर तयार करण्याचे कारखाने आहेत; हमालखाने आहेत; गुलाम बनविण्याच्या मुशी आहेत;आमच्या राष्ट्रीय जोमाचा—कर्तृत्वाचा आणि पराक्रमाचा नायनाट करण्याचीं यंत्रें आहेत वगैरे वाक्यांचा वर्तमानपत्रांतून—सभांतून-व भाषणांतून पाऊस पाडण्याचें काम आम्ही उल्हासानें आणि हौसेनें करतों; पण आमचें सरकार बोलून चालून परकें आहे, तें मानवी आहे आणि मनुष्यधर्मांत ‘ स्वहित ’ आणि ‘ स्वसंरक्षण ’ हे जे अत्यंत बलवान आणि महत्त्वाचे धर्म आहेत ते आमच्या सरकारासही आहेत व असले पाहिजेत या गोष्टी आम्हीं कां विसराव्या ? आमच्या येथें पसरलेला काळोख दूर करण्यावांचून त्यांचें कांहीं अडलें नाहीं. राजव्यवस्थेचीं व कारभाराचीं कामें करावयास त्यांना माणसें लागलीं तर त्यांना पृथ्वीच्या पाठीवर त्यांचे असे मुलूख पुष्कळ आहेत, तेथून तीं आणितां येतील; आणि आज ते तीं थोडीफार आणीत आहेत. अगदीं हलक्या कामावर लावण्यास त्यांना बिनशिकलेले लोक चालते; असें असूनही त्यांनीं हिंदुस्थानांत सार्वजनिक शिक्षण प्रथम सुरू केलें.सरकारी अशा शाळा त्यांनीं प्रथम घातल्या आणि त्यांतही आमच्या इकडे इंग्रजी शिक्षण सुरू केलें हें सामान्य काम नव्हे. इंग्रजी शिक्षणानें एतद्देशीय लोकांत इंग्रजांच्यासारख्या महत्त्वाकांक्षा, इं-

ग्रजी मनोविकार, इंग्रजी विचार, इंग्रजी कल्पना उत्पन्न होतील हें न समजण्याइतकें तें दुधखुळें नव्हतें व नाहीं. इंग्रजी शिक्षणानें आपण राजकीय हक्क मागूं लागूं आणि हळूहळू राज्यकारभार आपल्या हातीं घेण्याची खटपट करूं हें भविष्य इंग्रजी शिक्षण येथें सुरू करण्याचे वेळींच आमच्या सरकारानें केलें होतें. व हें सर्व दिसत असूनही त्यांनीं इंग्रजी शिक्षण इकडे सुरू केलें आहे हें लक्षांत ठेवावें. तें सुरू करण्यांत त्यांचा उद्देश सर्वांशीं परोपकाराचा—निरपेक्षतेचा असेलअसें माझें ह्मणणें नाहीं. तसा केवळ परोपकार आणि निव्वळ निरपेक्षभाव त्यांना असावा अशी आपण अपेक्षा तरी कां करावी? राज्यकारभार चालविण्याची सुलभता, खर्चाची काटकसर, वगैरे स्वप्रेरित कामनांचाही भाग इंग्रजी शिक्षण सुरू करण्यांत असला पाहिजे हें उघड आहे. तथापि केवळ स्वसंरक्षणच त्यांस हवें असतें तर त्यांनीं आह्मां सर्वांस इंग्रजी विद्येचा गंध लागूं दिला नसता, आम्हास हलक्या सलक्या नोकऱ्या आणि कोंडाभाकर मेहनतीनें मिळेल इतकी व्यवस्था ठेवून पूर्वींप्रमाणें आमची अल्पसंतुष्टता कायम राखिली असती. आणि मग मायबाप सरकारांत आम्हाला कांहींच दोष दिसले नसते. मुकीं बिचारीं कोणींही हका अशीं मेंढरें आम्ही पुरीं बनलों असतों; परंतु इंग्रज सरकारानें आम्हांस तसें राहूं दिलें नाहीं ही त्याच्या स्वसंरक्षणपरायणतेची जशी, तशीच थोरपणाची आणि उदारचरिततेची साक्ष आहे. आमच्या देशाची आजची हीन स्थिति, आमची उपासमार, आमची सर्व बाजूंनीं पराधीनता, आमच्या हालअपेष्टा आणि जेथें तेथें आमचा आज होत असलेला अपमान माझ्या हृदयाला झोंबत नाहीं असें कोणी समजूं नये. तो कदाचित् मला विशेषच झोंबत असेल. परंतु तेवढ्यामुळें मी सरकाराच्या प्रत्येक कृतींत दोषच दोष पहात बसणार नाहीं. म्हणूनच शिक्षणाचे बाबतींत सरकारानें आमचेवर केलेले उपकार तेवढ्या पुरते कबूल करणें म्हणजे देशद्रोह आहे असें मला वाटत नाहीं. 'सुधारलेले सरकार' म्हणवून घेण्यास आमच्या सरकारास लोकशिक्षणाचा प्रश्न हातीं घेणें मनलज्जेनें नसलें तर जनलज्जेनें तरी जरूर होतें. व तें त्यांनीं घेतलेंही. लोकशिक्षण हातीं घेऊन त्याचा प्रसार करण्यास सरकार झटत आहे. यावरून सरकाराची राजकीय मनोदेवता अजून जागी आहे. सरकारानें केलें आहे यापेक्षां करावयाचें पुष्कळ आहे असें म्हणावयास मी भीत नाहीं; पण उलट पक्षीं लोकांनीं काय केलें आहे असा प्रश्नही विचारावयास मी भीत नाहीं. लोकशिक्षण-राष्ट्रीय लोकशिक्षण—हें आमचे येथें तरी एका अर्थीं लोकांचें काम आहे. आपण आहोंत कसे आणि असायाला पाहिजे कसे या गोष्टी आमच्या आम्हांस जितक्या कळतील तितक्या त्या आमच्या इंग्रज सरकारास कळावयाच्या नाहींत. त्या त्यांना कळल्या नाहींत तर त्यांत त्यांचा दोष नाहीं. पोटदुखीची कळ ज्याचें पोट दुखतें त्यालाच समजायाची. दुसऱ्याला कशी समजावी? आम्ही काय, कसे, कोठें आहोंत हें आमचें आम्हांलाच बरोबर कळावयाचें. तें आमचें आम्हीं पाहिलें पाहिजे. 'वळख तूं तुज टाकून मीपण' हें आमचें काम. तें केल्यावर—स्वतांची ओळख करून घेतल्यावर, आपणांस काय, कसें, कोठें असावयाचें आहे तें आम्ही ठरविलें पाहिजे आणि तिकडे जाण्याचा मार्ग क्रमिला पाहिजे. तो मार्ग म्हणजे राष्ट्रीय शिक्षण असें मीं मागें सांगितलेंच आहे. सरकार शिक्षणाचे कामीं जे काय उद्योग

करीत आहे, त्याचे बरोबरीनें किंवा त्याहून अधिक आमचे प्रयत्न झाले पाहिजेत. आणि सरकारी शिक्षणांत असणारे दोष आम्ही आमच्या शिक्षणांतून काढून हें त्यापेक्षां सरस आहे असें सरकाराच्या नजरेस आणून दिलें पाहिजे. असें आम्हीं केलें आहे काय ? कितीसें केलें आहे ? केलें आहे असें म्हणायाला आम्हांस फारसें तोंड नाहीं. आमच्या खाजगी शाळा म्हणजे शंभरांतील नव्याण्णव तरी पोट भरण्याचा धंदा म्हणून काढिलेल्या असतात. मी स्पष्ट बोलतों म्हणून, बंधुहो, मजवर रागावूं नका. माझा स्पष्टपणा कोणाला दुखविण्याकरितां नाहीं. आमच्या शिक्षणाची स्थिति पाहिली—आमच्या अज्ञानामुळें—आमच्या हलगर्जीपणामुळें—आमच्या बेपर्वाईमुळें आमच्या मुलांचें वाटोळें झालेलें-आणि हिंदमातेचीं इतकीं लेकरें तिच्या कार्याला-तिचें पांग फेडण्याला निरुपयोगीं झालेलीं पाहिलीं म्हणजे माझा जीव कळवळून येतो आणि माझा मलाच फार संताप येतो. इतक्या पोरांचें मातेरें आमच्या हातून झालेलें मला दिसत आहे. हीं पराक्रमशाली आर्यांचीं आणि एका काळीं जिचा कुसवा सुपुत्रांनीं आणि सुपुत्रींनीं धन्य केला होता तिचींच मुलें माझ्या डोळ्यांदेखत वायां जात आहेत. आणि मला त्यांचेकरितां कांहीं करतां येत नाहीं ! माझे हातून त्यांचें बरें करण्याची खटपट होत नाहीं, मला त्यांची विपत्ति—शिक्षणविषयक विपत्ति—अंशतःही दूर करतां येत नाहीं, या विचारानें माझें डोकें भणभणून जातें, आणि स्वताचाच मला तिटकारा येतो; मग माझ्यासारख्याच माझ्या बंधुवर्गासंबंधानें मी बोलत असतां मी खरें खरें तें—निदान जें मला खरें वाटतें तें—स्पष्टपणें ओकून टाकावें याबद्दल त्यांनीं माझा राग करूं नये. खरोखरच, आमच्या शिक्षणाच्या आम्हांस इष्ट सुधारणेसाठीं आम्हीं काय केलें आहे ! एकंदर देशांतील अशा तऱ्हेचे खरेखरे प्रयत्न मोजले तर दहापांचही भरणार नाहींत.मद्रासेस एक दोन, कलकत्त्यास एक दोन, पंजाबांत एक दोन, संयुक्त प्रांतांत एक दोन, ह्मणा हवेंतर, आणि आमच्या इकडे एक दोन; बस, झाले आमचे शिक्षणप्रयत्न ? आणि यांतही केवळ राष्ट्रीय शिक्षणाकडे दृष्टि ठेवून चालविलेले प्रयत्न किती निघतील ? अलीगडचें कॉलेज, दयानंद कॉलेज, बनारसचें हिंदु कॉलेज, कलकत्त्याचें ब्रम्हो कॉलेज, मद्रासचें नॅशनल स्कूल आणि पचाप्पा कॉलेज, हे सर्व प्रयत्न एकदेशीय आणि उलटे आहेत. व ते बऱ्याच अंशीं लंगडे आहेत. कोणी पैशानें तर कोणी माणसांनीं, कोणी ऐक्यभावानें तर कोणी उदात्त हेतूनें लंगडे आहेत. आमच्या इकडेही एक दोन प्रयत्न या दिशेनें झाले आहेत; पण त्यांसंबंधानें येथें मला फारसें बोलतां येणार नाहीं. आमच्या इकडील अशा तऱ्हेचा—आणि आरंभीं—किंवा उत्पादकांचे मनानें तरी—राष्ट्रीय दिशेचा पहिला प्रयत्न पुण्याचें न्यू इंग्लिश स्कूल किंवा डेक्कन ऐज्युकेशन सोसायटी हा होय. या प्रयत्नाचें आजपर्यंत एकच फळ राष्ट्रीय उपयोगाचें झालें आहे.खाजगी रीतीनें-सर्वांशीं देशी माणसांनीं चालविलेल्या शाळा व कॉलेजें हीं सरकारी शाळांशीं व कॉलेजांशीं टक्कर मारण्याइतक्या —कदाचित् त्यापेक्षांही अधिक फलप्रदपणें चालवितां येतात हें या सोसायटीनें लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें. शिस्त, परीक्षांचे निकाल आणि उपकरणें या सर्व बाबतींत, सरकारापाशीं असलेलें अचाट सामर्थ्य अंगीं नसतांही सरकाराची बरोबरी लोकांना करतां येते आणि शिक्षणाचे कामांत सरकाराच्या प्रयत्नांस खाजगी लोकां-

ना चांगला हातभार लावितां येतो ही गोष्ट सदर सोसायटीनें सिद्ध केली आणि त्याचें फळ आपणास आज महाराष्ट्रांत दिसत आहे. आज महाराष्ट्रांत खाजगी इंग्रजी शाळा इतक्या सुरू झाल्या आहेत हें कांहीं अंशीं तरी सदर सोसायटीच्या उदाहरणाचेंच कार्य आहे. सोसायटीवर आंतून बाहेरून वेळोवेळीं जीं संकटें आलीं त्यांनां सोसायटीच्या मार्गांत वरचेवर धोंडे पडले नसते; खाजगी द्वेष, दुःसह मतभेद, वगैरेच्या अतिशय प्रक्षोभानें तिच्या कौमार्यांतच तिला पक्षपाताचे झटके बसले नसते; बाहेरच्या वातावरणांत खवळलेल्या झंझावातानें सोसायटीस मधून मधून पछाडलें नसतें; आणि सामाजिक व राजकीय प्रदेशांत गेल्या वीस वर्षांत झालेले भूकंप आणि ज्वालामुखींचे उद्रेक सोसायटीपर्यंत येऊन भिडले नसते, तर निवळ शिक्षणसुधारणेच्या कामांत ह्या सोसायटीनें कांहीं कामगिरी केली असती असें म्हणावयास जागा आहे. दुय्यम शिक्षणाच्या पूर्वीच्या यत्तापत्रकांत चवथीची भूमिती काढून पांचवीस चढविण्यांत, आणि हल्लींही युनिव्हर्सिटीनें बदललेल्या गणिताभ्यासानुरूप शाळांतील गणितशिक्षणक्रम बदलून घेण्याच्या कामांत, तसेंच सृष्टिशास्त्र, रसायनशास्त्र वगैरे विषय सर्व यत्तांच्या मुलांस मराठींत शिकवून पहाण्याचे कामांत, दुय्यम शिक्षणाच्या शाळेसच हातकामाचे वर्ग जोडण्याचे कामांत सोसायटीनें आजही पुढाकार घेतला आहे. सोसायटीच्या पंचवीस वर्षांच्या आयुष्यांत ही कामगिरी अगदीं थोडी आहे हें कबूल केलें पाहिजे. खुद्द मुंबईस आर्यन एजुकेशन सोसायटी निघाली आहे, तिनें धर्मशिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे असें ऐकतों. याप्रमाणें आमचे इकडे कांहीं खाजगी प्रयत्न शिक्षण सुधारणेकरितां म्हणून झाले आहेत—पण ते इतके थोडे आहेत कीं ते जमेस न धरले तरी चालतील. यापेक्षां कितीतरी पटीनें जोराचे, विस्ताराचे आणि व्यापकतेचे उद्योग आम्हीं केले पाहिजेत. आज सरकारानें केलेल्या प्रयत्नांच्या पासंगासही लोकांचे प्रयत्न पुरणार नाहींत ! ही वस्तुस्थिति पाहिली म्हणजे आमच्या राष्ट्रीय पराक्रमाची आणि राष्ट्रीय कर्तव्यबुद्धीची कींव येते आणि मनावर निराशेची छटा चढते. आम्हांला सरकार हवी तेवढी स्वतंत्रता देत नाहीं, आम्हांस सरकार करावी तितकी पैशाची मदत करीत नाहीं वगैरे सबबी माझ्या तोंडावर फेंकण्यांत येतील; पण त्यांत अर्थ नाहीं. आमचें काम करण्यास आम्हीं दुसऱ्यावर अवलंबून रहावें कां ? दुसरा मदतीस येईपर्यंत वाट पहात बसावें कां ? उलट आपण ज्या चिमटयांत आज सांपडलों आहों त्याची धार नीट पाहूनच आमचे प्रयत्न झाले पाहिजेत. आणि दोनही पात्यांची धार चुकवून कुशल कसरती मल्लाप्रमाणें आम्हांस आपलें कार्य उरकलें पाहिजे. आमच्या शिक्षणांतील दोष काढून तें हल्लींपेक्षां पुष्कळच फलद्रूप करतां येणें शक्य आहे, असें प्रत्यक्ष प्रयोगांनीं सरकारास दाखवा, आणि मग सरकाराला नांवें ठेवण्यास पुढें सरा. तोंपर्यंत सरकाराचे दोष दाखवावयाचे असल्यास आपल्या कामचुकारपणाची आठवण ठेवून दाखवा. असे शिक्षणप्रयोग लोकांनीं केल्यास त्यांस सढळ हातानें मदत करणें सरकाराचा धर्म आहे, व सरकार तशी मदत करणार नाहीं असें नाहीं. तशी त्यांनीं केली तर ठीकच; ती नाहीं केली तरीही लोकांनीं आपल्या हिंमतीवर शिक्षणाचे नवे प्रयोग करून पाहिले पाहिजेत.

## शिक्षक.

२५. आजचा अभ्यासक्रम दोषग्रस्त आहे आणि त्यामुळें आमची हानि होत आहे—हें प्राथमिक व दुय्यम शिक्षणापुरतें—आतांपर्यंत सांगितलें. परंतु लोकशिक्षणांत विषयव्यवस्था व शिक्षणक्रमाची मांडणी जितकी महत्त्वाची आहे, तितकेच ती ज्यांचे हातीं पडते ते शिक्षकही महत्त्वाचे आहेत हें आपण विसरूं नये. शिक्षणक्रम कितीही शास्त्रशुद्ध असला तरी तो अंमलांत आणणारीं माणसें असावीं तशीं नसलीं तर शिक्षणक्रमाच्या शास्त्रशुद्धतेचा फारसा फायदा होत नाहीं. अमुक यत्तेंत अमुक वयाच्या मुलांस अमकें शिकवावें असें विचारपूर्वक ठरवून दिलें तरी शिकवणाराचा भाग नीट झाला नाहीं तर शिक्षण चांगलें होण्याची आशा नको. पुष्कळदा ठरलेला शिक्षणक्रम दोषग्रस्त असूनही मुलांचें शिकणें चांगलें होईल. विषय शिकविणारा शिक्षक, विषयाची सुलभता आणि मुलांची ग्राहकता या तिहींवर शिक्षणाचे बरेवाईट परिणाम अवलंबून असतात. यांतील कोणतेंही एक कमी असलें कीं तेवढा शिक्षणाच्या पूर्णतेंत कमीपणा राहतो. त्यांतल्या त्यांत पहिला व तिसरा भाग विशेषच महत्वाचा आहे. शिकविणारा अडाणी, कामचुकार आणि दोषग्रस्त असला तर मुलगा हुषार असूनही त्याचें नुकसान व्हावयाचें. उलट शिकविणारा कुशल असला तरी मुलगा अगदीं बुद्धिहीन असला तर शिकविणाराच्या श्रमाचें चीज फारसें होत नाहीं. या तिहींत नंबरवारी लाविली तर शिक्षकाचाच नंबर पहिला लागेल. शिकविणारा कसबी—आपलें काम उत्तम करणारा—असला म्हणजे शिक्षण थोडें—फार फायदेशीर होतेंच होतें. तेव्हां आपण अभ्यासक्रमाचें परीक्षण करून तो दोषग्रस्त ठरविला, त्याप्रमाणें शिक्षकवर्गाचेंही परीक्षण केलें पाहिजे. अभ्यासक्रमाप्रमाणें आजचा शिक्षकवर्गही दोषग्रस्त आहे कीं नाहीं ?

या प्रश्नाचें खरें खरें उत्तर देणें जिवावर येतें, पण तें तसेंच दिलें पाहिजे. मी स्वतः शिक्षक आहें. आज दहा वर्षें शिक्षकाचें काम करूनही मी असावा तितका चांगला शिक्षक झालों नाहीं, हें माझें मला ठाऊक आहे. आणि माझ्याप्रमाणें माझ्या कित्येक व्यवसायबंधूंचे मजपाशीं उद्गार निघालेले मला आठवत आहेत. शिवाय मीं पुष्कळ शिक्षकांचें शिकविणें पाहिलें आहे. तेव्हां मीं जर वरील प्रश्नाचें उत्तर ‘ आहे ’ असें दिलें तर तें निदान धाडसाचें होणार आहे. आज प्राथमिक-दुय्यम शाळांत आणि कित्येक कॉलेजांतही-पण कॉलेजांचा आपल्याला आतां विचार करावयाचा नाहीं, म्हणून तीं सोडून देऊं—जे शिक्षक काम करीत आहेत त्यांना आपल्या कामाची बरोबर माहिती आहे काय ? त्यांचा त्यांनाच हा प्रश्न विचारला तर ते त्याचें उत्तर काय देतील ? सुतार, लोहार, चितारी, रंगारी, वगैरे धंदेवाले लोक आपापला धंदा वेगळा शिकलेले असतात. कोणता वाटेल तो धंदा घ्या-त्यांत शिरणाराला आपलें काम समजे तों कोठें तरी हमाली—उमेदवारी करावी लागते आणि तें शिकावें लागतें. लिहिणें वाचणें—हिशेब टिपणें वगैरे सामान्य शिक्षण आहे. तें येवो अगर न येवो त्याला आपलें कसब म्हणून निराळें शिकावें लागतें. पण शिक्षकाचें तसें आहे काय ? निदान आज तरी तसें आहे असें किती लोकांस वाटतें ? खुद्द शिक्षकांपैकीं कितीजणांस वाटतें ? शिक्षकाचें काम हवें त्यानें करावें; दुसरें कोठें जमलें नाहीं, दुसरें कांहीं करण्याची पात्रता नाहीं, दुसरें कांहीं

करतां येणें अनेक कारणांमुळें अशक्य आहे, चला, एखाद्या शाळेंत जा आणि व्हा मास्तर, अशीच आज आमची कल्पना आहे कीं नाहीं ? आजचे सगळे शिक्षक असे आहेत असें मी ह्मणत नाहीं, म्हणावयाचा नाहीं. शिकण्या–शिकविण्याची हौस आहे आणि शिक्षकाचा धंदा आवडीनें पत्करला आहे, असे शिक्षक मला ठाऊक आहेत. परंतु अशांची संख्या किती भरेल ? श्रम–मेहनत–यातायात नको म्हणून, फार खटपट न करतां होतां आलें म्हणून, किंवा दुसऱ्या अशाच कारणानें शिक्षक झालेले लोक थोडे आहेत काय ? ज्यानें उठावें त्यानें पंतोजी बनावें असें आज चाललें आहे कीं नाहीं ? वैद्यकी, राजकीय चळवळी आणि शाळा हीं गारोड्याचीं पोतडीं आहेत. यांत वाटेल त्याचा समावेश होतो. " माझें कपाळ दुखतें आहे " ' अहो सुंठ घाला, त्यांत काय आहे ' असें सांगण्याचा अधिकार कोणास नाहीं ? गव्हर्नर–जनरलाच्या मनांत नाहींत अशाही राजकीय धोरणाच्या बातम्या कोणाला नसतात ? औषधयोजनेंत आणि राजकीय प्रकरणांत आपणास कांहीं समजत नाहीं म्हणणारे जसे थोडे, तसेच शिकविण्याचें काम आपलें नाहीं ह्मणणारेही थोडे. वर्तमानपत्रांचा धंदा जसा हल्लीं हवा त्यानें करावा तसाच शिक्षकाचा ! सामान्य लोकांची तरी हीच समजूत आहे. मग आमचा शिक्षकवर्ग दोषग्रस्त असल्यास नवल नाहीं.

## शिक्षकांचे दोष.

२६. हल्लींच्या शिक्षकवर्गांतील दोष येणेंप्रमाणें आहेत. ( १ ) ते आपल्या धंद्यासाठीं तयार झालेले नसतात. ( २ ) त्यांना आपल्या कामाची आवड नसते. ( ३ ) ते स्वतः विचार करणारे नसतात. ( ४ ) ते कर्तव्यदक्ष नसतात. ( ५ ) मुलांच्या हिताकडेच त्यांची दृष्टि नसते. ( ६ ) त्यांचा स्वतःच्या जिभेवर आणि विकारांवर ताबा नसतो. ( ७ ) त्यांना पुरेसा पगार मिळत नसल्यामुळें ते आपल्या कामास वाहिलेले नसतात. ( ८ ) इतर देशांतील शिक्षणविषयक चळवळींची आणि आमच्या येथीलही शिक्षणविषयक प्रश्नांची त्यांना माहिती नसते. ( ९ ) मुलांशीं त्यांची सहानुभूति नसते. ( १० ) न्याय, सत्य आणि पथ्यापथ्य यांची त्यांना असावी तितकी चाड नसते. ( ११ ) त्यांची शिकवण्याची पद्धति शास्त्रशुद्ध नसते. ( १२ ) शिक्षणशास्त्राची त्यांस माहिती नसते. या दोषांचा आतां क्रमशः विचार करूं.

( १ ) पैकीं पहिल्याचा विचार आतां झालाच आहे म्हणावयाचा. शिक्षकाच्या धंद्यालाही–इतर धंद्यांप्रमाणें उमेदवारी आणि शिक्षण पाहिजे. इतर धंद्यांपेक्षां शिक्षकाचें काम निराळें आहे. इतर धंद्यांत नवशिक्या पडल्यास नुकसान मुख्यतः त्याचेंच होतें. धंद्याची कांहीं माहिती किंवा अनुभव नसला तर वैद्यकींत ज्याप्रमाणें दुसऱ्याचें नुकसान होतें, तसेंच शिक्षणांत होतें. औषध घेतांना रोग्याला किंवा रोग्याच्या माणसांना वैद्याची माहिती असते. आणि हवा तेव्हां वैद्य बदलतां येतो. तसें शिक्षणांत करतां येत नाहीं आणि अडाणी शिक्षकाचे हातून झालेलें नुकसान मागून शिक्षक बदलला तरी भरून येत नाहीं. अडाणी वैद्याच्या हातून होणाऱ्यापेक्षां अडाणी शिक्षकामुळें होणारी हानि फार अधिक असते. वैद्याच्या औषधानें मुख्यतः जडावरच परिणाम व्हावयाचा असतो. परंतु शिक्षकाच्या शिकवणीचा परिणाम जडाला हालविणाऱ्या–चालविणाऱ्या अजडावर--मनावर होत असतो.

लहान मुलाचें मन आणि त्याचें स्थान मेंदू हीं दोनहीं लहानपणीं फार नाजूक असतात. प्रकाशलेखनाच्या अत्यंत नाजूक फलका-प्रमाणें लहान मुलाच्या अंत:फलकावर अत्यंत सूक्ष्महीं बाह्य विषयाचें चिन्ह उठतें, आणि तें एकदां उठलें म्हणजे त्याच्या जन्माच्या गाठोडीपैकीं झालें. तें अनुभवाला अप्रतीत होईल कदाचित्—मुलाला त्याची आठवण राहणार नाहीं कदाचित्. पण त्याचा ठसा मन:फलकावरचा नाहींसा व्हावयाचा नाहीं. त्यानें त्याची सर्व मन:प्रकृति थोडीफार बदलावयाची. अशा स्थितींत रागीट, अविचारी वगैरे शिक्षकाच्या कृती-उक्तींचा मुलावर जो ठसा उमटतो त्यांनीं मुलांची केवढी हानि होत असेल ! म्हणून मुलांस शिकविणें अत्यंत नाजुक काम आहे. अशा कामावर नेमावयाचा माणूस आपल्या कामांत तरबेज झालेलाच असला पाहिजे. पण हल्लींची स्थिति काय आहे ! मूल शाळेंत गेलें कीं प्रथम कोणाच्या हातांत पडतें ! मराठी सहावी यत्ताही ज्याची पास झाली असेल नसेल अशा सर्वांशीं नालायक शिक्षकाच्या ! या शिक्षकाला आपला धंदा अर्थातच आपल्या शिक्षकापासून प्राप्त झालेला असतो. 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम' हें यांचें मोठें शिक्षणतत्त्व ! यांना वेताची छडी शाळेंतून मिळाली नाहीं तर गांवांतील चिंचांवर, नाहीं तर तुराट्यांवर, नाहींतर कळकाच्या काठ्यांवर, नाहीं तर दवण्यांवर यांचा हल्ला व्हावयाचा. तलवारीबंदुकीवांचून शिपाईगडी, लेखणीवांचून कारकून, तसें छडीवांचून हे पटाईत शिक्षक शाळेंत पाय टाकतील ! नांव नको ! छडीच्या प्रयोगाशिवाय पोरांना सरस्वती प्रसन्नच होत नाहीं ! आणि त्यांना लक्ष्मी प्रसन्न होत नाहीं ! त्याला त्यांनीं काय करावें ! डोंबाऱ्याच्या पोराला ज्याप्रमाणें ढोलाच्या ढमक-ढमक-ढमकाशिवाय उड्या मारतां येत नाहींत, किंवा त्याची बंगाली मैना नाचवितां येत नाहीं; त्याची जादू त्याला सुचत नाहीं; तसेंच कदाचित् आमच्या या मास्तरांचें होत असेल. छडीच्या तडाक्यानें डोक्यांत ठोकलेले उजळणीचे धडे छडीच्या छम छम आवाजाशिवाय बाहेर येत नसतील कदाचित् ! कसेंही असो; प्राथमिक शाळांतील मास्तरांची आणि छडीची ही अभेद्य मैत्री आमच्या पोरांस फार भोंवते यांत शंका नाहीं. त्यांच्या बुद्धीची गति कुंठित होणें, त्यांचा स्वभाव भित्रा होणें, त्यांना खोटें बोलण्याची व लबाडी करण्याची संवय लागतें, शाळेचा-विद्येचा किंवा शिकण्याचा तिटकारा येतो, हे सर्व परिणाम तिचे आहेत. मी म्हणतों छडीवाला मास्तर कां होईना, पण छडी वापरायाला चांगल्या अनुभविक वस्तादापाशीं तयार झालेला असला तर त्याचाही थोडाफार उपयोग होईल, पण आमच्या या मास्तराला जर शागीर्दी किंवा उमेदवारी न करतांच मास्तर बनविलेलें असलें, तर त्याच्यापासून मुलाला काय मिळावें ? माराशिवाय दुसरी प्राप्ति काय व्हावयाची ? प्राथमिक शाळांतील दोनतृतीयांश शिक्षक तरी शागीर्दी न केलेले असतात. ज्या वयांत आमच्या मुलांना अत्यंत अनुभविक, उत्तम तयार झालेले आणि नामांकित शिक्षक हवेत त्या वयांत त्यांना असल्या आडमुठ्या मास्तरांच्या ताब्यांत आम्हांस द्यावें लागतें व आम्ही देतों, तेव्हां आम्हांस काय म्हणावें ? आणि प्राथमिक शाळांवर असल्या मास्तरांची नेमणूक करणारांना तरी काय म्हणावें ?

प्राथमिक शाळांत हल्लीं थोडेबहुत ट्रेन्ड ऊर्फ तयार केलेले मास्तर आहेत. पण त्यांचाही व्हावा तसा फायदा होत नाहीं. एक तर या ट्रेन्ड शिक्षकांस करावें तसें तयार केलेलें नसतें. माझें हें विधान वाचून

सध्याच्या ट्रेनिंग कालेजांचे मुख्याध्यापक मजवर खपा होतील. परंतु वस्तुस्थिति सांगतांना मला त्यांच्या मर्जीगैरमर्जीपेक्षां सत्याकडेच विशेष लक्ष दिलें पाहिजे. शिवाय या विधानांत खुद्द त्यांच्यावर टपका ठेवण्याचा माझा इरादा नाहीं. ते आपल्याकडून सुधारणेचे प्रयत्न बरेच करीत असतील. ट्रेनिंग कालेजांत मुख्य विषय शिक्षणपद्धति हाच असला पाहिजे. पण आमच्या ट्रेनिंग कालेजांचा सध्याचा अभ्यासक्रम पहावा तर तो दुय्यम शाळांतील सर्व अभ्यासांचा संग्रह करणारा आहे असें दिसेल. इंग्रजी भाषा शिवायकरून युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परीक्षेस लागणारे बहुतेक सर्व विषय, आणि तिकडे न लागणारे, शेतकी, तालीम, गाणें, मराठी भाषेची उपपत्ति, शिक्षणपद्धति इतके विषय ट्रेनिंग कॉलेजांत हल्लीं शिकवितात. विषयांची संख्या आणि त्यांचें परिशीलन व ज्ञान यांचें प्रमाण व्यस्त असतें हा शिक्षणशास्त्राचा नियम आहे. ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थी इतके विषय कसे तयार करितात याची चौकशी मीं खुद्द त्यांना विचारून केली आहे. त्यांच्यापाशीं टिपणांचीं बाडें 'मागच्यांचें पुढच्यांस लोण' याप्रमाणें आलेलीं असतात. हीं बाडें पाठ करावयाचीं, इतिहास—भूगोल—रसायन—पदार्थविज्ञान—यंत्रशास्त्र सर्व कांहीं मुखोद्गत करावयाचें. आजपर्यंतचे परीक्षांचे प्रश्न मिळवून त्यांचीं उत्तरें घोकून ठेवावयाचीं आणि कोणीकडून एकदां सर्टिफिकेट हातांत पडलें कीं त्या सर्वांस रजा देऊन आपल्या नोकरीवर जावयाचें, हा ट्रेनिंग कॉलेजांतील बहुतेक विद्यार्थ्यांचा क्रम असतो. शिक्षणपद्धति हा खरोखर तेथील सर्वांत महत्वाचा विषय, पण त्याची तयारी तेथें मोठी विलक्षण होते ! सुमारें तीस पस्तीस वर्षांमागें, फौलरसाहेबांच्या मॅन्युअल ऑफ टीचिंग नांवाच्या पुस्तकाचें भाषांतर झालेलें आहे. तें तेव्हां आमच्या ट्रेनिंग कालेजांत सुरू झालें तें अजून तसेंच आहे. या भावी मास्तरांस शिक्षणपद्धतीचा झरा तो ! तेवढें पुस्तक पाठ केलें आणि दोन तीन महिन्यांनीं एकदां वर्ग शिकविण्याची पाळी आल्यास देखरेख करणाऱ्या शिक्षकांच्याच टिपणांचा उतारा करून घेतला व त्यांस नाना युक्तींनीं खुष ठेविलें कीं शिक्षणपद्धतीचें पारायण झालें. वस्तुपाठ व बालोद्यान यांचें सध्याच्या ट्रेनिंग कॉलेजांत मिळणारें शिक्षण फारच बहारीचें असतें ! कॉलेजांतील वस्तुपाठावर देखरेख करणाऱ्या शिक्षकापासून किंवा शास्त्र शिक्षकापासून एक दोन पाठांचे नमुने घेऊन ते पाठ करून ठेविले कीं काम झालें. तसेंच बालोद्यानाचें. सदर शिक्षकांनाही वस्तुपाठ व बालोद्यान या दोन्हींची माहिती यथातथाच असते. एक दोन इंग्रजी पुस्तकें घेऊन त्यांतला कांहीं भाग भाषांतर करून यांनीं घेतलेला असतो किंवा तयार ठेवलेला असतो. तो विद्यार्थ्यांनीं बाबा वाक्यं प्रमाणं प्रमाणें घ्यावयाचा. यांत त्यांचा दोष नाहीं. ते सदर विषयाकरितां म्हणून तयार केलेले नसतात. याप्रमाणें हल्लींचीं ट्रेनिंग कॉलेजें अंशतः अंधपरंपरा कायम करण्याचीं ठिकाणें झालीं आहेत. तीं तशीं व्हावींत असा सरकाराचा हेतु नाहीं व कॉलेजांच्या मुख्याध्यापकांचाही नाहीं. परंतु सरकाराचा व कॉलेजांच्या मुख्याध्यापकांचा हेतु कितीही थोर असला तरी काम जोंपर्यंत वेठीचें होतें, तोंपर्यंत त्या हेतूचा थोरपणा काय करायाचा ? या कॉलेजांतील विद्यार्थी बहुधा जवळच्या वरिष्ठांची मर्जी राखण्यांत चूर असतात. देखरेख करणाऱ्या शिक्षकाच्या टिपणांबाहेर त्यांनीं जाण्याची सोय नसते, किंवा त्यांवर शंका विचारण्याची-

ही विद्यार्थ्यांची छाती होत नाहीं. कारण भांडवल तुटपुंजें असणाऱ्या पेढ्यांसारखे हे शिक्षक असतात. नव्या जुन्या शिक्षणपद्धतींचा रात्रंदिवस अभ्यास आणि इकडील मुलांच्या मनःप्रकृतीचें बारीक निरीक्षण यांची सांगड घालून शिक्षणपद्धतीचें स्वतंत्र शिक्षण देण्याइतका यांचा वकूब नसतो. त्यामुळें ट्रेनिंग कॉलेजांत या मुख्य विषयाची सध्यां तरी फार हेळसांड होते व ट्रेन्ड मास्तरही ‘ अन ट्रेन्ड ’ ऊर्फ तयार न झालेल्या मास्तरापेक्षां शिकविण्याचे कामांत फारसा चांगला असत नाहीं. ट्रेनिंग कॉलेजासंबंधाची ही माहिती तेथें शिकणारां व शिकून नौकरीवर गेलेल्यांपाशीं चौकशी करून मीं मिळविली आहे व ती मिळाली तशी दिली आहे. तींत तपशिलाचा कोठें दोष असेल, परंतु मूलतः ती विश्वसनीय असावी असें मला वाटतें. दुय्यम शाळांतील शिक्षक तर ट्रेन्ड नसतातच म्हटलें तरी चालेल. येथें ट्रेन्ड शिक्षकांची जरूरच कोणास वाटत नाहीं. माणूस प्रवेश परीक्षा पास झालेला असला कीं तो पहिल्या तीन यत्तांस सर्व विषय व वरच्या दोन तीन यत्तांस इंग्रजीशिवाय हवे ते विषय शिकविण्यास लायक ठरतो, आणि ग्रॅजुएट असला कीं, कामच झालें. मग त्याला शिक्षकाचें काम येतेंच येतें ! त्याला कोणताही विषय शिकविण्याची अडचण नाहींच ! ही समजूत आमच्या सरकाराचीही आजपर्यंत होती असें वाटतें. इंग्रजी शिक्षणास आमच्या इकडे मोठ्या प्रमाणावर सुरुवात होऊन कमींत कमी चाळीस वर्षे झालीं. इतक्या वर्षांत, दुय्यम शाळांतही ट्रेन्ड शिक्षक हवेत असा विचार, आणि त्यांना तयार करण्यासाठीं एकादी स्वतंत्र संस्था काढण्याची कल्पना सरकाराला सुचूं नये हें आश्चर्य आहे ! उशीरां तरी आतां सरकाराला त्याची जरूर वाटूं लागली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पण सरकारानें दुय्यम शिक्षकांची परीक्षा सुरू करण्यापूर्वी, आपल्या धंद्यांत उमेदवारी करणारे किंवा धंद्यांतील कसबाची माहिती मिळविण्याची खटपट करणारे किती शिक्षक होते ? अजूनही ज्यांना ही परीक्षा देणें भाग नाहीं त्यांपैकीं कितींना त्याची जरूर आहे असें वाटतें ? आम्हाला आमच्या मास्तरांनीं जसें शिकविलें तसेंच आम्हीही आमच्या मुलांस शिकवितों. आधीं शिकविण्याची आमची कल्पनाच अशी कीं, हातांतल्या विषयाचा इतका भाग वर्गांत वाचायाचा, किंवा मुलांच्या मस्तकांत कोंबायाचा. वर्षांत इतका इतिहास, इतका भूगोल, इतकें इंग्रजी वगैरे संपवायाचें. ‘ माहितीचा संचय ’ म्हणजे विद्या नव्हे. आणि तो मुलांच्या डोक्यांत भरणें, कोंबणें, ठोकणें हें शिक्षण नव्हे; पण मी म्हणतों हें तरी नीटपणें कोण करतो ? आधीं विषय जेवढा सांगावयाचा तेवढा अगोदर तयार करून मुलांना सांगणारे किती ? व तो मुलांचा झाला आहे कीं नाहीं पहाणारे किती ? वर्गांत जाऊन तासभर इमानानें बडबड तरी करणारे किती ? दुय्यम शाळांत शिक्षणपद्धतीबरोबरच शिक्षकाची विद्वत्ताही पहावयास पाहिजे. येथें पद्धतीचें महत्त्व त्या मानानें कमी होऊन ज्ञानदानाचें महत्त्व तितकेंच वाढतें हें खरें. प्राथमिक शाळांत ज्ञानदानापेक्षां ज्ञानदानाच्या पद्धतीचेंच महत्त्व विशेष असतें. किंबहुना तेंच सारें म्हटलें तरीही एक वेळ चुकणार नाहीं. दुय्यम शिक्षणांत शिकविण्याची तऱ्हा आणि शिकविण्याच्या विषयाचें ज्ञान दोनही सारखींच महत्त्वाचीं होतात. येथील शिक्षकांस शिकवावयाचा विषय चांगला अवगत असून तो वागत असला पाहिजे. आणि त्याला तो विद्यार्थ्यांच्या

मनांत ठसवितांही आला पाहिजे. दोनही गुणांनीं युक्त असे आमच्या शाळांत किती शिक्षक असतात ? आणखी त्यांतही विषय विद्यार्थ्यांच्या मनांत भरवून तो त्यांचा बनविणारे कि.ती असतात ? प्रश्नांचीं उत्तरें द्यायाला नकोत.

### शिक्षकांस शिकविण्याची हौस नसते.

( २ ) शिक्षकांना आपल्या धंद्याची आवड नसते, हें म्हणणें अगदीं निरपवाद नसलें तरी सामान्यतः खरें आहे. ‘ शिकणें ’ व ‘ शिकविणें ’ आवडतें म्हणून, पूर्वींच्या ब्राह्मणांप्रमाणें तेंच काम करीत राहणारे आज फार थोडे लोक आहेत. याला कारणें अनेक आहेत हें खरें. प्राचीन काळीं असे शिकणारां-शिकविणारांचे निरानिराळे मठ असून तेथें गुरुशिष्यांचीं गोत्रें राहात असत आणि त्यांचें अध्ययन—अध्यापन निवांतपणें चाले. राजे लोक अशा मठांचा मान ठेवीत आणि योग्य परामर्ष घेत. आज तो राजाश्रय राहिलेला नाहीं. विद्याव्यासंगाचे वेडामुळें ज्ञानार्जन व ज्ञानदान स्वतंत्रपणें करीत राहणाऱ्या लोकांस आजच्या काळीं निर्वाहाचीही अडचण पडते. ज्ञानविषयांचें एकनिष्ठेनें परिशीलन करून आपापल्या विषयांचे नवनवे अज्ञात प्रांत ज्ञातांत ओढणारे ज्ञानमार्गी कुलगुरू देशाच्या उद्धाराचे मोठे स्तंभ होत.त्यांच्यापासून विद्या-कलाकौशल्याचे झरे फुटून त्यांच्या मधुर जलाचें पान सर्वसामान्य लोकांस घडावयाचें ! आणि ज्ञानार्जनांत घालविलेल्या त्यांच्या काळाचा आणि त्यांनीं खाल्लेल्या खस्तांचा अर्थात् त्यांच्या तपश्चर्येचा लोकांस उपयोग व्हावयाचा. विद्युत्प्रयोग करीत असतां हात किंवा पाय भाजून घेतल्यानें सामान्य लोकांच्या कष्टांचा कायमचा परिहार व्हावयाचा. ने यंत्रशक्तीचे निरनिराळे प्रयोग करीत बसल्यानें लोकांचे नित्याचे व्यवहार सोयीचे आणि सुखाचे व्हावयाचे. काव्यकलादिकांचा परिपोष त्यांनीं केला कीं, सामान्य लोकांच्या नीरस जन्मांत काव्याची भर पडावयाची. राजशासन, अर्थनिष्पत्ति, सांपत्तिक घडामोड, युद्धशक्ति, सामाजिक परिवर्तन, इतिहास वगैरे विषयांचें वेड लागून त्यांनीं आमरण ते ते विषय अधीत व उदित करावयाचे आणि त्यांच्या निर्वाहाची व नित्याच्या योगक्षेमाची तजवीज लोकांनीं—किंवा लोकमुख सरकार—यांनीं योग्य प्रकारें लावायाची. अशी स्थिति जेथें असते तेथील लोकांचे हाल आणि अज्ञान भराभर निरस्त होत असतात. त्यांचा ऊर्जितकाळ त्यांच्या हुकमतींत असतो, ते म्हणतील तेव्हां हजर होतो. आमच्या येथें हल्लीं तशी स्थिति नाहीं. उद्यां—परवां येवढ्यांत येण्यासारखी नाहीं, व तोंपर्यंत आमचें शिक्षण पूर्णदशेला येण्याचीही आशा नाहीं. परंतु हल्लींपुरतें तरी आमचें शिक्षण सुधारण्यास शिकण्या—शिकविण्याची ज्यांना हौस—आवड आहे, असले शिक्षक पुष्कळ झाले पाहिजेत. शिक्षकाचा धंदा आवडीनें—निरुपायानें नव्हे—पत्करणारे शिक्षक हवेत. तसे आज फारसे नाहींत, ही मोठी उणीव आहे. आणि हल्लांच्या स्थितींत ती भरून निघण्याचीही आशा नाहीं. आमच्या राजकीय परिस्थितीनें आमच्या देशाच्या कारभारांतील किती तरी जागा—किती तरी कामें आम्हांस मोकळीं राहिलीं नाहींत. उत्तम सेनानी—उत्तम सैनिक होण्याची ज्यांना उमेद त्यांना खर्डेघाशी करीत बसावें लागतें. आपल्या देशासाठीं, आपल्या प्रभूसाठीं, आपल्या देशाच्या शत्रूंशीं झुंजण्यांत रणांगणीं देह ठेवणें हा आम्हांस मोक्षाचा उत्तम मार्ग वाटतो, पण तो आज आमच्या हातचा गेला

आहे. नाना हिताहितांची व्यवस्था लावून देशाला शांतता—न्याय—सुरक्षितता देण्याचीं हीं बहुतेक वरच्या दर्जाचीं कामें आम्हांस मिळत नाहींत. आवड असेल तोच धंदा करीन म्हणणें आज पुष्कळांस साध्य नाहीं, त्याला इलाज नाहीं. जिकडे जमेल तिकडे कमी श्रम करावे लागतील आणि फारशी दगदग रहाणार नाहीं तिकडे आह्मापैकीं बहुतेकांस जावें लागतें. आमच्यांत महत्वाकांक्षा आणि वरचढपणाची हांव नाहीं. पोटाची कशीबशी खळगी भरली म्हणजे आम्हांला आणखी फारशी दगदग करणें नको असतें. आह्मी आमच्या योग्यतेहून हलक्या पगाराचीही नोकरी पत्करतों याचें कारण पुष्कळदां हेंच असतें. पुढची आशा असते, परंतु त्याहीपेक्षां तूर्त दगदग कमी झाली, थोडीशी गैरसोय सोसली तरी चालेल अशाच वृत्ती आमच्यांत फार. अशा अनेक कारणांमुळें आवड नसतांही शाळाखात्यांत व शिक्षकवर्गांत शिरणारी मंडळी आमच्यांत बरीच आहे व ती सध्यांच्या स्थितींत असावयाचीच.

## कर्तव्यदक्षता कमी.

( ३ ) आवड, हौस किंवा भक्ति नसली तरी तिची जागा कर्तव्यदक्षतेनें भरून काढतां येते. जो धंदा पत्करली तो आवडत नसला तरी, ‘ पत्करला खरा, मग तो दक्षतेनें व कसोशीनें करावयाचा ’ अशी तरी वृत्ति हवी. ‘ पदरीं पडलें पवित्र झालें. ’ लग्न झाल्यावर मग तें फिरवितां येत नाहीं; मग त्यानें अंगावर येणारीं सर्व कामें व धर्म बिनबोभाट उचलावयाची आणि पाळावयाची हिंदी बायकांची अत्यंत थोर प्रकृति आहे, तीच पुरुषमंडळींत असती तर बरें होतें. परंतु पुरुषांत ती वैवाहिक संबंधांतही दिसावी तितकी दिसत नाहीं. आणि इतर संबंधांत मुळींच दिसत नाहीं—दिसलीच तर फारच थोडी—म्हटलें तरी चालेल. आवडो-नावडो, अंगावर पडलेलें काम चोख करावयाचें, ही कर्तव्यदक्षता आमच्या अंगीं फार थोडी आढळते. पाठींत चाबूक बसल्याशिवाय किंवा आरीनें टोचल्याशिवाय ज्याप्रमाणें कित्येक तट्टें आणि बैल पाऊल उचलीत नाहींत, तसेंच आमचें होतें. कोणी बोकांडीस बसणारा नसेल तर आमचें काम कधींही वेळेला किंवा नीटपणें व्हावयाचें नाहीं. हा आमचा स्वभावदोष आहे. इतर देशींच्या लोकांतही तो असेल. कोणास ठाऊक ! कदाचित् आपल्या इतका नसेल ! मला तरी हा दोष आपल्या इकडे फार आढळतो. चुकारपणा आमच्या अंगांत भरलेला आहे. आमच्या वातावरणाच्या उष्ण प्रकृतीचा हा कदाचित् परिणाम असेल. अंग जितकें कमी हलेल, त्रास जितका कमी पडेल, मेहनत जितकी चुकवितां येईल, तितकें पहावयाचा आमचा स्वभाव. माझ्या इतक्या दिवसांच्या अनुभवांत मला कर्तव्यदक्ष माणसें फार थोडीं आढळलीं, यामुळे या बाबतींत मी कदाचित् घाईनें हा दोष सामान्यतः सर्वांवर लादीत असेन ! परंतु मला तरी या दोषाचे दाखले पदोपदीं येतात. शिक्षक लोकांत हा दोष वस्तुतः असूं नये. मासल्यालाही सांपडूं नये. आपल्या कामाची चाड त्याला अतिशय आसायाला हवी. काम म्हटलें कीं त्यापुढें त्याचे खाजगी—लौकिकी—सारे विचार बाजूस सरले पाहिजेत. परंतु तसें फार थोडे ठिकाणीं होतें. बऱ्याच शिक्षकांचें काम वेठीच्या कामासारखें असतें. तात्पुरतें—अळंबळें करावयाचें. तें जसें होईल तसें होईल. त्याची फारशी पर्वा नाहीं. असें सामान्यतः होतें. ज्याला लौकिकाची हौस असते तो लौकिकाकरितां तरी आपलें काम मनें लावून करतो. पण ज्यांना लौकिकाची

तमा धरण्याचें कारण नसतें, ज्यांचे पगार, बढती, वगैरे सर्व ठराविक शिरस्त्याप्रमाणें, वशिल्याप्रमाणें आणि संधानरचनेप्रमाणें होत असतात, त्यांशीं ज्यांच्या कामाचा फारसा संबंध नसतो त्यांना आपलें शिकविण्याचें काम मनापासून करण्यास तेवढाही मोह नसतो. सरकारी नोकरींत प्रत्यक्ष कामापेक्षां इतर गोष्टींना अलीकडे महत्त्व फार आहे असा बोभाट आहे. आणि जो माणूस विशेष कसोशीनें काम करतो तो खात्यामध्यें मागें पडतो असें म्हणतात. हें कितपत खरें आहे तें विद्याखात्यानें पहावें. परंतु तें खरें नसलें तरी अशी वदंता असणें किंवा बोभाटा होणें ही खात्याच्या इभ्रतीस आणि शिक्षणाचें काम नीट चालण्यास बाधक आहे. शिक्षकांमध्यें कर्तव्यदक्षता दिसावी तितकी दिसत नाहीं. रोज शिकवावयाचा धडा अगोदर बरोबर तयार करून जाणारे शिक्षक किती आहेत ? ते इतके थोडे आहेत कीं, असा एकादा भेटल्यास विद्यार्थीमंडळाच्या तो विशेष नजरेंत भरतो, ‘ अमक गृहस्थ धडा पाहिल्याशिवाय वर्गावर यावयाचे नाहींत, ’ असे उद्गार त्याचे संबंधानें निघतात. शिकवावयाचा धडा काय आहे हें सुद्धां आमच्या शिक्षकांस पुष्कळदां वर्गांत गेल्यावर कळतें. मुलांच्या धड्यांचीं आणि विषयाच्या माहितीचीं संगतवार टिपणें रोजचीं रोज ठेवणारे शिक्षक फारच थोडे. ज्यांची स्मृति अद्वितीय असेल व ज्यांना टिपणें ठेविल्याशिवायच सर्व गोष्टी वेळच्या वेळीं आठवत असतील अशा अद्भुत स्मरणाच्या शिक्षकांस माझें बोलणें नाहीं. परंतु असलीं अद्वितीय माणसें थोडींच असणार ! माझ्यासारख्या सामान्य माणसांस धडे तयार करूनच जावें लागतें. टिपणेंच ठेवावीं लागतात व विषयाची नीट जुळणी आधीं करावी लागते. मुलांच्या प्रकृतिविशेषांप्रमाणें, संचित विधेप्रमाणें, आणि बुद्धीच्या मगदुराप्रमाणें विषयांची मांडणी आधीं ठरवावी लागते. पुष्कळदा ‘ अमुक मुलास हें नडेल, अमुकास तें समजणार नाहीं ’ तेव्हां त्याला तें समजण्यासाठीं योजावयाचे उपाय आणि दाखलेही आधीं मनांत आणून ठेवावे लागतात. अशा तऱ्हेची धड्याची तयारी आधीं न करतांही प्रसंगवशात् कित्येकांचें शिकविणें चांगलें वठतें. पण तसें फार थोड्यांचें वठतें, व तें वठलें तर वठतें. असली प्रत्युत्पन्न मति फारच थोड्यांचे वांट्यास आलेली असते. आज पंचवीस वर्षें शिक्षकाचें काम करीत असूनही, आणि बरींच वर्षें तोच तो विषय व तेंच तें पुस्तक शिकवीत असूनही प्रि. सेल्बीसारखे विद्वान् रोजचा धडा वाचल्याशिवाय वर्गावर जात नाहींत. मग आम्हांस तसें करणें किती अगत्याचें असलें पाहिजे ! परंतु आमच्यापैकीं किती लोक तसें करतात ? कित्येकांस तर दुय्यम शाळांच्या अभ्यासांत शिकविण्यासारखेंच कांहीं दिसत नाहीं. याप्रमाणें शिक्षक-कोणत्याही कारणानें असोत-कामचुकार असले म्हणजे मुलेंही तशींच बनतात आणि कामचुकारपणाची परंपरा कायम रहाते. आमच्या राष्ट्रीय उन्नतीस हें किती विघातक आहे ! राष्ट्रीय शिक्षणाची ओरड करणारांनीं इकडे कधीं लक्ष दिलें आहे काय ? धडा नेहमीं आधीं तयार करून जाणें; सर्व गोष्टी वेळच्यावेळीं करणें; मुलांच्या अभ्यासाची चालढकल न होऊं देणें; बारीक सारीक गोष्टींत सुद्धां जागरूक रहाणें, हीं शिक्षकाच्या कर्तव्यदक्षतेचीं लक्षणें आहेत. तीं आमच्या शिक्षकांत पुष्कळदां दिसत नाहींत याचें वाईट वाटतें.

**मुलांच्या हिताकडे दृष्टि नसते.**

( ४ ) कर्तव्यबुद्धि नसली तर परोपकार-बुद्धि तरी हवी. मुलांच्या हिताची काळजी हवी. आपले हातून मुलांचें नुकसान होऊं नये, होईल तितकें त्यांचें हितच व्हावें अशी जागृत बुद्धि तरी हवी. तिच्या-योगानें, कर्तव्यदक्षतेनें व्हावयाचें काम होईल; पण तीही आमच्या शिक्षकवर्गांत जागृत नसते. मुलांचें नुकसान समजून उमजून करणारे शिक्षक फारसे नाहींत. निदान सगळ्या वर्गाचें नुकसान मुद्दाम करणारे शिक्षक मिळावयाचेच नाहींत असा माझा समज आहे. दुराग्रह, खाजगी अदावत, वगैरेमुळें एखाद्या व्यक्तीचें नुकसान करणारे शिक्षक नाहींत असें नाहीं; आणि चढाओढीमुळेंही कित्येक मुलांचें नुकसान साधणाऱ्या शाळा नाहींत असेंही नाहीं. परंतु साधारणपणें मुलांविषयीं दुष्टबुद्धि कोणाची नसते. झालें तर त्यांचें बरें व्हावें असेंच शिक्षकांस वाटत असतें. फक्त हें वाटणें पुष्कळांमध्यें निजलेलें असतें. शिक्षकांना मुलांसाठीं म्हणून कांहीं श्रम घेण्याची प्रेरणा करण्याइतकें बळ त्यांत नसतें, तें असायाला ती बुद्धि जागी असली पाहिजे. मुलांचें कल्याण साधण्यासाठीं, आपल्याला त्रास पडला सोसूं, खर्च आला करूं, म्हणणारे शिक्षक फारसे मिळत नाहींत. मुलांच्या कल्याणाची ज्यांची काळजी जागती आहे, त्यांना तें साधल्याशिवाय चैनच पडावयाचें नाहीं. ते, तेवढें साधण्यासाठीं हवी ती घस सोसण्यास तयार होतात; खुद्द त्या मुलांचाही रोष संपादावा लागला तरी संपादतील, लोकापवाद सहन करावा लागला करतील, रात्रीचे दिवस करावे लागले तरी मागें घेणार नाहींत. पण मुलांचें ज्यांत कल्याण आहे तोच मार्ग त्यांना दाखवितील. मुलांना गोड वाटत आहे—येवढ्याचकरितां त्यांच्या तंत्रानें नाचणें त्यांचेकडून व्हावयाचें नाहीं. त्यांच्या ज्या वर्तनानें ते शेवटीं फसणार असतील त्याचा प्रतीकारच असले शिक्षक करतील. आणि स्वतः शिकविण्याचे कामीं देखील मुलांस विषय नीट समजण्यासाठीं पडेल ती मेहनत घेतील. मुलांचे हिताची काळजी असल्यामुळें ज्याचेयोगानें त्यांचें अहित होईल असें वर्तन ते स्वतः करणार नाहींत. अर्थात् मुलांस विषय समजावून देतांना भलतेंच सांगून वेळ मारून नेणार नाहींत, आणि तशी वेळ येऊं नये म्हणून आपला धडा तयार करतील, किंवा निदान वर्गांत कोठें अडल्यास तेथें थांबतील, त्यावर विचार करतील—शोधाशोध करतील, पुस्तकें पहातील, आणि मग मुलांना सांगतील. वेळ मारून नेणारे शिक्षक मला ठाऊक आहेत. मुलांच्या हिताची काळजी बाळगणारे शिक्षक सहसा असें करणार नाहींत.

प्राथमिक शाळांतील शिक्षकास मुलांच्या कल्याणाचा किंवा मुलांचा विचारच नसतो. तो बहुधा सांगकाम्या असतो. इतका पगार द्यावयाचा, इतकें काम करावयाचें,—करतो आहे असें, किंवा केलें आहे असें दाखवावयाचें म्हणजे झालें. यापेक्षां अधिक कांहीं त्याला ठाऊक नसतें. त्याला मुलांचें कल्याण आणि त्यांचा सगळा पुढचा जन्म आपल्या हातांत आहे वगैरे विचारांचें वारेंही नसतें. विशेषतः अन्ट्रेन्ड शिक्षकास तर नसतेंच म्हणायाचें. ट्रेन्ड शिक्षकास ही भाषा येत असते. पण ते विचार फारसे नसतात. तसे असते तर म्युनिसिपल शाळांतील ट्रेन्ड शिक्षक वर्गांत खुशाल मांड्या घालून पानें चघळीत—गप्पा ठोकीत—झोंपा घेत—किंवा

वर्तमानपत्रें वाचीत बसले नसते. ते तसे असतात हें मला ठाऊक आहे. असले मास्तर माझ्या ओळखीचे आहेत. त्यांशीं बोलावयाला गेलें म्हणजे मुलांच्या कल्याणासंबंधानें ते माझ्यापेक्षां जास्ती वक्तृत्व करतात, परंतु त्यांचें आचरण पाहिलें ह्मणजे त्यांना मुलांच्या कल्याणाची मुळींच पर्वा नसते, ही गोष्ट स्पष्ट होते. प्राथमिक शाळा म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत दिल्यानें स्थानिक स्वराज्य दृष्टीनें काय फायदा असेल तो असो, केवळ शिक्षणापुरतीच दृष्टि ठेवल्यास, म्युनिसिपल शाळांत फार घोटाळा आणि अव्यवस्था असते असें मला दिसून आलें आहे. म्युनिसिपल कौन्सिलरांच्यापुढें हांजी हांजी करण्यांत आणि त्यांच्या घरीं खेटे घालण्यांत मास्तरांचा जितका वेळ जातो, त्यांची मनधरणी करण्यांत जेवढी आतुरता दिसते, तेवढा वेळ व ती आतुरता मुलांच्या शिक्षणांत दिसती तर नामी झालें असतें. परंतु मुलांना शिकविण्यापासून या मास्तरांचा फायदा काय ? म्युनिसिपालिटींतील लोकांस खुष ठेविलें म्हणजे त्यांचे पगार वाढतात. निदान काम न करतां—पगार कमी होत नाहीं आणि दपतरी शेरा चांगला रहातो. खेडेगांवांत प्रत्यक्ष पहाणारें कोणी नसल्यामुळें हीच स्थिति व्हावयाची. परंतु शहरांतल्या मास्तरांपेक्षां खेड्यांतले मास्तर काम अधिक करतात. एक तर त्यांची बढती वगैरे डेप्युटी इन्स्पेक्टरांच्या हातांत आणि अंशत: वार्षिक परीक्षेच्या निकालावर असते. व दुसरें ते लोक शहरांतल्या मास्तरांपेक्षां किंचित् जास्त भित्रे असतात. तेव्हां केव्हां काय होईल नेम नाहीं, या भीतीनें ते आपलें काम थोडेंफार मेहनतीनें करतात. शहरांतील शिक्षकांपेक्षा त्यांना मुलांच्या कल्याणाची इच्छाही थोडीशी अधिक असते. त्यांची भूक थोडी असते, आणि गांवकरी लोक थोडेसे भोळे असतात. मास्तर मनमिळाऊ असला, मुलांची काळजी घेणारा असला म्हणजे ते लोक त्याला मान देतात. भाजीबिजी पाठवितात. शिवाय त्याला आपला लौकिक राखावयाचा असतो. तो आपल्याकडून लोकांना खुष ठेवून त्यांच्या मुलांची विद्या झाली तर करून घेण्याची मनोभावें खटपट करतो. पण शहरांतील शिक्षकांसंबंधानें—कांहीं अपवाद खेरीज करून—तसें ह्मणतां यावयाचें नाहीं.

दुय्यम प्रतीच्या सरकारी शाळांतील शिक्षकांस मुलांच्या कल्याणाची फारशी तळमळ असेल असें वाटत नाहीं. त्यांच्यापैकीं बरेच मापटाके किंवा टाकभाडे शिक्षक असतात असें मी भीतभीत म्हणतों. कारण ते शाळेंत काय करतात हें मीं पाहिलेलें नाहीं. माझें अनुमान त्यांच्याशीं झालेल्या गप्पागोष्टीवरून, त्यांच्या एरव्हींच्या उद्गारांवरून, मुलांविषयीं त्यांच्यांत दिसून येणाऱ्या नेहमींच्या वृत्तींवरून काढिलेलें आहे. ते वर्गांत जाऊन झोंपा घेत नसतील खास. त्यांच्या नांवावर घातलेलें काम ते करून टाकीत असलेच पाहिजेत. तथापि मुलांच्या कल्याणाची आंच असलेले शिक्षक आपलें काम जसें करतील तसें ते करीत नसावे ! याला अनेक कारणें असतात. कित्येकांच्या गुणांची पारख होत नाहीं; कित्येकांना नको तेंच काम मिळतें; कित्येक जात्याच बेगुमान असतात; कित्येकांचें आपल्या वरिष्ठांशीं जमत नसतें, कित्येकांचे स्वतंत्र विचार सरकारी नोकरींत चालण्यासारखे नसतात. कित्येक मात्र मनापासून काम करितात.

दुय्यम प्रतीच्या खाजगी शाळा दोन प्रकारच्या असतात, तसे त्यांतले शिक्षकही दोन प्रकारचे असतात. कांहीं शाळा शिक्षणप्रसार करणें हें पुण्यकर्म आहे म्हणून

निघालेल्या असतात; कित्येक चालविणारां-च्या पोटासाठीं निघालेल्या असतात. दुसऱ्या प्रकारच्यांची संख्या मोठी असते. शिक्षकही कित्येक शिक्षणाचें पुण्यकर्म करण्यासाठीं या शाळांत शिकवीत असतात. शिक्षण हीच खरी देशसेवा असें त्यांचें मत असतें. व त्याप्रमाणें ते मुलांचें कल्याण व एकंदर देशाचें हित हीं दोनही डोळ्यांपुढें ठेवून शिक्षणाचें काम करीत असतात. कित्येक आपल्या शाळेचा लौकिक वाढविण्याकरितां मुलांच्या आजच्या कल्याणाकडे पाहून काम करितात व कित्येक केवळ शाळू सोबती असतात. त्यांचें काम टाकभाड्याचें असतें. एकंदरींत मुलांच्या हिताहिताचा आपल्या मनाशीं विचार करून इतर विचार एकीकडे सारून मुलांचेंच हित आणि योग्य संवर्धन करूं झटणारे शिक्षक फार क्वचित् असतात.

## शिक्षक स्वतंत्र विचार करणारे नसतात.

( ५ ) शिक्षक कर्तव्यदक्ष, खुषीनें व आवडून शिक्षकाचा धंदा करणारे किंवा मुलांच्या कल्याणाची आंच बाळगणारे असले म्हणजे त्यांचे हातून काम कसोशीनें होतें.पण पुष्कळदा शिक्षक मनापासून काम करीत असले तरीही त्यांच्या श्रमाचें चीज होत नाहीं. शिक्षण मुलांचे उपयोगी पडून शिकविलेलें त्यांना बरोबर कळण्याला आणि त्याचा परिणाम मुलांच्या मानसिक प्रकृतींत इष्ट घडामोड घडवून आणणारा होण्याला शिक्षकानें नुसती इमानानें मेहनत करून भागत नाहीं. शिक्षक स्वताचे कामाचा स्वतंत्रपणें विचार करणारा पाहिजे. आपल्याला जसें शिकविलें तसेंच आपणही आपल्या मुलांस शिकविणारा शिक्षक जगाच्या मागें पडतो व त्याच्या हाताखालीं शिकणारीं मुलेंही तशींच मागें पडतात. आपणांस जें काम आहे, त्याचा उद्देश काय, तें केल्यानें साधावयाचें काय आहे, तें उत्तम साधावयास उत्तम मार्ग आणि सोपा उपाय कोणता, आपल्या मुलांस त्यातलें कोणतें उपयोगाचें, आपण ज्या पद्धतीनें एकादा विषय शिकलों तींत आपल्या मुलांचे मानानें काय काय फेरफार केले पाहिजेत, वगैरे गोष्टींचा त्यानें आपल्या मनाशीं विचार केला पाहिजे. आज इंग्रजीचा धडा शिकवायाचा आहे, त्यांतला कोणता भाग आजच मुख्यतः करावा, मुलांचें इंग्रजीचें आधींचें ज्ञान किती आहे, त्यांना मागें किती गोष्टी ठाऊक झाल्या आहेत, आणि त्यांशीं बरोबर जुळतील, त्यांच्या मागून संगतवारपणें येतील, अशा आजच्या धड्यांत कोणत्या आहेत, त्यांकडे त्यांचें लक्ष विशेष वेधण्यासाठीं एकंदर धड्याची मांडणी कशी करावी इत्यादि बाबी रोजच्यारोज शिक्षकानें स्वतंत्रपणें ठरविल्या पाहिजेत. आपल्यापुढें आहेत तीं मुलें कशीं—किती ऐपतीचीं, मनाच्या कोणत्या अंगानें सुदृढ आणि कोणत्यानें पंगू आहेत, त्यांच्या सुदृढ अंगांचें पोषण आणि पंगू अंगांचें सांगीभवन होण्यास धड्यांतील कोणता भाग उपयोगाचा आहे आणि त्याचा कसा उपयोग करावा वगैरे बारीक गोष्टी नेहमींच्या—ठरीव कवायतीनें काम करणाऱ्या शिक्षकांस सुचतच नाहींत. ते स्वतः 'पीछेसे आयीचे' गुलाम असतात. आणि त्यांच्याप्रमाणेंच त्यांचीं मुलें—त्यांचा शिष्यवर्गही बनतो. स्वतंत्रपणें विचार करणाऱ्या शिक्षकास दर तासास कित्येकदा आपल्या शिकविण्यांतील वैगुण्य आणि तें भरून काढण्याचे नवे उपाय सुचतात हें मला ठाऊक आहे. एकच धडा एकाच यत्तेच्या 'अ' तुकडीला सांगितला, त्यापेक्षां 'ब' ला बरा आणि

त्याहीपेक्षां ' क ' ला बरा सांगतां आल्याचा अनुभव आहे. असें होण्यास शिक्षक स्वतः-चें डोकें खर्च करून आपल्या कामाचा आणि परिस्थितींचा बरोबर मेळ बसविण्यांत दंग होणारा पाहिजे. इतिहास—भूगोल, गणित, भाषा कित्येक वर्षे शिकवीत असलेले शिक्षक मला माहीत आहेत. पण त्यांच्याशीं बोलतांना, हल्लींच्या शिकविण्याच्या पद्धतींत कोठें कमतरता असल्याचें त्यांना समजल्याचें मला फारसें आढळलें नाहीं. ' शिक्षकावर आणि शिकविण्याच्या हातोटीवर काय आहे हो ! हुशार तो हुशार आणि दगड तो दगडच रहावयाचा; हुशार मुलगा, शिकविणारा कोणीही, कसाही, असला तरी पुढें सरतोच आणि दगड मुलगा कोणाचेंही हातीं दिला तरी फत्तरच ' असे उद्गार बहुतेक शिक्षकांच्या तोंडांतून निघतात. कसेंही शिकविलें तरी फळ एकच. ' जातीच्या सुंदरांना कांहींही चालतें ' हा त्यांचा न्याय. आमच्या शिक्षकांस असें वाटतें हें शिकणारांचें व त्यांचें दुर्भाग्य आहे. एकच सोनें भिन्न कारागिरांचे हातीं पडल्यानें भिन्न गुण घेतें. कारागिराच्या कर्तबगारीवर आणि कुशलतेवर त्याचें पुढील स्वरूप अवलंबून असतें. मुलगा जातीचा हुशार असला तरी तो ज्या शिक्षकाचे हातीं पडेल त्याचे हुशारीप्रमाणें मुलाच्या हुशारीचा प्रकाश सतेज किंवा मंद होतो. जातीच्या सुंदराही झाडपाल्यानीं मढविल्यापेक्षां वस्त्रालंकारांनीं सजावलेल्या अधिक खुलून दिसतात. हुशार मुलगाही खरोखर कुशल शिक्षकाचे शिकवणींत असला तर एरव्हीं होतो त्याहीपेक्षां हुशार होतो. ' हुशार तो हुशार ' हें मत ' यद्भावि तद्भावि ' कोटींतील होय. त्यानें उद्योगाचें कारणच रहात नाहीं. असले शिक्षक मुलांच्या विचाराला कसें शिक्षण देणार ? लहानपणीं सर्व शिक्षकांनीं दगड ठरविलेला मुलगा त्याला योग्य शिक्षक मिळताच पुढें आल्याचीं उदाहरणें माझेपाशीं आहेत. अमक्या मुलास अमक्या तऱ्हेनें शिकवा म्हणजे तो लवकर सुधारेल असें सांगून तसें झाल्याचें मीं बघितलें आहे. कित्येक शिक्षक प्रथम एका तऱ्हेनें शिकवीत असतां त्याला नवीन तऱ्हा सांगून तीप्रमाणें शिकवूं लागल्यापासून तिची पहिलीपेक्षां अधिक उपयुक्तता ओळखूं लागलेलेही मला ठाऊक आहेत. विचार करून आपला मगदूर, स्वभाव आणि अधिकार व मुलांची ताकद, प्रकृती आणि उत्सुकता वगैरेंचा मेळ घालून प्रत्येक धडा शिकवावयाची आपली पद्धति नेहमीं इष्ट दिशेनें फिरविणाऱ्या शिक्षकांना, आपलें व आपल्या मुलांचें उत्तरोत्तर अधिकाधिक हित करतां येतें, हें चोहोंकडच्या अनुभवानें सिद्ध झालेलें आहे. पुष्कळदा प्रत्येक मुलागणीक पद्धतींत फरक करावा लागतो. आजच्या शिक्षणपद्धतींत सरसकट वर्गाचें शिक्षण चालू असल्यामुळें व्यक्तिविशेषांकडे दुर्लक्ष होतें व बऱ्याच मुलांचें जन्माचें नुकसान होतें. प्राथमिक यत्ता आणि दुय्यम शाळांतील पहिल्या तीन यत्ता यांत तरी मुलांचें व्यक्तिशः शिक्षण झालें पाहिजे. प्रत्येक मुलगा कोठें अडतो, कां अडतो, याकडे लक्ष पुरवून त्याच्या मगदुराप्रमाणें त्याला इतरांच्या बरोबरीस ओढण्याचें, नाहीं तर त्याच्या त्याच्या मानानें त्याला पुढें चालविण्याचें बिकट काम शिक्षकाचे हातून झालें पाहिजे. तें आज होत नाहीं. आज मुलगा शाळेंत घातल्यापासून अखेरपर्यंत नापास किंवा पास होत असतो. तो तसा कां होतो त्यालाही समजत नाहीं, त्याच्या शिक्षकांसही समजत नाहीं. व्यक्तिभेदानें उत्पन्न होणारें व्यंग मुलगा लहान असतां जितकें लवकर

दुरुस्त करतां येतें, तितकें तो मोठा झाल्यावर करतां येत नाहीं. आज प्रवेश परीक्षेंत गणितांत किंवा इंग्रजींत वगैरे नापास होणाऱ्या बऱ्याच मुलांपैकीं बरींच लहानपणापासून सारखीं त्याच विषयांत कच्चीं रहात आलेलीं असतात. प्राथमिक शाळांत व दुय्यम शाळांतील पहिल्या तीन यत्तांत मुलांकडे जर व्यक्तिशः लक्ष पोंचेल आणि त्यांचे कच्चे विषय इतरांच्या गतीनें ओढीत ढकलीत न नेतां पक्के करून घेतले तर वरती त्यांना फारसें जड जाणार नाहीं. आज तसें होत नाहीं याचें मुख्य कारण शिक्षक स्वतंत्रपणें विचार करणारे नसतात. वस्तुतः शिक्षकही विचाराची तसदी न घेणारे होण्याचें कारण आमची 'सरसकट बारा टक्की' शिक्षणपद्धति आहे. आमची शिक्षणपद्धति यत्तांनीं बांधलेली आहे. आमच्या शाळांत यत्तांप्रमाणें मुलें फिरतात, मुलांप्रमाणें यत्ता फिरत नाहींत. मुलगा अमक्या वर्गांत आहे, तेव्हां त्याला त्या वर्गाचे विषय शिकवावयाचे; मग ते त्याला समजोत, किंवा मागचे कच्चे असल्यामुळें त्याच्या शक्तीच्या बाहेरचे असोत. हा आमच्या शाळांचा-व आमच्या शिक्षकांचा खाक्या. वर्गांत विषय ज्यांना समजतील त्यांना समजतील. बाकीच्यांना न समजले तर न समजले. त्याला काय करावयाचें. ही स्थिति कांहीं अंशीं आमच्या शाळांतील वर्गाच्या बांधणीमुळें प्राप्त झाली आहे. पण कांहीं अंशीं खालच्या वर्गांत मुलांकडे व्यक्तिशः लक्ष न पोंचल्यामुळेंच आलेली आहे. शिक्षक, शाळांतील यत्तांच्या बांधणींचे, चालत आलेल्या शिकवण्याच्या पद्धतीचे आणि आतां सांगितलेल्या 'भवितव्यता' मताचे गुलाम नसले, आपल्या कामाचा आपल्या पुरता आणि आपल्या ताब्यांतील मुलांपुरता विचार स्वतांच्या दिशेनें करणारे असले तर या अनिष्ट स्थितीनें होणारी मुलांच्या अभ्यासाची हानि त्यांना भरून काढितां येण्यासारखी आहे; परंतु असे शिक्षक आहेत कोठें ? भूगोलासारखा विषय पुस्तकावरून व नकाशावरून नुसता घोटून घेण्याचेंही पुष्कळांस साधत नाहीं, तो शिकविण्याची चोहोंकडे उपेक्षा होते, मग तो गोड करून मुलांचें लक्ष वेधे आणि त्यांत गांवांच्या नांवाशिवाय व लोकसंख्यांच्या आंकड्यांशिवाय, इतर उपयुक्त ज्ञान त्यांस मिळवितां येई असा शिकविण्याची गोष्टच नको. थोडासा विचार केला, आणि शिकविण्याची पद्धति सुधारण्याची इच्छा धरिली तर गांवांचीं नांवें आणि लोकसंख्यांचे आंकडे देखील हल्लींच्यापेक्षां सरस रीतीनें-मुलांत उल्हासवृत्ति ठेवून शिकवितां येतात. अलीकडील शिक्षणशास्त्राचें आणि नवीन शास्त्रशुद्ध शिक्षणपद्धतीचें ज्यांना नांवही ठाऊक नव्हतें, अशा दहा पंधरा वर्षांच्यापूर्वींच्या शिक्षकांतही गांवांच्या नांवांचा भूगोल मुलांस गोडी लागेसा शिकविणारा एखादा शिक्षक निघे. शिक्षकानें स्वतांच्या मेंदूस थोडीशी तसदी दिल्यास तसें करणें अशक्य नाहीं. पण स्वतः विचार करावा कोणीं ?

## जिभेवर व विकारांवर ताबा नसतो.

( ६ ) स्वतंत्र विचार करीत नाहींत किंवा तसा विचार त्यांना सुचत नाहीं हा शिक्षकांचा बुद्धीच्या बाजूचा दोष आहे. मनोवृत्तींच्या बाजूनेंही असाच दोष आजच्या शिक्षकांत आढळून येतो. त्यांचा आपल्या जिभेवर व विकारांवर ताबा नसतो. शिक्षकाचे अंगीं हा मोठा दोष. जीभ आणि मनोविकार हीं शिक्षकांचीं फार मोठीं हत्यारें आहेत, तीं परजण्याची आणि त्यांचा यथाप्रसंग आणि यथाकाम उपयोग कर-

ण्याची हातोटी ज्याला साधली तो शिक्षक बहुधा अपयश घेत नाहीं. अशा शिक्षकांला छडींच्या किंवा स्नायूंच्या जोराच्या प्रयोग करण्याची पाळी येत नाहीं. त्याच्या शब्दांचा रोख, आवाजाचा सूर, चेहऱ्यावर दिसणाऱ्या मनोवृत्तीची छटा, डोळ्यांची फेंक, हीं अत्यंत प्रभावशाली आयुधें असतात. मुलाच्या अपराधाच्या लहानमोठपणाप्रमाणें त्याला आपला शब्द बदलतां येतो, आणि मुलाच्या मनाला अवश्य तेवढाच घाय त्याला करतां येतो. शिक्षेच्या फाजील तीव्रतेनें त्याचीं मुलें कोडगीं होत नाहींत, तशीं भित्रीं होत नाहींत. कां कीं, तो केवळ विकारानें झपाटून जाऊन शिक्षा कधींच करीत नाहीं. त्याचे विकार त्याचे कह्यांत असतात. आतां इतकें रागावलें पाहिजे तर तितकाच तो रागावतो. आतां इतका डोळा वटारला पाहिजे, तितकाच तो वटारतो. आतां रागापेक्षां खेदच झाला पाहिजे व दाखविला पाहिजे तर खेदच त्याला होतो व तो दाखवितो. कौतुक, समाधान, आनंद, प्रेम, दया, करुणा, खेद, राग, रोष, संताप, वगैरे विकार व त्यांचे आविर्भाव त्याला मोजून आणितां व दाखवितां येतात, व त्यांच्यायोगें त्याला मुलांचे मनावर हवा तसा व हवा तेवढाच परिणाम करतां येतो. त्यानें मनांत आणिल्याशिवाय त्याची शांति भंग पावत नाहीं. विनाकारण, विनाप्रसंग राग किंवा खेद त्याला व्हावयाचा नाहीं, व त्याची जीभही तो वागवील तशीच वागते. धड्याची आगाऊ तयारी करतांनाच आज कोठें विनोद करावयाचा, कोठें आवेश आणायाचा, तो किती आणायाचा, वगैरे तो ठरवून टाकतो. तोंडानें उच्चारावयाचे शब्द कोणते, किती हें सर्व त्याचे हुकमीं असतें. त्याची जीभ विनाकारण लांब होत नाहीं किंवा भलत्याच ठिकाणीं आंखडत नाहीं. असले शिक्षक एकदम तयार होत नाहींत. रोज धडा शिकविण्याचे आधीं आणि शिकवून आल्यावर आपल्या कामाची आपल्याशीं शहानिशा करीत राहून त्याप्रमाणें आपल्यांत सुधारणा करण्याचा रोज प्रयत्न केल्यानेंच हा इष्ट गुण अंगीं येतो. परंतु हल्लीं असे शिक्षक फार थोडे आहेत. तसे होण्याची खटपट करणारेही फार थोडे आहेत.

## विकारप्रभुत्त्वाचा शिक्षणांत उपयोग.

जीभ व विकार यांवर ताबा असला त मुलांस शिक्षा लावण्यांत शिक्षकास त्यांचा उपयोग होतो हें तर सिद्धच आहे. पण धडा समजावून सांगण्यांतही या शक्तीची शिक्षकास मोठी मदत होते. विषयाच्या सर्व बाजू यथातथ्य विद्यार्थ्यांपुढें मांडतां येण्यास, प्रत्येक बाजूच्या अभिमान्यांस आपल्या मतानें येणारा आवेश आणि चढणारा अभिमान बरोबर वठवितां आला पाहिजे. मक्केचें किंवा काशीचें वर्णन करीत असतां, अकबर किंवा अवरंगजेब यांचा इतिहास शिकवीत असतां, इंग्रजी धडा देत असतां, कधीं कधीं गणिताचें उदाहरण शिकवीत असतांही त्या त्या ठिकाणांविषयीं निरनिराळे लोक ज्या भावानें बोलतात ते भाव शिक्षकास आपलेसे करतां आले, किंवा हातच्या विषयास अवश्य त्या मनोवृत्तीशिवाय बाकीच्यांस दाबून टाकितां आलें तर धडाही मुलांस बरोबर समजेल आणि त्याला एकदेशीयता येणार नाहीं. मनोविकाराशिवाय कोठेंही मजा नाहीं. निर्विकार शिक्षकाचें शिकविणें नीरस व कंटाळवाणें होतें. बुद्धीच्या विषयाशीं वृत्तींच्या विषयाचें किंवा उद्भावाचें मिश्रण झालें तरच शिकविणें यथास्वभाव होतें. ज्यांच्या मनोवृत्ती वाळून

गेल्या आहेत, असले लोक जगांत असले तर ते वठलेल्या झाडासारखे होत. मुलें तशीं असणें निसर्गविरुद्ध आहे. आणि त्यांच्याशीं ज्यांचा संबंध त्यांनींही तसें त्यांच्याशीं वागणें मुलांच्या मनोजीवितांतील रस गोठवून टाकणारें असतें. मनोविकारांचें यथायोग्य प्रकटीकरण आणि त्यांना शोभेशी जिभेची करामत या दोन गोष्टींनीं धडा सुगम होतो. मुलें इतर सर्व भान विसरून चाललेल्या विषयांतच रमतात व शिक्षकाचे श्रम सफल होतात. एरव्हीं सर्व यांत्रिक होतें. असे शिक्षक आज शोधूनही लवकर सांपडत नाहींत.

## शिक्षक शिक्षणासच वाहिलेले नसतात.

( ७ ) हल्लींचे शिक्षक आपल्या कामास वाहिलेले नसतात. शाळेच्या वेळांशिवाय इतर वेळांत ते निरनिराळे उद्योग करीत असतात. कोणी अर्ज वगैरे लिहून देण्याचा धंदा करितात; प्राथमिक शाळांतील कित्येक शिक्षक भिक्षुकी करतात, लोकांचीं धर्मकर्में चालवितात, लग्नमुंजीच्या दिवसांत आचाऱ्या वाढप्यांचीही जागा भरून काढणारे कांहीं शिक्षक सांपडतात. कोणी फावल्या वेळांत एखाद्या वकिलाची किंवा श्रीमंताची कारकुनी—चिटणिशी करतात. कोणी खाजगी शिकवण्या शिकवतात. दुय्यम शाळांतील शिक्षक बहुधा खाजगी वेळ शिकवण्या करण्यांतच घालवितात. कित्येक वकिलीचा अभ्यास करतात, कांहीं दुसरीकडे नोकरी पहात असतात, कांहीं वर्तमानपत्रांत लिहिण्याचा, दुकानें चालविण्याचा, धंदा पत्करतात. कित्येक युनिव्हर्सिटीच्या परीक्षांची तयारी करतात, कित्येक तर विमाकंपनीचें काम करतात. केवळ आपल्या शाळेंतील कामाला वाहून घेणारे शिक्षक सध्याच्या प्राथमिक शाळांत आणि बऱ्याच दुय्यम शाळांत दुर्मिळ आहेत. यांत शिक्षकांना बोल लावण्यास फारशी जागा नाहीं असें माझें मत आहे. त्यांचा पगारच त्यांनीं पुरेसा नसतो. प्राथमिक शाळांतील शिक्षकांची ही स्थिति सरकारानेंही कबूल केली आहे. तरी त्यांचा पगार सरकार फारसा वाढवीत नाहीं ! त्या शिक्षकांच्या पगाराची माणशीं सरासरी आठ दहा रुपये पडली म्हणजे सरकारास धन्यता वाटते. त्यांनीं आपल्या कामास वाहून घेणें फारसें जरूर नाहीं असें सरकारानेंच त्यांस पर्यायानें दाखविलें आहे. प्राथमिक शाळांच्या कित्येक शिक्षकांकडून सरकार पोस्टाचें काम करून घेतें आणि त्याबद्दल त्यांस तीन चार रुपये जास्ती देतें. या व्यवस्थेमुळें टपालखात्याचें काम थोड्या खर्चांत होत असेल यांत शंका नाहीं; परंतु राजकीय चळवळींशीं शाळाखात्याचा संसर्ग राहूं न देण्याचे कामीं डोळ्यांत तेल घालून बसलेल्या सरकारास पोस्टखात्याच्या सोयीसाठीं शाळाखात्याच्या मंजुरीनें घडणारा हा प्राथमिक शाळांतील शिक्षकांचा व्यवसाय—व्यभिचार कां चालावा कोण जाणे ! शिक्षणेतर उद्योगांशीं शाळांचा किंवा शिक्षणसंस्थांचा आणि त्यांतील गुरुशिष्यांचा कर्तृकसंबंध असूं नये, हें तत्त्व शिक्षणशास्त्रविवेचक मान्य करतात; पण तें शिक्षणाचे कामाकडे त्यांत पडलेल्या माणसांचें सर्व लक्ष गुंतावें, त्यांचा अवधानव्यभिचार होऊं नये व एकच काम यथासांग आणि पूर्णतेनें व्हावें यासाठीं होय. कोणतेंही काम शक्य तितकें सर्वांगसुंदर होण्यास तें एकाग्रचित्तें आणि अनन्यभावानें झालें पाहिजे. शिक्षणासही हा नियम येवढ्याकरितांच लागू करावयाचा. आमचें सरकार राजकीय चळवळीपुरता तो

नियम शिक्षणास लागू करतें, आणि इतर बाबतींत आपणच त्याचें उल्लंघन करवितें यांतलें इंगित काय ? शिक्षकांकडून पोस्टाचें काम करून घेणें, टोळ मारण्याकरितां त्यांची रवानगी करणें, प्लेगव्यवस्थेंत त्यांचेकडून काम घेणें, वगैरे प्रकार अनन्यभावाच्या शिक्षणतत्त्वास उघड उघड विरुद्ध आहेत. प्राथमिक शाळांतील शिक्षक आपल्या कामास अनन्यभावें वाहिलेले नसतात याचा बोल सरकाराकडेच जातो.

दुय्यम शाळांपैकीं सरकारी शाळांत शिक्षकांचा पगार अगदींच हलका नसला तरी त्यांचे योग्यतेला कमीच असतो. तथापि तेथील शिक्षकांनीं आपलें काम अनन्यभावानें करूं नये हें थोडेंसें चमत्कारिक आहे. त्याची मीमांसा मी करीत नाहीं. पण त्याला कांहीं तरी बलवत्तर कारणें असलीं पाहिजेत. त्यांच्या स्वातंत्र्याचा फाजील निरोध, राजनिष्ठेविषयीं सरकाराची साशंकवृत्ति, बढत्या, बदल्या वगैरे संबंधानें होणारे अन्याय, व्यक्तीच्या शिक्षण विषयक योग्यतेपेक्षां वरिष्ठांची मनधरणी करण्याचे जे इतर गौणमार्ग आहेत त्यांसच मिळणारें फाजील महत्त्व, स्पष्टपणा आणि निर्भीडपणा यांच्यापायीं भोगावे लागणारे अपमान, आणि केवळ शरीरवर्णामुळें माणसामाणसांना विद्याखात्यांतच मिळणाऱ्या मानप्रतिष्ठांतील पंक्तिप्रपंच, हीं तीं कारणें असल्यास न कळे. अशा कारणांनीं उत्पन्न होणारा असंतोष कोठेंही चांगला नव्हे, विद्याखात्यांत तर तो फारच घातक होय. तो होण्यास सरकारानें यत्किंचितही जागा ठेवतां कामा नये. तें कसेंही असो. सरकारी दुय्यम शाळांतही केवळ आपल्या कामास वाहून घेतलेले शिक्षक फारसे नसावेत असें वाटतें. हे शिक्षक दुसरा कांहीं उद्योग करीत नसतील व नाहींत हें खरें; परंतु अनन्य भावानें उत्पन्न होणारी आस्था, तळमळ आणि निदिध्यास त्यांचे ठायीं सर्वत्र आढळत नाहीं. इतर कांहीं व्यवसाय करतां येत नाहींत, आणि स्वतःच्या कामांत विशेष मन घातलें तर त्याचें चीज नाहीं, अशा स्थितींत हा शिक्षकवर्ग सर्व जन्मभर असतो.

खाजगी शाळांतील शिक्षकांस ही गोष्ट विशेषच लागू असते. आमच्या इकडच्या बऱ्याच खाजगी शाळा केवळ अडचणीमुळें निघालेल्या असतात. कांहीं प्रशस्य अपवाद आहेत ते सोडा. बाकीच्यांची स्थिति पावसाळ्यांत उगवणाऱ्या झुडुपांप्रमाणें असते. त्यांच्यापाशीं ‘ गंगाजळी ’ फंड नसतो उत्पन्नाचा कायमचा वाहता झरा नसतो, मुलांची फी हेंच त्यांचें उत्पन्न. तें अर्थातच पुरेसें नसतें. आम्ही हिंदुस्थानची प्रजा, आमच्यापाशीं दिवसानुदिवस पैशाचें त्राण नाहींसें होत आहे. मुलांना शाळेंत घालून त्यांच्या फीची आणि पुस्तकांची सोय करणें आम्हांस उत्तरोत्तर किती कठिण पडत आहे, आमचा संसार हांकण्यांतच आमची किती तारंबळ व धांवपळ उडत आहे याची कल्पना—किंबहुना अनुभव आपणांपैकीं बहुतेकांस आहे. तेव्हां आपल्या मुलांपासून होणारें फीचें उत्पन्न किती असणार ? या फीच्या उत्पन्नांतच सर्व मास्तरांचा पगार, शाळेचें सामान, पुस्तकें, उपकरणें वगैरेंचा गुजारा करावयाचा असतो. आमचें सरकार मेहेरबान झालें म्हणजे, फार झालें तर, या साऱ्या खर्चाचा तिसरा भाग मदत म्हणून देतें. परंतु नवीन नियमांच्या अंमलबजावणींत हा तिसरा भाग पुरा मिळणें कल्पतरूच्या प्राप्तीसारखें अशक्य आहे. शंभरांपैकीं शंभर मार्क कोणत्याही शाळेस देणें इन्स्पेक्टरांच्या जिवावर येतें. आणि मार्क ज्या मानानें कमी त्या मानानें या तिसऱ्या भागाची-सरकारी मदतीची छाटाछाट व्हावयाची. त्यामुळें आमच्या खा-

जगीं शाळा सामान्यतः दरिद्रीच असतात. अर्थात् त्यांतील शिक्षकांस भरपूर पगार मिळण्याची गोष्टच नको. कोटींचे कोटी रुपयांची रोज उलाढाल करणाऱ्या आमच्या सरकारासही जर आपल्या विद्याखात्यांतील शिक्षकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें आणि निर्वाहास अवश्य तेवढा पगार देववत नाहीं तर, ज्यांच्या थैल्या नेहमीं रित्या किंवा ज्यांना थैल्याच नाहींत अशा खासगी शाळांत शिक्षकांचे पगार अगदीं भिकार असल्यास नवल काय ? आणि त्यांनीं इतर धंदे केल्यासही—त्यांना करावे लागल्यासही आश्चर्य काय ? तसें व्हावयाचेंच. अशा शिक्षकांमध्यें स्वतांच्या कामाविषयीं अनन्यभाव न दिसल्यास त्यांना बोल लावण्यांत हांशील काय. अशा स्थितींत ज्या खाजगी शाळांतील कित्येक शिक्षक एकनिष्ठेनें काम करीत असतील, त्यांची व त्या शिक्षकांची खरोखर धन्य होय. खाजगी प्राथमिक शाळांत तर असे शिक्षक फारच विरळा. खाजगी दुय्यम शाळांत मात्र असे शिक्षक कोठें कोठें दृष्टीस पडतात.परंतु ते बहुधा चार दोन वर्षांचेच सोबती असतात.प्रवाशानें पुढची मजल मारण्यापूर्वी रात्रीपुरता एखाद्या धर्मशाळेचा आश्रय करावा तशासारखे हे शिक्षक दुसरीकडे कोठें त्यांची चांगली सोय जमेपर्यंत या शाळांत काम करितात. तेवढ्या वेळांत तरी ते आपलें काम अनन्यभावानें करतात हें विशेष आहे. बाकी असेही शिक्षक थोडेच असतात. दर वर्षास दर शाळेच्या वांट्यास एखाद-दुसरा लाभल्यास पुष्कळ. खाजगी शाळांतील शिक्षकांची पगारासंबंधानें इतकी असंतोषाची स्थिति असल्यामुळें आणि त्यांतील उपकरणसामग्रीही असावी तितकी नसल्यामुळें म्हणा किंवा अन्य कारणामुळें म्हणा खाजगी शाळांसंबंधानें सरकारचें धोरण अलीकडे बदलून त्यांना विशेष कात्रींत धरण्याकडे आहेसें दिसतें. असें असेल तर ती मोठी दुःखाची आणि शिक्षणाच्या हितास बाधक गोष्ट आहे.हिंदुस्थानांत शिक्षणप्रसार हवा तितका होण्यास खाजगी शाळांसारखें साधन नाहीं आणि त्यांच्या मदतीशिवाय सरकारानें तो करूं पहाणें व्यर्थ आहे. सरकाराच्या राजकीय परिस्थितीमुळें विद्याप्रसाराकडे देण्यास हवा तितका पैसा सरकारास आपल्या तिजोरींतून काढतां येत नाहीं व तो पुढेंही केव्हां काढतां येईलसें दिसत नाहीं. खाजगी शाळांची मदत सरकारानें घेतलीच पाहिजे. आणि तीही त्यांच्यावर आपण उपकार करतों अशा बुद्धीनें नव्हे—सरकारावर त्यांचे उपकार आहेत अशा कृतज्ञ भावानें घेतली पाहिजे, व त्यांना वारतां येत नाहीं असा सर्व खर्च त्यांचा सरकारानें चालविला पाहिजे. आज तसें होत नाहीं, त्यामुळें शाळांतील शिक्षकांचे पगार फार हलके—अपुरे आहेत. आणि शिक्षणास विशेषतः लागणारा अनन्यभाव त्यांचेमध्यें उत्पन्न होत नाहीं.

## शिक्षकांस शिक्षणविषयक घडामोडींची माहिती नसते.

( ८ ) आमच्या शिक्षकांची सांपत्तिक स्थिति आणि मानसिक स्थिति याप्रमाणें सुखाची नसल्यामुळें त्यांना आपल्याच देशांतील शिक्षणविषयक चळवळींची माहिती नसते, मग इतर देशांतील शिक्षणविषयक चळवळींचें नांवच नको.हिंदुस्थानांतील शिक्षणप्रसाराचा आजपर्यंतचा इतिहास, १८५४ सालचा शिक्षणविषयक खलिता, १८५७ सालच्या भयंकर उत्पातानें त्या खलित्यांत आंखलेल्या धोरणांत पडलेला फरक, १८८२–८३ सालचें शिक्षण कमिशन, व त्याचा रिपोर्ट आणि त्यावरील सरकारी ठराव व गेल्या सात वर्षांत शिक्षणाचे बा-

र्तींत विचार करण्याकरितां भरलेलीं कान्फरन्सें, युनिव्हर्सिटी कमिशन, त्यांचा रिपोर्ट, सरकारी ठराव, युनिव्हर्सिटीचा कायदा त्यावरील वादविवाद, मावळत्या नामदार लाट साहेबांचीं शिक्षणविषयक भाषणें, वगैरे चळवळींची माहिती मिळविण्याची खटपट आमच्या शिक्षकांस नको असते. मागचें सर्व सोडलें तरी गेल्या सात वर्षांतीलच या विषयावरील वाङ्मय किती शिक्षकांनीं वाचिलें आहे, किंवा अन्य तऱ्हेनें त्याची यथातथ माहिती मिळविली आहे ? हा त्यांचा विषय आहे, तरी त्यासंबंधानें सरकार काय करीत आहे—कां करीत आहे, किती लोक त्यांना विरुद्ध आहेत, किती अनुकूल आहेत, विरुद्ध ते विरुद्ध कां ? अनुकूल ते अनुकूल कां, इत्यादि तत्संबंधी प्रश्नांचा आपल्या मनाशीं तरी निकाल त्यांनीं लाविलेला असणें इष्ट आहे. यानें शिक्षणविषयक विश्वाचा पसारा दृष्टीसमोर राहतो, आपलें—आपल्या हिंदुस्थानाचें शिक्षणांतलें साध्य फळ स्पष्टतर होतें आणि आपल्या लहानशा जगावर, त्या मोठ्या जगावर वावरलेली दृष्टि फिरल्यामुळें येथें आपल्या लहानशा कामगिरीचें सुकाणूं बरोबर हालण्यास मदत होते. 'जाऊं द्या हो. आपल्याला काय करावयाचें आहे ! आपलें कर्म ठरलेलेंच आहे ' अशा निराशेनें —उद्वेगानें—विषादानें भरलेले उद्गार आमच्या शिक्षकांचे तोंडून निघतात. त्यांचीं कारणें कांहींही असतील. अशी उदासीनता असते—आहे खास आणि ती शिक्षणाचें काम नीटपणें होण्यास अनिष्ट आहे हेंही खास.

माझ्या मतें या देशांतील शिक्षणविषयक चळवळींची माहिती शिक्षकांस पाहिजे तशी इतर ठळक देशांतीलही हवी कदाचित् दुसरीच पहिलीपेक्षां सध्यां विशेष उपयोगाची आहे. जर्मनी, फ्रान्स, अमेरिका इंग्लंड, जपान वगैरे देशांत शिक्षणाचे उद्योग कोण कसे करीत आले आहेत, तेथील शाळा कशा असतात, शिक्षक कसे असतात, खाजगी संस्थांची शिक्षणास मदत कशी, किती होते, नवीन पद्धति, नवीन कल्पना कोठें कशा निघतात, त्यांचा अनुभव कोण, केव्हां, कोठें पहातात; आमच्या इकडे त्यांतील कोणत्या आल्या आहेत, कोणत्या आणिल्या पाहिजेत वगैरे प्रश्न सध्याच्या काळीं अत्यंत अगत्याचे आणि महत्वाचे आहेत. आमच्या देशाचें भवितव्य बऱ्याच अंशीं या प्रश्नांचीं उत्तरें देण्यावर आणि त्या उत्तरांचा आम्ही उपयोग करून घेण्यावर आहे. हिंदुस्थानाची राष्ट्रीय स्थिति आज डळमळली आहे. मृत्यूपूर्वीं किंवा जन्मापूर्वीं जीवाच्या अंतर्बाह्य शरीरांत जी चळवळ, खळबळ, चंचलता, अस्थिरता सुरू होते व जिच्या वेदना जीवाबरोबर जीवाशीं संबद्ध झालेल्यास किंवा होणारासही भोगाव्या लागतात, तशी चळवळ, ती चलबिचल, ती खदखद राष्ट्राच्या मृत्यूपूर्वीं किंवा जन्मापूर्वीं राष्ट्रीय वातावरणांत व राष्ट्रीय शरीरांत होत असते. जीवाच्या ठिकाणीं ही स्थिति थोडा वेळ टिकते. राष्ट्राच्या जीवितांत ती वर्षानुवर्ष टिकते, पांचपन्नास वर्षे सहज चालते. त्या स्थितीचें पूर्व लक्षण उगाच कोठें आमच्या येथें पुसट पुसट दिसूं लागलें आहे. अशा वेळीं राष्ट्राचा मृत्यु साधावयाचा किंवा पुनर्जन्म साधावयाचा हेंच भावी राष्ट्राच्या आईबापांस आणि हितचिंतकांस ठरवायाचें असतें. शिक्षकांचें काम अशा वटकेस फार नाजूक असतें. त्यांना राष्ट्रीय प्रसूतिलक्षणें नीट समजावीं—सूक्ष्मतः अवलोकावीं लागतात. आणि राष्ट्रप्रसूतीच्या शास्त्राचें सोपपत्तिक ज्ञान सर्व सज्ज ठेवावें

लागतें. तसें असलें तर हें राष्ट्रीय बाळ सुरक्षितपणें आणि निरामयपणें जन्मास येतें. तसें नसलें—शिक्षक अडाणी, जीवंत दृष्टीचे—भोंवतीं—इतरत्र काय चाललें आहे इकडे न पाहणारे, सोपपत्तिक ज्ञानाची पर्वा न करणारे, आपल्याच मोडक्या तोडक्या अनुभवाच्या घमेंडींत राहणारे असले ह्मणजे- किंवा कांहीं कां होईना ह्मणणारे असले ह्मणजे पुढील प्रकार पहायालाच नको. तो आधींच ठरविल्यासारखा बिनचुक व्हावयाचा, अष्टू-घाला-होणाराला बोल बराबर लागायाचा-आणि सर्वच कारभार आटपायाचा ! हिंदुस्थानांतील शिक्षकांच्या माथीं आज फार मोठी जबाबदारी आहे. ती त्यांनीं ओळखिली पाहिजे. स्वतांचाच आणि आजचाच मात्र विचार विसरून जन्मूं घातलेल्या राष्ट्राचा आणि उद्यांचा विचार बघून चाललें पाहिजे. तें कसें चालावें, आपलें काम उत्तम फलदायी कसें करावें, हें समजण्यासाठीं इतर देशींच्या आपल्या बंधूंचा अनुभव त्यांनीं आस्थेनें गोळा करावा आणि पहावा. आज आमच्यापैकीं बरेच जण हें आपलें कर्त्तव्य करीत नाहींत ही खरोखर शोचनीय गोष्ट आहे. आमच्यापैकीं कित्येकांस त्याची जरूरच वाटत नाहीं आणि कित्येक आळसानें तिकडे दुर्लक्ष करतात, कित्येकांचा निरुपाय होतो; मिळून आज यासंबंधानें बहुतेक अंधार आहे. आम्हांला जर इतर देशांत जाऊन वर्ष सहा महिने घालवून तेथील शिक्षणसंस्थांची माहिती प्रत्यक्ष जागच्याजागीं गोळा करतां येती तर उत्तमच होतें पण तें आमच्या आवाक्याबाहेरचें आहे, तोंवर तद्विषयक पुस्तकांवरच आम्हांस निर्वाह केला पाहिजे. फार झालें तर ज्यांना तशी संधि मिळते त्यांना मुद्दाम विनंति करून कित्येक बाबींची माहिती मागवितां येईल. कोणत्या तरी रीतीनें ती मिळविणें अवश्य आहे. आज ती आमच्या शिक्षकांस नसते ही मोठी उणीव आहे.

## शिकणारांशीं सहानुभूति नसते.

( १ ) शिक्षकाचे कामास अत्यंत महत्वाचा गुण सांगावयाचा झाल्यास मुलांशीं सहानुभूति हा होय. आमच्या इकडे या गुणाचा प्रायः अभावच आहे. अलीकडे कांहीं दुय्यम शाळांतील कांहीं शिक्षकांस या गुणाचें महत्त्व समजूं लागलें आहे. तथापि त्यांसही पूर्वपरंपरेनें फारसें सोडलेलें नाहीं. प्राथमिक शाळांत मुलांशीं सहानुभूतीचें नांवच नको. मुलांच्या मनाच्या स्थितीची आह्मांस कल्पनाच होत नाहीं. आईबाप, पालक, शिक्षक, इन्स्पेक्टर वगैरे सर्व या गोष्टींत सारखेच. मुलें आणि मोठीं माणसें यांतील अंतरच त्यांचे लक्षांत रहात नाहीं. मोठ्या माणसांचे अंगीं जे गुण, जें ज्ञान, जी उचितज्ञता असावी तिचीच मुलांचे ठिकाणीं ते अपेक्षा करतात, त्यामुळें मुलांचा अपराध नसतां, अन्यायानें त्यांस शिक्षा किंवा स्तुति मिळते, त्यांचा समज चुकीचा होतो, त्यांस भलत्याच संवयी लागतात. चहाडी, लबाडी त्यांस आपणच शिकविल्यासारखें होतें. पुष्कळदां आपल्या दृष्टीनें जो भयंकर गुन्हा तो गुन्हा आहे असें मुलांस वाटतच नसतें. विशेषतः अगदीं लहान मुलांचें असें फार होतें. कुशा, काशी, दामू, मोरू, रामू वगैरे मुलें—वय सुमारें तीनपासून सहापर्यंत—खेळत असलीं तर त्यांत तीं एकमेकांच्या वस्तू घेतात देतात—दडवतात—हिसकावतात—अशीच एखादी कुशाची वस्तू दामूनें आणिली म्हणजे आपण दामूला चोरीबद्दल शिक्षा करतों. परंतु दामूला अजून ' चोरी ' ' चोर ' ' चोरलें ' या शब्दांचा अर्थच माहित नसतो. त्याला हा नुसता खेळ आणि तोडीस तोडच असते.

त्यानें याची आणि यानें त्याची वस्तु घ्यावी, दडवावी यापेक्षां त्यांत कांहीं नसतें. अशा रीतीनें ज्याची मुलांना कल्पनाही नसते अशांबद्दल त्यांना दंड केल्यानें नसती कल्पना आपण त्यांचे मनांत उत्पन्न करतों आणि त्यांचे खेळ, त्यांच्या खोड्या आपल्या समोर होत असत त्या आपल्यामागें होऊं लाग तात व पूर्वींच्या खुलेपणानें आपल्याला त्यांचं अंतरंग कळण्याचा मार्ग असे तो बंद होतो. आणि एव्हांपासून त्यांना आडमार्गाचा-खोटेपणाचा-धडा मिळतो. 'खोटें बोलणें' तर आपणच मुलांस शिकवितों अशी माझ्या अवलोकनावरून माझी खात्री झाली आहे. आपण मुलांशीं बोलतों तेवेळीं आपल्या शब्दांचा आपल्या मनांत जो–जितका–जसा अर्थ असतो तो–तितका–तसाच मुलांच्या मनांत उदित होतो अशी आपली समजूत असते, पण ती अत्यंत चुकीची असते. मुलें भाषा श्रुतीनें शिकतात. तीं जें जें ऐकतात, तें तें उच्चारून–बोलून पहाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळें अनेक शब्द त्यांचे तोंडीं केवळ ऐकलेल्या ध्वनींचें पुनरुच्चारण या नात्यानेंच येतात. आपण जे शब्द उच्चारतों तेच त्यांच्या बोलण्यांत आले ह्मणजे आपल्याला वाटतें त्यांना आपल्याप्रमाणेंच ते समजतात. माझ्या स्वतांच्या व माझ्या शेजाऱ्यांच्या लहान मुलांच्या वाग्विकासाचें मीं सूक्ष्मतः अवलोकन केलें आहें व अजून करीत असतों. माझा असा अनुभव आहे कीं, पुष्कळच शब्द मुलें भराभर बोलतात, पण त्यांतील एकदशांश शब्दांचाही अर्थ त्यांना माहीत नसतो. शब्दार्थाचा शोध लावण्यास त्यांना कोलंबसाप्रमाणें बरींच वर्षे व्यवहारांत–बालसंसारांत भटकावें लागतें. अशा वेळीं त्यांना नुसते प्रतिशब्द देऊन उपयोग नसतो. मुलांच्या भाषेंत आणि आमच्या भाषेंत केवढें अंतर असतें हें लक्षांत न राहिल्यामुळें बहुधा तीं खरें सांगत असतां–आपणांस तें खोटें वाटतें आणि आपण त्यांस आपल्याला खरें वाटत असतें तें बळेंच कबूल करावयास लावतों. मुलांची आठवणही आपल्या इतकी वाढलेली नसते, त्यामुळें त्यांना पुष्कळ गोष्टींची आठवण नसते. 'हें तूं केलेंस का' अशा प्रश्नाला त्यांनीं 'नाहीं' असें उत्तर दिल्यास आपणास संताप येतो आणि आपण त्यांना दोन अपराधाबद्दल शिक्षा देतों. परंतु त्यांना जर तें केल्याची आठवणच नसली तर त्यांचें मन त्या बाबतींत शुद्ध असतें व त्यांनीं नाहीं म्हणणें हेंच बरोबर असतें. अशा चुका शिक्षकांच्या हातून फार होतात. त्या होऊं नयेत यासाठीं शिक्षकांस मुलांशीं सहानुभूति असली पाहिजे. मुलांचें मनोगत ओळखून आपणही त्यांचेबरोबर मूल होतां आलें पाहिजे. मुलांस ज्याचें हसूं येतें त्याचें त्यांसही हसूं आलें पाहिजे; मुलांस ज्यानें वाईट वाटतें त्यानें त्यांसही वाईट वाटलें पाहिजे. वृत्ति–बुद्धि–कृति तीनही बाजूंनीं मुलांच्या प्रकृतीशीं तादात्म्य करून घेण्याची शक्ति शिक्षकांचे अंगीं हवी. ती असली म्हणजे त्याला त्या बालकोलंबसांतला एक माहितगार कोलंबस होतां येतें आणि वाग्विचारव्यवहारसृष्टींतील कित्येक नवीं खंडें नव्यानें हुडकून काढतां येतात. मुलांस कोणतीही गोष्ट आयती सांगणें हें शिकविणें नव्हे. ती त्यांच्याबरोबर शोधून काढणें–आणि नवीन शोध लाविल्याचा अनुभव व आनंद त्यांस भोगूं देणें हेंच खरें शिकविणें होय, मुलांची वाढ म्हणजे मानवजातीच्या वाढीची अत्यंत संक्षिप्त पुनरावृत्ति असें बऱ्याच शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. त्याप्रमाणें मुलांचें शिक्षणही मानवजातीच्या आजपर्यंतच्या शिक्षणाच्या भराभरा उ-

जळणीवजा झालें पाहिजे. शिकणारा—शिकविणारा यें कांहीं वेळ तरी तादात्म्य झाल्यावांचून शिक्षक फिरून शिकणारे होऊन मुलांबरोबर ते ते विषय नव्यानें शिकूं लागल्यावांचून-तें तसें व्हावयाचें नाहीं. शिक्षकाला मुलांचे अनुभव मुलांप्रमाणेंच अनुभवितां आले पाहिजेत. मुलाशीं सहानुभूति पाहिजे म्हणण्याचा हा माझा अर्थ आहे. नुसता कनवाळूपणा—किंवा मृदुपणा अंगीं असून काम भागत नाहीं. करड्या कडकपणापेक्षां करारी कनवाळूपणा पुष्कळ बरा हें खरें, तथापि त्याहीपेक्षां पुढें गेलें पाहिजे. मुलांचा मूलपणा आणि थोरांचा थोरपणा यांचें प्रमाणशीर मिश्रण शिक्षकाचे अंगीं झालेलें पाहिजे. तरच त्याला मुलांमध्यें खेळून मिसळून त्यांना सुयंत्र वळवितां येतें. त्यांचें पुढारीपण पटकावतां येतें. आणि त्यांच्या नित्य फुलणाऱ्या मनास आणि वाढणाऱ्या शरीरास इष्ट व ठरीव मार्गानें, धाक दपटशहाच्या जुलमाशिवाय, आपल्या मागें नेतां येतें. अशा तऱ्हेची सहानुभूति हल्लींच्या प्राथमिक शिक्षकांत नाहींच म्हणावयाची. छडीचा प्रयोग फार जपून—कधीं काळीं—करावयास शिकलेले शिक्षक अलीकडे कोठें कोठें आढळतात. परंतु मुलांना वळण लावण्यास लागणारा करारीपणा न गमावतां मुलांत मूल होणारे शिक्षक फारसे नाहींत. दुय्यम शाळांतही सहानुभूति असल्यानें मोठी मदत होते. 'अमूक झालें म्हणजे अमूक करावयाचें' अशा कायद्यानें चालणारे शिक्षक अगदींच सैल कारभाराच्या शिक्षकांपेक्षां बरे खरे, 'तथापि अमूक झालें तें कां झालें ' हें जाणणारा शिक्षकच त्याहून चांगला. मुलाचें दुर्लक्ष झालेलें पहातांच त्याला बांकावर उभा करणारे शिक्षकांचा वर्ग गप बसणारा असेल कदाचित्, परंतु शिकणाराच असेलसा नियम नाहीं. पण मुलाचें दुर्लक्ष झालेलें दिसतांच, त्याचें कारण आपल्या शिकविण्यांत आहे, वर्गांत आहे, त्या मुलाच्या मनोवृत्तींत आहे, किंवा मुलाच्या वाईट संवयींत आहे याचा बरोबर तलास ज्या शिक्षकास तावडतोब लावितां येतो. त्याच्या शिकविण्याचा फायदा घेण्यास त्याचा वर्ग बहुतकरून उत्सुक असतो.त्याचे हातून अन्याय होत नाहीं. तो मुलांसंबंधानें भलताच ग्रह करून घेत नाहीं. मुलें 'झालेलीं' नव्हेत, ' होणारीं ' आहेत; 'बनलेलीं' नव्हेत-'बनणारीं' आहेत हें तो कधीं विसरत नाहीं. अमूक मुलगा असा आहे आणि तमूक तसा आहे अशा मनाच्या पक्क्या गांठी तो कधीं मारून ठेवीत नाहीं. जलाशयाच्या जलपृष्ठाप्रमाणें मुलांचे स्वभाव व मनें वाहत्या वाऱ्यानें नानाविधपणें तरळ होणारीं असतात. त्यांना स्थिरता आणि दृढता यावयाची असते. तोंपर्यंत त्यावरील तरंगांचें यथार्थ परीक्षण करून उचितांचें पोषण आणि अनुचितांचें निरसन करणें शिक्षकाचें काम असतें.तें करावयाचें म्हणजे मुलांच्या मनाशीं सहानुभूति हवी. तशी हल्लीं नसते.

## न्याय-सत्य-पथ्यापथ्यांची तलख चाड हवी.

( १० ) मुलांशीं सहानुभूति असावी. शिक्षकांस मुलांबरोबर मुलांसारखें होतां आलें पाहिजे. पण त्यांत वय-शिक्षण-अनुभव इत्यादींनीं प्राप्त झालेल्या गुणांचा विसर पडतां कामा नये. न्याय-सत्य-पथ्यापथ्य यांची त्यांना नेहमीं चाड असली पाहिजे. सध्यांच्या शिक्षकांत ही असावी तितकी कडकडीत नसते. पक्षपात-मेहरनजर-चालढकल-रेटून-दे ऐसाजे-.वगैरे प्रकार त्यांच्या नित्याचरणांत फार होतात. सत्याच्या चाडीपेक्षां आणि मुलांच्या हितापेक्षां

स्वतांच्या प्रतिष्ठेच्या खोट्या नकलेची चाड त्यांना अधिक असते. आपण म्हट-लेलें—केलेलें—सांगितलेलें चुकलें आहे असें दिसून आल्यावर, किंवा एखाद्या मुलानें दा-खविल्यावरही आमचे शिक्षक पुष्कळदां आ-पलेंच धरून बसतात, आणि त्याचा रास्त-पणा छडीच्या किंवा रागाच्या मदतीनें स्थापूं पहातात. आपली चूक कबूल करणें म्हणजे आपली इभ्रत घालविणें अशी त्यांची सम-जूत असते. चूक कबूल केल्यानें विद्वत्तेबद्दलची त्यांची इभ्रत किंचित् कमी झाली असें घट-काभर समजलें तरीही सत्यप्रियतेबद्दल वाढ-लीना ? यांत नुकसान कोठें झालें ? मला वा-टतें येथें शिक्षकानें स्वतांच्या मानापमानाचा विचारच करावयाचा नाहीं. मुलांस खरें तेंच सांगणें हा त्याचा धर्म. त्याच्या गैर-समजुतीमुळें मुलांना त्यानें भलतेंच सांगितलें असलें तर तें जितक्या लवकर सुधरून घेतां येईल तितकें घेतलें पाहिजे. आपली चूक कबूल करावी लागली पत्करली; पण मुलांची खोटीच समजूत रहातां नये, हीच शिक्षकाच्या मनाची नेहमींची वृत्ति असली पाहिजे. पण तशी फार करून नसते, ही दुःखाची गोष्ट आहे. लहान मुलांच्या शिक्ष-कांत सत्य—न्याय—पथ्यापथ्यासंबंधानें दक्षता जितकी असेल तितकी थोडीच. लहान मुलांस शिक्षकाचें सांगणें ह्मणजे अगदीं देव-वचनाप्रमाणें खरें वाटतें. त्यांना चुकीची माहिती सांगणें—किंवा चुकून खोटें सांगणेंही पातक होय. मग आपण चुकलों हें समजू-नही ती चूक न सुधारतां मुलांचा आपल्या सांगण्यानें झालेला समज तसाच राहूं द्याव-याचा हें तर महा घोर पातक आहे. यानें होणाऱ्या नुकसानापेक्षां नुकसान अनीतीच्या उघड उपदेशानेंही होणार नाहीं. प्राथमिक शाळांत सत्यापेक्षां न्यायाचे खून फार होतात. दुय्यम शाळांत न्यायापेक्षां सत्याचे कदाचित् ज्यास्ती भरतील. दोनही ठिकाणीं समाजाच्या सुस्थितीच्या अगदीं मुळाशीं असणाऱ्या या दोन तत्त्वांसंबंधानें बरीच धरसोड दृष्टीस पडते. मुलांस ज्या वयांत कुटिल वादविद्या येत नसते—जेव्हां त्यांचीं मनें स्वभावतः सरळ आणि उजू असतात अशा वयांत त्यांस सत्य—न्यायाविषयीं अ-त्यंत दक्ष असेच शिक्षक मिळाले पाहिजेत. हल्लीं तसे फारसे मिळत नाहींत.

## शिक्षणपद्धती शास्त्रशुद्ध नसतात.

( ११ ) केवळ शिकवण्याच्या पद्धती-संबंधानेंही हल्लींच्या शिक्षकांत गुणांपेक्षां दोषच अधिक सांपडतील. व्यवस्था—मोड—मांडणी-पूर्वापर क्रम आणि सुगमता हे गुण शिक-विण्याच्या पद्धतीनें साधावयाचे. विषय शि-कविण्याच्या तऱ्हा निरनिराळ्या माणसांच्या निरनिराळ्या असतात, आणि शिक्षणशास्त्रा-चा जों जों अधिक विकास होत आहे तों तों शिकविण्याच्या पद्धतींतही जीवंत देशां-त फरक पडत आहे. आमच्या देशांत मात्र तसा फरक फारसा दिसत नाहीं. भूगोल, इतिहास, भाषा, व्याकरण, गणित, शास्त्र शिकवावयाच्या ज्या पद्धती पंचवीस वर्षां-पूर्वीं होत्या, त्याच आज थोड्याफार अं-शानें कायम आहेत. त्यांत सुधारणा झाले-ली दिसत नाहीं. शिक्षणशास्त्रास धरून त्या पद्धतींत योग्य ते फेरफार झालेले नाहींत. फ्रान्स, अमेरिका व अंशतः जर्मनी या देशांत शिक्षणपद्धतींत उलथापालथ झाली आहे. मॅजिक् लॅटर्न, स्थलाचे देखावे चित्रें—नमुने—फोटो—बायॉस्कोपिक प्लेट्स वगैरेंच्यायोगानें इतिहास व भूगोल शिकविण्याची रीत ति-कडे अगदींच बदलली आहे. भूगोलाच्या व इतिहासाच्या धड्यांकरितां मुलांचे वर्ग ब-रोबर घेऊन बाहेर हिंडणारे शिक्षक इकडे कोठें दिसत नाहींत; तिकडे ते जागोजाग

सांपडतील. ऐतिहासिक पोवाडे, ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें, ऐतिहासिक स्थळांचे देखावे, आणि नमुने यांनीं तिकडे इतिहासाचे धडे पुस्तकांतून निघून जमिनीवर—भिंतीवर—आणि शिक्षकांच्या व मुलांच्या डोळीं मुखीं येऊन बसतात. भूताला वर्तमानाचें स्वरूप देऊन वर्तमानाचा क्षणभर विसर पाडणें हेंच इतिहासाच्या पाठाचें मर्म आहे. भूगोलाचा पाठ पुस्तकानें त्या शिक्षकांस कधींच देतां येत नाहीं. ती कला इकडील शिक्षकांसच साधलेली आहे. तिकडे भूगोलाच्या पाठानें तितका प्रवास केल्याचें— तीं तीं स्थळें प्रत्यक्ष पाहिल्याचें, आणि त्यांच्या सृष्टस्थितीचें स्वतः अवलोकन केल्याचें श्रेय येतें. योजनें लहान होऊन देशांदेशांमधील अंतर अंतर्दृष्टीनें लुप्त होतें. आणि समीपांच्या-प्रमाणें दूरचेही देश परिचित होतात. पुस्तकांवरून नकाशे गिरविण्याचा आणि गांवानद्यांच्या यादी घोकण्याचा शीण मुलांस देण्याचें काम तिकडील शिक्षकांनीं सोडून दिल्याला बरींच वर्षे होऊन गेलीं; नुसत्या संख्या मुखोद्गत करवून त्यांच्या बेरजा वजाबाक्यांची संथा मुलांस देण्याचें प्रयोजन त्यांना कधींच दिसेनासें झालें आहे; न पाहिलेल्या वजनामापांचीं—नाण्यांचीं कोष्टकें तिकडच्या मुलांच्या डोक्यांस भारावून सोडण्याचें नाकारीत आहेत, आणि संध्येच्या मंत्रांप्रमाणें युक्लिडाचे सिद्धान्त मुलांचे तोंडीं बसवून घेण्यास त्यांच्या शिक्षणाच्या श्रुतिस्मृति सांगेनाशा झाल्या आहेत. शब्दांचीं रूपें व्यक्तिशः घोकून आणि विशिष्ट प्रयोगांचे कोश कंठगत करून भाषापांडित्य संपादण्याचे प्रयत्न तिकडील मुलांस करावे लागत नाहींत, आणि रोज दोन तास शाळेंत आणि दोन तीन तास घरीं परकी भाषेच्या अध्ययनास देऊन पुनः हिरमुष्टी होण्याचे प्रसंग आपल्या मुलांवर आणणारे शिक्षक तिकडे उत्तरोत्तर दुर्मिळ होऊं लागले आहेत. पदार्थांचें आणि प्रयोगांचें दर्शनही न घेतां सृष्ट पदार्थांच्या आणि रसायनाच्या सिद्धान्तांचें शब्दशः मनन करण्याच्या अजब कसबाचाही तिकडे आतां शिकणारा-शिकविणारांस कंटाळा आला आहे. सारांश, शाळांच्या अभ्यासक्रमांत येणाऱ्या सर्व विषयांत शिक्षणपद्धति पार बदलून नवीन झाल्या आहेत. आणि सांगण्यापेक्षां शिकविण्याचें—वळण लावण्याचेंच काम तिकडील शिक्षक आस्थेनें करूं लागले आहेत. मुलांना श्रम व अभ्यास करायाला सांगणारांपेक्षां, आपणच अधिक श्रम आणि अधिक अभ्यास करणारे शिक्षक तिकडे यशस्वी होत आहेत. स्मृतीपेक्षां बुद्धि आणि कल्पनेबरोबर इंद्रियशक्ति विकसित करण्याकडे तिकडील शिक्षकांचें लक्ष लागल्यामुळें त्यांना तोंडीं आणि सप्रयोग शिक्षण देण्यांतच विशेष अर्थ वाटतो. त्यांच्या पद्धतीनें त्यांच्या घशांस आणि इंद्रियशक्तींस मुलांच्याइतकेच श्रम होतात. त्यांच्या शिक्षणपद्धती शास्त्राच्या पायावर बसविलेल्या असतात. त्यांच्या पद्धती अशा का आणि तशा कां नाहींत, याचें बरोबर उत्तर त्यांना सांगतां येतें. आमच्या इकडे शास्त्रशुद्ध शिक्षणपद्धति म्हणजे काय हेंच पुष्कळांस ठाऊक नाहीं.

## शिक्षकांचा शिक्षणशास्त्राशीं परिचय नसतो.

( १२ ) त्याचें कारण आमच्या शिक्षकांस शिक्षणशास्त्राची मुळींच माहिती नसते. शिकविणें म्हणजे सांगणें, धडा देणें, संथा देणें ही आमच्या जुन्या वैदिक पंडितांची समजूत अजून आमच्या शिक्षकांची पुष्कळ अंशीं तशीच कायम आहे. जडसृष्टींतील पदार्थांचें आणि व्यापारांचें अ-

वलोकन करून पंडितांनीं कांहीं सामान्य सिद्धान्त ठरविले आणि सृष्टिशास्त्र, रसायनशास्त्र, विद्युच्छास्त्र वगैरे शास्त्रें निर्माण केलीं, त्याप्रमाणें अजडसृष्टींतील वस्तूंचें व व्यापारांचें अवलोकन करून त्यांविषयींही सामान्य सिद्धांत पंडितांनीं काढिले आहेत. व त्यांचींही निरनिराळीं शास्त्रें बनविलीं आहेत. मानसशास्त्र हें त्यांतील एक आहे. शिक्षणाची उपपत्ति या शास्त्रान्वयें मुख्यतः होते आणि त्याप्रमाणें ती करून सोपपत्तिक शिक्षणशास्त्रही पाश्चात्य पंडितांनीं निर्माण केलेलें आहे. परंतु शेंकडा एक दोन माणसांखेरीज शिक्षणशास्त्राची माहिती आमचे इकडे फारशी नसते. शिक्षकवर्गांतही, प्राथमिक शाळांतील शिक्षकांस सोपपत्तिक शिक्षणशास्त्र—ते ट्रेन्ड असले तरीही, फारसें अवगत नसतें म्हटल्यास फारसें मोठें धाडस होणार नाहीं. आमच्या ट्रेनिंग कॉलेजांत जो विषय मुख्यतः शिकवायाचा त्याचीच हेळसांड होते असें मला ट्रेनिंग कॉलेजांतून बाहेर पडलेल्या कित्येक शिक्षकांकडून समजलें आहे, आणि ट्रेनिंग कॉलेजांतील वेळापत्रकाची मला जी माहिती आहे, तीवरूनही तीच गोष्ट शाबीत होते. मराठींत शिक्षणशास्त्राची माहिती देणारीं पुस्तकें नाहींत. परंतु ट्रेनिंग कॉलेजांतील शिक्षकवर्गास इंग्रजी येत असतें. त्यांनीं शिक्षणविषयक माहिती मिळवून ती सुगम रीतीनें तेथील विद्यार्थ्यांस सांगितली तर, मला वाटतें, पुष्कळ उपयोग होईल. सध्या 'पीछेसे आयी' तत्त्वावर मिळालेल्या टिपणांचा उतारा आणि घोकण्या यापेक्षां ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांस शिक्षणशास्त्राची माहिती देणारें मोठेंसें साधन नसतें; त्यामुळें शिक्षक ट्रेंड असो कीं अंट्रेंड असो, त्याला शिक्षणशास्त्राचीं ओळख नसते. मानसशास्त्राचा शिक्षणाच्या उपपत्तीस उपयोग होतो, तेवढें मानसशास्त्रही शिक्षकांस परिचित असलें पाहिजे. परंतु प्राथमिक शिक्षकांस मानसशास्त्राचें नांवही ठाऊक असतें कीं नाहीं कोण जाणे. दुय्यम शाळांतील शिक्षकांचीही स्थिति थोडीफार हीच. त्यांनाहीं मानसशास्त्राशीं कधीं प्रसंग आलेला नसतो. त्यांच्यापैकीं जे ग्रॅज्युएट आहेत त्यांना मानसशास्त्र नांवानें ठाऊक असतें. परंतु त्यांना, त्याचा शिक्षकांस उपयोग असतो याची कल्पना नसते. आतां दुय्यम शाळांतील शिक्षक तयार करण्याकरितां निघालेल्या कॉलेजांत शिक्षणविषयक मानसशास्त्र शिकविण्याची तजवीज व्हावयास पाहिजे. ती कशी काय होते तें पहावयाचें आहे. अलीकडे दुय्यम शाळांतील शिक्षकांकरितां जी परीक्षा निघाली आहे त्या परीक्षेसाठीं निवडलेल्या पुस्तकांत मानसशास्त्राचा समावेश आहे. तरी इतर पुस्तकांचा अभ्यास नीट केल्यास मानसशास्त्र न समजतांही त्या परीक्षेच्या लेखी भागांत पास होणें अशक्य नाहीं. आज तरी आमच्या शिक्षकांचा शिक्षणशास्त्राचा असावा तसा व्यासंग झालेला नसतो.

## गुरुशिष्यांमधील नातें.

२७. आतांपर्यंत सांगितलेले शिक्षकांचे दोष सर्वत्र सारखे आहेत असें मी म्हणत नाहीं. कोठें कांहीं, कोठें कांहीं, कोठें ते सारे, कोठें आणखीही दोष दिसून येतात. ते नाहींतसे करण्याची खटपट आपण केली पाहिजे. शिक्षकाचें कर्तव्य फार मोठें आहे, फार पवित्र आहे, फार जबाबदारीचें आहे.

## शिक्षणाची पूर्वपीठिका.

मनुष्य समाज करून राहूं लागल्यापासून समाजाच्या संकीर्णतेबरोबर शिक्षकाची जबाबदारी आणि कामगिरी वाढत आली आहे. आजचा मानवसमाज फारच

क्लिष्ट, एकमेकांत गुंतलेला झाला आहे. पूर्वींचे साधे संबंध—साधीं नातीं, साधी राहणी, साधी उभारणी जाऊन, आज सगळा संसार अनेक रंगा—अनेकांगी—बनला आहे. एकेरीचा दुहेरी—दुहेरीचा चोहेरी—होत होत आज जगाचा व्यवहार असंख्य पदरी झाला आहे. नानादेशांतील नानापदर एकत्र गुंतून गेले आहेत. मानवी शरीराची रचना ज्याप्रमाणें अत्यंत गूढ, अत्यंत सूक्ष्म, अत्यंत संकीर्ण, अत्यंत भिन्न, अत्यंत विचित्र तत्त्वांची झालेली आहे व तीं सर्व तत्त्वें—तीं महाभूतें ज्याप्रमाणें विलक्षण रीतीनें एकमेकांत मिसळून त्यांवरील मूळच्या छापाप्रमाणें आकार बनवितात आणि सृष्टीच्या अगाध कळसूत्राची साक्ष पटवितात, तसेंच मानवी समाजाचें झालें आहे. माझा मी होतों तो माझा आणि बायकोचा झालों:—मुलाबाळांचा झालों, कुटुंबाचा—कुटुंबाच्या समूहाचा झालों. कुलपतीचा—गोत्रपती, गोत्रपतीचा—नगरपती, नगरपतीचा—राज्यपती—असें होतां होतां आज सुधारलेल्या स्वतंत्र राष्ट्रांत मी माझा असून सगळ्यांचाही झालों आहें. विश्वाच्या डोलाऱ्यांत आमची पृथ्वी म्हणजे वाळूच्या कणाएवढी. परंतु ती सुद्धां सर्व डोलाऱ्याच्या सुस्थितीला प्रचंड सूर्यमालांच्या हाराइतकीच अवश्य आहे. तिच्या एकटीच्या स्थानभ्रंशानें सर्व चक्राच्या गतीस धक्का बसेल, तींत बिघाड होईल असें शास्त्रज्ञ म्हणतात. तसेंच मानवाचें झालें आहे. व्यक्ति आपापल्यापरी एकटा भागीक्षुल्लक. परंतु समाजाच्या हल्लींच्या स्थितींत त्याचे लागेबांधे किती सूक्ष्म आणि किती लांबवर पसरलेले असतात! त्यामुळें 'खावें—प्यावें—पहुडावें' या वृत्तीपेक्षां व्यक्तीचें क्रियाक्षेत्र फार वाढलें आहे. त्याचे हितसंबंध आणि व्यवहार बहुरूपी बनले असल्यामुळें आपल्या कर्तव्याचा बराच भाग त्यास उपाध्यायाद्वारें करून घ्यावा लागतो. एकंदर पसाऱ्याचा कांहीं भाग तो उचलतो आणि त्याच्या हातून न होणारा सारा भाग त्याच्याप्रमाणें इतरांस थोडथोडा उचलावा लागतो. शरीरांत जसें पहावयाचें काम डोळ्यांनीं उचललें, ऐकण्याचें कानांनीं, वासाचें नाकानें, रुचीचें जिभेनें आणि स्पर्शाचें त्वचेनें उचललें, अंतर्व्यापारांचीही याप्रमाणें वांटणी झाली, तशीच संसाराच्या सर्व अंगांची वांटणी समाजांत होते. ज्याला त्याला आपल्या मगदुराप्रमाणें आपला कार्यभाग उचलावा लागतो. तो उचलण्यांत त्याचा वेळ आणि बळ खर्च झाल्यामुळें त्याच्या स्वतांच्या इतर कर्तव्यांचा वांटा दुसऱ्याकडे जातो. याप्रमाणें नानाविध लोकांस नानाविध लोकांकरितां खपावें लागतें, आणि आपण दुसऱ्यांचें कांहीं काम करून आपलें कांहीं दुसऱ्यांवर विसंबावें लागतें. मुलांच्या शिक्षणाची गोष्ट अशीच झाली आहे. समाजाच्या पहिल्या स्वरूपांत मुलांस वाढविणें, आणि आपल्यासारखें संसारक्षम बनविणें हें आईबापांचें काम असतें व तें तीं बजावततातही. परंतु समाजाची अनेकविधता वाढली आणि श्रमविभागाची उत्तरोत्तर अधिक जरूर वाटून समाजाचे व व्यक्तीचे व्यवहार भिन्न भिन्न वर्गांकडे वांटून गेले, लोकसंख्या वाढल्यानें रोजचा योगक्षेम कठिण झाला, निर्वाहाचेच श्रम व्यक्तीचा सर्व काळ आणि बळ खाऊन बसूं लागले म्हणजे इतर कामांबरोबर अपत्यशिक्षणाचेंही काम दुसऱ्यावर सोंपवावें लागतें, आणि समाजांतील कांहीं व्यक्तींस दुसऱ्यांच्या मुलांस संसारक्षम बनवणारे बनतात होऊन बसावें लागतें. ही शिक्षकाच्या धंद्याची पूर्वपीठिका लक्षांत धरली म्हणजे शिक्षकाचें काम किती महत्त्वाचें आहे तें समजतें, आणि त्यांनीं करावयाचें काय हेंही समजतें.

मांजरी आपल्या पिलांस उंदीर मारावयास शिकविते; कुत्रीं, वाघ, सिंह, पांखरें, वानर वगैरे मनुष्येतर प्राणी आपल्या पिलांस आपल्यासारखें करून सोडतात; जीवितयात्रा ज्या मार्गानें व जशी व्हावयाची असते तशा धोरणानें नव्या जीवांस शिकवायाचें, असा क्रम मानवेतर प्राण्यांत दिसतो. मांजरी आपल्या पिलांस पोहायास शिकवीत असलेली आढळत नाहीं. वानरी आपल्या पिलांस उंदरांची शिकार करावयास शिकवीत नाहीं. समाजाच्या पहिल्या स्वरूपांत मनुष्यही तसेंच करीत असे. आपण संसार केला, करीत आहों, तसाच करण्याचें कसब आपल्या मुलांस शिकवावयाचें आणि आपली जागा रिती राहूं द्यावयाची नाहीं, हीच बुद्धि सर्व शिक्षणाचे मुळाशीं आहे. संसार करण्याची ऐपत मुलांचे अंगीं आणावयाची हें पहिलें काम. अर्थात् शरीररक्षण—आणि प्राणधारण या दोन गोष्टी मुलांस आधीं शिकवायाच्या आणि या गोष्टी साधून संसारांत व समाजांत जितकें वरती चढतां येईल तितकें चढतां यावें अशीही त्यांची तयारी करून द्यावयाची, हाच प्रत्येक आईबापांचा विचार मुळीं असतो, असला पाहिजे. समाजशास्त्राच्या अनुरोधानें तोच विचार बरोबर ठरतो. शिक्षकाची पूर्वपीठिका लावीत असतां त्याच्या कामाच्या मूळ स्वरूपाचाही आपल्याला शोध लागला हें बरें झालें. शिक्षकांचें काम हें आईबापांचेंच काम आहे; तें त्यांनीं आईबापांच्या ऐवजीं करावयाचें असतें. म्हणून गुरुशिष्यांचें नातें पितापुत्रांच्या नात्यासारखेंच असलें पाहिजे. आईबापांस जें काम इतर व्यवसायामुळें करतां येत नाहीं तें शिक्षकांनीं करावयाचें आहे.

### शिक्षकांची योग्यता

२८ तेव्हां शिक्षकांची योग्यता केवढी आहे ! आईबापांची योग्यता आणि शिक्षकांची योग्यता सारखीच. आईबापांचेंच काम त्यांस करावयाचें असतें. तेवढ्यापुरते मुलांचे आईबापच ते. मुलांस आईबापांसारखें किंबहुना त्यांचेहून अधिक संसारक्षम करण्याकडेच शिक्षकांनीं आपलें सर्व लक्ष वाहिलें पाहिजे. आईबापांनीं आपल्यावर विश्वासानें व निरुपायानें सोंपविलेलें काम आपल्या हातून उत्तम रीतीनें पार पडण्यासाठीं शिक्षकांनीं तितकी योग्यता संपादन केली पाहिजे; आईबापांची वत्सलता, त्यांची मायाममता, त्यांची कळकळ, त्यांची जागरूकता, त्यांची निष्ठा, त्यांची पुत्रपरायणता शिक्षकांनीं धारण केली पाहिजे. मुलाला कांटा बोंचतांच आईच्या आंतड्यांना बसणारा पीळ शिक्षकांच्या आंतड्यांस बसला पाहिजे. मुलांचें जें कांहीं करावयासाठीं आईबापांची धडपड चालते तें तें घडवून आणणें शिक्षकांचें काम आहे. तें तें घडवून आणण्याइतका अधिकार शिक्षकानें मिळविला पाहिजे. दुसऱ्यांचीं मुलें आपल्या हवालीं आहेत—त्यांना आपण क्षणभरही विसंबणार नाहीं अशी शिक्षकांची भावना असली पाहिजे. त्यांशीं प्रतारणा करणें हें पाप आहे. शिक्षकांनीं आपलें काम बरोबर न करणें—शिक्षकांस अवश्य असणारी योग्यता संपादन न करणें—हा एक प्रकारचा भयंकर विश्वासघात आहे. आम्ही तो धंदा करणारे—आपल्या कसबांत हुशार—आपलें काम बरोबर करणारे—मुलांची विद्या कोणती—कशी करावी याचा विचार करणारे--असें समजून आईबाप आपलीं मुलें आमच्या स्वाधीन करतात व आपल्या उद्योगाला जातात. ही त्यांची समजूत—हा त्यांचा आमच्यावरचा विश्वास—आम्ही खरा केला पाहिजे. हें पवित्र काम आहे. त्यांचा पवित्रपणा आम्ही मळवितां कामा नये. सृष्टीच्या एकंदर सर्गसोपानांत

मनुष्यप्राणी जर सर्वांत श्रेष्ठ असेल तर मनुष्याची एक पिढी जातांच तिची जागा पटकावणारी दुसरी पिढी ती जागा घेण्यास आणि सृष्टीचें गाडें आणखीही पुढें ओढण्यास समर्थ करण्याचें काम ज्यांचे हातीं त्यांची योग्यता केवढी मोठी ! खुद्द सृष्टीनें किंवा परमेश्वरानेंच स्वतांचें कांहीं काम या शिक्षकांकडे निरोपिलें आहे. तें नेटपणें, आपलें सर्व बळ एकवटून बजावण्यास शिक्षकांनीं झटलें पाहिजे, व तें उत्तम तऱ्हेनें आपले हातून होण्यासाठीं त्यांनीं नेहमीं उद्योग केला पाहिजे. अर्थात् शिक्षकाचें काम अंगावर घेण्यापूर्वीं त्या कामास योग्य झालें पाहिजे.

## हवें काय ?

२९. आतांपर्यंत शिक्षणक्रम. शिक्षक आणि शिक्षणाचे कामीं झालेले व होत असलेले खाजगी व सरकारी प्रयत्न यांतील ठळक गुणदोषांचा विचार केला. पाडण्याचें काम केलें; आतां रचण्याचे कामास सुरुवात करावयाची आहे. रचनेला आरंभ करण्यापूर्वीं रचायाचें काय आहे हें पाहूं.

आजच्या वातावरणांत—वर्तमानपत्रांत वगैरे शिक्षणाचे संबंधानें जे विचार ऐकूं येतात त्यांत शिक्षणाच्या तीन अंगांचा विशेष उल्लेख होत असतो: '*नीतिशिक्षण' 'धर्मशिक्षण' आणि 'राष्ट्रीय शिक्षण'. पैकीं तिसऱ्याचा ध्वनी नुकताच उठूं लागला आहे, धर्मशिक्षणाची ओरड आज दहा पांच वर्षांची आहे, आणि नीतिशिक्षणाची पांच पंचवीस वर्षांपासून मधून मधून ऐकूं येते. शिक्षणाची नवीन रचना करतांना या तीन अंगांकडे दुर्लक्ष करतां कामा नये. आपल्याला जें शिक्षण हवें आहे, त्यांत काय काय हवें हें आतां पहावयाचें आहे. आज काय नाहीं तें आतांपर्यंत पाहिलें. आतांपर्यंतच्या विवेचनावरून आपल्यास शिक्षणासंबंधानें पांच चार गोष्टी बऱ्याच स्पष्टपणें समजल्या आहेत त्या अशा:—आमचा हल्लींचा शिक्षणक्रम केवळ युनिव्हर्सिटीकडे पाहून रचलेला आहे. ( २ ) त्यांत मुलांपुढें भलत्याच गोष्टी भलत्याच वेळीं येतात. ( ३ ) ( ४ ) दुय्यम शिक्षणांत मुलांना दुहेरी श्रम पडतात. ( ५ ) विषयग्रहणापेक्षां शब्दग्रहण फार होतें. ( ६ ) देशभाषांची आत्मघाती उपेक्षा होते. ( ७ ) समुदायापुढें मुलांकडे व्यक्तिशः लक्ष पोंचत नाहीं. ( ८ ) मनाच्या एका बाजूच्या एका अंगावरच आज ओझें पडतें आणि दुसऱ्या बाजूंकडे आणि दुसऱ्या अंगांकडे लक्ष देण्याची व्यवस्था नाहीं. ( ९ ) सगळ्यांस एकसारखेंच शिक्षण मिळतें. ( १० ) शिक्षकांच्या व शिक्षणपद्धतीच्या दोषांमुळें मुलांवर भार फार पडतो. ( ११ ) मुलांची वाढ त्यामुळें खुंटते. ( १२ ) उपयोग आणि विद्या यांची फारकत होते. ( १३ ) पराश्रय आणि परावलंबन वाढतें. इत्यादि.

## आपल्या शिक्षणाचें धोरण.

आपल्या शिक्षणाचें धोरण ठरवितांना वरील दोष आपण वर्जिले पाहिजेत. आपला शिक्षणक्रम असावा कसा ? याचा आपण थोडक्यांत आराखडा काढूं. शिक्षणाचें मुख्य काम प्रत्येक माणसास शरीररक्षण आणि प्राणधारण करण्याचें सामर्थ्य आणून देणें आहे, हें कबूल केलें पाहिजे. प्रत्येक माणसास स्वतांचा निर्वाह करतां व संसार हांकतां न आल्यास तो सृष्टीच्या संसारास भारभूत होतो. तसा तो होऊं नये—सृष्टीच्या संसारांत त्याचेवर पडणारें काम करण्यास आणि तिच्या कामकऱ्यांची परंपरा संतत—अखंड ठेवण्यास प्रत्येक माणूस आधीं त-

यार झाला पाहिजे. शिक्षणाच्या उद्देशांत याचा समावेश करणें म्हणजे शिक्षणाची पदवी हलकी करणें होय असें ज्यांस वाटत असेल त्यांस वाटो. मी तेथून आरंभ करणार ! आमच्या देशांत जर कशाची अत्यंत निकड असेल तर ती शिक्षणाच्या उद्देशांत 'शरीररक्षण' आणि 'प्राणधारण' यांचा समावेश करणें याची होय असें माझें मत आहे. 'सर्वारंभास्तंडुलाः' तांदुळांचा धिक्कार करणारे करोत. मी ह्मणतों—आमच्या सगळ्या उड्या, सगळे मनोरथ, सगळे कल्पनेचे मनोरे त्यांवर आहेत. आधीं माध्यान्हाची तजवीज मग सगळ्या गोष्टी. राजकीय—सामाजिक—औद्योगिक कोणत्याही बाबतींत आमचें तट्टू आम्हीं पुढें दामटायाला, आधीं तें पायांवर उभें पाहिजे, आणि त्याच्या पोटांत दोन वांस गेले पाहिजेत. सृष्टीच्या इतर अपत्यांपासूनही आपणांस तोच धडा मिळतो. भक्ष्यशोध आणि भक्ष्यसंपादन या दोन गोष्टीच प्राणिमात्र आपल्या संतानास प्रथम शिकवितो, आणि मनुष्य प्राणिवर्गाच्या शिखरावर बसला असला तरी मनुष्यानेंही त्याच गोष्टी मुख्यतः शिकविल्या पाहिजेत. त्यांची उपेक्षा करणें आत्मघाताचें लक्षण होय. म्हणून आपल्या शिक्षणक्रमांत प्रथम 'शरीररक्षण'—'प्राणधारण' या दोन विद्यांचा अंतर्भाव झाला पाहिजे.

( २ ) आमच्या देशाच्या राष्ट्रीय गरजा भागविण्याची त्यांत तजवीज झाली पाहिजे. या गरजा अनेक आहेत आणि त्या भागविणारेही अनेक होतील. या अनेकांस अनेक प्रकारें इष्ट असणारें शिक्षण त्यांस मिळेल अशी व्यवस्था आमच्या शिक्षणक्रमांत हवी.

(३) शिक्षणक्रम मुलांच्या वयाशीं आणि वाढीशीं जुळला पाहिजे. जे विषय जेव्हां समजतील ते तेव्हांच शिकवावयास लागावें.

( ४ ) शब्दग्रहणापेक्षां नियमग्रहण करविणारा अभ्यासक्रम असावा.

( ५ ) त्यांत देशभाषांस प्राधान्य मिळालें पाहिजे.

( ६ ) शरीर आणि मन या दोहोंसही आणि दोहोंच्या सर्वही अंगांस शिक्षण मिळालें पाहिजे.

( ७ ) युनिव्हर्सिटी शिक्षण मिळविणारांची व्यवस्था निराळी पाहिजे.

( ८ ) युनिव्हर्सिटीकडे जाणारांखेरीज बाकीच्यांचें सर्व शिक्षण देशभाषेंतूनच झालें पाहिजे, तथापि त्यांस इंग्रजी—वाटल्यास—शिकतां यावें.

( ९ ) सत्य-न्याय-आणि समता यांस धरून चालण्याची मुलांस संवय लागली पाहिजे.

( १० ) परोपकार—भूतदया—पराक्रम—स्वहितत्याग वगैरे गुणांविषयीं आदर आणि स्पृहा उत्पन्न करण्याचा यत्न पाहिजे.

( ११ ) व्यवहार चोख—सरळ—करण्याची संवय मुलांस लागेलसा कटाक्ष पाहिजे.

( १२ ) कडवेपणा-करारीपणा-नेट—चिकाटी हे गुण वाढविले पाहिजेत.

( १३ ) स्वतःच्या प्रयत्नास उत्तेजन मिळालें पाहिजे.

( १४ ) जिज्ञासा आणि शोधकबुद्धि वाढली पाहिजे.

( १५ ) हिंदुस्थान हा आपला देश—हिंदुस्थानांतले लोक ते आपले लोक, त्यांचें हित तें आपलें हित, अशी भावना वाढविली पाहिजे.

( १६ ) स्वतंत्रता आणि स्वैरपणा यांतील अंतर समजून मुलांना शिस्तीबरहुकूम बिनतकार चालण्याची संवय लागली पाहिजे.

( १७ ) शिक्षण—स्वस्त—फुकट झालें पाहिजे.

( १८ ) तें शास्त्रशुद्ध झालें पाहिजे. इत्यादि. इत्यादि.

## नीतिशिक्षण सामान्य शिक्षणाहून निराळें आहे काय ?

३०. ही एकंदर यादी पाहून कित्येकास मोठा चमत्कार वाटेल. यांत नीतिशिक्षणाचा आणि धर्मशिक्षणाचा कोठेंच उल्लेख नाहीं ह्मणून ते मजवर रागावतील आणि मला शिक्षणाचा प्रश्नच मुळीं समजला नाहीं असें म्हणूं लागतील. परंतु नीतिशिक्षणाचा व धर्मशिक्षणाचा उल्लेख मीं निराळा कां केला नाहीं हें त्यांस थोड्या विचारानें समजणार आहे. ज्यांना तें तसें समजणार नाहीं, त्यांस मी त्यासंबंधानें माझें म्हणणें स्पष्टपणें सांगतों.

नीतिशिक्षण हें सामान्य शिक्षणाहून निराळें आहे काय ? मला वाटतें या प्रश्नासंबंधानें जितका कोलाहल झाला तितका शांतपणानें विचार झाला असता तर नीतिशिक्षणाचा प्रश्न आज उपस्थित झाला आहे त्यापेक्षां फार निराळ्या तऱ्हेनें आणि स्वरूपानें तो पुढें आला असता. आज नीतिशिक्षण हवें म्हणणारांस नीतिशिक्षण म्हणजे काय ? असें विचारल्यास ते काय सांगतील ? भूगोल, इतिहास, पदार्थविज्ञान, रसायन, गणित वगैरे विषयांप्रमाणें नीति हा विषय शाळांत शिकवीत नाहींत, नीतीवर लिहिलेलीं पुस्तकें शाळांत नेमलेलीं नाहींत, त्या विषयाची लेखी किंवा तोंडीं परीक्षा प्राथमिक व दुय्यम शाळांत होत नाहीं हें खास. नीतिशिक्षण नाहीं ह्मणणारांचें ह्मणणें हेंच आहे काय ? इतिहास—भूगोल काव्य—व्याकरणासारखा नीति हा विषय पुस्तकांचेद्वारें—शिकावयाचा व शिकवायाचा आहे काय ? आज शाळांत नीतिशिक्षण मिळत नाहीं म्हणणारांस असें वाटतें काय कीं, आजच्या शाळांतील मुलांस खरें खोटें, न्यायान्याय, बरें बुरें, नीतीचें अनीतिचें, समजत नाहीं ? खोटें बोलणारीं मलें त्यांना खरें काय तें माहीत नसतें म्हणून खोटें बोलतात काय ? कुशाचे कागद दांडगाईनें घेणाऱ्या गोविंदास ते आपले नव्हेत हें समजत नसतें काय ? रामाला बोलण्यांत गुंतवून आपण त्याच्यावर जागा पटकवणाऱ्या नारायणाला आपण लबाडी करतों हें कळत नाहीं काय? मला वाटतें नीतीचे हे मूळ सिद्धान्त मुलांस फार लवकर समजूं लागतात. परंतु ते त्यांच्या वर्तनांत दिसत नाहींत. नीति हा विषय बुद्धिशिक्षणाचा नव्हे, वृत्ति व प्रेरणांच्या शिक्षणाचा आहे. येथें विचारांत दोष नाहीं. आचारांत आहे, आणि आचारांतील दोष नुसत्या विचारानें जाणें कठिण असतें. सत्यनिष्ठेवर निबंध लिहावयाचा असतां नित्य खोटें बोलणारीं मुलेंही तो उत्तम लिहितात. दारू पिण्यापासून होणारें नुकसान व्याख्यानानें सांगतांना दारुड्याच्या वक्तृत्वाला पूर येतो तसा दुसऱ्याच्या येत नाहीं. आज समाजांत अनीति फार असेल तर ती नीतीच्या अज्ञानामुळें नाहीं. ज्ञानवृद्धीनें नीति सुधारण्यास लहानपणीं थोडीशी मदत होत असेल. परंतु शाळांत खरें—खोटें समजून सांगितलें पाहिजे अशी आमच्या मुलांची स्थिति नसते. व्याख्यानांनीं, पुस्तकांनीं नीति सुधारती तर आज सर्व ख्रिस्ती देश नीतीचे आरसे बनते. नीतीची गोष्टच वेगळी आहे. तिचा संबंध आचरणाशीं आहे. मनुष्याच्या एकंदर आचरणाचा एक गठ्ठा केला तर त्यांत विचारपूर्वक—ज्ञानपूर्वक—बुद्धिपुरःसर केलेल्या आचारांची संख्या फारच अल्प भरेल, केवळ नेहमींच्या संवयीनें झालेले आचारच फार सांपडतील. मनुष्याचा आयुःक्रम सामान्य ठरीव नमुन्याबरहुकूमच पुष्कळ होतो. मनुष्य म्हणजे

संवयींचा भारा, असें इंग्रजींत एकानें म्हटलें आहे. तें मनुष्याच्या शारीरिक, मानसिक जीविताच्या फार मोठ्या भागास लागू पडतें. त्याचे विचार—त्याचे उच्चार—त्याचे आचार—सर्व ब-याच अंशानें संवयीनें ठरलेले असतात. डोळ्यांपुढें बोट नेतांच डोळ्याचें पातें जसें पटदिशीं लवतें, तशींच मनुष्याचीं बरींच कृत्यें त्याचे हातून होतात. तो करतो अशीं कर्में फार थोडीं. एवढें खरें कीं यांपैकीं बरींच कृत्यें करावयाचीं नाहींत असें त्यानें मनांत आणल्यास न करण्याचें त्याचे हातांत असतें. हें असें आहे, संवयीनें मनुष्याचीं बरींच कामें होतात, हेंच ठीक आहे. सृष्टीच्या व्यवस्थेंतील ही काटकसर आहे.संवयीनें श्रम वांचनात आणि सामर्थ्याचा व्यय कमी होतो.चालणें-बोलणें,पहाणें-ऐकणें, श्वास घेणें—सोडणें सर्व कामें जर आह्मांस विचारपूर्वक करावीं लागतीं तर केवढा घोंटाळा झाला असता; आणि आह्मी. किती पंगू झालों असतों. परंतु पदार्थाला गति दिली ह्मणजे घर्षणाभावीं ती तशीच रहावी हा सृष्टींतील नियमच निराळ्या स्वरूपानें मानससृष्टीला येथें लागू आहे. अध्यात्मिक शक्ति एक वेळ एका मार्गानें वाहिली ह्मणजे पुनः त्याच मार्गानें वाहावयाची. तुह्मीं मुद्दाम तिचा अवरोध केला तर निराळी गोष्ट ! आह्मांस जें नीतीशिक्षण हवें आहे तें आचाराचें शिक्षण हवें आहे. खरें—खोटें, वगैरे ओळखणें नेहमींच्या व्यवहारांत तितकें कठिण नसतें. आणि तें जेथें अत्यंत गूढ असतें तेथें तें तळापासून हुडकून काढणारी नीतिकुशाग्रता आमच्या सामान्य मुलांस नसली तरी चालेल. नीतिशिक्षणाचा मुख्य संबंध मुलांच्या आचरणाशीं आहे आणि नीतीचें आचरण मुलांचे अंगवळणीं पाडणें हेंच खरें नीतिशिक्षण. खरें तेंच मुलांचे तोंडीं यावें; सरळ तेंच मुलांचे हातून घडावें, न्याय्य तेंच त्यांनीं सहज करावें अशी त्यांस संवयच लागली पाहिजे. तेव्हां नीतिशिक्षणाचें खरें रहस्य मुलांस योग्य त्या संवयी लावण्यांत आहे. तें नीतीवरचीं पुस्तकें घोकून घेण्यांत आणि तेच तेच नीतीनियम वारंवार सांगून त्यांची किंमत अतिपरिचयानें कमी करण्यांत नाहीं. अतिपरिचयानें माणसांची अवज्ञा होते, तशीच शब्दांची किंमत कमी होते. मनाच्या कांहीं विशिष्ट स्थितींत कांहीं शब्दांचा जो उपयोग होतो तो, तेच शब्द वेळीं अवेळीं कानीं पडल्यानें, होत नाहीं इतकेंच नाहीं, तर पुनः होण्याचा संभवही राहत नाहीं. अतिप्रयोगानें त्या त्यां शब्दांतला जोर—प्राण निघून जातो. एकादें फेंकलेलें अस्त्र जसें पुनः कामास येत नसे—नाहीं, एकदां वाहून टाकिलेलें फूल जसें पुनर्माल्य होत नाहीं तसें या शब्दांचें आहे. कर्तव्य, धर्म, न्याय, सत्य वगैरे शब्दांचें पावित्र्य कायम राखण्यास त्यांवर उगाच व्याख्यानें होतां नयेत. अनुतप्त हृदयांत योग्य वेळीं योग्य माणसानें त्यांचा मंत्र फुंकला असतां त्यांचें कार्य फार मोठें आहे. परंतु दर आठवड्यास किंवा दररोज नेमल्यावेळीं त्यांचा पाठ होऊं लागला कीं, ते शब्द मेल्यासारखे होतात, आणि त्यांचे प्रयोगानें हृदयांत जे चैतन्य जागृत व्हावयाचें तें होणें बंद होतें. नीतिशिक्षण देणें तें पुस्तकांनीं आणि व्याख्यानांनीं द्यावयाचें नसतें. मुलांचे सभोंवतीं आसमंतच असें ठेवायाचें कीं, तेथें त्याला अनीतीचें आचरण सुचूं नये. सगळें वातावरण खऱ्यानें, न्यायानें—सरळपणानें—प्रेमानें भरलेलें पाहिजे. जिकडे पाहील तिकडे मुलाला तेंच दिसलें पाहिजे. जगांत घडोघडीं त्याला दिसलें पाहिजे कीं अमुक वर्तनाला मान आहे.

नीतीच्या थोर कल्पना मुलांचे

मनांत नांदत ठेवणें हाही नीतिशिक्षणाचा एक गौण भाग आहे. पण या नीतिशिक्षणाची एक मोटी गोम आहे. मुलांना उवड उपदेशाचे पाठ कंटाळवाणे होतात. असल्या पाठांस मी 'आजीबाईचे' पाठ म्हणतों. आमच्या मराठी क्रमिक पुस्तकांत आणि बऱ्याच इंग्रजी पुस्तकांत असले पाठ फार आहेत. अशा पाठांनीं इष्ट फलप्राप्ति होण्याऐवजी पुष्कळदां जें नको असतें तेंच होतें. मुलांना नीतिपंथाकडे वळविण्याकरितां ते पाठ असतात. परंतु असल्या नीरस उपदेशाचा मुलांना कटाळा येतो व त्या उपदेशांत सांगितलेल्या नीतिपंथाचाही तसाच तिटकारा उत्पन्न होतो. वस्तुतः सर्व पाठांचेद्वारें द्यावयाचें नीतिशिक्षण प्रच्छन्न असलें पाहिजे. नीतितत्त्व शिकविण्याचा उद्देश त्यांत कोठेंच दृग्गोचर होतां नये. मुलांच्या इष्ट मनोवृत्ति इष्ट दिशेनें जागृत व्हाव्या आणि मुलांचीं मनें त्यांनीं गुरफटून जावीं असे ते पाठ असले पाहिजेत. त्यांना चटका लागेल, त्यांना त्यांतील नायकाविषयीं कौतुक—आदर—पूज्यभाव वाटूं लागेल आणि केवढा थोर पुरुष हा असे विचार त्यांचे मनांत घोळत राहतील, अशा तऱ्हेनें—वस्तुस्थितीशीं तंतोतंत जुळणाऱ्या गोष्टी जोरदार भाषेनें लिहून त्यांचे पुढें मांडाव्या, आणि तात्पर्य वगैरे कांहींही न काढतां त्या गोष्टी मात्र त्यांचे मनांत ठसतील अशा शिकवाव्या. म्हणजे न बोलतां—न सांगतां त्यांच्या मनोवृत्तींस इष्ट वळण लागतें. एकीकडे मनोवृत्तींस वळण लावावयाचें आणि दुसरीकडे त्यांच्या प्रेरकशक्तीला काम द्यावयाचें—त्या त्या मनोवृत्तींस कृतींच्या रूपानें प्रकट होण्याचे प्रसंग उत्पन्न करावयाचे, हेंच नीतिशिक्षण. असलें नीतिशिक्षण हल्लींच्या शिक्षणांत देणाराला पुष्कळ देतां येईल. हल्लींचा शिक्षणक्रम त्याचे आड येत नाहीं. फक्त शिक्षकाला नीतिशिक्षणाची कल्पना बरोबर हवी. ती आज नसते. पूर्वी केव्हां होती असें वाटत नाहीं. आमच्या क्रमिक पुस्तकांची या दृष्टीनें सुधारणा होणें फार इष्ट आहे. नव्या पुस्तकांतही 'आजीबाईचे पाठ' आले आहेत. अशा बाबतींत पुस्तकांनीं दृष्टचनुभवाचें काम करावयाचें असतें. त्यापेक्षां अधिक काम करण्याचा पुस्तकें प्रयत्न करतात व त्यामुळें कांहींच साधत नाहीं. तथापि सध्याच्याही पुस्तकांचे साह्यानें किंवा त्यांच्यावांचून नीतिशिक्षण देणें आज अशक्य नाहीं.मात्र तें व्याख्यानानें देतां येत नसून संवयी बनवून द्यावयाचें असतें. तें शिक्षकांस समजलें पाहिजे. 'पांचवा तास नीतीचा उपदेश' अशा व्यवस्थेनें नीतिशिक्षण देणारे देवोत. माझ्या मतें ती व्यवस्था चुकीची आहे. नीतिशिक्षणास उत्तम वेळ म्हणजे मुलांच्या चरित्रांतील प्रसंग. नित्युपदेशाचे शब्द आचरणाच्या बऱ्यावाईट फलाचे जोडीदार असले पाहिजेत. तें फल चाखतांना उपदेशशब्द—वेळ पाहून कमीजास्ती दिल्यास त्यांचा उपयोग होतो. येथेंही शिक्षणतत्त्व एकच. भुकेआधीं खायाला देणें बरें नव्हे. भूक लागल्यावर खायाला देणें, विचारल्यावर सांगणें, प्रसंग आल्यावर उपदेश करणें, हे तीनही नियम मुलांच्या संगोपनांत अत्यंत मोलवान् आहेत. हल्लींच्या शिक्षणक्रमांत हे नियम पाळतां येण्याजोगे आहेत.

### योग्य मनोवृत्तींचा विकास व प्रेरक शक्तींचा अभ्यास हेंच नीतिशिक्षण.

३१. यांतही आणखी नीतिशिक्षणाची सोय करावयास जागा आहे. सामान्य शिक्ष-

णच नीट सुधारलें—तें देण्याचीं पुस्तकें व पद्धति बदलून हव्यात तशा केल्या ह्मणजे मुलांची नीतिमत्ता वाढविण्यास पुष्कळ वाव मिळेल. सगळ्या नीतीचें मूळ सामाजिक जीवितांत आहे. इतरांशीं कोणत्याही तऱ्हेचा संबंध नाहीं, कोणास उपद्रव नाहीं, कोणाचा संपर्क नाहीं—कोणाचें साहाय्य नको—कोणाचें कर्ज नको, अशा स्थितींत सारांश माळेंतून तुटून निघालेल्या मण्याप्रमाणें एकाकी स्थितींत जन्म घालविणें माणसाला शक्य व इष्ट असतें तर ज्या वर्तननियमांस आज आपण नीतिनियम म्हणतों त्यांचा संभव झाला नसता. अशा माणसांच्या आचरणांत नीतीचा विचारच शिरत नाहीं. वाहातें वारें आणि तापतें ऊन, खालची जमीन आणि वरचें आकाश, यांशिवाय दुसऱ्या कोणाची ज्यास ओळख नसणार किंवा कोणाशीं प्रसंग नसणार; झाडपाला, कंदमुळें आणि पोटभर पाणी यांशिवाय ज्यास कशाची जरूर नसणार, अशा फटिंगभाईस नीति—अनीतीचें कारणच नाहीं. सर्व मानव जाति जर अशीच असती तर तिलाही नीति—अनीतीचें कारण नसतें. परंतु असलें एकाकी जीवित मनुष्यास कधीं आवडलें नाहीं आणि अनुभवतां आलें नाहीं. मनुष्याच्या मानवेतर पूर्वजांसही लावों पिढ्यांच्या मागेपर्यंत एकटें रहाणें साधलें नाहीं. संसार संतानाचा आजच्याहून अन्य मार्ग जोंपर्यंत सृष्टीस सांपडणार नाहीं तोंपर्यंत मनुष्यास एकेकटें राहणें शक्य नाहीं—इष्ट नाहीं. एकाचीं दोन झालीं कीं नवे संबंध—नवे भाव—नवे विचार—नव्या प्रेरणा आल्या, वागण्यांत सामान्यत: ठरीवपणा ठेवण्याची जरूर आली,—आणि नीतीचा उगम झाला. आज मनुष्य एकटा नाहीं—दुकटा नाहीं—' असंख्य टा '—नवीन शब्द बनविला तर—झाला आहे. त्याप्रमाणें त्याचें चरित्रही तितकेंच असंख्य रंगांचें आणि असंख्य घटकांचें झालें आहे. नित्य नवे प्रसंग—नित्य नवे संबंध—नित्य नवे लागेबांधे—उत्पन्न होत आहेत, आणि मनुष्याच्या ऐहिक जीविताचें जाळें घोंटाळ्याचें बनत आहे—बनलें आहे. त्यामुळें या चक्रव्यूहात्मक संसारांत दिशाभूल न होतां, वाट फारशी न चुकतां, आपापला कार्यभार वाहून नेण्यास मनुष्याच्या आचरणास होकायंत्राप्रमाणें कांहीं ठरीव वळणें लागलेलीं पाहिजेत. तीं लावावयाचीं म्हणजे ज्या सामाजिक जाळ्यामुळें त्यांची जरूर लागली आहे तें लहानशा प्रमाणावर मुलांच्या आयुष्यांत आणि संसारांत उत्पन्न करावयाचें. त्यांचे दुसऱ्याशीं संबंध वारंवार घडवून आणावयाचे. आज दोन मुलांशीं उद्या तिहींशीं परवां चारांशीं—अशा रीतीनें त्यांस खेळायास आणि जोडीनें काम करायास लावायाचें, व अशा प्रसंगीं सगळें गाडें सुरळित चालण्यासाठीं अवश्य असेंच वर्तन त्यांचे हातून घडवायाचें—तसें न वागल्याचे परिणाम त्यांना भोगायास लावायाचे. नीतिशिक्षणाचा हा मार्ग अवलंबण्याचें शिक्षकांनीं मनांत आणिल्यास त्यांना तें हलींही करतां येणार आहे. काव्य आणि इतिहास हे विषय आजच्या अभ्यासक्रमांत आहेत. मुलांच्या मनोवृत्तींच्या पोषणास आणि इष्ट विकासास या दोहोंचा मोठा उपयोग होतो. नेहमींच्या अनुभवांतील दुःखप्रसंग यथावत रेखाटणारीं, थोर—उदार—पराक्रमशाली कृत्यांविषयीं कौतुक आणि हेवा उत्पन्न करणारीं, वीररसाच्या परिपाकानें बाहूंत स्फुरण आणणारीं, पितृवात्सल्य भूतदया—स्वहितत्याग—भगिनीप्रेम—बंधुभक्ति—मित्रनिष्ठा—वगैरेंचीं जीवमान चित्रें देणारीं, प्रचंड पर्वत, अनावर जलौघ, स्वैर वारे, तुफान समुद्र, भयंकर उत्पात, ज्वालामुखींचे

उद्रेक—आणि विद्युत्पात वगैरेंच्या वर्णनांनीं मानवाचें पामरत्व आणि विश्वचालक शक्तीचें अतर्क्य प्रभुत्व प्रतीत करणारीं, फुलांचें हसें, पिकांचें पिसें, पांखरांचें गाणें—झऱ्यांचे सूर, वृक्षलतांचे संवाद, नक्षत्रांचे निरोप, ज्योतींचें तेज, गुहांचें गुह्य, किशोरांचे खेळ आणि सुंदरांचें सौंदर्य हृदयांत बिंबवणारीं काव्यें म्हणजे नीतिशिक्षणाचे अखंड झरे. त्यांची आणि मुलांची योग्य वेळीं गांठ घालून दिली पाहिजे. ती घालून देणें हेंच नीतीच्या विषयाचें आध्यात्मिक शिक्षण.

याप्रमाणें एकीकडे मनोवृत्ती तयार होत आहेत तों त्यांचेबरोबरच प्रेरणाशक्तीचेंही पोषण केलें पाहिजे. मनाशीं संकल्प करून—निश्चय ठरवून त्याप्रमाणें वागण्याचे मुलांस साजतील असे प्रसंग त्यांस आणून दिले पाहिजेत, आणि त्या त्या प्रसंगीं त्यांचे हातून स्वताच्या प्रेरणेनें वर्तन होऊं दिलें पाहिजे. आपल्यापुढें आलेल्या एकाहून अधिक आचार--विषयांतून आपण अमुकच निवडणार व तोच आचरणार याचा निश्चय स्वतां करण्याचें वळण मुलांस लावणें हा नीतिशिक्षणाचा मोठा भाग आहे. दोन तीन वाटांपैकीं अमुक चांगली आणि तिनेंच प्रस्तुत प्रसंगीं आपण जाणार हें, मुलांस काय—मोठ्यांस काय, संवयीनें ठरवितां आलें पाहिजे, तसें फार थोड्यांस येतें. तें आल्यावर आपला निश्चय न डळमळूं देतां त्या वाटेला धरून राहण्याची ताकद उत्पन्न करणें हा नीतिशिक्षणाचा तिसरा भाग होय. या तिहींचेंही काम बरोबरच चाललें पाहिजे. हल्लींच्या शिक्षणक्रमांत मनाच्या तीनही अंगांचा विकास करण्याकरितां अवश्य तसा बदल केला म्हणजे नीति—शिक्षणाच्या तीनही अंगांची व्यवस्था होईल. आज मनोवृत्तींचें पोषण कसेंबसें होतें. त्यांतही सुधारणेला पुष्कळ जागा आहे. तथापि त्याची थोडीशी तजवीज आहे. त्याच्या पुढच्या दोहोंची मात्र आज दाद लागत नाहीं. ती लावणें अवश्य आहे.

## धर्मशिक्षण.

३२. नीतिशिक्षणाची याप्रमाणें वाट लाविली. त्याचे मागून—परंतु अलीकडे विशेष जोरानें पुढें आलेला प्रश्न धर्मशिक्षणाचा आहे. या प्रश्नासंबंधीं माझीं मतें आज लोकांना आवडतील अशीं नाहींत. धर्मासंबंधानें माझी स्वतांची वृत्ति कशीही असो. धर्मशिक्षणावांचून—धर्मवृत्तीवांचून समाजाचें आज चालायाचें नाहीं हें मला पूर्णपणें कबूल आहे. तथापि 'धर्मशिक्षण' 'धर्मशिक्षण'—म्हणून अलीकडे जी ओरड सुरू झाली आहे ती, सामान्यतः लौकिक ओरडी ज्या तऱ्हेच्या असतात तशीच आहे, मुळाशीं थोडासा सत्याचा कणमात्र—बाकी सारा असत्याचा आणि गैरसमजाचा फुगवटा. आज शाळांत धर्मशिक्षण नाहीं, त्यामुळें आमचीं मुलें धर्मभ्रष्ट होत आहेत वगैरे ओरडीचें नीट परीक्षण केलें म्हणजे त्यांतील तथ्यातथ्य आपल्या लक्षांत येईल. ही ओरड मुख्यतः इंग्रजी तऱ्हेनें शिकलेल्या लोकांची आहे. हें माझें ह्मणणें प्रथमदर्शनीं मोठें विलक्षण वाटेल. परंतु त्यांत विलक्षणपणा कांहीं नाहीं, तें वस्तुस्थितीला तंतोतंत धरून आहे. आमच्यांतील अगदीं जुनीं माणसें धार्मिक आहेत, कर्मठ धर्मनिष्ठ आहेत. अलीकडील लोक-विशेषतः इंग्रजी शिकलेले—आपल्यासारखे कर्मठ नाहींत, स्नान संध्या—देवपूजा वगैरे धर्मकर्में त्यांचे हातून यथासांग होत नाहींत हें पाहून त्यांना वाईट वाटतें, व ते आमच्या धर्मभ्रष्टतेविरुद्ध तक्रार करतात. परंतु धर्मभ्रष्टतेचें सूत्र शाळांशीं लावून ते देत नाहींत. काळ बदलला, राजा परका

आला, वगैरेमुळें धर्माचें मातेरें झालें असा त्यांचा समज असतो. धर्म शिकविणें शाळांचें काम आहे, हें त्यांच्या स्वप्नींही येत नाहीं. त्यांना स्वतः धर्माचें जें काय शिक्षण मिळालें तें घरीं वडिलांनीं आणि उपाध्यायानें दिलें, तात्या पंतोजीनें नव्हे हें त्यांस ठाऊक असतें. लिहिणें—वाचणें—आणि हिशोब करणें येवढें तात्या पंतोजीच्या शाळेंत मुलांनीं शिकावयाचें. याचे पलीकडचें शिक्षण घरीं किंवा इतरत्रच मिळावयाचें असें ते समजतात. त्याची जबाबदारी शाळांवर ते लादीत नाहींत. सरकारी व खाजगी व्यवहाराचें स्वरूप अलीकडे बदलल्यामुळें आपणच मुलांच्या स्नानसंध्येकडे कानाडोळा केला ही गोष्ट ते नाकबूल करीत नाहींत. शिकलेले लोक त्यांच्या दृष्टीनें धर्मभ्रष्ट खरे. पण त्यांच्या धर्मभ्रष्टतेला कारण त्यांचीं घरें आहेत. त्यांच्या वडिलांच्या वेळीं घरांत स्नानसंध्येच्यासंबंधानें आणि इतर बाबतींत जी कदर होती ती त्यांचे वेळीं राहिली नाहीं—बदललेल्या परिस्थितींत तिची तितकी जरूर वाटली नसो, किंवा ती राखणें तितकें कठिण पडूं लागलें असो—पूर्वींची कदर घरीं राहिली नाहीं, त्यामुळें नवीन पिढी धर्मकर्में नीटपणें करीनाशी झाली, ही गोष्ट जुन्या माणसांस समजते व ती ते बोलून दाखवितात. हल्लींच्या धर्मौदासीन्याचें खापर ते शाळांचे माथीं फोडीत नाहींत.

इंग्रजी पद्धतीनें शिकलेल्या लोकांत मात्र अलीकडे धर्मशिक्षणसंबंधानें ओरड करण्याची आणि सध्याच्या धर्मौदासीन्याचा दोष शाळांवर लादण्याची टूम निघाली आहे. आज हिंदुस्थानांतील शाळांत सामान्यतः धर्म शिकवीत नाहींत हें खरें, पण हिंदुस्थानांत शाळांत धर्म शिकविण्याचा प्रघात पूर्वींही कधीं नव्हता. लिहिण्यापुसण्याच्या शाळा आमच्याइकडे तुरळक कां होईनात, पण बरेच दिवसांपासून आहेत. तरी धर्माचा संबंध शाळांशीं लावण्याचा वाट आम्हांस आतांच सुचूं लागला आहे. हल्लीं धर्मशिक्षणसंबंधानें आक्रोश करणारांत तीन चार प्रकारचे लोक आहेत. कांहींना हल्लींच्या लोकांची धर्मावरील श्रद्धा उडालेली पाहून खरोखर दुःख होतें. त्यांना पूर्वागत चालींत आणि धर्मविधींत कांहीं तरी गूढ सत्य खास असेल असें मनापासून वाटतें. अशा माणसांनीं धर्मशिक्षणाची तजवीज शाळांनीं करावी म्हटल्यास त्यांत अर्थ असतो. त्यांच्या आस्थेमुळें आणि कळकळीमुळें त्यांच्या म्हणण्याला मान द्यावासा वाटतो. पण या प्रामाणिक गृहस्थांस माझें एक सांगणें आहे, त्याचा त्यांनीं विचार करावा. आजच्या शाळा ऋग्वेदी ब्राह्मणांच्या वेगळ्या, यजुर्वेदी ब्राह्मणांच्या वेगळ्या, काण्वांच्या वेगळ्या, पांचकळशांच्या वेगळ्या, शिंप्यांच्या वेगळ्या, वारकऱ्यांच्या वेगळ्या, अशा नसतात. तशा पंथापंथाच्या वेगळ्या शाळा करणें आजच्या स्थितींत शक्य नाहीं—इष्टही नाहीं. माणसांमाणसांतले असले भेद जितके कमी करतां येतील, जितके कमी किंमतीचे वाटूं लागतील तितके बरे, अशी आपली आज स्थिति आहे. सरकार हे भेद कायम ठेवूं पाहत आहे आणि सरकारानें तसें करावें हें बरोबर आहे. जें आहे तें राखण्याचें कामच सरकाराला करावयाचें असतें. आहे तें टाकून देऊन त्यापरीस बरवें तें घेण्यास लोक तयार होत तोंपर्यंत सरकारास पूर्वीचें जतन करीतच रहावें लागतें. शिवाय आमच्या येथें सरकार परकी—परधर्मी असल्यामुळें त्याला आमच्या धर्मांत हात घालतां येत नाहीं.

शीख—मुसलमान—नेटिव ख्रिश्चन—युरेशियन-पार्शी—जैन—हिंदू आणि हिंदूंतील हजारों पोटभेद जसेचे तसे ठेवण्यांतच सरकाराचें लक्ष वेधलेलें असणार. मावळत्या व्हाइसरायांच्या मताप्रमाणें हे भेद राखणें आणि जुटीची फूट करणें सरकाराच्या राजकारणासही अवश्य आहे! तें कसें काय आहे तें मला समजलें नाहीं किंवा सांगतां आलें नाहीं तरी हिंदुस्थानांत माणसांमाणसांत जे भेद आहेत ते नष्ट करणें सरकाराचे हातून होणार नाहीं, तें आपलें आपणच केलें पाहिजे असें मी म्हणतों तें करावयास सर्व जातींच्या आणि लोकांच्या मुलांस एकत्र शिकविणें हा एक उपाय आहे.

दुसरें, हिंदुस्थानांतील तीस कोट प्रजेला सामान्य धर्म नाहीं. एकट्या हिंदूंतच धर्माचे अनेक निरनिराळे पंथ आहेत, या सर्वांस लागू पडेल असा धर्म शिकविणें कठिण आहे. तेव्हां धर्म शिकविण्याचें काम शाळांना सांगूं नये. ज्याला जसा धर्म आपल्या मुलास शिकवायाचा असेल त्यानें तसा त्यास घरीं खुशाल शिकवावा.

## शाळांत द्यावयाचें धर्मशिक्षण.

तिसरें, शाळांत मुलांस स्वतांस विचार करावयास लावावयाचें, सृष्टिशास्त्र, रसायनशास्त्र, ज्योतिष शास्त्र वगैरे शास्त्रें शिकवायाचीं; आणि त्यांशीं ज्यांतील कर्मे विसंगत आहे तो धर्मही तेथेंच शिकवायाचा हें जमावें कसें? चंद्रग्रहण—सूर्यग्रहणाचे वेळीं संध्या—जप करीत बसण्यास धर्म सांगणार आणि इतर सृष्टिचमत्कारांप्रमाणें त्याचें अवलोकन करीत बस, जपजाप्यानें ग्रहण लागतही नाहीं आणि सुटतही नाहीं असें ज्योतिषशास्त्र सांगणार. तेव्हां हा परस्परविसंवादी प्रकार शिक्षणांत हवा कशाला? तो नाहीं तो घालणें म्हणजे आधींच अंतर्बाह्य भिन्न असणाऱ्या आम्हांस आणखी ढोंगी बनविणें नव्हे काय? शाळेंत ग्रहण पृथ्वीच्या सांवलीनें किंवा चंद्र आड येण्यानें लागतें, आणि घरीं तें राहूकेतूंनीं चंद्रसूर्यांचीं बिंबें गिळल्यानें लागतें! दोहोंची परवा नाहीं, आपल्या खुषीस येईल तसें वागावें; आंघोळ केल्यानें धार्मिक म्हणवून घेतां येतें-आंघोळ करावी; नाहीं केली म्हणण्यानें नीतिधैर्याचें सर्टिफिकेट मिळतें—तसें करावें! असलीं बिनतंत्री माणसें निर्माण करायास मदत करण्यांत अर्थ काय? त्यापेक्षां हल्लींच्या धर्माला शाळेंत न घुसडतां, आहे तसाच घरीं बाहेरीं राहूं द्यावा आणि नवीन—धर्म—संस्थापनार्थाय पुनः एकादा महात्मा उत्पन्न होऊन सर्व हिंदुस्थानाला एक धर्म देईपर्यंत वाट पहावी. धर्माचे विधी ज्या कालीं सुरू झाले त्या कालापेक्षां मानवी ज्ञान आतां वाढलें आहे. त्या कालीं ज्या गोष्टी अज्ञात होत्या व ज्यांविषयीं धर्माला त्या वेळच्या जिज्ञासेचें समाधान होईल असे अनमान धक्के बसवावे लागले त्यांतील कित्येक आज मानवानें आपल्या ज्ञात प्रांतांत सामील केल्या आहेत. त्यामुळें ते विधी व त्या समजुती आतां पाळले नाहींत किंवा खऱ्या मानिल्या नाहींत तर कांहीं नुकसान नाहीं. आज धर्मसंबंधानें खबरदारी घ्यावयाची ती मुलगा संध्या करतो कीं नाहीं, मुकटा नेसतो कीं नाहीं, कानावर जानवें ठेवतो कीं नाहीं याची नव्हे. जुन्या माणसांस हाच सारा धर्म, याचे पलीकडे धर्म कांहीं नसतो हें खरें. परंतु आज शिकलेल्या लोकांना तरी यांस महत्त्व देतां नये. मानवातीत सामर्थ्याच्या सर्वत्र ज्या लीला दिसत आहेत, त्यांविषयीं कौतुकबुद्धि व सत्य-आणि श्रेष्ठ-आणि उदात्त. जें त्याविषयीं पूज्यभाव या मनोवृत्ती मुलांचे मनांत जागृत ठेवल्या म्हणजे आज आम्हांला जें धर्मशि-

क्षण पाहिजे तें मिळालें. धर्माचें महत्त्व कर्मांत नाहीं. कर्म हें धर्मवृत्तीचें प्रदर्शन आहे तें धर्मवृत्तीचें प्रकट स्वरूप आहे. तें स्वयंभू हवें. सांगोवांगीचें—देखोवेखीचें काय कामाचें ? खरी किंमत या प्रकट स्वरूपाची नाहीं, कारण त्याचें नाटक करतां येतें—आज आह्मी करतोंही. धर्मकर्माचें नाटक झालें कीं तें ताबडतोब बंद झालें पाहिजे. मग तें जुनें असो, नवें असो. आकाशाच्या अनंत, कल्पनातीत विस्ताराकडे पहात, पौर्णिमाच्या चंद्राची शांत स्वच्छ चंद्रिका रानावनांत खेळतां बागडतांना बघत, किंवा अमावास्येच्या तमोमय रात्रीं अगाध अज्ञातांतील आणि अभेद्य अज्ञेयांतील अंधुक तिरीपांप्रमाणें इकडे—तिकडे—चोहोंकडे लकलकणाऱ्या तारकांकडे दृष्टि लावीत, बसल्यास आश्चर्य आणि जिज्ञासा, चमत्कार आणि उत्कंठा, यांनीं मनाची जी अपूर्व स्थिति होते ती होणें बंद झालें म्हणजे मनुष्य खरा धर्मभ्रष्ट झाला. घोर अरण्यांत, गूढ गव्हरांत, गगनभेदी पर्वत-राशींच्या पायथ्याशीं, आकाशांतील मेघांशीं टक्कर देणाऱ्या वृक्षांखालीं, पर्वतप्राय जलसंचय सैरावैरा फेंकून देणाऱ्या आणि आकाश पाताळ एक करून सोडणाऱ्या क्षुब्ध समुद्रापाशीं, उभें असतां अहंभाव विरून विश्वाचा अवाढव्य कारखाना चालवणाऱ्या बळवान सामर्थ्याचा साक्षात्कार ज्याला होत नाहीं तो खरा धर्मभ्रष्ट. असली धर्मभ्रष्ट मंडळी शाळांतून निघूं नयेत, एवढी खबरदारी शाळांत घेणें शक्य आहे, अवश्य आहे. पूज्यभाव आणि आदरबुद्धि हीं धर्माचीं मुख्यांगें. तीं कायम ठेवण्याचा आणि त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न शाळांतून झाला पाहिजे. परंतु या पलीकडचा धर्म शाळांनीं शिकवूं नये. तो त्यांच्या आहाराबाहेरचा आहे.

## विधिबद्ध धर्माचें शिक्षण शाळांत नको.

परंतु पूज्यबुद्धि—आदर—प्रेम—कौतुक वगैरे नसलीं तरी चालतील. आम्हांस केवळ कांहीं प्रचार—कांहीं विधि पाळणेंच हवें, आणि शाळांनीं तेच विधि शिकविले पाहिजेत, असें म्हणणारे कित्येक लोक आहेत. यांना धर्माची जरूर राजकीय दृष्ट्या वाटते. आध्यात्मिक शुद्धतेची यांना फारशी परवा नाहीं. धर्माच्या नांवावर राजकीय धिंगाणा घालण्याची यांची इच्छा. मागें आमचे राजकीय प्रयत्न धर्माच्या निशाणाभोंवतीं झाले, आतांही ते तसेच झाले पाहिजेत असें यांस वाटतें. यामुळें आपलीं मतें कांहीं असलीं, तरी लोकांसाठीं म्हणून धर्माचे कांहीं विधि पाळणें हे लोक अवश्य समजतात व तेंच शाळेंत शिकवावें असें हे प्रतिपादितात. यांस साध्य निराळेंच आणि धर्म हें यांचें साधन मात्र. अशा लोकांशीं वाद करण्याच्या भानगडींत मी पडत नाहीं. यांस इतिहासांत मागें जें जसें झालें तें तसेंच पुनः कधीं होत नाहीं हें समजत नाहीं. 'History repeats itself' किंवा 'इतिहासांत पुनः पुनः तेंच तें घडतें' या भ्रामक वाक्यावर त्यांची भिस्त असते. वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. ऐतिहासिक घडामोडींत साम्यापेक्षां वैषम्यच विशेष असतें. आमच्या सध्याच्या राजकीय स्थितींत तरी आमच्या उत्कर्षास एककली धर्माची मदत न होतां अडथळाच होण्याची भीति आहे. उद्यांच्या आम्हांला आमचा धर्म मनांतच ठेवावयास शिकलें पाहिजे. जगांतील, अजूनही गूढ राहिलेल्या, प्रश्नांस जो जसें उत्तर देईल त्याचा तसा धर्म राहील, आणि तो त्यानें स्वतःपुरता पाळावा. परंतु सर्व हिंदुस्थानाचा एक जीव

व्हावयास हवा असेल तर आम्ही आपला धर्मसंबंध मागें आणि हिंदुस्थान हा आमचा देश पुढें घालून चाललें पाहिजे. ‘ हिंदुस्थान ’ हें आमचें निशाण. ‘ हिंदुस्थान ’ हाच आमचा परवलीचा शब्द. ‘ हिंदुस्थान ’ हीच आमची संग्रामगर्जना. पूज्यभाव—कौतुक—प्रेम हे धर्माचे सारभूतभाव. ते सर्वत्र कायम ठेवून बाकीच्या धर्मास माजवरांतच आडकवून ठेवण्यास आम्हीं शिकलें पाहिजे. मग शाळांत धर्म कशाला ? विधिबद्धधर्म शाळांस नको. भावमात्रक धर्म शाळांस हवा व तो हल्लींही शिकवितात. कवींचे प्रासादिक बोल, प्रतिभावान ग्रंथकारांची वाणी, कौतुकोत्पादी शास्त्रप्रयोग आणि वृथाभिमान निरसणारीं सृष्टिरहस्यें ज्या शाळांत शिकवितात तेथें आज हिंदुस्थानास हवें तेवढें धर्मशिक्षण मिळतें असेंच मी म्हणतों. यापेक्षां जास्तीची अपेक्षा करणें शहाणपणाचें नाहीं.

जर्मनींत बहुतेक सर्व शाळांत धर्मशिक्षणास आठवड्यांतून दोन तीन तास मिळतात. परंतु तें कितपत हितावह आहे याची मला शंका आहे. एक तर धर्माची गोष्ट थोडीशी नीतीसारखीच आहे. हा सर्वांशीं मनोवृत्तीचा प्रश्न आहे. मनोवृत्ती कवायती हुकमतींत ठेवण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ आहे. तसा प्रयत्न होतांच धर्माच्या शिक्षणास कवायतीचें स्वरूप येतें. तें धर्मशिक्षणास येणें अत्यंत अनिष्ट. जगांत कवाईत जर कोणत्या एका विषयांत नको असेल तर ती धर्मांत होय. तेथेंही मुलांना ती करण्याची संवय लाविली कीं त्यांच्या नीतीचें व धर्माचें पुरें वाटोळें झालें म्हणून समजावें. फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांत धर्म व लोकशिक्षण यांची फाळणी झाली आहे-होत आहे. जपानांत तर धर्मशिक्षणाचा शाळांशीं संपर्क नाहीं असें सांगतात. मग आमच्याच येथें तो कशास हवा ? आमच्या येथेंही शाळांत तो मागें नव्हता. नवीनच उपस्थित करा कशाला ? जर्मनीचें उदाहरण अपवादादाखल आहे. पण जर्मनीची राजकीय—सामाजिक स्थिति आणि आमची, यांत महदंतर आहे. तेथें बहुतेक लोक रोमन कॅथॉलिक आहेत. कोठें कोठें प्राटेस्टंट आहेत, त्यांस धर्माचे बाबतींत माफी असते. तथापि ते सारे ख्रिश्चन आहेत. आमच्या येथें सगळें निराळें आहे. धर्म हा हिंदुस्थानाला एकत्र बांधणारा बंद होणें अशक्यांतलें आहे. आमची फूट वाढविण्यास मात्र आमचे प्रचालित धर्म विशेष मदत करतील. म्हणून आमच्या येथें लोकशिक्षणांत धर्माचा—विध्युक्त धर्माचा—अंतर्भाव करतां येणार नाहीं.

## राष्ट्रीय शिक्षण, राजकीय चळवळी आणि विद्यार्थी.

३२. लोकांपुढें आलेल्या शिक्षणविषयक प्रश्नांपैकीं तिसरा महत्त्वाचा आहे, तो राष्ट्रीय शिक्षणाचा आहे. सध्यां बंगाल्यांत मुख्यतः आणि महाराष्ट्रांत ओढून आणिलेल्या चंद्रबळासारखी जी एक लाट उसळली आहे, तिच्या धुमश्चक्रीमुळें राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न आज वर्तमानपत्रांत विशेष फडकत आहे. मुलांनीं सरकारी शाळा सोडणें, परीक्षांस न बसण्याचे ठराव करणें आणि राष्ट्रीय युनिव्हर्सिटी स्थापण्याचे बेत चालविणें हें या प्रश्नाचें बंगाली स्वरूप आहे. आमचे इकडे, स्वदेशी चळवळ आणि बहिष्कार या दोहोंची फाटाफूट करून पहिलीचें अभिनंदन आणि दुसरीचा निषेध करणाऱ्या शिक्षकांस ‘ हे आमचे गुरूच नव्हेत ’ असें सांगणें हेंच राष्ट्रीय शिक्षण होऊन बसलें आहे. ज्या शाळांतील मुलांस विलायती कपड्यांची होळी करणारा होळकरांमध्यें मिसळण्याची किंवा त्यांचे मुखंड बनण्याची

आणि त्यावर व्याख्यानें देण्याची बंदी होईल त्या शाळा आडव्या आलेल्या मुलाप्रमाणें कापून टाकण्याच्या योग्यतेच्या, असा उपदेश इकडील राष्ट्रीय शिक्षणाचा पाया होत आहे! बंगाल्यांत राष्ट्रीय युनिव्हर्सिटीप्रीत्यर्थ वर्गण्या गोळा होत आहेत आणि विद्यार्थ्यांस विद्याव्यासंग सोडून स्वदेशी चळवळींत पुढाकार घेण्याचे कामीं उत्तेजन मिळत आहे. आमचे इकडेही स्वदेशी वस्तूंच्या सार्वजनिक चळवळींत मिसळूं न देणाऱ्या बापास बाप न ह्मणण्याचे कामीं मुलांस प्रोत्साहन मिळत आहे! राष्ट्रीय शिक्षणाचा समारोप तर बहुत उत्तम होत आहे! तुमच्या मनांत भरविलेल्या किंवा उठलेल्या लहरीच्या आड तुमचे गुरू येत आहेत काय? ते तुमचे गुरूच नव्हेत. विलायती कपड्यांची होळी करण्याचें तुमच्या मनांत असून तुमचे बाप तुम्हांस तसें करूं देत नाहींत काय ? सोडा बापाचा संबंध आणि सांगा त्यांना तुह्मीं आमचे बाप नव्हे आणि आह्मी तुमचे मुलगे नव्हे. देशोद्धाराची केवढी वेळ ही ! बहिष्कारयोगासारखा योग भगवंतासही सुचला नाहीं. या योगाचें साधन करण्यास कोवळें लुसलुशीत वय लागतें. याच वयांत याचा गुरुमंत्र घ्यावा लागतो. हीं मुलें आमच्या राष्ट्राचे भावी खांब. आज आमचे हातून जी कामगिरी झाली नाहीं ती उद्याच्या राष्ट्राचे हातून—या पोरांच्या हातून झाली पाहिजे. ती कामगिरी करण्यास त्यांनीं पाळण्यांतच आरंभ केला नाहीं हा त्यांच्या आईबापांचा दोष ! ती आतांही त्यांना करूं न देणें म्हणजे राष्ट्रद्रोह होय ! आईबाप, भाऊ, बहीण, गुरु, मित्र कोणाचें एकावयाचें नाहीं; शिस्त—कैद—कदर सारें व्यर्थ आहे ! नारळाचा नवा कोंब उत्पन्न होण्यास नीरळ सडवावा लागतो; राज्यव्यवस्था नीट बसण्यास अराजक व्हावें लागतें; पाण्यांतील घाण नाहींशी होण्यास पाण्यांत हजारों आळ्या उत्पन्न व्हाव्या लागतात; नव्या राष्ट्राचा उदय होण्यास—नव्या शिस्तीचा, नव्या व्यवस्थेचा उदय होण्यास पहिलें नष्ट झालें पाहिजे. तेव्हां आजचे बाप, आजचे गुरू, आजचे कायदे—आजचे नियम—आजच्या शाळा—आजची शिस्त सर्व पार उडवून दिलें पाहिजे ! मनास येईल तसें वागणारीं मुलें निपजलीं पाहिजेत ! शिंगराला लगाम घालण्यापूर्वी तें बेलगाम मोकळें नसतें ? आजचीं मुलें म्हणजे उद्याच्या राष्ट्र-वारूचीं शिंगरें आहेत. त्यांना आज बेलगाम नाचूं देणें हेंच इष्ट आहे ! तसें करणार नाहींत, ते देशद्रोही होत !

ही विचारसरणी आज राष्ट्रीय शिक्षणाची ओरड करणारांची आहे. यांच्या मतें राष्ट्रीय शिक्षण ह्मणजे मुलांस राजकीय चळवळी चालविण्याचें काम शिकविणें. आणि नवीन तत्त्वाप्रमाणें शिक्षण हें प्रत्यक्ष पाहिजे—सप्रयोग झालें पाहिजे. तेव्हां या लोकांच्या मतें आमच्या शाळांनीं आपलीं सर्व मुलें आजच्या चळवळींत सामील करावीं. वंगभंगाचे प्रतीकारार्थ सभा भरवावयाची वेळ आली, चालली सर्व शाळांतील वानरसेना तेथें, बसला त्यांतला एकादा मारुती खुर्चीवर, असें झालें पाहिजे. उद्यां सरकाराला गिरणींतील मजुरांसंबंधानें अर्ज करायाची वेळ आली कीं, चाललीं शाळेंतलीं मुलें साह्य-सह्या गोळा करावयाला व न देणारांचीं डोकीं फोडायाला; युनिव्हर्सिटीच्या कायद्याविरुद्ध सभा भरवायाच्या असल्या कीं, चालले आमच्या शाळेंतील बालगोपाल घरोघर हिंडायाला आणि चवाठ्यावर व्याख्यानें द्यावयाला; गणपतीच्या नांवावर सरकाराची आणि वंद्य पुरुषांची नालस्ती करायाची वेळ आली, आल्या आमच्या शाळा 'पायीं घा-

गऱ्या हातीं टिपऱ्या' घेऊन नाचायाला ! असें झाल्याशिवाय आमच्या मुलास राष्ट्रीय शिक्षण मिळणार नाहीं. राष्ट्रीय शिक्षण तें हेंच. सरकारी शाळांत हें कधीं मिळावयाचें नाहीं म्हणूनच खाजगी शाळा आम्हांस हव्या. खाजगी शाळाही याच्या आड येतील तर त्या आम्हांस नकोत. तेथें आम्हीं आपलीं मुलें कां घालावीं आह्मांस समजत नाहीं. मी म्हणतों ज्यांना तें समजत नाहीं त्यांनीं आपलीं मुलें तेथें घालूं नयेत हेंच उत्तम. परंतु आमच्या शाळांनीं वरच्यासारखें शिक्षण देण्यास तयार होणें मला तरी इष्ट वाटत नाहीं, इतकेंच नाहीं, तर तो मोठा गुन्हा होईल असें माझें मत आहे. अंगावर पिणाऱ्या मुलाला रणांगणावर पाठविण्यासारखें घातकी आणि वेडेपणाचें हें काम आहे. माझ्या मतें हें आधीं शिक्षणच नव्हे. राजकीय शिक्षणही नव्हे, राष्ट्रीय शिक्षणही नव्हे. राजकीय शिक्षणांत राजसंस्थांचे प्रकार, राजशासनाची उपपत्ति; उत्पत्ति—स्थिति—लय; राजाप्रजांचे संबंध; कायदा आणि त्याची अवश्यकता; देशाची संपत्ति आणि लोकसंख्या याचा संबंध, परचक्रापासून रक्षणाचे उपाय, वगैरे विषयांचा ऊहापोह आणि इतिहास येतो, व तो शाळांत पुस्तकें व व्याख्यानें यांच्या द्वारें समजावून द्यावयाचा असतो. ज्या गोष्टी काय आहेत—कशा होतात—कशा विलयास जातात हें मुलांस शिकावयाचें असतें त्या त्यांना करूं देणें ह्मणजे निसर्गाचा क्रम उफराटा करण्यासारखें आहे. ह्मणून, राजकीय शिक्षणांतही विद्यार्थ्यांचा वरील अव्यापारेषु व्यापार अंतर्भूत करतां येत नाहीं. राष्ट्रीय शिक्षण तर याहून अगदींच निराळें आहे.

## राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय ?

३४. मग राष्ट्रीय शिक्षण ह्मणजे काय ? मला वाटतें सगळ्या राष्ट्रास सामान्येंकरून लागू होतें आणि अवश्य असतें तें राष्ट्रीय शिक्षण. सगळ्या राष्ट्राचें शिक्षण तें राष्ट्रीय शिक्षण असेंही म्हणतां येईल, पण त्या दृष्टीनें आज आमच्या देशांत राष्ट्रीय शिक्षण चालू आहे. राष्ट्रास—म्हणजे राष्ट्रांतील मुलांस शिकविण्यासाठीं शाळा आहेत, कॉलेजें आहेत, विद्याखातीं आहेत, युनिव्हर्सिट्या आहेत. सर्व कारखाना आहे. फक्त या सगळ्यांत आह्मांस हवें तें नाहीं. आमच्या सर्व लोकांस एकवटून आमचें एक राष्ट्र बनविण्याचा मनःपुरःसर प्रयत्न त्यांत नाहीं. आमच्या देशाच्या-आमच्या लोकांच्या गरजा पाहून त्या भरून काढण्याकरितां आमचीं मुलें तयार करण्याची खटपट त्यांत नाहीं. आमच्या अंगांत जे गुण नाहींत ते पैदा करण्याचें आणि जे फाजील आहेत त्यांना आहारांत आणण्याचें धोरण त्यांत नाहीं. आमच्या अंगांत असेल नसेल तेवढें कर्तृत्व बाहेर काढून आमच्या देशाच्या कारणीं लावण्याचा उद्देश त्यांत नाहीं. आमच्या सामाजिक, राजकीय, औद्योगिक परिस्थितीचा आमच्या दृष्टीनें विचार करून आमच्या राष्ट्राची स्थिति त्या सर्व बाजूंनीं उन्नत होईल अशा दिशेनें आमचा शिक्षणक्रम ठरविलेला नाहीं. हिंदुस्थानासारख्या देशाचा राष्ट्रीय शिक्षणक्रम या सर्व गुणांनीं युक्त असला पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण कसें असावें तें जर्मन व जपान यांपासून शिकावें. जर्मनीला अनेक लहान लहान राज्यांचा समावेश करून एक जर्मनी बनावें लागलें. सर्वांत आपण जर्मन अशी भावना उत्पन्न करावी लागली. इतिहासज्ञांस ठाऊक असेल कीं, आजचें जर्मन राष्ट्र प्रिन्स बिस्मार्कच्या आटोकाट धोरणानें बनलेलें आहे. तेथील शिक्षणविषयक कामगिरींत सरकाराची कामगिरी मोठी आहे. शिक्षणाचें राष्ट्रीय धोरण तेथें सरकारानें ठरविलें. अभ्यासक्रम आणि शिक्षणपद्धती मात्र खा-

जंगी प्रयत्नांनीं हळू हळू ठरत आल्या. आमच्या येथें हीं दोनही कामें बऱ्याच अशीं लोकांचीं लोकांस करावीं लागतील. आजपर्यंत सरकारानेंच सर्व केलें आहे. लोकांचें त्यांत फार थोडें आहे हें खरें. तथापि जोंवर हिंदुस्थानाचें शिक्षण सरकाराच्यापेक्षा लोकांच्याच हातांत विशेष आलें नाहीं तोंवर राष्ट्रीय शिक्षणाचें नांव व्यर्थ आहे. शिक्षणाचें काम आह्मीं आमचें उचललें पाहिजे हें जरी खरें तरी तें सरकाराशीं भांडून आणि फाटून करावयाचें नाहीं. सरकाराशीं भांडून निवाल्यास तुमच्या शिक्षणाचें मातेरें झालें म्हणून समजा. पाण्यांत राहून पाण्याशीं वैर करण्यांतलेंच तें होईल. तसें न करतां जें सरकारानें केलें नाहीं किंवा सरकाराला करतां येणार नाहीं तें आपण केलें पाहिजे आणि त्यांत सरकाराची सानुभूति मिळविली पाहिजे. तें काय व कसें करावें हें पहाण्यापूर्वीं आपलें शिक्षण सुधारण्यांत काय काय अवश्य आहे तें बघूं.

३५. आज सरकार व आह्मी मिळून करावयाचें काम मोठें आहे. बाळें, मुलें, थोर होणारे, आणि थोर, इतक्यांच्या शिक्षणाची राष्ट्रीय तत्त्वावर आम्हांस इमारत बांधावयाची आहे. त्या इमारतीचा आतां भागशः विचार करूं.

## बाळांच्या बागा.

आज आमच्या येथें बाळांच्या शिक्षणाची सोयच नाहीं. आम्हांला मुलें होतात, तीं वाढतात, सहा सात वर्षांचीं झालीं म्हणजे शाळेंत जाऊं लागतात, व पुढें शाळेच्या क्रमानें व त्यांच्या नशिबानें, म्हणजे आमच्या कर्तव्यशून्यतेनें म्हणा, कर्तव्यज्ञानशून्यतेनें म्हणा, जशीं निपजतील तशीं निपजतात. हा ‘ होईल–तसें–होईल ’ चा कारभार आहे. तो बंद होऊन ‘ करूं–तसें करूं ’ चा कारभार सुरू झाला पाहिजे. आम्हास आमच्या लहान बाळांस वागवितां येत नाहीं हें उघड उघड आहे. कोठेंही क्षणभर बसा, म्हणजे मुलांना वागवितांना आमच्या होणाऱ्या चुका हव्या तितक्या नजरेस पडतील. आम्ही आपल्यासारखेंच त्यांना समजतों आणि त्यांशीं वागतों. लहरीचा, अव्यवस्थेचा, लिढाईचा, अडाणीपणाचा छाप मुलांसंबंधाच्या आमच्या प्रत्येक कृतीवर दिसतो. आमच्या बायकांना पोरें एक खेळणीं तरी वाटतात नाहीं तर लोढणीं होतात. त्यांची ब्याद टाळण्याकरितां, त्यांच्यायोगें मनाची करमणूक करून घेण्याकरितां त्या अमुक एक करणार नाहींत असें नाहीं. बाऊ, बोवा, समंद, हडळ, चोर, मास्तर, काय वाटेल तें वाटेल तेव्हां निर्माण करतील किंवा आर्जव, लाडीगोडी, खाऊ, शाबासकी, बक्षिशी, प्रशंसा यांचा बेसुमार पाऊस पाडतील. उपदेश करतांना खोटें बोलूं नये म्हणून सांगतील आणि एकादे वेळेस आपणच खोटें उत्तर त्यांचे हातीं पाठवितील. मुलें हौसेनें एकादें काम करीत असतील तेव्हां ‘ पुरे झाली तुझी अडमड ’ म्हणून त्यांचे पाठींत रपाटा घालतील आणि कौतुक करण्याची लहर आली म्हणजे तेंच काम करण्यासाठीं त्यांची मनधरणी करतील. आपलें काम वाढूं नये आणि आपल्याला त्यांचेवर नजर ठेवून बसावें लागूं नये ह्मणून त्यांच्या हातापायांची चळवळ आणि जिभेची टकळी धाकदपटशहानें, नाहीं तर चवदाव्या रत्नाच्या प्रयोगानें बंद करूं पहातील आणि मग तोंड बंद व्हावें ह्मणून त्यांना खाऊ देतील. सारांश मुलें, वाढणारे—नेहमीं मनाला व शरीराला भक्ष्य शोधणारे आणि स्पंजाप्रमाणें जें पुढें येईल त्याचें इंद्रियद्वारां शोषण करणारे जीव आहेत, याची त्यांना

कल्पनाच नसते. त्यांची सर्वांगांनीं वाढ व्हावी, यासाठीं तीं आपल्या हातीं आलीं आहेत—त्यांच्या विकासास आपल्या हातून होईल तेवढी मदतच आपण केली पाहिजे—आपल्या आईबापांनीं दिलेलें वाण आपल्याला पुढें पोंचवायाचें आहे, अशी बुद्धिच त्यांस नसते. आणि मुलांच्या नाजूक प्रकृतीचें तानमान समजून घेण्याइतकी शांती आणि धिमेपणाही त्यांचे अंगीं क्वचित्च सांपडतो. आह्मी इतके शिकलों—सवरलों, पण आह्मांसही अजून तें तितकें साधत नाहीं. मग आमच्या बायकांना तें न साधल्यास नवल नाहीं. अशा रीतीनें लहानपणीं मुलांची हेळसांड झाल्यामुळें त्यांच्या पुढच्या जन्माची बरीच हानि होते. कां कीं या वेळीं त्यांच्या शरीरास आणि मनास ज्या संवयी लागतात त्यांवरच पुढच्या शिक्षणाची फलद्रूपता अवलंबून असते. यासाठीं या कोंवळ्या वयांत तिसऱ्या वर्षापासून सातव्या वर्षापर्यंत त्यांच्या योग्य शिक्षणाची सोय केली पाहिजे. या वयांत त्यांना माहिती कांहीं फारशी द्यावयाची नसते. त्यांना सांगावयाचें फारसें नसतें, शिकवायाचें—वळवायाचें असतें. त्यांना योग्य संवयी लावायाच्या असतात. हें काम ज्यांना मुलांची हौस आहे, मुलांचे स्वभाव ओळखतात, अशा बायकांचें आहे. अशा बायकांस बालसंगोपनाचें शास्त्र सप्रयोग शिकविलेलें असलें म्हणजे त्यांना तें काम चांगलें करतां येईल. इंग्लंडांत अशा बाया पुष्कळ आहेत आणि अशा बालशाळा किंवा बाळांच्या बागाही पुष्कळ आहेत. या शाळांचा आपल्या इकडे मोठा उपयोग होईल. आमच्या अंगचा नेभळेपणा, फाजील सहनशीलपणा, नाहींसा करून आम्हांस थोडेसे कडवे, करारी, मानी—आणि अन्यायाची चीड येणारे बनविणें या वयांत शक्य आहे. तसेंच जुटीनें काम करणें, दुसऱ्याशीं ममतेनें वागणें, दुसऱ्याकरितां आपखुषीनें झीज सोसणें, आणि सामान्यतः दुसऱ्याच्या होईल तेवढें उपयोगीं पडणें, सरळपणानें स्वतां वागणें, दुसरा वांकडा झाल्यास त्याचा वांकडेपणा चालूं न देणें, वगैरे संवयी या वयांत, समंजस, कल्पक, शांत आणि प्रेमळ बायकांनीं मनांत आणिल्यास, मुलांत उत्पन्न करतां येतील. इंग्लंडांत आणि अमेरिकेंत या बाळशाळा-मुलांच्या बागा-उत्तम चालतात. आणि त्यांचेपासून एकंदरींत फार फायदा होतो असा अनुभव आला आहे. आमच्या येथेंही तसा अनुभव कां येणार नाहीं ?

## बाळांच्या बागांना माळिणी.

पण या बागांना माळिणी कोठून आणायाच्या ? आज आमच्या बायकांत तर जिकडे तिकडे अंधार आहे. या माळिणी तयार करण्याचें काम दिवसगतीचें आणि थोडेंसें खर्चाचें आहे. तथापि तें करणें अशक्य नाहीं. आमच्या समाजांत विधवांचा वर्ग फार मोठा आहे. त्यांची स्थितिही दुर्धर असते. त्यांना जन्म कसा तरी घालवावा लागतो. अमक्याकरितां जगावें असें वाटायाला त्यांना कांहीं नसतें. मागें पाश नसतो, पुढें कर्तव्यार्थ नसतो. त्या जिवंत असून मरत असतात ! मुलाबाळांची त्यांना हौस असते, पण त्यांना मुलेंच नसतात ! अशा स्त्रियांस या लोकोपयोगी पुण्यकार्यासाठीं थोडेंसें शिकवून तयार केलें तर त्यांच्या जन्माचें एका रीतीनें तरी चीज होईल. त्यांच्याकरितां इलाख्यांत चार पांच ठिकाणीं सरकारानें व लोकांनीं मिळून शाळा घातल्या आणि त्यांत त्यांस मुलांचे स्वभाव, त्यांच्या मनाची व शरीराची वर्धमान स्थिति, मुलांच्या प्रकृतीचे विशेष, त्यांस होणारे रोग, त्यांना जडणाऱ्या

संवयी, त्यांच्या प्रकृतीचा आणि मनाचा संबंध वगैरे विषयांची माहिती दिली, व त्यांचेकडून लहान मुलांचे कांहीं वर्ग चालविले, तर पांच सात वर्षांत आपल्याला बाळांच्या बागा चालविणाऱ्या माळिणी पांच पन्नास सहज मिळतील. हल्लीं ट्रेनिंग कॉलेजांत ज्या शिक्षकिणी तयार होतात त्यांना मुलांस वागवाया-वाढवायाचें शिक्षण मिळत नाहीं. मराठी सात यत्तांचे अभ्यास त्यांचेकडून करून घेतात आणि बालोद्यान शिक्षणांतील कांहीं देणग्यांची कवाईत त्यांचे देखत करवितात इतकेंच. माथमिक शाळांकरितां शिक्षकिणी तयार करण्याकरितां हीं ट्रेनिंग कॉलेजें आहेत. मुलांच्या बागांकरितां माळिणी तयार करणाऱ्या शाळा त्या नव्हत. मला वाटतें उत्तर हिंदुस्थानांत थोडासा या दिशेनें प्रयत्न होत आहे, तसाच आमचे इकडे झाला पाहिजे. आज थोडीशी शिष्यवृत्ति दिल्यास कुलीन विधवा बालसंगोपिका व्हायाला आनंदानें पुढें येतील. सहजानंदी बालसमाजांत, मुलांच्या मुग्ध निर्मळ संगतींत वेळ घालविणें खरोखर महद्भाग्य आहे; देशाच्या भावी समाजाचे आधारस्तंभ अगदीं कोंवळेपणीं आपल्या हातीं घेऊन त्यांच्या ओलेपणांत त्यांवर इष्ट गुणांचे आणि इष्ट प्रवृत्तींचे ठसे उमटविण्याचें मंगलकार्य करण्यास कोण तयार होणार नाहीं ? 'हातीं पाळण्याची दोरी, तीच जगीं राज्य करी !' ही स्त्रीची प्रतिष्ठा-हें स्त्रीचें जन्मकार्य; तें करावयास वैधव्याचे विपत्तींतही -सदाचरणानें वागून- सांपडलें तर कोण मागें पेईल ? आमच्या विधवा भगिनींकडून ही फार मोठी कामगिरि करून घेतां येणार आहे. समाजांतील पुढारी आणि विद्याखात्याचे अधिकारी यांनीं ही गोष्ट मनावर घेण्यासारखी आहे. बाळकाळांत शिकवायचें फार नसतें. शिक्षकिणींस तेथें विद्वत्ता नको असते. शांत-प्रेमळ-प्रसन्न स्वभाव आणि मुलांसारखी निर्मळ आणि आनंदी वृत्ति असली म्हणजे पुष्कळ, येथें मुलांस खेळू द्यावयाचें, बागडूं द्यावयाचें. मोडतोड करूं द्यावयाची, मातींत काम करूं द्यायाचें; नवनवे खेळ, नवनव्या जोडतोडी, नवनव्या कल्पना, नवनव्या युक्ति, नवनवे चाळे येथें चालू द्यावयाचे. या सगळ्यांतून हळुहळु, संथपणें, व्यवस्थेचे- नीटनेटकेपणाचें-नमेकेपणाचे-दोरीसूतपणाचे - सरळपणाचे-प्रामाणिकपणाचें-अंकुर पोसायाचे, आणि हट्टास निश्चयाचें, लहरीस उल्हासाचें, माथेफिरूपणास योग्य संतापाचें, दांडगाईस जोराचें, आप्पलपोटेपणास मानीपणाचें स्वरूप क्रमाक्रमानें द्यावयाचें. खेळांत खेळ आणि शिकण्यांत शिकणें करावयाचें. हें काम मन लावून केलें तर सोपें आहें. तें आमच्या बायकांस सहज करतां येईल. मातींत खेळतां खेळतां मातीचीं आळीं- वर्तुळें-कडीं, बोळकीं, मडकीं, हांडे, टोपणें, झांकणें करवितां येतात. त्यांचा आकार व आकृति दोनही हळुहळु सुधारून मुलांस निरनिराळे आकारांतील आकृति व आकृतींतील सुबकपणा ओळखून तसा वठविण्यास शिकवितां येतें. खेळतां खेळतांच चिमखडे, घडवंच्या, टोपल्या, हंडचा, कुंपणें, मांडव, खुर्च्या, टेबलें मुलांकडून करून घेतां येतात. यांतच संख्या बेरीज-वजाबाकी-गुणाकार-भागाकार-अगदीं लहान लहान शिकवितां येतात. माती-काड्या-दोरे-कागदाचीं चिटोरीं यांनींच थोडथोडी अक्षर-ओळख करून देतां येते. यांतच त्यांस पाखरांचीं, फळांचीं, खेळांचीं गाणीं सांगतां येतात. सौंदर्य, सुबकपणा-व्यवस्था-सफाई-वगैरेंची गोडी येथें उत्पन्न करतां येते. नेहमीं कांहीं तरी उपयोगी काम करीत राहण्याची संवय येथें लावतां येते. कोणताही -पदार्थ वाकाऊ

नाहीं—त्याचा कांहीं तरी उपयोग होतो हें येथें दाखवितां येतें व त्याप्रमाणें मुलांस कांहींही वांया जाऊं न देण्याची संवय जडवितां येते. सारांश, येथें पांडित्य देतां आलें नाहीं तरी पुढील आयुष्यांत यश मिळण्यास लागणारें मूळ भांडवल मुलांच्या गांठीं मारून देतां येतें. निदान तें मुलांच्या आणि पालकांच्या प्रत्ययास आणून देतां येतें. तें मूळचें खाणींतलें बाहेर काढून शुद्ध करतां येतें. हें काम थोडें नाहीं आणि क्षुल्लकही नाहीं. हें करण्यासाठीं ग्रॅजुएटांची किंवा इंग्रजी शिकलेल्यांची जरूर आहे असेंही नाहीं.

न्यू लानार्क येथें ओवेनानें १८१६सालीं काढलेल्या शाळेवर एक साळी नेमिला होता. या कामास मुलांची हौस, न त्रासणारा—न कंटाळणारा स्वभाव, आणि सांगितलेलें निमूटपणें करण्याची तयारी येवढे गुण शिक्षकाचे अंगीं असले म्हणजे योग्य माणसाच्या सल्लामसलतीनें मुलांच्या वागा उत्तम चालतील. विधवांस—विशेषत: ब्राह्मण विधवांस—या कामीं चांगलें तयार करतां येईल असें मला वाटतें. सरकार व लोकांचे पुढारी यांनीं मिळून या कामीं खटपट केल्यास शिक्षणाच्या अगदीं पायाशीं असलेली ही उणीव पांच पंचवीस वर्षांत हळू हळू भरून निघेल असा मला भरंवसा आहे.

## प्राथमिक शिक्षण.

( १ ) याप्रमाणें अगदीं लहान वयाच्या मुलांची सोय केल्यास व त्यांस अवश्य त्या संवयी लाविल्यास प्राथमिक शिक्षणाचें काम सोपें होईल. आमचें प्राथमिक शिक्षण आज फारच अवजड आणि अतिप्रसंगी झालें आहे. सामान्य माणसांस या काळांत अगदीं जरूर येवढेंच शिक्षण प्राथमिक शाळांत मिळावें.आज प्राथमिक शाळा म्हणजे देशभाषांच्या शाळा-मग त्यांत वाटतील ते विषय वाटतील तितके शिकावे लागोत.मराठी सातही यत्ता सध्यां प्राथमिक अभ्यासक्रमांत मोडतात. ही स्थिति बदलली पाहिजे. सातव्या किंवा आठव्या वर्षापासून दहाव्या किंवा अकराव्या वर्षापर्यंत मुलांचें प्राथमिक शिक्षण व्हावें. यांत लिहिणें—वाचणें—व ठळक हिशेब करणें यापेक्षां अधिक कांहीं नसावें. बालोद्यान पद्धतीनें मुलाला अक्षरओळख, अंकओळख आणि मोडी लिपीची ओळख झाली असली, रंग आणि साध्या आकृती ओळखतां येत असल्या, आणि त्याच्या हाताला व डोळ्यांना टापटिपीच्या, सफाईच्या, व्यवस्थेच्या संवयी लागलेल्या असल्या म्हणजे ओनाम्याची तयारी झाली, म्हणजे मुलाला प्राथमिक शाळांत घेण्यास हरकत नाहीं. जेथें बालशाळा नसतील तेथें प्राथमिक शाळांस बाळांचे वर्ग जोडावे आणि त्यांत त्यांची ओनाम्याची तयारी करून घ्यावी. खुद्द प्राथमिक शाळांत वाचणें—बोलणें—मजकूर जुळणें पूर्णांकांचे हिशोब करणें, गाणें, पदार्थ पाहून किंवा आठवणीनें आणि कल्पनेनें चित्रें काढणें, दिलेल्या चित्रांत रंग—मूळ वस्तूशीं जुळतील असे-भरणें, नेहमींच्या वस्तू कागदावर रेषांनीं दाखविणें, मोजमाप घेणें, मोजमापाप्रमाणें कापणें—कातरणें—जोडणें—बांधणें, वजन करणें, खणणें—खुरपणें, धांवणें, उड्या मारणें, वगैरे ठोकळ व्यवहारांत नेहमीं लागणारे आणि माणसाला माणूसपण देणारे विषय स्थूल प्रमाणानें शिकवावे. इतिहास—भूगोलाचें त्यांना अगदीं तांत्रिक ज्ञान असलें म्हणजे पुष्कळ. म्हणजे आसपासचीं खेडीं, आसपास होणारीं पिकें, झाडें, कारखाने वगैरेंची माहिती असली म्हणजे त्यांना हवा तेवढा भूगोल झाला. गांवाचा आणि गांव ज्या प्रांतांत असेल त्या प्रांताचा पांच पंचवीस वर्षांचा इतिहास,

होऊन गेलेले मोठे पुरुष, त्यांनीं केलेलीं कामें, त्यांचे गुण वगैरे माहीत झालें म्हणजे पुष्कळ झालें. त्यांना व्याकरणाची आणि दोन हजार वर्षांपासून आजपर्यंतच्या इतिहासाची जरूर नाहीं. ऐकलेल्या—वाचलेल्याचा अर्थ समजावा, मनांतलें बरोबर सांगतां यावें, लिहून दाखवितां यावें, पदार्थ दिसला म्हणजे तो रूपरसगंधस्पर्शादिकांनीं तपासतां—न्याहाळतां यावा आणि हातां पायांचा—नाका—डोळ्यांचा, काना—तोंडाचा हवातसा उपयोग करतां यावा, ठोकळ व्यवहार नीट समजावा आणि चालवितां यावा, शारीरिक श्रमाच्या कामांचा कंटाळा न येतां तीं उरकतां यावीं. येवढें आलें म्हणजे मनुष्यास अगदीं अवश्य तेवढें ज्ञान झालें. प्राथमिक शिक्षणक्रमांत यापेक्षां अधिक कांहीं नको. मुलगा ब्राह्मण वैदिकाचा असो किंवा कुणबी शेतकऱ्याचा असो, त्याला इतकें आलेंच पाहिजे. इतकें येण्याचीच काळजी सर्व प्राथमिक शाळांची असली पाहिजे. यापेक्षां अधिकाची अपेक्षा प्राथमिक शाळांना नसावी. युनिव्हर्सिटीच्या तंत्रास जुळण्याकरितां आमच्या प्राथमिक अभ्यासक्रमांत खेंचाखेंच नको. नेहमींच्या व्यवहारांतल्या पदार्थांबाहेर त्यांना कांहीं समजावयास नको. दुधांत आलबुमेन अमुक आणि दुधाला पांढरा रंग अमुकानें येतो हें घोकून लक्षांत ठेवण्याची तसदी प्राथमिक शाळांतील मुलांस नको. श्वासनलिका—फुफ्फुसें—यकृत—पित्ताशय वगैरेंची अर्धी कच्ची माहिती पुस्तकांतून घोकून सांगणाऱ्या शिक्षकाकडून त्यांना मिळायाला नको. त्याला तराजू धरतां येऊं दे, खरी खोटी ओळखतां येऊं दे, वजनें मापें तपासतां येऊं दे, चर खणतां येऊं दे, झाडांना पाणी देतां येऊं दे, फुलाफळांची—नेहमींच्या—ओळख होऊं दे, फाटलें तुटलें शिवतां येऊं दे, मोडलें तोडलें जोडतां येऊं दे, वाचली बातमी सांगतां येऊं दे, सांगितला निरोप पोंचवितां येऊं दे आणि त्याच्यावर टाकलेलें काम उरकतां येऊं दे, म्हणजे आह्मांस हवें तेवढें तो शिकला. येवढें सगळें त्यास आयास न पडतां शाळांत प्राप्त झालें पाहिजे. रोज चार तासांपेक्षां त्यांस वर्गांत कोंडून न ठेवतां आणि त्यांच्या हौसेपेक्षां त्यांच्या डोक्यांत अधिक कांहीं न कोंबतां मुलें येवढें शिकलीं पाहिजेत. येवढ्यापुरता आमच्या प्राथमिक अभ्यासक्रमांत फरक केला पाहिजे. अपूर्णांक गणित, जिल्हा इलाख्याचा भूगोल, सबक्तगीन अल्लाउद्दीनांचा इतिहास, कोलंबसाचा वृत्तांत, बेंजामिन फ्रांकलिनाची दिनचर्या आणि स्वार्थी वर्तमानकाळीं तृतीय पुरुषाचीं एकवचनें, आऊटकीं, आकरकीं, एकोत्रीं, टाक, सवायकी—दिडकी—अडीचकीं, साडेसातकीं, रवांचें गणित अव्हाईुपाइस आणि ट्रायवेटें—या सगळ्यांस आमच्या प्राथमिक शाळांतून हद्दपार केलें पाहिजे. या सगळ्यांचा आधीं फारसा उपयोग नाहीं आणि आठ दहा वर्षांच्या मुलांच्या मानसिक शक्तीस तालीम देण्याची त्यांचे अंगीं पात्रता नाहीं. जर्मनींतील प्राथमिक अभ्यासक्रम जवळ जवळ मी सांगतों असाच आहे. या अभ्यासक्रमाला भाषाविषयाशिवाय कोठेंही पुस्तकांची जरूर नाहीं. शिक्षकांचा घसा आणि डोकें यांची कामगिरी येथें फार. या शाळांत कठिण काम आहे तें निरनिराळ्या विषयांवरील पाठांचा परस्पर संबंध राखण्याचें होय. तो नेहमींच राखतां येईल असें नाहीं, तथापि शेंकडा पन्नास वेळां तरी चारी तासांचे धडे एकमेकांशीं जोडून—एकांतूनच दुसरा, त्यांतून तिसऱ्या विषयाचा, असे काढून—सगळ्या शिक्षणांत संगती ठेवतां येईल. तशी संगती लहानपणीं तरी अवश्य असते. त्या वयांत पृथग्भावांचा

एकमेकांशीं असणारा अन्तःसंबंध ओळखत नाहीं. म्हणून या वयाच्या मुलांना शिकवायाच्या विषयांची मांडणीच अशी ठेवावी कीं, एकांतून दुसऱ्यांत ओघानेंच जांता यावें. यायोगें मुलांस पृथक् वस्तूंतील नातें शोधण्याची संवय लागते.

## प्राथमिक शिक्षण द्यावें कोणीं ?

( २ ) प्राथमिक शिक्षण कसें पाहिजे तें सांगितलें. तें कोठें कोठें पाहिजे आणि द्यावें कोणीं हें पहावयाचें आहे. प्राथमिक शिक्षण कोठें पाहिजे हा प्रश्नच घेतां कामा नये. तें सर्वत्र पाहिजे.शाळेंत जाण्यासारख्या प्रत्येक मुलास तें मिळालें पाहिजे. आज दर पांच मुलांपैकीं चारांस शिक्षण मुळींच मिळत नाहीं आणि १० माणसांपैकीं नऊ निरक्षर आहेत. हे आंकडे व्यस्त झाले पाहिजेत. राष्ट्रीय शिक्षणाचें धोरण सर्वांस शिक्षण द्यावयाचें असेंच असलें पाहिजे. आज पांचांपैकीं चार मुलांस शिक्षण न मिळण्याचें कारण प्राथमिक शाळांची संख्या फार लहान आहे. प्रत्येक गांवाला त्याच्या लोकसंख्येच्या मानानें लहान मोठी शाळा असली पाहिजे आणि ती देणें सरकाराला अशक्य नाहीं. आमच्या पूर्वीच्या गांवठी शाळांस सरकारानें मदत केली तर प्राथमिक शाळांची संख्या भराभर वाढेल. गांव लहान असल्यास तेथें एकच शिक्षक देऊन लहानशी शाळा चालवावी. खेडेगांवच्या लहान लहान शाळांना शिक्षक अनट्रेन्ड चालतील. त्या शाळा पहिल्या प्रतीच्या व्हावयाला पुष्कळ अवकाश आहे. सरकारानें या कामांत विशेष चवढाळपणा न ठेवतां लिहायावाचायास शिकविणारा माणूस भेटला कीं त्याला मदत देऊन त्याची शाळा चालू ठेवावी.

## थोडासा पंक्तिप्रपंच हवा.

(३) शिक्षकांसंबंधानें थोडासा पंक्तिप्रपंच करावयास हवा. मोठ्या गांवांतल्या शाळांस सरकारानें ट्रेन्ड शिक्षकच पुरविले पाहिजेत. एक वर्ष तरी ट्रेनिंग कॉलेजांत राहून गेलेले मास्तरच नेहमीं प्राथमिक शाळांवर असावे.मीं सांगितला तितका व तसाच प्राथमिक अभ्यासक्रम ठरविला म्हणजे प्राथमिक शाळांस विशेष विद्वान शिक्षकांची जरूर नाहीं. आस्थेवाईक, चौकस आणि इमानानें काम करणारे शिक्षक हवेत. ट्रेनिंग कॉलेजांत त्यांची विद्वत्ता वाढविण्यापेक्षां त्यांना शिकविण्याचें कामच शिकविण्याकडे विशेष लक्ष पोंचलें पाहिजे. शहरांशिवाय बाहेरच्या गांवठी शाळांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें—मुलांच्या संख्येप्रमाणें पैशाची मदत दिली पाहिजे. तसें केल्यास शास्त्रशुद्ध शिक्षण न मिळालें तरी लिहिण्यावाचण्यापुरतें आणि हिशेब टिपण्यापुरतें शिक्षण सर्व मुलांस मिळण्याची तरी सोय होईल. शहरांतील—मोठ्या गांवांतील प्राथमिक शाळांसंबंधानें मला विशेष विचार करावयाचा आहे. आज शहरांतील प्राथमिक शाळा कमिटीच्या ताब्यांत आहेत. शिक्षणाच्या बाबतींत ही व्यवस्था नुकसानाची झाली आहे असें वाटतें. कमिटीच्या शाळांवर देखरेख असावी तशी नसते. आणि या शाळांतील शिक्षकांस शिकविण्यापेक्षां कमिटीच्या मेंबरांची मर्जी संपादण्यांतच फायदा असतो.त्यामुळें ते मुलांना धडे नेमून देऊन आपण वर्तमानपत्रें वाचीत, तंबाकू चघळीत, झोंपा ताणीत किंवा गप्पा झोडीत बसतात. असा प्रकार सर्वच शिक्षक करतात असें नाहीं. आपलें काम बरें आपण बरें, असें समजणारे सरळ—पापभीरू शिक्षक कमिटीच्या शाळांतही आहेत; परंतु ते बहुधा मागें पडतात. आपल्या कामापेक्षां इतर उद्योग करणारे आणि वेळ पाहून वागणारेच पुढें सरतात. सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यांत असणाऱ्या प्राथमिक शाळांतही ही

तक्रार ऐकूं येते, पण त्यापेक्षां कमिटीच्या शाळांत या तक्रारीला अधिक जागा मिळत असावी. कारण कांहींही असो, शहरांतील प्राथमिक शाळांवर देखरेख यापेक्षां चांगली होणें अवश्य आहे. आणि तेथील प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रमही थोडासा निराळा ठेविला पाहिजे.

## शहरांतील प्राथमिक शाळा.

( ४ ) शहरांतील प्राथमिक शाळांचे दोन तीन प्रकार करावे. निव्वळ प्राथमिक शिक्षणावरच थांबणारांकरितां कांहीं शाळा, प्राथमिक अभ्यासक्रम पुरा करून दुय्यम अभ्यासक्रमही आटपणारांकरितां कांहीं आणि प्राथमिक—दुय्यम—अभ्यास करून युनिव्हर्सिटीकडे जाणारांकरितां कांहीं शाळा. ही वांटणी लवकर होते असें कित्येकांचें म्हणणें पडेल. पण तशी केल्याखेरीज शिक्षण यथासांग होत नाहीं. आजच्या शिक्षणक्रमांतील बरेच दोष ही वांटणी वेळींच न करतां सर्व अभ्यास युनिव्हर्सिटीच्या परीक्षांचे तंत्रानें ठरविल्यामुळें उत्पन्न झालेले आहेत. युनिव्हर्सिटीचे तंत्रानें चालावयाच्या शाळा वेगळ्या काढिल्या म्हणजे सामान्य लोकशिक्षणाची व्यवस्था हल्लींपेक्षां अधिक समाधानकारक करतां येणें शक्य आहे. जर्मनी व अमेरिका येथें युनिव्हर्सिटीशीं—म्हणजे वाङ्मयात्मक शिक्षणाच्या युनिव्हर्सिटीशीं संबंध नाहीं अशाच शाळा पुष्कळ आहेत आणि त्याच पुष्कळ असण्यांत देशाचा एकंदरींत फायदा आहे.

निव्वळ प्राथमिक शिक्षण घेऊन थांबणारांकरितां चालविलेल्या शाळांत व्यावहारिक शिक्षणास विशेष प्राधान्य मिळालें पाहिजे. यांत येणारीं मुलें बाळांच्या बागांतून आल्यास चांगलेंच; पण तशीं न आलीं तरीही आठ वर्षांच्या मुलांस या शाळेंत घेऊन बारा वर्षांपर्यंत त्यांना तेथें शिक्षण द्यावें. त्यांच्या शिक्षणांत बुद्धि वगैरेंचे विषय दोन तासांचे आणि शरीरकष्टाचे दोन तासांचे अशी योजना असावी. रेखालेखन, अक्षरलेखन, मोडी बाळबोध वाचन आणि थोडेसे हिशेब इतके विषय त्यांस शिकवावे. याशिवाय हातकामाचा ओनामा म्हणून त्यांच्या हातांपायांकडून नाना तऱ्हेचीं साधीं कामें करून घ्यावीं. या शाळांत येणारीं मुलें बहुधा हलक्या वर्गांतलीं—मजूर वगैरेंचीं असणार. त्यांना शिक्षण अगदींच फुकट देण्यांत यावें. त्यांना व्यवहाराचें शिक्षण देणें हें सरकाराचें कर्तव्य आहे.

दुसऱ्या प्रकारच्या प्राथमिक शाळा यापेक्षां अधिक शास्त्रीय पद्धतीच्या असाव्या. यांत 'बालोद्यान आणि वस्तुपाठ' यांच्याद्वारें शिक्षण देण्याची व्यवस्था असावी. सातव्या आठव्या वर्षापासून दहाव्या अकराव्या वर्षांपर्यंतचीं मुलें या शाळांत असावीं. यांचें पूर्णांक-गणित मात्र करून घ्यावें. तें बाळांच्या बागांतील पद्धतीचा ओघ पुढें चालवून करून घेतां येतें. यांचीं पांच ज्ञानेंद्रियें आपापल्या कार्यास चांगलीं तयार करण्याकरितां नेहमींच्या व्यवहारांतले पदार्थ, त्यांचीं चित्रें—नमुने वगैरेंची अवलोकन—तपासणी त्यांचेकडून करविली पाहिजे. रोजचा एक तास या तपासणीस आणि तीपासून मिळालेली माहिती एकत्र जुळण्यास देण्यांत यावा. या अवलोकन—तपासणीस धरूनच त्यांना भाषेचे धडे द्यावे. त्यांचें बोलणें आणि अक्षरें तयार करणें बरोबर चालवावें. रोज त्यांचेकडून पाहिलेल्या वस्तूंचे नमुने मातीचे तयार करून घ्यावे; वस्तूचे वास्तविक रंग नमुन्यावर चढवून घ्यावे, वस्तूचे नांव—त्याचे ठळक गुण किंवा भाग मातीचे—काड्या—चिटोरीं—मणी वगैरेंचे अक्षरीं करून घ्यावे. व मग कांहीं दिवसांनीं लड्डू किंवा भक्ष

यांचेयोगें लिहून घ्यावें. अक्षरलेखन इतकें लांबणीवर टाकण्यास दोन कारणें आहेत. आज मुलांची अक्षरावर मेहनत फार होऊनही त्यांचें अक्षर चांगलें नसतें. आणि माझ्या मतें हा दोष मुलांचा नसून अक्षर शिकविणारांचा आहे. अक्षर शिकविण्याची पूर्वीची तात्या पंतोजीचीच पद्धति अजून सुरू आहे. अक्षर शिकविणें म्हणजे मुलांस मांडी घालून लिहावयास बसविणें, आणि एक तासभर त्यांचेकडून लिहविणें, यापेक्षां अधिक कांहीं आहे याची आमच्या अक्षरशिक्षकांस कल्पना नसते. हल्लींच्या पद्धतीनें मुलांच्या पाठीस कुबड येतें, बोटांस आंखडण्याची संवय लागते, फार लिहितां येईनासें होतें आणि शिक्षकास प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष देतां येत नसल्यामुळें मान फिरविणें, जीभ काढणें, तिरकें पाहणें वगैरे खोडी मुलांस लागतात. लेखणी किंवा टाक धरतां येत नाहीं आणि अक्षराच्या मोडींतील खुबी समजत नाहीं. मला वाटतें आकार—आकृति मुलांचे मनांत चांगली भरून त्यांस त्यांचे नमुने अजमासानें मातीचे व कागदांच्या चिटोऱ्यांचे वगैरे चांगले करतां येण्यापूर्वी त्यांस अक्षर शिकवूं नये आणि लिहावयास लावूं नये. ढोबळ रेखालेखन आधीं शिकविल्यानेंही अक्षर शिकविणें सोपे जाईल. रेखालेखनानें पदार्थांच्या आकृती निरनिराळ्या आकाराच्या काढतां आल्यावर अक्षरें काढणें फारसें कठीण नाहीं. कारण अक्षरें ही ठरीव आकृतीच आहे. आणि मुलांचें अक्षर तयार झाल्याशिवाय त्यांस वर्गांत शब्द किंवा टिपणें लिहावयास लावूं नये. तसें केल्यानें मुलांना खरडण्याची संवय लागते . आणि हाताची चांगली संवय जाऊन अक्षरांचीं भलतींच वळणें हातीं बसतात. सुबकपणा आणि नीटसपणापेक्षां जलदीला महत्त्व मिळतें आणि मुलांचीं अक्षरें कायमचीं बिघडतात. मराठी पहिल्या यत्तेपासून इंग्रजी सातवीपर्यंत आमच्या शाळांत शुद्धलेखनाचा आणि टिपणें उतरून घेण्याचा सपाटा सारखा सुरू असतो. आमच्या मुलांना शेवटपर्यंत नीट लिहितां येत नाहीं. सुवाच्यता आणि शुद्धपणा त्यांचे लिहिण्यांत दुर्मिळ होतात. याला बऱ्याच अंशीं कारण हें शुद्धलेखन आणि टिपणें लिहिणें आहे असें माझें मत झालें आहे. या दोहोंच्यायोगें आम्हीं मुलांना अशुद्ध आणि विद्रूपलेखन मात्र रोज नियमानें शिकवीत असतो. कागद सुवाच्य न लिहिल्यामुळें मुलांस नापास करण्याऐवजीं त्यांच्या शाळांस दंड होईल तर नामी होईल असें पुष्कळदा वाटतें. पण तसें केल्यास मुलांचे मागें वरून लिहून नेण्याचें काम फार लागेल अशी भीति आहे. हल्लीं सुबक—नीटनेटकेपणाबद्दल ज्या शाळांची ख्याती आहे त्यापैकीं एक दोन ठिकाणीं मीं शोध केला त्यावरून त्यांच्या मुलांनीं—लिहिण्याचा सुबकपणा आणि टापटीप, काळ—कष्ट आणि इतर कामांची फार मोठी किंमत देऊन विकत घेतल्याचें मला समजलें.

या साध्या गुणांच्या प्राप्तीकरितां मुलांना वाजवीपेक्षां फाजील श्रम करावे लागतात याचें कारण, त्यांना विसरायाचें बरेंच असतें हें असतें. पण आधीं त्यांना भलत्या संवयी लावतां कां आणि मग त्या घालविण्याची खटपट करतां कां? या दुसऱ्या प्रकारच्या प्राथमिक शाळांत आरंभीं मुलांस लेखणीनें लिहावयास मुळींच न शिकवितां, अक्षरांचे ठोकळे, काटक्या, शिशाचे तुकडे, मणी, माती वगैरेवर लिहिण्याचें काम भागविलें, आणि रेखालेखन व पाहिलेले आकार—आकृति नमुन्यांत उठविणें, या दोहोंवर भर दिला तर शेवटच्या वर्गांत त्यांना लेखणीनें लिहिणें

शिकवायास फारसा त्रास पडणार नाहीं. महिना दोन महिन्यांत तें सहज साध्य होईल. लिहावयास बसविण्याच्या हल्लींच्या पद्धतींत फरक करणें अवश्य आहे. लहान मुलांच्या पाठीचा कणा पक्का झालेला नसतो.त्यामुळें या वयांत त्यांना मांडी घालून बसवून वांकविल्यानें त्यांच्या पाठीस रग लागते आणि तिचा ताठपणा मोडतो. अर्थातच फुफुसांच्या संकोच–विकासास अडथळा होतो. तीं भात्यासारखीं फुगून व्हावीं तितकीं दणकट होत नाहींत. डोळ्यांना सारखें खालीं पहावें लागल्यामळें दृष्टीस ताण बसतो. बोटें आंखडून लेखणी धरणें भाग पडल्यानें बोटें आणि मनगट दुखूं लागतात व हाताच्या स्नायूंस साफ राहण्याची संवय राहत नाहीं. लेखण्या किंवा टाकांचे होल्डर बारीक असले ह्मणजे बोटांची व मनगटाची त्रेधाच उडते. यांत सुधारणा करण्याचें विद्याखात्याच्या किंवा शिक्षकांच्या अजून लक्षांत कसें आलें नाहीं कोण जाणे ! बोटें सडक लांबवून आणि हात पालथा ठेवून लिहितां येई अशी लेखणी किंवा टाक धरावा, आणि बोटें विशेष आवळावीं लागूं नयेत इतकी जाड दांड्याची लेखणी असावी. बसतांना मागें टेंकण असावें, आणि ताठ बसून पुढें सहज दिसे इतक्या उंचीचें कागद ठेवावयास मेज पुढें असणें अवश्य आहे. कोणताही विषय शिकतांना मुलांच्या शरीरास त्रास होईल व त्यांचें अवधान विपर्यस्त होई असें त्यांस बसवूं नये, हा शिक्षण शास्त्राचा नियम. मराठी लिहिण्यास घालावयाची मांडी सुखाची खात्रीनें नाहीं. मग ती घालायास लावतां कशाला ? पुढे टेबल, डेस्क किंवा पेटी ठेवण्याची कल्पना माहीत नव्हती त्या काळचें हें अनिष्ट अवशिष्ट अजून कां राहूं द्यावें ? हें सगळें बदलून मीं सांगितल्या क्रमानें अक्षरलेखन शिकविल्यास मुलांचे बरेच श्रम, बराच काळ, आणि लेखनप्रमाद वांचतील अशी माझी समजूत आहे.

या शाळांत एक तास पूर्णांक गणितास, एक तास पदार्थ–पाठ बालोद्यान–वगैरे पंच ज्ञानेंद्रियांच्या विषयास, एक त्यावरून निघणाऱ्या भाषापाठास आणि एक हस्तव्यापारास व सामान्य व्यावहारिक शिक्षणास अशी अभ्यासाच्या वेळाची वांटणी असावी. यांतील सर्व शिक्षण तोंडीं, पुस्तकांवांचून व्हावें. फक्त वाचन शिकवायास मात्र पुस्तकें मुलांचे हातीं द्यावीं. मुलांचीं वाचन पुस्तकें कशीं असावीं याविषयीं मीं मागें विवेचन केलेलें आहे. तशीं पुस्तकें निघणें अशक्य नाहीं. मी सुचवितों या पद्धतीनें शिकविल्यास शिकविणारासच तीं तयार करतां येतील. त्यांत चित्रें वगैरेची रेलचेल असावी. विद्याखात्याचीं नवीं निघालेलीं दोन पुस्तकें मीं पाहिलीं. तीं पूर्वींच्यापेक्षां बरीं असलीं तरी असावीं त्यापेक्षां पुष्कळच कमी दर्जाचीं आहेत. त्यांतील चित्रें तरी चांगलीं असायाचीं होतीं ! पण तींही मोहक नाहींत आणि भाषा तर उरावर दडपण बसल्यासारखी दबत दबत बोलणारी आहे. हृदयांतून निघून थेट हृदयांत जाणारी, साफ–जगाच्या मलानें अविकृत, बालांच्या मोकळ्या बोलाप्रमाणें अनिर्बंध वावरणारी, विनाकारण हंसणारी, सहज रुसणारी आणि तेव्हांच उमलणारी भाषा ज्या पुस्तकांत नाहीं, तीं पुस्तकें मुलांचे हातांत देण्यास योग्य नव्हेत. नवीन झालेल्या पुस्तकांची भाषा भीत भीत पाउलें टाकणारी, वारंवार बुजणारी, अकालीं पोक्तपणा दाखविणारी असल्यामुळें, परकी भाषेप्रमाणें मोठेपणीं स्वभाषा शिकविणारांस तीं कदाचित् फायदेशीर होतील. पण ज्यांचेकरितां तीं केलेलीं आहेत त्यांना तीं ति-

तर्की साजणारीं नाहींत असें म्हणावें लागतें. भाषेशिवाय इतर विषयांत मुलांना पुस्तकांची जरूर नाहीं. शिक्षकांना मात्र तीं पुष्कळ हवींत.

## दुय्यम शाळा कशा असाव्या.

याप्रमाणें प्राथमिक शाळांची रचना केल्यावर दुय्यम शाळा त्यांस अनुरूप आणि दुय्यम शाळांच्या उद्देशांस धरून चालविल्या पाहिजेत. हल्लीं दुय्यम शाळा ह्मणजे इंग्रजी शाळा झाल्या आहेत. तसें असण्याचें कारण नाहीं. लोकशिक्षणाच्या एकंदर घाटांत दुय्यम शाळा म्हणजे—मनुष्यास अगदीं अवश्य असणाऱ्या शिक्षणापेक्षां थोडेंसें अधिक आणि अगदींच हलक्या, वेठकामापेक्षां वरच्या प्रतीच्या कामधंद्यांस व वरच्या प्रतीच्या आयुर्मार्गास योग्य असें शिक्षण देणाऱ्या शाळा होत. केवळ व्यवहार व उपयोग न पाहतां व्यवहारोपयोग आणि आध्यात्मिक उन्नति या दोहोंचा मेळ घालण्याचा या शाळांत प्रयत्न व्हावा. तो मेळ देशाला व लोकांना काय हवें तें पाहून आणि सर्वांगी मनुष्यतेचा थोडा तरी विकास करण्यास कोठपर्यंत गेलें पाहिजे हेंही पाहून बसविला पाहिजे. थोडीशी काव्यवाङ्मयाची ओळख, अभियुक्त कलांविषयीं अभिरुचि, आसमंताची आपली—शेजाऱ्यांची, येथची—बाहेरची, आजची—कालची, सृष्टींतील नेहमींच्या घडामोडींची आणि मनुष्याच्या उद्योगांची पोटापुरती माहिती, पूर्णांक—अपूर्णांक गणित, आणि संसारांत हरहमेश येणाऱ्या प्रसंगीं लागणारी हातकामाची संवय, इतक्या गोष्टी दुय्यम शाळांनीं मुलांस शिकविल्या पाहिजेत. यांतील कांहीं कमी—कांहीं अधिक, मुलांनीं निवडायाच्या पुढील व्यवसायाप्रमाणें शिकवाव्या लागतील. कांहीं-करितां यांत आणखी विषयांची भर घालावी लागेल. एकंदरींत पहातां दुय्यम शाळा चार पांच प्रकारच्या वेगवेगळ्या झाल्या पाहिजेत. (१) युनिव्हर्सिटीकरितां विद्यार्थी तयार करणाऱ्या कांहीं दुय्यम शाळा निराळ्या हव्या. आज सगळ्याच तें व तेवढेंच काम करीत आहेत, (२) सरकारी नोकरींत शिरणारे कारकून वगैरे तयार करण्याकरितां कांहीं दुय्यम शाळा असाव्या, (३) वैद्यकीचा किंवा इंजिनिअरिंगचा धंदा करणारांकरितां निराळ्या शाळा हव्या, (४) यांत्रिक कामें करणारांकरितां कांहीं आणि (५) व्यापार उदीम करणारांकरितां कांहीं; आणि सगळ्यांत विशेष महत्त्वाच्या म्हणजे रसायन, लोहचुंबक, विद्युत् वगैरेचा व्यावहारिक रीत्या विशेष अभ्यास करणारांकरितां आणि शेतकीकडे जाणारांकरितां कांहीं अशा वेगवेगळ्या मुलांकरितां वेगवेगळ्या दुय्यम शाळा असणें जरूर आहे. जर्मनींत दुय्यम शाळा सर्वांशींच अशा निरनिराळ्या नसल्या तरी तेथें चार पांच प्रकारच्या दुय्यम शाळा असून त्यांचें वर्गीकरण थोडेंफार याच तत्त्वावर केलेलें असतें. दुय्यम शाळांचे मुख्यतः चार वर्ग केले तरी चालतील. शास्त्रीय, व्यावहारिक, कारकुनी आणि विद्यापीठी. या चार शाळांस कांहीं विषय साधारणपणें अवश्य असतील. दुय्यम शाळांचा अभ्यासक्रम पांच किंवा सहा वर्षांचा असावा. त्यांपैकीं सुमारें तीन वर्षें सामान्य सर्वांगी शिक्षणाला देऊन पुढचीं तीन वर्षें त्या त्या शाखेला अनुरूप शिक्षणास द्यावीं. दुय्यम शाळांतील सर्व मुलांस थोडेंबहुत इंग्रजी शिकवावें तें चांगलें. पहिलीं चार वर्षें सर्व शिक्षण देशभाषांचे द्वारें झालें पाहिजे. पुढचीं दोन वर्षें कांहीं शाळांतील शिक्षण इंग्रजींतून देणें आज युनिव्हर्सिटीच्या विपरीतपणामुळें अवश्य आहे.

दुय्यम शाळा प्रकार १. युनिव्हर्सिटीकरितां विद्यार्थी तयार करणाऱ्या. यांत अंकगणित---बीजगणित---भूमिति, देशभाषांचें वाङ्मय व व्याकरण, इंग्रजीचें व्याकरण, संस्कृत किंवा प्राचीन भाषा; इतिहास भूगोल आणि शास्त्राची सामान्य माहिती. हे विषय सहा वर्षांवर क्रमशः वांटून दिले, ते शास्त्रशुद्धपद्धतीनें तोंडीं शिकविले, शिक्षण चार वर्षे देशभाषेंतून दिलें आणि पुढें इंग्रजीची मखलाशी केली, तर हल्लींच्यापेक्षां मुलांचें शिकणें बरें व्हावें. शिकविण्याच्या पद्धती जर मुलांस विषय समजून देण्याच्या असतील—नुसतें मुलांनीं घरीं किती केलें आहे हें पाहणाऱ्या नसतील—आणि ज्ञानवाहन परकी नसेल तर प्रवेश परीक्षेला लागणारे सर्व अभ्यास पांच वर्षांत चांगले करून घेतां येतील. इंग्रजीशिवाय बाकीचे सारे विषय देशभाषेंतच सांगितले आणि वर्गांत मुलांचेकडून करवून, बसवून घेतले तर आजचा बराच श्रम वांचेल. इतिहास—भूगोल हे विषय खरोखर एक वर्षाचे आहेत. ते सबंध सात वर्षांत तयार होत नाहींत ! संस्कृत देशभाषेनें शिकविलें तर वर्षा दीड-वर्षांत किती तरी होईल. देशभाषेला आणि सामान्य माहितीला आठवड्यांत तीन चार तास दिलेच पाहिजेत. सारांश, या शाळा हल्लींसारख्या चालवून त्यांत विषयांची वांटणी आजच्यापरीस निराळी केली, आणि शिक्षणाचें वाहन आणि पद्धति बदलली तर दुय्यम शाळांतील हल्लींचें शिक्षण अधिक फलप्रद होईल.

दुय्यम शाळा प्रकार २. कारकून वगैरे तयार करणाऱ्या. यांत इंग्रजी बोलणें, पत्रें वगैरे लिहिणें आणि सारांश काढणें, यांवर विशेष भर हवा. अक्षर चांगलें आणि जलद लिहावयास शिकवावें, टाइपरायटिंग, लघुलेखन, हे विषय ज्यास्त घालावे. सरकारी कारभाराची माहिती, मुलकी-जमाबंदी वगैरे खात्यांतील अधिकाऱ्यांस पडणारीं कामें; वगैरे ज्यास्ती शिकवून संस्कृतादि प्राचीन भाषांस फांटा द्यावा. इतिहास अलीकडील मात्र शिकवावा. ब्रिटिश साम्राज्याचा भूगोल—त्यांतही हिंदुस्थानाचा भूगोल मुख्यतः शिकवावा. शास्त्रादि विषयांची त्यांस माहिती नसली तरी चालेल. अंकगणितावर विशेष भर देऊन बीजगणित थोडेंसें आणि भूमिती थोडीशी येती करावी म्हणजे यांचें शिक्षण पुरें होईल. हातकामाचा एकादा धंदा त्यांस वाटल्यास शिकतां यावा.

दुय्यम शाळा प्रकार ३. यांत इतर विषय पहिले तीन वर्षे इतरांप्रमाणें शिकवावे. त्या पुढें वनस्पतिशास्त्र शारीरशास्त्र, संस्कृत किंवा त्रिकोणमिती, बीजगणित, भूमिती, सर्व्हेइंग, महत्त्वमापन, प्लॅन्स्—एस्टिमेट्स, ड्राफ्टिंग वगैरेंचा समावेश करावा. यांतून बाहेर पडणाऱ्या मुलांस अनुभवानें व अधिक वाचनानें वैद्यकी करतां यावी किंवा खाजगी रीतीनें इंजनीरिंगचा धंदा करतां यावा. ड्राफ्टसमन—ओव्हर्सीअर,—सर्व्हेअर' प्लॅन्स—एस्टिमेटें तयार करणारांची नेहमीं जरूर लागते. मुंबईसारख्या शहरांत खाजगी रीतीनें हा धंदा करणारे पुष्कळ आहेत व उत्तरोत्तर अशा लोकांची'जरूर वाढत जाणार आहे.

दुय्यम शाळा प्रकार ४. यांत ड्राइंग, भूमिती, इंग्रजी, अंकगणित वगैरे विषयांचें सामान्य शिक्षण झाल्यावर कार्पेंटरी, स्मिथी, वीव्हिंग,—सुतारकाम, लोहारकाम, विणकाम, यंत्रांची घडामोड, टर्निंग, फिटिंग, वगैरे शिकवावें. यांना रोज जगाची सामान्य माहिती म्हणून शास्त्रीय—ऐतिहासिक—भूगोलिक गोष्टी सांगाव्या. परंतु रोज दोन तास तरी वरील विशिष्ट धंद्यांचें शिक्षण मिळावें. शिक्षणवाहन देशभाषा असावें.

दुय्यम शाळा प्रकार ५. यांत पहिलीं तीन वर्षें सामान्य बुद्धिविकासक शिक्षणांत घालवून पुढें निमा वेळ सामान्य शिक्षणांत आणि निमा व्यापारोपयोगी शिक्षणांत जावा. व्यापारी भूगोल, इंग्रजी मराठी जमाखर्च, व्यापाराचे निरनिराळे प्रकार, अर्थशास्त्र, बाजारभावाचें प्रकृतिमान, दलाली, बट्टा वगैरेचे प्रकार, वाऊक व कच्च्या व्यापाराच्या शर्ती, हिंदुस्थानाची खनिज संपत्ति, नवीन होण्यासारखे धंदे, हे विषय यांस जास्त शिकवावे. इंग्रजी बोलणें व पत्रें वगैरे लिहिणें अवश्य. जन्म भाषेखेरीज इतर जवळच्या देशभाषांचें व्यवहारापुरतें ज्ञान यांना जरूर करून द्यावें.

दुय्यम शाळा प्रकार ६. यांत वनस्पति शास्त्र, शेतकी शास्त्र, खतें, हवामान, भूगर्भाची थोडीशी माहिती, मातीचे प्रकार, झाडां वगैरेचा मातीवर परिणाम, पिकांचे रोग, गुरांचे रोग, त्यांवर उपाय—रसायनाची व्यावहारिक ओळख, पाण्यासंबंधाचें सृष्टशास्त्र, हे विषय पुढच्या तीन वर्षांत अधिक शिकवावे. पहिल्या तीन वर्षांत सामान्य बुद्धिविकासक शिक्षण द्यावें. येथें सर्व शिक्षण देशभाषांच्याद्वारें देऊन इंग्रजीचें ज्ञान लिहिलेलें वाचून समजण्यापुरतें द्यावें. या शाळांचा उपयोग शेतकीचा धंदा करणारांस फार होईल. आज त्यांस प्रवेश परीक्षा देऊन पुढें जावें लागतें; तसें न लागतां त्यांचें थोड्यांत पुष्कळ काम होईल. यांस माल कोठें कसा खपतो याचीही माहिती सरकारी रिपोर्टावरून काढावयास शिकविलें पाहिजे.

दुय्यम शाळा प्रकार ७. यांत अर्वाचीन परकी भाषा खेरीजकरून सर्व विषय देशभाषांच्याद्वारें शिकविले पाहिजेत. यांचें इतिहास—भूगोलाचें ज्ञान अगदीं ठोकळ असलें तरी चालेल. बाकी सर्व विषय या शाळांत प्रवेश परीक्षेस लागतात तितके शिकवावे. इंग्रजी वाङ्मयापेक्षां, चालू इंग्रजीच विशेष शिकवावें. यांतील मुलांस शास्त्रीय इंग्रजी पुस्तकें वाचून समजलीं पाहिजेत आणि आपणास सांगावयाचें तें कसें बसें इंग्रजींत सांगतां आलें पाहिजे. याचें शिक्षण देशभाषेंतूनच व्हावें. पांच वर्षेपर्यंत यांस सामान्य शिक्षण विशेष कसोशीनें देऊन पुढें दोन किंवा तीन वर्षें यांनीं रासायनिक वगैरे प्रयोगशाळेंत घालवावीं. येथें व्यापारीय व व्यावहारिक पदार्थांचीं सर्व कार्यें, उत्पत्ति-स्थिति—लय, साध्या पदार्थांचीं निरनिराळीं रूपान्तरें, निरनिराळ्या रसायनांचे निरनिराळे गुण वगैरेंचा सप्रयोग अभ्यास यांनीं करावा. येथें यांच्या विशिष्ट शास्त्रांत यांची गति उपपत्तीच्या दृष्टीनें बी. ए. इतकी व व्यवहाराच्या दृष्टीनें त्याहून अधिक व्हावी. या शाळांत तयार होणाऱ्या माणसांचा हिंदुस्थानाच्या खनिज व उद्भिज्ज संपत्तीचा विकास आणि उत्कर्ष करण्याचे कामीं फार उपयोग होईल. आजच्या स्थितींत यांस सर्व शिक्षण इंग्रजींत घेऊन म्याट्रिक्युलेशन, पी. ई., इंटरमीजिएट आणि बी. एस. सी. झाल्यावर मग मि. गज्जरांच्यासारख्या लॅबारेटरींत पुनः शिकत राहवें लागतें. इतका प्रवास करण्यांत—इतक्या परीक्षांकरितां इंग्रजी वाङ्मय आणि इंग्लंड—ग्रीस—रोमां—चा इतिहास, संस्कृत व्याकरण आणि नाटकें वगैरे, त्यांच्या कामास आणि सामान्य शिक्षणास थोडेसे अनवश्यक अशा विषयांचा अभ्यास करण्यांत त्यांचें बरेंच वय जातें—शक्ति खर्च होते, आणि पुनः हातीं ससत्त्व असें कांहींच लागत नाहीं. जर्मनीच्या व्यापारास असल्या शाळांचाच उपयोग फार झाला आहे. तेथें युनिव्हर्सिटींतील प्रोफेसरांपेक्षां दुय्यम शाळांच्या या शाखांत काम करणारांचे हातून वरच्या प्रतीचें काम होतें,

आणि अभ्यास करणारांची प्रत्यक्ष कृती आणि प्रयोग यांच्याद्वारें देशाच्या ऊर्जितावस्थेस मोठी मदत होते. आमच्या येथें दुय्यम शाळांस असल्या शाखा जोडल्यास आमच्या सध्याच्या निरुपयोगी शिक्षणास उपयोगाची जोड होऊन युनिव्हर्सिटीकडे न जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा जन्म फुकट जातो तो त्यांच्या व देशाच्याही कारणीं लागेल.

दुय्यम शाळांचे जे इतके प्रकार सांगितले तितके न करतां एकाच शाळेच्या दोन दोन तीन तीन शाखा केल्यानें फायदा होईल; खर्चही कमी लागण्याचा संभव आहे. कोणत्या तरी मार्गानें दुय्यम शाळांचें आजचें सगळें चक्र युनिव्हर्सिटीच्या तंत्रानें फिरणारें झालें आहे. तसें तें न राहतां प्राथमिक शिक्षणानंतर मुलांची वांटणी करतां येऊन कांहींना युनिव्हर्सिटीकडे व कांहींना व्यवहारोपयोगी शाखेकडे जातां यावें. आणि आईबापांनाही वेळींच मुलांच्या पुढच्या आयुष्याची दिशा ठरवितां यावी म्हणजे झालें. जर्मनींत हें मुलांचे नववे वर्षींच ठरवावें लागतें. तेव्हांपासूनच किंवा पुढें एकदोन वर्षांत युनिव्हर्सिटीच्या दुय्यम शाळा आणि व्यवहाराच्या दुय्यम शाळा वेगळ्या होतात किंवा त्यांतले अभ्यासक्रम वेगवेगळे होतात. युनिव्हर्सिटीच्या बाजूस प्राचीन भाषा, प्राचीन इतिहास वगैरे विषयांस महत्त्व मिळतें, आणि इतर बाजूस अर्वाचीन भाषा, अर्वाचीन इतिहास आणि शास्त्रें यांना अग्रमान मिळतो. त्यामुळें मुलांच्या बुद्धीचा, शक्तीचा आणि पालकांच्या पैशाचा भलत्याचाच पाठलाग करण्यांत वेच होत नाहीं आणि हिंमत, बुद्धि आणि साधनें असतील त्यांची पीछेहाट होत नाहीं. ज्याला हेंही साधून तेंही साधावयाचें असेल त्याचेबद्दल प्रश्नच नाहीं. कारण त्यास सारेच मार्ग खुले राहतील. तथापि त्याचा सुद्धां मी सांगतो त्या तऱ्हेनें दुय्यम शाळाची नवी मांडणी झाल्यास थोडासां नफाच होईल. एक तर बरेच विषय आधीं त्याचे हस्तगत झालेले असतील. वर्षभरांत त्यानें संस्कृत उरकलें आणि इंग्रजींत उत्तरें लिहिण्याचा अभ्यास केला कीं युनिव्हर्सिटींत प्रवेश होणें त्यास जड जाणार नाहीं. उलट पक्षीं युनिव्हर्सिटीचें त्याचें हुकलें तरी आतां काय करूं म्हणत त्यास स्वस्थ बसून राहावें लागणार नाहीं.

## ट्रेनिंग कॉलेजें-शिक्षक उत्तम पाहिजेत.

३५ या सगळ्या व्यवस्थेंत प्राथमिक व दुय्यम शाळांतील सामान्य शिक्षणाच्या भागांत शिक्षक उत्तम असले पाहिजेत आणि ते तयार करण्याकरितां ट्रेनिंग कॉलेजें पाहिजेत. हल्लींच्या काळीं शिक्षकास धडा तयार करण्याचीं साधनें मुबलक असतात, तेव्हां ट्रेनिंग कालेजांतील अभ्यासक्रमांत प्रत्यक्ष शिकवून घेणें, शिक्षण-पद्धतींचा अभ्यास करून पडताळा पाहविणें, मानस शास्त्राची माहिती देणें, धडे तयार करविणें, वगैरेस काळ आणि प्रसंग फार मिळाला पाहिजे. याला ट्रेनिंग कालेजाचे वर्ग लहान पाहिजेत, किंवा दर वीस मुलांस शिक्षणशास्त्राचें व पद्धतींचें ज्ञान करून देणारा एक हुशार, चौकस, स्वतंत्र विचाराचा, व्यासंगी आणि स्वतां शिक्षकाचें काम केलेला माणूस पाहिजे. ट्रेनिंग कॉलेजांची संख्याही वाढविली पाहिजे. किंवा प्रत्येक शाळेनें आपापले शिक्षक तयार करून त्यांना ट्रेनिंग कॉलेजाच्या शिक्षणाच्या परीक्षेस-इतर विषयांच्या नव्हे-बसविलें पाहिजे व तसें करण्याची त्यांस सवलत ठेविली पाहिजे. मी म्हणतों याप्रमाणें प्राथमिक व दुय्यम शाळांतील अभ्यासक्रम ठेवल्यास ट्रेनिंग कॉलेजांतील शिक्षणक्रमही बदलावा लागेल.

तां तीन प्रकारचा ठेवावा लागेल. प्राथमिक शाळांतील शिक्षकांकरितां आणि दुय्यम शाळांतील शिक्षकांकरितां निराळे शिक्षणक्रम करावे लागतील. आज देशभाषांच्या ट्रेनिंग कॉलेजांत विषयांची गर्दी असते. त्यांना युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परीक्षेस लागतात तितके विषय—इंग्रजीशिवाय—शिकविण्याची व्यवस्था असते. ट्रेनिंग कॉलेजें म्हणजे दुय्यम शाळा नव्हेत. त्यांना त्या शाळांचें स्वरूप कां यावें ? इंग्लंडाचा इतिहास, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, संस्कृत, स्थितिगतिशास्त्र, भूमिति, जगाचा भूगोल, अलीकडे थोडीशी शेतकी आणि अपघाताचे वेळीं ताबडतोब करविण्याचे उपाय इतके विषय कॉलेजांत नवीन शिकवितात असें वाटतें. या विषयांस वेळ देऊन राहिलेला वेळ शिक्षणाची उपपत्ति, पद्धति आणि त्यांचा पडताळा, मानसशास्त्र व नीतिशास्त्र यांच्या शिक्षणास हल्लीं मिळतो. ट्रेनिंग कॉलेजें हीं खरींखरीं ट्रेनिंग कॉलेजेंच असलीं पाहिजेत. प्राथमिक म्हणजे-मनुष्यास अगदीं अवश्य तेवढें शिकविणाऱ्या शाळांकरितां शिक्षक तयार करतांना त्यांची विद्वत्ता वाढविण्याचा प्रयत्न नको. मी सांगितलेल्या योजनेप्रमाणें प्राथमिक व दुय्यम शाळांतील पहिल्या वर्षाचा अभ्यास ज्यांचा झाला असेल अशा उमेदवारांस प्राथमिक शाळांच्या कॉलेजांत घ्यावें आणि त्यांना प्राथमिक शाळांत-केवळ ओनाम्याच्या शाळांत—लागणाऱ्या विषयांची उपपत्ति आणि मुलांचे स्वभाव-त्यांना शिकविण्याच्या पद्धती, बाळांच्या शिक्षणाकरितां निरनिराळ्या देशांत झालेले प्रयत्न व त्यांतील ग्राह्यांश, संवयीचें शास्त्र आणि ज्ञानेंद्रियांची शक्ति वाढविण्याचे मार्ग वगैरे केवळ शिक्षणविषयक माहिती देणारेच विषय शिकवावे. रोज दोन तास यांस व दोन तास प्रत्यक्ष शिकवून पहाण्याकरितां ठेवून एका वर्षांत ओनाम्याच्या शाळांचे शिक्षक तयार करावे. हे तयार करण्यास मोठ्या ट्रेनिंग कॉलेजांचीही गरज नाहीं. जिल्ह्याजिल्ह्यांत मुख्य शहरीं नमुनेदार शाळा काढून त्यांना प्राथमिक शिक्षकांचे वर्ग जोडावे व शाळेच्या मुख्य शिक्षकाकडून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करवावी. हा शिक्षक इंग्रजी जाणणारा असावा व यास सालोसाल निघणारीं शिक्षणविषयक पुस्तकें सरकारानें पुरवावीं. याप्रमाणें नमुन्याच्या शाळांतच प्राथमिक शिक्षक तयार करण्याची सोय झाल्यास दहा पांच वर्षांत 'तयार झालेले' शिक्षक मिळण्याची अडचण पडणार नाहीं. या भावी शिक्षकांची परीक्षा इन्स्पेक्टराकडून घेणें बरें नव्हे. शाळेच्या मुख्याध्यापकांनीं त्यानें अनुभवासाठीं दिलेल्या पाठांची नोंद ठेवून त्यांना गुणांक देऊन ठेवावे आणि वर्षाअखेर या उमेदवारांची परीक्षा दुसऱ्या शाळांच्या मुख्य शिक्षकांकडून घेऊन त्यांनीं दिलेले गुणांक सर्व वर्षांतील नोंदबुकांतील गुणांक यांची बेरीज करून त्यांवरून त्यांची योग्यता ठरवावी.

याप्रमाणें ओनाम्याच्या शाळांतील शिक्षक तयार होतील. तसेंच दुय्यम शाळांच्या देशभाषाशाखेचे शिक्षकही तयार करतां येतील. शाळांतील शिक्षक होऊं पहाणारे उमेदवार दुय्यम शाळांच्या देशभाषी शाखेंतील सर्व अभ्यासक्रम पुरा करून आले पाहिजेत. तसा त्यांचा अभ्यासक्रम पुरा झाल्याबद्दल शाळेच्या मुख्याचा दाखला त्यांनीं आणिला पाहिजे. या शिक्षकांच्या तयारींत विषय—वांटणी साधली पाहिजे. प्रत्येकास सगळेच विषय शिकवितां यावे अशी अपेक्षा ठेवूं नये. मीं सुचविलेल्या पांच सहा प्रकारांपैकीं उमेदवार ज्या प्रकारच्या शाळांत शिक्षक होणार असेल त्याकरितांच त्यास

तयार करावे. दुय्यम शाळांतील सामान्य शिक्षणाच्या वर्गांकरितां शिक्षक निराळे, आणि वरच्या विशिष्ट विषयांची वांटणी झाल्यावरच्या वर्गांकरितां शिक्षक निराळे तयार करावे. खालच्या तीन वर्गांचे शिक्षक प्राथमिक शिक्षकांप्रमाणेंच दुय्यम शाळांच्या मुख्य शिक्षकांनीं तयार करावे किंवा मोठ्या ट्रेनिंग कॉलेजांतही त्यांचे वर्ग असावे. येथें उमेद्वार दुय्यम शिक्षणाचा चार पांच वर्षांचा क्रम आटपून आलेले असतात. ते माझ्या सूचनेप्रमाणें शिकून आलेले असल्यास देशभाषांच्या वाङ्मयाशीं, सामान्य इतिहास—भूगोलाशीं, अंकगणित—बीजगणित—भूमितीच्या मूलतत्त्वांशीं, व्यावहारिक किंवा औपपत्तिक शास्त्रकलांपैकीं एकदोहींशीं त्यांचा परिचय झालेला असेल. त्यांस फक्त शिक्षणपद्धतीचें ज्ञान देणें अवश्य राहील. सर्व विषयांत त्यांची गति झालेली असते. शिक्षक झाल्यावर जो विषय त्यांस शिकवावा लागेल त्याचा विशेष व्यासंग त्यांस दुसऱ्याच्या मदतीवांचून यापुढें करतां येईल. तेव्हां तो विषय पुनः त्यांस शिकविण्याची किंवा त्यांस चालते बोलते सर्वसंग्रह बनविण्याची जरूर नाहीं. शेतकीची माहितीही त्यांस, वैद्यकीही त्यांसच, सुतारकाम, लोहारकाम वगैरे हातकामेंही त्यांसच शिकविण्याची हांव ट्रेनिंग कालेजांनीं धरूं नये. जे विषय तो दुय्यम शाळांत शिकला असेल, त्यांची उपपत्ति आणि अकरापासून सोळा, सतरा वर्षांचे मुलांस वागविण्याची रीत, त्यांच्या मानसिक शक्तींच्या वाढीचें प्रमाण, त्यांचे स्वभाव, त्यांचें आचरण, विषय सांगण्याच्या पद्धती, लहान मुलें आणि मोठीं मुलें यांस शिकविण्याच्या प्रकारांत फरक कां, कसा व किती करावा वगैरे शिक्षकासच अवश्य गोष्टी; प्राथमिक व दुय्यम शिक्षणांचा परस्पर संबंध आणि इतर देशांतील शिक्षणविषयक चळवळी, त्यांचीं फळें, इतिहास, हिंदुस्थानांतील शिक्षणप्रयत्न, नडी व गरजा आणि त्या भागविण्याचे मार्ग वगैरेंचें ज्ञान; या दोहोंस या शिक्षकांच्या शिक्षणांत अग्रस्थान मिळालें पाहिजे. यांस आठवड्यांतून दोन तीन तास हव्या त्या प्रश्नांचा निकाल करून घेण्यास द्यावे, आणि रोज दोन तीन तास तरी प्रत्यक्ष शिकवून पहाण्याकरितां ठेवावे. यांच्या पाठीमागें इतर ज्ञानविषयांचें—पदार्थ विज्ञानादि अभ्यासांचें—लफडें नसलें म्हणजे यांस निवळ शिक्षणाकडेच लक्ष देण्यास संधि मिळेल, आणि शिक्षणविषयक वाङ्मय वाचून टाकण्यास सांपडेल. या उमेद्वारांस इंग्रजी समजत असलेलें चांगलें. आणि तें त्यांस समजत असेलही. कारण माझ्या दुय्यम शाळांत इंग्रजीचें समजण्यापुरतें ज्ञान सर्वांसच मिळवायाचें आहे. तसें नसलें तरीही हरकत नाहीं. कारण हे शिक्षक इंग्रजी शाखेच्या दुय्यम शाळाकरितां नव्हत. यांस एक वर्षाचें ट्रेनिंग पुष्कळ होईल.

माझ्या योजनेप्रमाणें शिकून न येतां सध्याची सातवी यत्ताच पास होऊन उमेदवार आले असल्यास यांच्या दोन तीन निराळ्या शाखा कराव्या. शास्त्रीय शिक्षण म्हणून द्यावयाच्या वस्तुपाठाकरितां, शेतकीकरितां आणि हातकामाकरितां निरनिराळे शिक्षक तयार करावे. भाषा—इतिहास—भूगोल—गणित वगैरे नित्याचे विषय शिकविणारे निराळे ठेवावे. म्हणजे आज जी सर्व उमेद्वारांस सर्वच विषयांची नवी तयारी करावी लागते ती करावी लागणार नाहीं. आणि एकना धड भाराभर चिंध्या त्यांस गाठोड्यांत बांधून व्याव्या लागतात त्या लागणार नाहींत. दुय्यम शाळांत निरनिराळ्या विषयांस निरनिराळे शिक्षकच

असावे हें बरें; तथापि शेतकी, हातकाम, शास्त्रपाठ हे विषय वेगळे काढिल्यानेंही बरेंच काम होईल. असें केल्यावर सामान्य विषयांच्या शिक्षकांस दुय्यम शाळांत त्यांस शिकावे लागलेल्या आणि शिकवावे लागणाऱ्या अभ्यासांची उपपत्ति आणि शिक्षणशास्त्र, शिक्षणपद्धति, मुलांचें मानसशास्त्र, नीतिशिक्षणाचीं तत्त्वें, देशीविदेशी शिक्षणविषयक चळवळी, दुय्यम शिक्षणानें साधावयाचा हेतु आणि प्रसिद्ध शिक्षणसुधारकांचीं चरित्रें, अनुभव व त्यांचा आपणास उपयोग हे विषय शिकवावे. रोज दोन तास तरी शिकवून पहाण्यास द्यावे. प्रॅक्टिसिंग स्कुलांत हवीं तितकीं मुलें नसल्यास शहरांतील इतर दुय्यम शाळांच्या मुख्य शिक्षकांकडे उमेदवारांस त्या त्या तासास पाठवून तेथें त्यांस शिकविण्याचा अनुभव घेऊं द्यावा. त्यांच्या शिकविण्यासंबंधानें त्यांच्याबरोबर गेलेल्या ट्रेनिंगांतील अधिकाऱ्याकडून व त्या शाळेच्या मुख्याकडून अभिप्राय आणवावे. याप्रमाणें उमेदवारांस पुढें जें करावयाचें तेंच कसें करावें तें सांगण्यांत आणि त्यांचेकडून तें वठविण्यांतच ट्रेनिंग कालेजांतील काळाचा बराच भाग गेला पाहिजे. अशा उमेदवारांस बरोबर घेऊन ट्रेनिंग कालेजाच्या अधिकाऱ्यांनीं शिक्षणाविषयीं प्रख्यात असलेल्या शाळा पहाण्यास गेलें पाहिजे. तेथील शिक्षणाची पद्धति पाहून तीविषयीं टीकात्मक——अभिप्रायात्मक——टिपणें उमेदवारांस काढावयास लाविलीं पाहिजेत व त्यांचा सगळ्यांनीं मिळून मित्रभावानें खल केला पाहिजे. शिक्षणाचीं उपकरणें येथच्या येथें कल्पनेनें नवीं नवीं तयार करण्याकडे आणि विषय सांगण्याच्या नव्या नव्या—सोप्या सोप्या रीती शोधून काढण्याकडे उमेदवारांचें लक्ष वेधलें पाहिजे. शिक्षणासंबंधाची चालू तारखेपर्यंतची माहिती गोळा करण्याचा त्यांस नाद लाविला पाहिजे.

वस्तुपाठ किंवा शास्त्रपाठ, शेतकी, हातकाम वगैरेकरितां निराळे शिक्षक तयार करावे; पण त्यांसही शिक्षणाच्या तत्त्वांच्या उपपत्तीची, मुलांच्या मानसशास्त्राची आणि शिक्षापद्धतीची माहिती दिलीच पाहिजे. त्यांचे विशेष विषय त्यांना शिकवितांनाही ते शिकवावे कसे यावरच विशेष कटाक्ष ठेविला पाहिजे. द्यावयाच्या धड्यांत संगती कशी ठेवावी, एकांतून दुसरें, दुसऱ्यांतून तिसरें तत्त्व कसें काढावें, शास्त्रीय दृष्टि कशी जागृत करावी, विशेषापासून निघणारे सामान्य सिद्धान्त कसे काढावे, ते काढतांना किती सावधगिरी ठेवावी वगैरे गोष्टी त्यांना नीट समजूं द्याव्या. महाग उपकरणांचे अभावीं साध्या व्यवहारांतल्या पदार्थांचें पाठापुरतें उपकरण तयार कसें करावें, हें या शिक्षकांस अवश्य समजलें पाहिजे. शेतकीच्या व हातकामाच्या उमेदवारांचा त्या त्या विषयांचा अभ्यास दुय्यम शाळांत झाल्यावरच त्यांस ट्रेनिंगांत घ्यावें, ह्मणजे त्यांस शिकविण्याच्या उपपत्ती—पद्धतीशिवाय कांहीं नवें तयार करावें लागणार नाहीं. याप्रमाणें दुय्यम शाळांच्या देशभाषी शाखांतील शिक्षक एकेका वर्षांत तयार करतां येतील. दुय्यम शाळांनींच हे शिक्षक तयार करण्याचे वर्ग चालविल्यास खर्च थोडा लागून काम अधिक व कदाचित् चांगलेंही होईल.

दुय्यम शाळांच्या विद्यापीठी बाजूकरितां मात्र तयार करावयाचे शिक्षक इंग्रजींत निष्णात पाहिजेत. आणि यांच्याकरितां मुंबईस निघणार आहे असलीं कॉलेजें निघालीं पाहिजेत. यांतही उमेदवारांचे अखेरचे दाखले अखेरच्या एक दिवशी परीक्षेवरून देऊं नयेत. त्यांच्या रोजच्या प्रगतीची, दिलेल्या पाठांची आणि ऐकलेल्या व्याख्या-

नांची नोंद ठेवावी. अखेरीस मानसशास्त्रांत, शिक्षणशास्त्रांत आणि शिक्षणपद्धतींत लेखी परीक्षा बाहेरच्या माणसांकडून घ्यावी. शिकविण्याची परीक्षा, शिक्षणावर विचार केलेल्या आणि शिकविण्याच्या हातोटीविषयीं प्रख्यात असणाऱ्या माणसांकडून घ्यावी. आणि कालेजांतील नोंद व या परीक्षांचा निकाल या दोहोंवरून उमेदवाराची योग्यता ठरवावी. हल्लीं ही शिकविण्याची परीक्षा इन्स्पेक्टराच्या एकट्याच्याकडे असते व त्यामुळें तिचा निकाल दिलेल्या पाठाच्या गुणावगुणापेक्षां इन्स्पेक्टराच्या व्यक्तिधर्माप्रमाणें होण्यास जागा राहते.

## खाजगी ट्रेनिंग कॉलेजें निघालीं पाहिजेत.

३७ आज राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करणारांनीं आमच्या नवीन पिढीचे शिक्षक सशास्त्र तयार करण्याचीही व्यवस्था करणें अवश्य आहे. आज खाजगी शाळांस ट्रेन्ड शिक्षक मिळणें कठिण असतें. याचें कारण सरकारी ट्रेनिंग कॉलेजें सरकारच्या जरूरीपुरतेही ट्रेन्ड शिक्षक तयार करण्यास पुरत नाहींत. खाजगी शाळांच्या चालकांस आजपर्यंत ट्रेन्ड शिक्षकांची अवश्यकता वाटली नाहीं खरी; पण आतां ती वाटणार. त्यांनीं आज मागितल्यासही त्यांना ‘ तयार ’ शिक्षक मिळणें मुष्किलीचें असतें. शिक्षण शास्त्रशुद्ध व्हावयाकरितां चांगले तयार झालेले शिक्षक अवश्य आहेत, व तसे शिक्षक सरकारी ट्रेनिंग कॉलेजांतून मिळणें जर कठिण पडलें, तर लोकांनीं स्वतंत्र ट्रेनिंग कॉलेजें स्थापणें अवश्य आहे. सरकारी ट्रेनिंग कॉलेजें व खाजगी ट्रेनिंग कॉलेजें यांनीं एकमेकांच्या सलोख्यानें काम चालविल्यास शिक्षणाच्या प्रगतीस फार फायदा होईल. शिक्षक तयार करणें हें प्राथमिक व दुय्यम प्रतीच्या शाळा आज यशस्वीपणें चालविणारास कठिण नाहीं. या कामाकरितां जिल्ह्यांतील किंवा प्रांतांतील खाजगी शाळांनीं एक विचार करून कोठें तरी मध्यवस्तीच्या ठिकाणीं आपले शिक्षक नवीन पद्धतीनें तयार करून घेण्याची व्यवस्था केल्यास त्या शाळांच्या नित्यकर्मांची यथासांगता आणि फलप्रदता अनेक पटीनें वाढेल यांत शंका नाहीं. आणि सरकारासही ‘ ट्रेन्ड ’ शिक्षकांची मागणी पुरविण्याचें संकट पडणार नाहीं. हळू हळू खाजगी शाळांची ग्रँट शाळांतील शिक्षकांच्या शिक्षणविषयक गुणवत्तेप्रमाणें फिरूं लागेल यांत संशय नाहीं. आज शिक्षकांची विद्यापीठी विद्वत्ता किंवा सामान्य परीक्षा पुरेशी ठरते; परंतु बंगालच्या लोकांनीं नीतिशिक्षणासंबंधानें सरकारास केलेल्या अर्जाला उत्तर म्हणून काढिलेल्या सरकारी ठरावावरून सरकाराचें धोरण या बाबतींत हळू हळू अधिक कडक होण्याचें दिसत आहे. तरुण मुलांस शिकविणाऱ्या शाळांत शिकविणारे शिक्षक शिक्षणशास्त्र व शिक्षणपद्धति शिकून तयार झालेले पाहिजेत असें सरकारानें म्हटल्यास त्यांत शास्त्रदृष्ट्या गैर कांहीं नाहीं. कांहीं दिवसांनीं सरकार तसें म्हणणार असें वाटतें. सरकारानें तसें म्हणूं लागण्यापूर्वीं लोकांनीं आपली जबाबदारी ओळखावी व खाजगी शाळांतील शिक्षकांकरितां निराळीं ट्रेनिंग कॉलेजें काढावीं हें इष्ट आहे. तेथील अभ्यासक्रम शिक्षणविषयक सामान्य तत्त्वें, व एतद्देशीय शिक्षणाचे गुणदोष लक्षांत बाळगून ठरवावा आणि सरकाराशीं सलोखा ठेवून सरकार व लोक यांच्या संगनमतानें तीं चालवावीं. यानें सरकारावरचें ओझें कमी होईल आणि लोकांचा कार्यभाग लोकांनीं उचलल्यासारखें होईल. या ट्रेनिंग कॉलेजांचा अ-

भ्यासक्रम मीं वर सांगितल्या प्रकारचाच असावा.

## सरकारी, खाजगी शाळा आणि सरकार.

एकंदर लोक शिक्षणाची सुधारणा करण्याकरितां खासगी शाळांसही ' ट्रेन्ड ' किंवा 'एवंगुण विशिष्ट' शिक्षक नेमणें भाग व्हावें हें तत्त्वतः बरोबर आहे. परंतु व्यवहाराला हें पुष्कळ वाटांनीं नडणार आहे. हिंदुस्थानांतील खाजगी शाळा येथील लोकांप्रमाणें दरिद्री आहेत—असणार. अशा स्थितींत ' गुणविशिष्ट ' शिक्षकांचें दुट्टें त्यांचेमागें लागल्यास त्यांना जीव धरून रहाण्याची पंचाईत होणार आहे. आजच खाजगी शाळा, सरकारी शाळा व सरकार यांचेमधील संबंध असावा तितका निर्दोष नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांच्या वागण्यावरून पुष्कळदां वाटतें कीं, खाजगी शाळांवर सरकाराचा असावा तितका विश्वास नाहीं, त्यामुळें त्यांस आपल्या कह्यांत ठेवण्यास सरकार उत्तरोत्तर अधिक निकराचे प्रयत्न करीत आहे. माझ्या मतें येथें जरा चूक होत आहे. बुजलेल्या शिंगराप्रमाणें सरकारानें राजकीय वातावरणांतील कित्येक क्षणिक खळबळींस भिऊन जाऊन शिक्षणाचें कायमचें धोरण बदलणें चांगलें नव्हे. घोडा उधळला किंवा बुजला म्हणजे त्याचा लगाम ताणून धरणें आणि त्यास मारहाण करणें जसें शहाणपणाचें नव्हे, तसेंच येथें आहे. कांहीं गोष्टी अत्यंत अनिष्ट अशा घडल्याबरोबर त्यांचा संबंध जेथें तेथें लावून मनाची समता आणि निश्चळता ढळूं देणें बरें नव्हे. शिक्षणाचें धोरण लोकांची दृष्टि आणि सरकारी दृष्टि यांचा मेळ घालूनच नेहमीं ठरविलें पाहिजे. याकरितां लोकांची दृष्टि सरकारास कळण्याचा मार्ग सरकारनें बंद करतां नये. खासगी शाळा या शिक्षणाचे कामांत समंजस लोकांची दृष्टि दाखविणाऱ्या राहूं दिल्या पाहिजेत; त्यांस ' सरकारी ' फर्म्यांत ओढूं नये. तसें केल्यास शिक्षणासंबंधी लोकांस हवें काय-नको कोणतें हें सरकारास कळण्याचा मार्ग उरत नाहीं ! खाजगी शाळा लोकांच्या दृष्टीच्या द्योतक, व सरकारी शाळा सरकारी दृष्टीच्या द्योतक व्हाव्या. खाजगी शाळांवर सरकारी देखरेख सामान्य शिस्तीपुरती रहावी. खाजगी शाळांतील उपकरणें, शिक्षकांची योग्यता आणि शाळागृहाची शिक्षणानुरूपता या गोष्टींसंबंधानें कडक होण्यास आज सरकारास असावा तितका अधिकार नाहीं. खुद्द सरकारच या बाबतींत पुष्कळ ठिकाणीं दोषी ठरण्यासारखें आहे. सरकारी शाळांसही सर्वांसच वरील बाबतींत अवश्य तितकी सर्वांगता प्राप्त झाली आहे असें ह्मणतां येणार नाहीं. तुडुंब भरून वाहून चाललेल्या तिजोरीचे मालक सरकार ! त्यांनाही जी गोष्ट अजून हवी तशी करतां आली नाहीं ती खाजगी शाळांस—अर्ध पोटीं राहणाऱ्या खाजगी शाळांस कशी करतां यावी ? ' तशी नाहीं करतां येत तर त्यांनीं जिवंतच राहूं नये. राहावें तर उत्तम—सर्वांगसुंदर व्हावें. नाहीं तर मरून जावें ' असलें कडक व्रत त्यांचे संबंधानेंच तेवढें बाळगण्याचें कारण नाहीं. खाजगी शाळा व सरकार यांतील संबंध अधिक सरळ, परस्परांस अधिक फायदेशीर आणि शिक्षणाचे प्रगतीस अधिक हितकर होण्यास चार पांच गोष्टी अवश्य आहेत. सरकाराचे बाजूनें ( १ ) खासगी शाळांशीं सहानुभूति हवी; त्यांच्या अडचणी, नडी आणि उणिवा पितृवात्सल्यानें पहाण्याची आणि त्या दूर करण्यास त्याच भावानें हातभार लावण्याची बुद्धि हवी. ( २ ) खासगी शाळा हें सरकारी धोरणास विघ्न नसून, लोकशिक्ष-

णाचें सरकाराचें काम लवकर आणि मोठ्या प्रमाणावर होण्याकरितां सरकारास मदत करण्याचे लोकांचे प्रयत्न आहेत, यांत लोक पर्यायानें सरकारास लोकशिक्षणाप्रीत्यर्थ तितका निराळा करभार देत आहेत, हें सरकारानें कृतज्ञबुद्धीनें लक्षांत बाळगलें पाहिजे. ( ३ ) खासगी शाळांतील शिक्षक आणि सरकारी शाळांतील शिक्षक यांची अदलाबदल होणें शक्य झालें पाहिजे.(४)त्याकरितां खासगी शाळांस ग्रँट देण्याचे बाबतींत आज असलेले नियम थोडेसे बदलले पाहिजेत. खासगी शाळांतील शिक्षकांस सरकारानें त्यांच्या पगाराचा दुसरा किंवा तिसरा हिस्सा अधिक दिला पाहिजे. यायोगें खासगी शाळांतील शिक्षकांची योग्यता वाढेल. आणि 'शिक्षणगुणविशिष्ट' शिक्षक खासगी शाळांनीं नेमलेच पाहिजेत असें सरकारास जोरानें म्हणतां येईल ( ५ ) एकंदर शिक्षणावर देखरेख ठेवण्याचें काम निव्वळ सरकारी अधिकाऱ्यांवर व तेंही परदेशाहून आणिलेल्या अधिकाऱ्यांवर न ठेवतां, सरकाराचें विद्याखातें, आणि खासगी शिक्षणसंस्थांचे पंच यांचेकडे समानाधिकारानें सोंपविलें पाहिजे. आज सरकारी विद्याखात्यास दिल्या भाकरीच्या मिंध्या सल्लामसलतीशिवाय इतर स्वतंत्र मंत्र मिळणें कठिण असतें. उलट लोकांसही आपले शिक्षणात्मक विचार मनांतले मनांत कुजत ठेवावे लागतात. त्यांचा ठिकठिकाणचें शिक्षणधोरण ठरविण्यांत आणि तें अंमलांत आणण्यांत वरील रीतीनें—अधिकारानें उपयोग झाल्यास शिक्षणाचे बाबतींत सरकार व लोक यांचेमध्यें लढा उत्पन्न होणार नाहीं. आणि सरकाराचे हेतूंविषयीं लोकांस, व लोकांचे हेतूंविषयीं सरकारास नेहमीं कुतर्क काढीत व संशय घेत बसावें लागणार नाहीं. ( ६ ) खासगी शाळांस अभ्यासक्रम आणि पुस्तकें आपापलीं ठरविण्याची हल्लींपेक्षां अधिक उदारपणाची मोकळीक देण्याची इच्छा हवी.

लोकांचे बाजूनें ( १ ) लोकशिक्षणाच्या प्रश्नाचा शांतपणानें आणि जबाबदारी ओळखून विचार व्हावयास हवा. ( २ ) लोकशिक्षण हवें तसें फलदायी करण्याचे कामीं सरकारास मदत करण्याची तयारी हवी. ( ३ ) खाजगी संस्थांनीं खाजगीपणाचा भलताच फायदा घेऊन सामान्य शिस्त ढिली आणि शिक्षणाचे हेतू अवनत होऊं देतां कामा नयेत. ( ४ ) सरकाराशीं भांडत बसण्यापेक्षां सामोपचारानें तडजोड कराायाची बुद्धि हवी. ( ५ ) आपलें काम उत्तरोत्तर अधिक शास्त्रशुद्ध आणि जास्त कसोशीनें करण्याची खटपट हवी. ( ६ ) अहमहमिकेपेक्षां-स्पर्धेपेक्षां-हेव्यापेक्षां एकोपा आणि सामान्यहितबुद्धि जागरूक हवी. ( ७ ) वागणुकींत अधिक सरळपणा आणि अधिक प्रामाणिकपणा हवा.

याप्रमाणें सरकार व लोक या उभयपक्षीं दे-घेवृत्ती राहिल्यानें एकंदरींत दोन्ही पक्षांचें हित आहे असें मला वाटतें. हल्लींची स्थिति दोघांसही बरी नाहीं. आज खाजगी संस्थांचे अधिकाधिक हातपाय जखडण्याची सरकारास बुद्धि झाल्यासारखी दिसते. दुसरीकडे खाजगी शाळाही नेभळ्या आणि शिस्त वगैरे संबंधानें बऱ्याच ढिल्या आहेत. दोघांनींही आपल्यांतील दोष आणि वांकडेपणा टाकून एकमेकांस सहाय व्हावें हें इष्ट आहे. सरकारानेंच या बाबतींत पुढाकार घेतला पाहिजे. हिंदी खाजगी शाळा या हिंदी बायकांप्रमाणें चेपल्या-चोपल्या म्हणजे मूग गिळून बसणाऱ्या आणि भिऱ्या व सांगकाम्या होतात. त्यांना कोणत्याच कामांत मग स्वतःच्या हिंमतीवर पुढाकार घेववत नाहीं.

## इन्स्पेक्टरांची परीक्षा असावी.

३८. येथपर्यंत शिक्षणक्रमासंबंधानें—शाळांसंबंधानें, आणि शिक्षकांसंबंधानें ज्या सूचना केल्या त्या मान्य असूनही पुष्कळ लोक म्हणतात त्यांपैकीं बऱ्याच फुकट जातात. इन्स्पेक्टरांच्या कलाप्रमाणें आणि मर्जीप्रमाणें सर्व शिकवावें लागतें, त्यामुळें मनांत असलें तरी जनांत तसें वठवितां येत नाहीं अशी बऱ्याच शिक्षकांची तक्रार आहे. खुद्द ट्रेनिंग कॉलेजांत सुद्धां परीक्षा जिल्ह्या-जिल्ह्याच्या डेप्युटीकडे असल्यामुळें कॉलेजांतील शिक्षणापेक्षां पूर्वींचीं टिपणें, आजपर्यंतचे प्रश्न, डेप्युटींचे कल आणि आवडी निवडी यांकडे ट्रेनिंगांतील उमेदवारांचें लक्ष असतें, असें म्हणतात. आणि तसें असणें संभवनीय आहे. या सगळ्यांत चूक होते ती अशी. सरकाराला शिक्षणाच्या नव्या पद्धती, नवे प्रकार सुरू करावयाचे आहेत. त्याप्रमाणें त्यानें ट्रेनिंग कॉलेजांत कांहीं कांहीं सुधारणा केल्याही आहेत. पण सरकाराचें विचारखातें जुन्या अधिकाऱ्यांचेंच बनलेलें आहे. यांना नव्या पद्धती आणि नवीन सुधारणा यांचा शांतपणें विचार आणि अभ्यास करण्याची इच्छा नसते, किंवा त्यांच्या समजुती-त्यांचीं मतें-त्यांची दृष्टि, जून झाडाप्रमाणें बनलेल्या—लोखंडाप्रमाणें बळकट बनलेल्या असतात; त्यांच्या मनाचे दरवाजे लागलेले असतात; नवे चष्मे त्यांस लागत नाहींत. त्यामुळें त्यांची इन्स्पेक्शन जुन्या तऱ्हेचीच होते. इतिहासांत तारखा फारशा शिकवूं नयेत असें शिक्षकांच्या सूचना सांगणार, तर इन्स्पेक्टर साहेब तारखाच विचारणार; वस्तुपाठ—बालोद्यान वगैरे मुलांच्या ज्ञानेंद्रियाची शक्ति वाढविण्याकरितां शिक्षणाच्या नव्या पद्धति आहेत—नवे विषय नव्हेत. त्या मुलांच्या मगदुराप्रमाणें आणि जरूरीप्रमाणें शिक्षकानें अनुभवून पहावयाच्या आहेत. आमचे इन्स्पेक्टर 'वस्तुपाठ' हें एक शिक्षणाचें सदर करून इतिहास—भूगोलाप्रमाणें त्यांतील प्रश्नोत्तरांस गुणांक देतात. 'या पेटींत काय आहे?' या प्रश्नाचें उत्तर नेहमींच्या माहितीमुळें 'कांहीं नाहीं' असें मुलानें दिलें कीं, मुलगा 'वस्तुपाठांत' नापास व त्याचेबरोबर त्याचा शिक्षकही. 'उघडल्याशिवाय कसें दिसेल?' हेंच उत्तर त्या प्रश्नास मिळालें कीं, मुलगा व शिक्षक दोघेही हुशार! सात आठ वर्षांच्या मुलांस शब्दांस—प्रतिशब्द न विचारतां त्यांस वाचलेल्याचा गोळाबेरीज अर्थ कळतो कीं नाहीं हें पहावयाचें नवीन पद्धतीस अनुरूप आहे. पण आज इन्स्पेक्टर साहेबांचें तेवढ्यानें समाधान होत नाहीं. वारा, पाऊस, यांसही प्रतिशब्द मुलांनीं सांगावे असें त्यांस वाटतें. एका शब्दाचा अर्थ एकाच शब्दानें सांगतां आला पाहिजे असाही त्यांचा हट्ट असतो. अक्षराच्या पुस्त्यांसंबंधानें तर इन्स्पेक्टर कमालच करतात. मुलांचें लिहिणें पहावयाचे ऐवजीं लांगमनचे कित्ते त्यांनीं किती खपविले हें पहाण्याचीच त्यांना फार हौस असते! लांगमनच्या कित्त्यांनीं मुलांचें अक्षर—विशेष चांगलें होतें असें म्हणावयास मला तर कारण दिसत नाहीं. त्यांनीं मोडी अक्षर महाग मात्र केलें आहे खास. इन्स्पेक्टर जुनेच असल्यामुळें शिक्षकांचा आणि शिक्षणपद्धतीचा निरुपाय होतो, हें कांहीं अंशीं खरें आहे. आणि म्हणूनच मला वाटतें सरकारानें इन्स्पेक्टर नेमण्याचे कामीं थोडीशी अधिक काळजी घेणें जरूर आहे. असिस्टंट डेप्युटी, आणि डेप्युटी इन्स्पेक्टर यांस जागा हल्लीं चढती प्रमाणें मिळतात. त्या तशा न मिळतां योग्यतेप्रमाणें मिळाव्या. इन्स्पेक्टरांच्याही परीक्षा असाव्या.

शिक्षकांस ज्याप्रमाणें शिक्षण पाहिजे त्याप्रमाणें इन्स्पेक्टरांसही पाहिजे. निदान वाटेल त्यांस निरनिराळ्या कारणांनीं इन्स्पेक्टर होतां येणें इष्ट नाहीं. इन्स्पेक्टरांस इन्स्पेक्शन, एक्झॅमिनेशन यांतील फरकच पुष्कळदां कळत नसतो. इन्स्पेक्टरांचा अधिकारही हल्लीं विनाकारण वाढलेला आहे. शाळांच्या नियमनाचें काम त्यांचें झालें आहे. वस्तुतः शाळांस मंत्र—मसलत देण्याचेंच त्यांचें काम असलें पाहिजे. कसेंही झालें तरी त्यांस शिक्षणपद्धति, शिक्षणशास्त्र, शिक्षाप्रकार व शाळांची तपासणी या विषयांत परीक्षा द्यावी लागावी. त्या शिवाय त्यांस इन्स्पेक्टर नेमूं नये हें इष्ट आहे. या व इतर देशांतील शिक्षणविषयक चळवळींचें चालू तारखेपर्यंतचें ज्ञान त्यांस असलें पाहिजे. आणि हीं माणसें राजनीति-राजकारणापेक्षां, शिक्षणाचें हिताहित पहाणारींच असलीं पाहिजेत. त्यांना स्वतःच शिकविण्याची कला उत्तम अवगत असली पाहिजे. हल्लीं आमचे इन्स्पेक्टर विलायतेहून येऊन दोन दिवस शिक्षकाचें काम केलें न केलें तोंच बनलेले असतात. हे देशी लोकांत वागणारे मिसळणारे नसतात. त्यामुळें त्यांना या देशाच्या शिक्षणविषयक अडचणी समजतच नाहींत. त्यांना खात्याचा नियम समजतो आणि वरचें धोरण समजतें. पण देशाची परिस्थिति—उणीवा—गरजा वगैरे समजत नाहींत. शिक्षणक्रमांत कोठें अडचणी आहेत, कोठे कोठें खाच खळगे आहेत वगैरे गोष्टींचें यथार्थज्ञान त्यांस होतच नाहीं ह्मटलें तरी चालेल. नाहीं तर सर्व विषय परकी भाषेंत शिकविण्याची पद्धत त्यांनीं तेव्हांच बंद करून टाकिली असती. ते स्वतः इंग्रजींतून शिकलेले असतात. येथेंही इंग्रजींत शिकवितात. पण येथें इंग्रजी ही जन्मभाषा नाहीं, शिक्षणाचें वाहन परकी आहे हा शिक्षणांतला मोठा दोष त्यांच्या लक्षांत येत नाहीं. ते देशी लोकांत देशी लोकांप्रमाणें मिसळत नाहींत. शिक्षणासंबंधीं प्रत्यक्ष अनुभवानें मुलांस व मुलांच्या पालकांस काय वाटतें हें त्यांना कळत नाहीं. त्यामुळें शिक्षणप्रश्नावर त्यांचे अभिप्राय फारसे महत्त्वाचे नसतात. आमच्या मुलांच्या, शिक्षकांच्या आणि लोकांच्या नीतिविषयीं—व्यवहाराच्या सरळपणाविषयीं त्यांना खात्री नसते. एकंदरींत हल्लींचे इन्स्पेक्टर असावे तसे नसतात. त्यांस, वरपासून खालपर्यंत सर्वांस, त्यांच्या विषयांत कमीं अधिक कठिण परीक्षा द्याव्या लागाव्या हें इष्ट आहे. त्या परीक्षेंत इकडील व इतर देशांतील शिक्षण पद्धतीची तुलना हा एक विषय असावा.

इन्स्पेक्टरांसंबंधानें दुसरी सूचना करावयाची आहे. आज शाळांत ज्याप्रमाणें एक मास्तरास पुष्कळ मुलें संभाळावीं लागतात आणि मुलांकडे व्यक्तिशः लक्ष देतां येत नाहीं त्याप्रमाणें असिस्टंट डेप्युटी आणि डेप्युटी इन्स्पेक्टरांचें झालें आहे. त्यांस काम फार असतें. त्यामुळें त्यांस शिक्षणविषयाचेंही वाचन ठेवतां येत नाहीं; माझें या बाबतींत कांहीं डेप्युटी व असिस्टंट डेप्युटींशीं भाषण झालें आहे. त्यांचा आवडता विषय कोणता—आणि व्यासंग कोणत्या विषयाचा आहे असें विचारतां त्यांनीं मला स्पष्ट सांगितलें कीं आपणास काम इतकें असतें कीं वाचावयास किंवा व्यासंगास वेळच मिळत नाहीं. असें असल्यावर यांस आपल्या ताब्यांतील शाळांस वर्षांतून एकदां धूळभेट देतां देतांच मारामार पडावी, आणि शिक्षकांस सांगण्यासवरण्यास यांस कांहींच सांपडूं नये यांत नवल नाहीं. यास उपाय इन्स्पेक्टरांची, डेप्युटी व असि-

स्टंट डेप्युटींची संख्या आहे, याच्या हळूहळू तिप्पट करणें. या नव्या जागा इन्स्पेक्टरांची परीक्षा दिलेल्या माणसांनींच भराव्या म्हणजे शिक्षणपद्धतीचें स्वरूप इष्ट दिशेनें फिरण्यास उशीर लागणार नाहीं. वर्षांतून पांच सहा वेळां तरी इन्स्पेक्टरांच्या खेपा दर शाळेंत झाल्या पाहिजेत. आणि त्यांस स्वतांस शिक्षणविषयाची उत्तम माहिती जय्यत ठेवतां आली पाहिजे. म्हणजे त्यांचें शिक्षकांवर ज्ञानाधिकारानें वजन पडेल. या इन्स्पेक्टरांतही शास्त्रपाठांकरितां, शेतकीकरितां—हातकामाकरितां वेगळे इन्स्पेक्टर असावे.

शेतकी, हातकामें वगैरेकरितां तालुक्यांतून व खेडेगांवांतून निराळ्या शाळा घालावयास नकोत. हल्लींचा अभ्यासक्रम थोडासा बदलून मुलांचा मानसिकशिक्षणकाळ रोज दोन तासांचा करावा आणि बाकीचे दोन तीन तास शाळेसच जोडून गांवांतील चांगल्या कारागिराचा कारखाना ठेवावा, कसबी शेतकऱ्यांचें शेत असावें व त्यांत त्या त्या मुलांस शागिर्दी करावयास लावावें. म्हणजे थोड्या खर्चांत सरकाराचें दुहेरी काम होईल.

आतांपर्यंत शिक्षण क्रमांतील दोष, शिक्षकांतील दोष आणि ते घालविण्यास काय केलें पाहिजे याचा विचार केला. आतां शिक्षणासंबंधीं कांहीं सामान्य विचार करावयाचा, आणि सुचविलेल्या कार्यक्रमांत सरकारानें उचलावयाचा भाग कोणता—आणि लोकांना किती उरकतां येईल हें सांगावयाचें आहे. शिक्षणासंबंधी आणखी बरेच प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. परंतु ते मी आतां गाळणार आहें. ते सोडवण्यास मला आतां वेळ नाहीं.

३९ वर सुचविलेल्या कार्यक्रमांत लोकांनीं व सरकारानें दोघानीं ही पृथक्पणें उचलायाचा कांहीं भाग आहे आणि कांहीं दोघांनीं मिळून उचलायाचा आहे. ( १ ) प्राथमिक शाळांकरितां आणि बाळशाळांकरितां, बालोद्यान आणि वस्तुपाठ शिकविण्यांत, फ्रोबेलियन पद्धतीनें शिक्षण देण्यांत तयार झालेले शिक्षक येथें एकदम उत्पन्न होत नाहींत—होणार नाहींत; या कामीं सरकारानें कांहीं होतकरू तरुण स्त्री-पुरुषांस हातीं घेऊन त्यांना त्या त्या पद्धतीचें परिशीलन करण्यासाठीं जर्मनी, फ्रान्स, इंग्लंद, अमेरिका, वगैरे देशांत पाठविलें पाहिजे. बाहेरचीं माणसें येथें नवखीं आणून त्यांच्याकडून आमचे शिक्षक तयार करण्यापेक्षां आमचीं माणसें तिकडे पाठवून तिकडे त्या त्या कामांत तयार करून आणिल्यास किती तरी अधिक हित होईल. अमेरिकेंत व इंग्लंडांत बाळशाळा आहेत, बाळांच्या बागा उत्तम आणि पुष्कळ आहेत. फ्रोबेलियन शिक्षण पद्धतीचें ज्ञान देण्यासाठीं आणि प्रसार करण्यासाठीं तेथें स्वतंत्र मंडळ्या व वर्ग आहेत. त्यांचेकडून येथील कांहीं स्त्रीपुरुष तयार करून आणविणें आणि येथील बालोद्यानांस वस्तुपाठांस सार्थ व सजीव करणें सरकारानें कर्तव्य आहे. हें काम सरकाराचे हातूनच व्हावयाचें व तें त्यांनीं केलें पाहिजे. अशा स्त्रीपुरुषांचे हातीं येथील कांहीं शाळा व ट्रेनिंग कॉलेजें देऊन सरकारानें शिक्षणपद्धतीचें आणि शिक्षणकर्माचे आदर्श लोकांपुढें व खाजगी संस्थांपुढें ठेविले पाहिजेत. अशा तऱ्हेचे नमुनेदार शिक्षक आणि नमुनेदार शाळा व कॉलेजें पुरविणें सरकारासच शक्य आहे, व त्यांनींच तें करणें रास्त आहे.

( २ ) प्राथमिक शिक्षण फुकट देण्याचे प्रयत्नही सरकारानेंच केले पाहिजेत. या बा-

बतींत गायकवाड सरकारांनीं आमच्या इंग्रज सरकारास लाजविलें आहे. बडोदेंसरकारनें प्राथमिक शिक्षण फुकट देण्याचा आरंभ केला आहे. आमच्या सरकारानें तो कोठेंही अजून केला नाहीं, तो करणें अवश्य आहे. निदान गरीब लोकांस तरी शिक्षण फुकट मिळालें पाहिजे. मालीवरील कर देण्याची ज्यांची पात्रता नाहीं त्या सर्वांस सरकारानें शिक्षण फुकट देण्यास खेड्यापाड्यांतून आरंभ करावा. हेंही काम सरकारासच करतां येण्यासारखें आहे.

(३) दुय्यम शाळांस जोडावयाच्या व्यावहारिक शाखांत शिकवावयाचे धंद्याचे विषय आणि व्यापारी माहिती, इतर देशांतील उद्योग व त्यांचे इतिहास; प्रयोगाचीं उपकरणें आणि द्रव्यें; हीं सर्व सरकारानें पुरविलीं पाहिजेत. निदान तीं उपलब्ध आणि सुलभ करणें तरी सरकारानेंच पत्करलें पाहिजे.

सारांश जेथें जेथें विशेष खर्च हवा असेल आणि परराष्ट्रीय माहिती लागेल तेथें तेथें सरकारानें पुढाकार घेऊन लोक शिक्षणास मदत केली पाहिजे.

सरकाराचे परकीपणामुळें सरकारास ज्या गोष्टी कळणार नाहींत किंवा करतां येणार नाहींत त्या लोकांनींच केल्या पाहिजे. लोकांच्या धर्मादायाचा बराच भाग सार्वजनिक शिक्षणाकडे वळून, प्राथमिक—दुय्यमशाळा मी म्हणतो तशा, किंवा ठिकठिकाणच्या सोयीस जमतील तशा, काढून सरकारी नमुन्यांतील दोष भरून काढण्याचें आणि शिक्षण हळूहळू 'देशी' करण्याचें काम लोकांचें आहे.बुडणाऱ्या उद्योगधंद्यांचा भाग लावून ते सरकाराच्या नजरेस आणणें आणि त्या त्या धंदेवाल्यांच्या मुलांस ते ते धंदे व सामान्य शिक्षण प्रयास न पडतां देण्याचे प्रयोग लोकांनीं केले पाहिजेत. अमुक गोष्टी हव्या आहेत. व शक्य आहेत हें खाजगी प्रयत्नांनीं—खाजगी शाळांच्या अनुभवांनीं सरकाराच्या नजरेस आणून देणें हें लोकांचें काम आहे. तें त्यांनीं केलें पाहिजे.

४० अलीकडे शिक्षणाचे जे कित्येक प्रश्न लोकांपुढें आले आहेत ते बहुतेक शिक्षक व विद्यार्थी यांच्या परस्पर संबंधाचे आहेत तसेच देशांतील इतर चळवळी व विद्यार्थी यां संबंधानें लोकांत चर्चा होऊं लागली आहे. या संबंधानें मला काय वाटतें तें सांगणें येथें अप्रासंगिक होणार नाहीं असें मला वाटतें. म्हणूनच मी त्याविषयीं कांहीं विचार येथें नमूद करतों. गुरू आणि शिष्य यांचा संबंध किती पवित्र आहे—किती पवित्र असला पाहिजे—शिष्यानें गुरुची सेवा कशी व किती अनन्यभावानें केली पाहिजे—गुरुगृहीं किंवा गुरुच्या ताब्यांत असतांना शिष्याचा धर्म केवळ गुर्वाज्ञा शिरसा वंद्य मानण्यापेक्षां दुसरा नाहीं, इत्यादिसंबंधानें आमच्या इकडील प्राचीन समजुती व नियम आमच्या स्मृतिग्रंथांत गोवलेल्या आहेत. मनुस्मृती—धर्मपथ—गृह्यसूत्रें वगैरे जुन्या ग्रंथांत या विषयांवर स्वतंत्र अध्याय असून त्यांत गुरुची यत्किंचितही अवज्ञा किंवा आज्ञोल्लंघन शिष्यानें केल्यास प्रायश्चित्तें आणि देहदंड सांगितले आहेत. एका परमेश्वरप्राप्तीखेरीज इतर कोणत्याही कामांत गुरूचें वचन उल्लंघिणें म्हणजे मोठें पाप असें सांगितलें आहे. ईश्वरप्राप्तीच्या आडच जेथें गुरू येईल तेथें देवाला चिकटून राहून गुरुजनांची आज्ञा उल्लंघिली असतांही शेवट गोड झाल्याचीं उदाहरणें महाभारतांत आहेत. परंतु त्या एका अपवादाखेरीज बाकी सर्व बाबतींत आणि सर्व आचारधर्मग्रंथांत गुरूची मर्जी संपादणें आणि त्यांनीं कांहीं सांगितलें तरी तें नि-

मूटपणें ऐकणें हाच शिष्यधर्म सांगितला आहे. खुद्द महाभारतांतच गुरूनें कांहींच्या बाहीच शिष्यास सांगावें, आणि शिष्यानें तें सिद्ध करण्यासाठीं वर्षानुवर्ष कष्ट सोसावे अशा कथा थोडया नाहींत. तेव्हां आमची प्राचीन पद्धती पाहिली तर गुरुशिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र असून त्यांत गुरूकडे सर्व अधिकार असून शिष्यांनीं सर्व बाबतींत गुरूच्या तंत्रानें चालावयाचें अशी आहे.

गुरुशिष्यांतील हा प्राचीन संबंध आतां राहिला नाहीं व तसाच तंतोतंत रहावा हें इष्टही नाहीं. आज आह्मी निराळ्या काळांत रहात आहों. आमचें जग बदललें आहे, आणि त्याप्रमाणें आमचे सर्व संबंधही बद. लले आहेत. तथापि अजूनही आमची गुरु- शिष्यांविषयींची कल्पना बदललेली नाहीं. ‘ शाळांस बोर्डिंगें असावीं, आणि तेथें मुलें रात्रंदिवस गुरूच्या ताब्यांत असावीं म्हणजे मुलांवर सर्व बाजूंनीं गुरूची देखरेख रहाते. अशा छात्राश्रमाचा राजा गुरू आणि त्याची प्रजा सर्वस्वी त्याची ताबेदार असते. तेथें गुरूचा शब्द म्हणजे कायदा. तो ताबडतोब अमलांत यावयाचा. नाहींतर शिष्याला रा- ज्यांतून हद्दपार व्हावें लागतें. ’ हीच शिक्ष- णाची दिशा आम्हांस हवी म्हणून आह्मी ओरडत आहों. इंग्लंडांत-अमेरिकेंत असले शिक्षणप्रयत्न झाले व त्यांपैकीं कांहीं चांगले यशस्वी झाले. तथापि तिकडील अनुभव या आश्रम पद्धतीस सर्वांशीं अनुकूल नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. इंग्लंडांत शाळेंत मुलानें हजर न राहण्या- बद्दल स्वतंत्र मॅजिस्ट्रेट किंवा इन्स्पेक्टर जबाबदार असतात, व गैरहजिरीबद्दल मुलां- च्या पालकांस कायद्यानें शिक्षा होते. शि- क्षण आणि शिक्षा या दोहोंची इंग्लंडांत पुष्कळ अंशीं फारकत झाली आहे, आणि जों जों सामान्यजनतेचें शिक्षण वाढत जा- ईल व मुलें स्वभावतः विशेष समजुतदार होत जातील तों तों शिक्षण आणि शिक्षा यांची फारकत होत जाईल व जावीही. तथापि जगाच्या पाठीवर कोठेंही गेलें तरी गुरु आणि शिष्य यांमध्यें गुरूचा अधिकार शिष्यावर चालावा असाच त्यांचा संबंध आहे. मुलगा शाळेंत घालायाचा तेंच मुळीं बापाला त्याचे संबंधाचें कर्तव्य बजाव- ण्यास सवड किंवा योग्यता नसते म्हणूनच घालावयाचा असतो. मुलास वळण लावा- वयाचें जें बापाचें काम तें बापानें गुरूवर सोंपविलें म्हणजे जेवाया खायाला घालून त्याचे करतां खर्च करावयाचें काम बापा- कडे राहिलें आणि बाकीचें ओघानेंच गुरु- कडे गेलें. गुरूनें जें जसें सांगावें तें तसें मुलानें करावें, आणि ज्या वाटेनें जाऊं नये म्हणून सांगितलें असेल त्या वाटेनें मुलानें जाऊं नये हाच योग्य मार्ग आहे. बापाचा अधिकार ज्याप्रमाणें मुलगा स्वतांचा निर्वाह स्वतां करूं लागेपर्यंत—अर्थात मुलगा स्वतांच समाजाचा एक स्वतंत्र अवयव होईपर्यंत गुंडाळून ठेवतां येत नाहीं—ठेवणें बरोबर नाहीं, त्याचप्रमाणें गुरूचा ठेवतां येणार नाहीं—येऊं नये. कांकीं येथें बापानें आपला अधिकार गुरूकडे सोंपविला आहे. पंख फुटून स्वतांला उडतां येइपर्यंत जसें पक्ष्या- च्या पिलांनीं, आईच्या दुधाची जरूर सु- टून स्वतांला भक्ष्य मिळवितां येईपर्यंत जसें पशूच्या पाडसांनीं, तसेंच आईबापाच्या छत्रा बाहेर पडून आपापला मार्ग आपण सुधारूं लागेपर्यंत—किंवा सुधारण्याचें वय होईपर्यंत आणि योग्यता अंगीं येईपर्यंत माणसाच्या मुलांनींही वडिलांच्या आज्ञेत रहावें आणि त्यांच्या धोरणानें चालावें हा निसर्गाचा नियम आहे. मनुष्याच्या ठिकाणीं कार्यांची वांटणी होत असल्यामुळें बापाचा अधिकार, सत्ता, व मान गुरूकडे जातो - इतकेंच,

गुरुशिष्यांचें हें नातें पवित्र आहे. त्याविषयीं अनादर कोणीही कोठेंही व्यक्त करणें व तो मुलांच्या कानीं जाणें वाजवी नाहीं—इष्ट नाहीं. केवळ सुलतानी अरेरावी हल्लींचे शिक्षक करीत नाहींत, करणार नाहींत. केलीच तर मुलांचे पालक शिक्षकांची समजूत घालतात, घालतीलही. मुलांचें काम गुरूंचा अधिकार तागडींत घालून तोलण्याचें खास नाहीं. गुरूंनीं मुलांच्या हिताविषयीं कळकळ बाळगावी, आणि विद्या शिकवावी, तशीच चालरीत, नीति शिकवावी, मुलें आडमार्गांत शिरत असलीं, चुकत असलीं, तर कधीं समजुतीच्या गोष्टी सांगून, कधीं धाक दाखवून, कधीं दंड करून त्यांना वाटेवर आणावें; व या कामीं पालकांनीं त्यांस साहाय्य करावें हेंच उचित होय. गुरूसंबंधानें आपल्याला कमजास्त वाटलें तरी तें पालकांनीं मुलांच्या देखत बोलूं नये, किंवा गुरूंची किंमत मुलांच्या मनांत उतरेल असें कांहींही होऊं देऊं नये. उलट पक्षीं गुरूंनींही आपली पदवी, आपला धर्म, आपला अधिकार यांना कमीपणा येईल असें कांहीं करूं नये, मुलांस योग्य कामांत मदत करावी, आणि त्यांचें कल्याण व्हावें एवढीच आपली इच्छा आहे असें त्यांनीं विद्यार्थ्यांच्या प्रत्ययास आणून द्यावें. मुलें शाळेंत असोत, शाळेबाहेर असोत, त्यांचे वर्तनावर गुरूंची नजर असावी; कारण अमक्या वेळीं मुलांची वाढ सुरू असते—आणि नसते असें थोडेंच आहे. वाईट गोष्टींचा ठसा त्यांचेवर केव्हां उठेल याचा नेम नसतो, म्हणून तीं वाचतात काय, ऐकतात काय, खेळतात कोठें, बसतात—उठतात कोणाबरोबर, संगतींत कोणाच्या असतात, वगैरे सर्व गोष्टींवर गुरूंची नजर पाहिजे. त्यांत जेथें कांहीं वावगें दिसेल तेथें तावडतोब मुलांची कानउघाडणी करून त्यांच्या पालकांच्या साहाय्यानें, वाईटाचा अंकुर वेळींच खुडून टाकिला पाहिजे. 'गुरूचें गुरूपण शाळेपुरतें' ही कायद्याच्या शब्दांची समजूत मुलांच्या मनांत कधींही शिरूं देतां नये. आज आईबाप नेहमीं आपापल्या कामांत चूर असतात अशा वेळीं तर ही घातुक कल्पना पसरूं देतां नये. यानें मुलें स्वैर बनतील. आणि आपलें व इतरांचेंही नुकसान करतील. गुरूंची पूज्यता मुलांच्या मनांत कायम राहील असेंच गुरूंनीं, पालकांनीं, आणि सर्व शहाण्या जबाबदार लोकांनीं वागलें पाहिजे. जे लोक गुरूंच्या पूज्यतेस कमीपणा आणतात, आणि गुरूंच्या अधिकाराची कायदेशीर मर्यादा ठरविण्याचा मुलांना उपदेश करतात ते मुलांचें नुकसान करीत आहेत, नवीन पिढीची नासाडी करीत आहेत आणि देशाची हानी करीत आहेत असें पक्कें समजावें. विचारोच्चाराच्या स्वातंत्र्याचा अभिमान माझ्या इतका कोणास नसेल. मी अमक्या तऱ्हेनेंच विचार करावा असें सांगणाराचें आज मी ऐकणार नाहीं. मी अमकेंच बोलावें आणि अमकेंच बोलूं नये असें सांगण्याचा युक्तिवादाच्या साहाय्याशिवाय कोणाला अधिकार नाहीं. तथापि उच्चार स्वातंत्र्याला युक्तीची थोडी तरी आडकाठी येते. आचारस्वातंत्र्याला तर याहीपेक्षां आडकाठी येते. समाजांत येऊन राहण्याबरोबर आपल्या स्वातंत्र्याचा बराच भाग आपण समाजाला दिला हें स्वतंत्र व्यक्तींनीं सुद्धां लक्षांत ठेवलें पाहिजे. जेथें मूळभूत तत्वाचाच प्रश्न असेल तेथें सत्याची कांस धरून राहण्याचा, निदान आपला पक्ष सत्याचा आहे अशी मनाची पक्की खात्री असल्यावर आपलें आचरण आपल्या तत्त्वास अनुसरून ठेवण्याचा अधिकार समाजाचा स्वतंत्र अवयव बनलेल्या माणसास आहे व असला पाहिजे. परंतु

एरव्हीं सामान्य व्यवहारांत त्याच्या स्वातंत्र्याला किती तरी आळा पडलेला असतो व तो त्याला पत्करावा लागतो. हें देवाणघेवाण आहे. समाजाचा आश्रय करून राहण्यास मिळावें म्हणून कांहीं कांहीं गोष्टींतील स्वतांचें स्वातंत्र्य समाजास विकावें लागतें. या गोष्टी फारशा महत्त्वाच्या नसतात हें खरें. तरी समाजाचा स्वतंत्र अवयव बनलेल्या व्यक्तीसही पुरें आचारस्वातंत्र्य नसतें. मग तें, जीं मुलें अजून समाजांत स्वतंत्रपणें प्रस्थापित झालेलीं नाहींत त्यांना कोठून मिळणार ? आणि तें घेण्याची त्यांनीं हांव तरी कां धरावी ? तशी वेडी हांव त्यांच्यांत उत्पन्न करूं नये, उत्पन्न होऊं देऊं नये. आपला अधिकार ओळखून आपण वागलें पाहिजे, म्हणजे आपण अजून मुलें आहों, दुसऱ्याच्या तंत्रानें वागणारे आहों, आणि आपली समाजांत स्वतंत्र प्रतिष्ठा होईपर्यंत आपण असेच राहिलें पाहिजे हीच शिष्यांची बुद्धि दृढ झाली पाहिजे. त्यांना स्वतंत्रपणें विचार करावयास गुरूच शिकवितात; त्यांस उचित त्या क्रमानें उच्चाराचें स्वातंत्र्यही थोडें थोडें गुरू देतात, आणि तीं जसजशीं मोठीं होतात तसतसें, त्यांच्या त्यांच्या कामापुरतें, आचारस्वातंत्र्यही शहाणे गुरू त्यांस अनुभवूं देतात. परंतु हा गुरूंचा चांगुलपणा आहे, उचितज्ञता आहे. गुरूंनीं तसें केलें नाहीं तरीही शिष्यांस त्यांचेविरुद्ध बंड करायास उत्तेजन देतां नये. समंजस गुरू विनाकारण शिष्यांचा लगाम ताणून धरीत नाहींत, आणि धरणार नाहींत. पण प्रसंगीं त्यांनीं तो तसा धरला तरी शिष्यांनीं तो निमूटपणें सोसला पाहिजे. तो न सोसल्यास उधळलेल्या वारूप्रमाणें त्यांस त्याचें प्रायश्चित्त भोगावें लागलें पाहिजे. ही शाळांतली शिस्त घरच्या कुटुंबांतल्या शिस्तीची निवळ नकल आहे. ती मोडण्यास कोठूनही यत्किंचितही उत्तेजन मिळतां नये. हीच शिस्त निराळ्या स्वरूपानें आणि निराळ्या प्रमाणावर समाजांत व राज्यांत असावयाची. शाळांची शिस्त जितकी उत्तम आणि अचल असेल त्या प्रमाणें समाजांत व राज्यांत ती रहावयाची. शिस्त मोडून केव्हां कोणाचें कल्याण झालें आहे ? समाज सुस्थितींत रहावयास हवा असेल, राज्यांत बेबंदशाही व्हावयाला नको असेल, तर शिस्त कायम राखिली पाहिजे. आणि ती कायम राखण्याचा खरा मार्ग म्हणजे शाळांतील व घरांतील शिस्त उत्तम ठेवणें. ज्या घरांत शिस्त नाहीं त्या घरांचें मातेरें होण्यास उशीर लागत नाहीं. ज्या शाळेंत शिस्त नाहीं ती शाळा नसलेली बरी. ती चालूंच देतां नये. मुलांना एकदां बेलगाम, बेगुमान, बेशिस्त संचरण्याची संवय लागली कीं तीं मोठीं झाल्यावरही बेफामच उधळायाचीं. तीं आज नुसत्या घराची शाळेची इमारत पाडावयाचीं, तर उद्यां मोठीं झाल्यावर समाजाची व राज्याची इमारत पाडायास कारण व्हायाचीं. समाजाची इमारत ढांसळावी, त्याचे खांबांचा त्याचे तुळयांस, त्याचे तुळयांचा त्याचे भिंतींस, त्याचे भिंतींचा त्याचे मजल्यास थांग राहूं नये, ज्यानें उठावें त्यानें मनास येईल तें करावें, बंध म्हणून मानूं नये, कैद किंवा आळा म्हणून जुमानूं नये, अशी इच्छा समंजस माणसाची असणार नाहीं. म्हणूनच शाळेंतील शिस्त ही पुढील समाजांतील शिस्तीचा पाया या नात्यानें तिला धक्का लागूं देतां कामा नये. शाळेंतील शिस्त गुरुशिष्यांच्या परस्पर संबंधावर अवलंबून आहे. तेव्हां गुरूंच्या तंत्रानेंच मुलांना वागायास लावणें—आणि गुरू ह्मणजे आपलें सध्यां पुरतें अखेर दैवत अशीच बुद्धि मुलांची

राहूं देणें हेंच आज तरी अवश्य आहे. यांत ढवळाढवळ करणें कोणत्याही दृष्टीनें हितावह नाहीं.

४१. गुरू आणि शिष्य यांच्या संबंधांतूनच विद्यार्थी व देशांतील चळवळी हा प्रश्न उपस्थित झाला आहे. या प्रश्नावर आज लोकांत चर्चा सुरू आहे. ती असावी तितकी निर्विकार आणि निष्कलुष नाहीं ही दिलगिरीची गोष्ट आहे. आठराव्या शतकांतील राजकीय कल्पनांचें आंबट सामाजिक वातावरणांत भिनल्यापासून समाजांत व राज्यांत पक्ष विशेष जारीनें सुरू झाले व पक्षाच्या कार्यासाठीं सारासार विचारांची होळी करण्याची चाल पडली. आमच्या इकडे त्या राजकीय कल्पना अलीकडे आल्या आहेत पण त्या येथें उत्पन्न झालेल्या नाहींत, बाहेरून आल्या आहेत. त्या येथें रूढ होऊन त्या अन्वयें आमचें राज्य चालावें अशासाठीं आमच्या येथील कित्येक लोकांचे प्रयत्न चालू आहेत. हे प्रयत्न बरे असोत–वाईट असोत. आमच्या सार्वजनिक चळवळींचें आजचें स्वरूप येथचें नाहीं हें खरें. त्यामुळें येथेंच उत्क्रान्त झाले त्या संस्थांत चळवळींत किंवा उद्योगांत जसा अंगचा जोर असतो तसा आमच्या सार्वजनिक चळवळींत नसतो. तो उत्पन्न करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यांचा आपल्याला आज विचार करावयाचा नाहीं. त्यांपैकीं फक्त एकाचाच आपल्याशीं संबंध पोंचतो. तो विद्यार्थ्यांस सार्वजनिक चळवळींत गुंतविणें हा होय. कित्येकांच्या मतें 'विद्यार्थी हे आमच्या भावी समाजाचे स्तंभ. आमच्या आजच्या चळवळींत जोर नसतो याचें कारण आमच्यांतील झालेल्या लोकांना त्या अगदीं नव्या असतात, त्यांचें त्यांना महत्त्व कळत नाहीं, शिवाय ते अनेक पाशांनीं बांधलेले असतात, त्यांना त्या चळवळींची भीति वाटते. तेव्हां कांहीं दिवसांनीं त्यांची जागा घेणारी जी विद्यार्थी मंडळी तिलाच या चळवळींत गुतविलें पाहिजे. या चळवळींविषयीं त्यांचे मनांत आवेश आणि उत्कंठा उत्पन्न केली पाहिजे, आणि त्यांचेकडून या चळवळींसंबंधानें बेधडक कामें करून घेतलीं पाहिजेत. त्यांना आजच्या चळवळींत घालून त्या आपल्या आहेत असें वाटावयास लाविलें पाहिजे, आणि मोठे लोक भीतीनें—धूर्तपणानें किंवा दूरदर्शीपणामुळें जें काम करीत नाहींत तें त्यांचेकडून करवून घेतलें पाहिजे म्हणजे आजचें काम तर उरकलें ! पुढचें पुढें पहातां येईल ! शिवाय जे पुढें मोठे होणार त्यांना तरी अशा चळवळी चालविण्याचें शिक्षण आतांपासून मिळालेंच पाहिजे. उद्यां ते सिटिझन होणार. म्हणून सिटिझनाचे हक्क काय व ते बजावावे कसे याचें कृतिशः शिक्षण त्यांस आज दिलेंच पाहिजे. तेव्हां सामाजिक काय, औद्योगिक काय, राजकीय काय—विशेषतः राजकीयच—चळवळींत विद्यार्थ्यांनीं मिसळलें पाहिजे, व त्यांत उचलवेल तेवढा कार्यभाग उचलला पाहिजे; आणि पालकांनीं व शिक्षकांनीं त्यांना तसें करूं दिलें पाहिजे. जे तसें करूं देत नाहींत ते भित्रे आहेत, भोंदू आहेत, पोटभरू आहेत.'

हें मत मला जितकें सरळपणानें मांडत आलें तितकें मांडलें आहे. यावर दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें आहे तें येणेंप्रमाणें:—विद्यार्थी हे विद्यार्थी आहेत तोंवर त्यांनीं विद्या मिळवायाची. ती मिळवितांना त्यांचें लक्ष दुसऱ्या कोणत्याही विषयाकडे किंवा गोष्टीकडे जाता नये. त्यांनीं निश्चळ मनानें आणि एकनिष्ठेनें ज्ञान मिळवावें, विद्या करावी, येवढेंच त्यांचें काम. ज्ञानाचे कण जेथून आणितां येतील तेथून ते त्यांनीं आणावे. त्यांच्या पालकांनीं

ज्याकरितां त्यांना शाळेंत किंवा कॉलेजांत घातलें आहे तें साधावयापलीकडे त्यांनीं जाऊं नये, व त्यांना जाऊं देऊं नये. असा व्यभिचार त्यांना करूं देणें हें पाप आहे. त्यांच्या कल्याणासाठीं, त्यांच्या पालकांच्या हितासाठीं आणि एकंदर नव्या पिढीच्या सुस्थितीसाठीं मुलांस बाहेरच्या चळवळींत पडूं न देणें हेंच शहाणपणाचें आहे.

दोनही पक्षांचें म्हणणें सारतः आपणांपुढें आहे. त्या दोन म्हणण्यांचा आपण शांतपणें विचार करूं. पहिल्या पक्षाच्या म्हणण्यांतील पहिला भाग खरा आहे, आपणांस लाजिरवाणा असला तरी तो यथार्थ आहे. पण त्यानें त्या पक्षाच्या म्हणण्यास बळकटी येत नाहीं. आमच्या चळवळींत अंगचा जोर नाहीं म्हणून त्यांत विद्यार्थ्यांस मिसळूं द्यावें काय ? आमच्या सामाजिक, औद्योगिक, राजकीय चळवळी कोणाच्या ? आज जो समाज आहे त्याच्या. त्या त्यानेंच चालविल्या पाहिजेत, त्यांचें ओझें त्यानें आपल्या पोरांवर कां टाकावें ? आह्मी भित्रे असलों—स्वस्थ असलों तर आम्हांस जागे करा, आमच्यांत आवेश ओता. पण जें आमचें काम तें करावयास आमच्या पोरांस कां वेठीस धरतां ? बापानें दिलेल्या शिव्यांबद्दल करडास मटकावणाऱ्या लांडग्याचाच न्याय आहे हा ! आम्ही जें करीत नाहीं, जें आह्मांस करवत नाहीं, किंवा जें आमच्यानें होत नाहीं, तें आमच्याहून बुद्धीनें, विचारानें, ज्ञानानें, शक्तीनें आणि अधिकारानें लहान अशा मुलांना करावयास लावावें आणि त्याचे बरे वाईट परिणाम जे आम्ही भोगायाचे ते त्यांना भोगायास लावावें, याला मुलांची काळजी म्हणायाची, त्यांच्या कल्याणाची कळकळ म्हणायाची, काम करण्याची शिताफी म्हणायाची किंवा देशाचें हित म्हणायाचें ? मुलांच्या हिताची कळकळ बाळगणारा आणि त्यांच्या अनामयाची काळजी करणारा वडील त्यांना त्यांच्या आहाराबाहेरचें ओझें उचलूं देईल काय ? तो स्वतः त्या ओझ्याखालीं मरेल हवा तर; पण आपल्या पोरांस तिकडे फिरकूं देणार नाहीं. अकाळीं जिवापाड मेहनत करवून पोरें उरीं फुटावीं हें देशहित तरी कोठलें ? देशहित साधावयाचें म्हणजे देशाची बळकटी—हिंमत उत्तरोत्तर वाढती ठेवायाची. पंचवीस वर्षांचे झाल्यावर जो कार्यभार मला उचलायाचा तो आज दहा पंधरा वर्षांचा असतांच उचलल्यास मी कायमचा लंगडा, पांगळा होणार नाहीं काय ? निदान माझी वाढ खुंटणार नाहीं काय ? घोड्यांचा व्यापार करणारे व्यापारी शिंगरें विकत घेऊन त्यांची वाढ पुरी होईपर्यंत त्यांना गाडीला जोडीत नाहींत किंवा बसण्याला काढीत नाहींत. मग आम्ही माणसासारखीं माणसें असून आमच्या पोरांना अकालींच सार्वजनिक चळवळींस हातभार लावायास किंवा अविचारामुळें खांदा देण्यास लावावें काय? आज आमच्या अंगीं धैर्य-बळ-धाडस नसेल तर तें आम्ही आमच्या मुलांत आमच्यापेक्षां थोडें तरी अधिक येईल अशी तजवीज करूं. पण उद्यांची उडी आजच मारावयास लावूं काय? आणि तीही आम्हांस मोठेपणींही ती मारतां येत नाहीं म्हणून ? बापानें मरतांना मुलावर कर्जाचा बोजा ठेवला तर मुलानें तो उचलून तें कर्ज फेडावें हें आपण मुलाला उचित समजतों, पण बापाचें करणें अनुचितच म्हणत नाहीं काय ? तेथें एक तरी असतें, बाप मरायालाच टेंकलेला असतो. त्यामुळें बापाचा निरुपाय होतो. येथें आमच्या सार्वजनिक चळवळी चालविणारे आह्मीं मरायाला टेंकलों आहों काय ?

आम्हीं जिवंत आहों, पायांवर उभे आहों तोंवर तरी आम्ही आपल्या कामाचा बोजा आमच्या मुलांच्या मानेवर देणार नाहीं, देतां कामा नये. आणि आमचा भार त्यांच्यावर टाकून त्यांची वाढ खुंटविणार नाहीं, खुंटवितां कामा नये. बाकी अशी तरी इच्छा करणें आमच्या परंपरेला सोडून नाहीं ! आम्हीं बाप झालों. तेव्हां आमच्या मुलांनेंही लवकर एकदां बाप व्हावें म्हणून आम्हीं त्याच्या पितृत्वाला दामटीत दामटीत किती लवकर आणतों ! लवकर एकदां नातू पाहून सुनेच्या कंबरेचा आणि मुलाच्या पराक्रमाचा कांटा एकदमच ढिला करण्याची आम्हांला नेहमींची संवय आहे ! उद्यांच्या गोष्टी आज करण्याची आणि करावयाची घाई करून देशाला खंगवण्याची पुण्याई आज बरींच वर्षे, सुमार एक शतक तरी, आम्ही संपादीत आलों आहों !

तथापि या पक्षाच्या ह्मणण्याचा दुसरा भाग इतका टाकाऊ नाहीं. त्यांत थोडें तरी तथ्य आहे. तें किती आहे तें पाहिलें पाहिजे. आमचीं मुलें म्हणजे उद्यांचे आम्ही. उद्यां जी कामगिरी त्यांना करावी लागणार ती करण्याची तयारी त्यांची आम्हीं आज करून दिली पाहिजे. पुढें ते नागरिक होणार, समाजाचे स्वतंत्र अवयव होणार, राजाचे प्रजाजन होणार, मुलांचे बाप होणार, कुटुंबाचे पति होणार, राजकीय, सामाजिक, औद्योगिक हक्कांचे अधिकारी होणार, तेव्हां त्या त्या नात्यानें त्यांना जें करावयाचें तें करतां येण्याची योग्यता आणि अधिकार त्यांना प्राप्त होई असें त्यांचें शिक्षण पाहिजे. व संसारसंग्रामांत स्वतंत्र सैनिक म्हणून ते उभे राहण्यापूर्वी, त्यांत यश मिळविण्यासाठीं, किंवा कृतकार्य होण्यासाठीं, शारीरिक व मानसिक जे गुण त्यांना अवश्य ते त्यांना मिळवून देणें हें त्यांच्या शिक्षणाचें काम आहे. आमच्या येथें तर हें काम विशेषच नाजूक आणि महत्वाचें आहे. आमच्या येथील संसारसंग्राम इतर देशांतील जीवनकलहाहून अधिक बिकट, अधिक खडतर, अधिक संकटावह आहे. त्यांत पडण्यापूर्वीं आमच्या मुलांना त्या मानानें अधिकच कसरत करायाला पाहिजे. हें म्हणणें येथपर्यंत बरोबर आहे. परंतु प्रश्न असा आहे कीं, या सैनिकांस शिक्षण द्यावयाचें म्हणजे आज त्यांना एकदम रणावर दोन फौजांच्या धुमश्चक्रींत नेऊन सोडायाचें कीं काय ? शिक्षण ह्मणजे आधींची-होणारांची-तयारी कीं बनलेल्यांची वारी ? विद्यार्थ्यांना पुढें जें जें व्हावयाचें व करावयाचें असेल तें तें व्हायाला आणि करायाला समर्थ होण्याकरितां आज त्यांनीं आपल्या शरीरास व मनास तालीम द्यावयाची असते हें उघड आहे. तथापि ते आज शिकत आहेत—शिकलेले नव्हेत, हें विसरूं नये. शिकलेल्यांनीं हळू हळू रणांत पुढें सरावें हें जितकें रास्त आहे तितकेंच शिकणारांनीं त्यांचे पुढें धांवावें किंवा लोकांनीं त्यांना दामटावें हें अविचाराचें आणि धोक्याचें आहे. त्यांचें शिक्षण हळू हळूच झालें पाहिजे. तें होईपर्यंत, तें झाल्यावर करायाचीं कामें त्यांना करूं देतां कामा नयेत. त्यांचें शिक्षणही तसेंच क्रमाक्रमानें व्यापक झालें पाहिजे. प्रथम केवळ मनुष्य प्राण्याच्या अस्फुट शक्तींस स्फुट करणारें—नंतर कुटुंबांत बहीणभावंडांत सुखानें नांदायाला अवश्य असणारें—पुढें शेजाऱ्यापाजाऱ्यांबरोबर वागायास शिकविणारें—पुढें जसे जसे समाजाचे निरनिराळे संबंध समजण्याचें त्यांचें वय होईल आणि बुद्धींत कुवत येईल, तसतसें नागरिकांचीं कर्तव्यें, राजा व प्रजा यांचे परस्पर धर्म, देशाची सामाजिक व राजकीय स्थिति आणि औद्योगिक व

सांपत्तिक उत्कर्ष यांचा संबंध, राष्ट्राचे गुण, शास्त आणि शास्ते यांतील झटापट व त्यांचें कायदेशीर उत्क्रमण, समाजांची उत्पत्ति, स्थिति व वाढ वगैरे विषय समजावून देणारें शिक्षण त्यांस द्यावयाचें. या दृष्टीनें विचार केला म्हणजे प्राथमिक व दुय्यम शाळांतील मुलांस राष्ट्रीय–सामाजिक-राजकीय-औद्योगिक संबंधाचें बाहेरचें वारेंही लागूं देणें बरोबर नाहीं असेंच म्हणावें लागत नाहीं काय ! या मुलांस त्या गोष्टी समजण्याइतकी त्यांच्या मनाची वेंघ वाढलेली नसते. त्यांनीं फक्त मागें झालेल्या ठळक ठळक घडामोडींचा स्मृतींत संचय करून ठेवावा, आणि त्यांत परस्पर कार्यकारण भाव सांपडल्यास सोधावा. चालू चळवळी, चालू उद्योग, चालू खटपटी, चालू झटापटी, आणि चालू लढालढींची वार्ताही त्यांचे कानीं जाऊं देणें बरोबर होणार नाहीं. त्यांच्या मनाला व शरीराला सामान्य शिक्षण देणें येवढेंच या वयांत त्यांना पथ्याचें होईल. पंधरा–सोळा वर्षांचें वय होईपर्यंत मुलांचा पोरपणा गेलेला नसतो आणि त्यांची दृष्टिही तितकी फेलावलेली नसते. मोठीं माणसें आपल्याहून किती मोठीं आहेत, आणि तीं काय करतात, कोठें जातात, कशासाठीं जातात, त्यांच्या कर्तृत्वाचे धागे कोठपर्यंत पोंचतात वगैरे गोष्टी त्यांना समजणें शक्य नसतें. तेव्हां त्या त्यांचेपुढें मांडूंच नयेत. मोठ्या माणसांच्या कामांत या वयांत त्यांना मन घालूं देतां कामा नये. यावेळीं पतोजीनें दिलेला अभ्यास आणि घरांत वडील माणसें सांगतील तीं निरोपाचीं वगैरे हलकीं कामें करणें येवढ्यांतच तीं चूर असलीं पाहिजेत. घरांतल्या घरांत शाहणे आईबाप, मोठीं माणसें बोलत असतां किंवा कांहीं मसलत करीत असतां, नुसती थट्टा मस्करी करीत असतां सुद्धां, मुलांना तिकडे फिरकूं देत नाहींत. मुलांची जागा निराळी असून तेथेंच त्यांनीं असायाचें असा त्यांचा कडक कायदा असतो. अशा शिस्तीचीं घरें पंचवीस वर्षांपूर्वीं जितकीं होतीं तितकीं आतां नाहींत ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. हलीं आमच्या घरीं-दारीं-बाहेरीं सर्वत्र बेबंदशाही झाली आहे. ती घातक आहे. पण जुनीं माणसें या एका गोष्टीविषयीं फार खबरदारी घेत. आणि मुलास भलत्याच वेळीं ‘ फाजील ’ -हा त्यांचा शब्द आहे–होऊं देत नसत. मला वाटतें ही त्यांची-जुन्या वाडवडलांची-रीत पुष्कळ शहाणपणाची होती, व तीच आम्ही पुढेंही चालविली पाहिजे. मुलांस मिसरू फुटेपर्यंत त्यांस मोठ्या माणसांच्या विषयांत मन घालूं देतां कामा नये. शाळेंतील अभ्यासांतच आणि शारीरिक व्यायामांतच त्यांनीं गर्क असावें अशी सक्त शिस्त पाहिजे.

मुलें कॉलेजांत गेलीं–सोळा वर्षांचीं झालीं म्हणजे मग हळूहळू हे विषय त्यांच्या शिक्षणांत येऊं द्यावे. इतिहासांतील राजकारणें, घडामोडी, त्यांची उपपत्ति, यांची सांगोपांग माहिती त्यांस दिली पाहिजे. देशाचा राजकीय व राष्ट्रीय उत्कर्ष–अपकर्ष होतो कसा, व्यक्तीची व समाजाची, तशीच लोकांची आणि राजसत्तेची झटापट कशी चालते–तींत केव्हां कशा चुका झाल्या, त्या कां झाल्या, वगैरे गोष्टींचा साधकबाधक प्रमाणांनीं खल त्यांचेसमोर झाला पाहिजे. कॉलेजांतील क्रमाच्या पायरीप्रमाणें वरील विषयांच्या विचारांची संकीर्णता आणि व्यापकता वाढत गेली पाहिजे. शेवटीं मागील गोष्टींबरोबर आणि सामान्य तत्त्वांबरोबर चालू गोष्टींचा आणि विशेष विषयांचाही ऊहापोह शिक्षकानें कालेजांत करणें अ-

वश्य आहे. राजकीय, सामाजिक व औद्योगिक विषय अभ्यासांत आले कीं त्यांचा तत्त्वदृष्ट्या आणि व्यवहारदृष्ट्या विचार करण्यास मुलांस अवश्य लाविलें पाहिजे, आणि चालू गोष्टींच्या दाखल्यांनीं तो विशद केला पाहिजे. मुलांसही चालू चळवळींचा अभ्यास त्यावरील वाङ्मयाच्याद्वारा करूं दिला पाहिजे. चालू वाङ्मयांतील दोष दाखवून शास्त्राच्या व अनुभवाच्या दृष्टीनें आज आहे काय—झालें पाहिजे काय व तें करायाचें कसें वगैरेचा खुलासेवार उपदेश विद्यार्थ्यांस गुरूंनीं केला पाहिजे. विद्यार्थ्यांनींही मधुकराप्रमाणें मागच्या जगाची तशीच आजच्या जगाची आंतर्बाह्य माहिती मिळविण्याचा उद्योग केला पाहिजे. कोठें कोण आहे, कोठें काय आहे, संसारांत—आपल्या देशाच्या संसारांत—आपली जागा कोठें आहे व ती आपण कशी भरावी वगैरेंची भवति न भवति आणि निश्चय कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं आपल्या मनाशीं केला पाहिजे. जगांतील मोठ्या संग्रामांची नकलही वरच्या म्हणजे संसाराच्या उंबरठ्याशीं पोंचलेल्या विद्यार्थ्यांनीं आपल्या आपल्याशीं—कालेजाच्या आवारांत आणि कालेजाच्या अधिकारांत, करून पहावी हवी तर. जेवावयाचीं क्लबें, लायब्ररी, रीडिंगरूम, डिबेटिंग सोसायटी, जिमखाना, वगैरे संस्था चालविणें, त्यांत अधिकारी निवडणें, त्यांचे कायदे करणें, त्यांच्या व्यवस्थेंत सुधारणा घडवून आणणें, ज्ञानार्जनाच्या आणि शिक्षणाच्या आटोक्यांतल्या नवनव्या संस्था उत्पन्न करणें, व्यक्तीच्या आचरणाला आपसांतच बहुमताचा आळा घालणें, आणि तें सर्व आपल्या गुरूंच्या सल्लमसलतीनें आणि अनुदिशेनें करणें हें सारें त्यांच्या पुढील आयुष्यांत त्यांजवर पडणाऱ्या कार्यभारासाठीं करावयाच्या कसरतींत येतें. विद्यार्थीपण संपेपर्यंत आणि गृहस्थाश्रम सर्वांगांनीं स्वीकारीपर्यंत विद्यार्थ्यांचें हेंच काम आहे. या पलीकडे ते गेले कीं, ते वडिलांचा अधिकार बळकावूं लागले म्हणावयाचें. पुढें मुलाला बाप व्हावयाचें आहे म्हणून आजच त्याला बाप बनवूं जाणें ज्याप्रमाणें वेडगळपणाचें आणि जीव घेणारें होईल, तसेंच हें आहे. पुढें त्याला बाहेरच्या चळवळी कराव्या लागतील म्हणून आजच त्यानें त्यांत पडावें. त्या कराव्या हें ह्मणणें बरोबर नव्हे. पुढें चळवळी कराव्या लागतील याकरितां चळवळी कशा असतात, कोण चालवितें, त्या जगतात कोणत्या गुणांनीं, मोडतात कोणत्या चुकांनीं, आमच्या चळवळींना जोम येण्यास कोणते गुण हवेत—वगैरेंचा सूक्ष्म अवलोकनानें, वादविवादानें, ग्रंथवाचनानें व तज्ज्ञांच्या मदतीनें अभ्यास करणें हें त्यांचें काम आणि हीच त्यांची तयारी. व्यवहारांत लागणारे गुण अंगीं पोसण्याकरितां कालेजाला जोडून असलेल्या इतर संस्थांचा त्यांनीं अवश्य उपयोग करून घ्यावा. याप्रमाणें आधीं सर्व सामग्री गोळा करून ठेवावी व मग विद्यार्थीदशा संपली म्हणजे हळू हळू सार्वजनिक चळवळींत पडावयास विद्यार्थ्यांनीं आरंभ करावा. त्याचे आधीं विद्यार्थ्यांना बाहेरच्या उठाठेवींची जरूर नाहीं व त्या त्यांनीं केल्यास गुरूंनीं त्यांस वाटेवर आणणें अवश्य आहे. तसें जे करणार नाहींत ते त्यांचे गुरु नव्हत. उद्यांचीं कामें आज करावयास जे त्यांना भर देतील ते चुकताहेत असेंच समजावें. उद्यांचीं कामें काय आहेत तीं आज अवश्य पहावीं व त्याकरितां आपले हातपाय आणि डोकीं तालीम करून—तयार ठेवावीं. पण उतावळी करूं नये. वेळ येण्यापूर्वीं—आपला आश्रम बदलण्यापूर्वीं, आपल्या आश्रमास बट्टा

लावण्यासारखें काम विद्यार्थ्यांनीं करूं नये. अर्जुनाचा वेष चढविल्याशिवाय सुभद्रा अर्जुनाची नसते हें विसरूं नये. मेल्याशिवाय प्रेतायतनावर पसरण्याची हांव कां ?

## सरकाराचा संबंध तोडून शिक्षणाचें चालायाचें नाहीं.

४२ शिक्षणाचे बाबतींत आणखी एका मुद्याचा विचार मी करणार आहें. आज सरकाराशीं संबंध तोडून आपलें शिक्षण आपल्या हातांत घेण्याची कल्पना निघाली आहे. पुष्कळांना असें वाटूं लागलें आहे— तें बरोबर आहे कां चूक आहे हें आपल्याला आतां पहावयाचें नाहीं—कीं, सरकाराला आमच्या येथें झालेला विद्याप्रसार पहावत नाहीं, आणि सरकार आमच्या शिक्षणांत इतउत्तर अडथळेच आणणार. असें आज कित्येकांना वाटत आहे खास. मला स्वतःला सर्वांशीं तसें वाटत नाहीं, आणि इंग्रज सरकाराला जोंपर्यंत सुधारलेलें ह्मणविण्याची चाड आहे तोंपर्यंत सरकाराचें कायमचें धोरण तसें होईल असें मी कधीं मानणार नाहीं. एकाददुसऱ्या माणसानें आपल्या अधिकारांत कांहीं बाह्यतः तरी पीछेहाटी दिसणाऱ्या गोष्टी केल्या, तरी सरकाराचें कायमचेंच वर्तनतत्त्व तसें बदलेल असें मी आज म्हणणार नाहीं. तें कांहीं असलें तरी, तसें वाटणारे लोक--समंजस लोक आज आहेत.त्यांच्या मनांत देशाचें शिक्षण देशाच्याच हातीं रहावें. सध्याच्या थोड्याशा खवळलेल्या समुद्रांत बंगाल्याकडे स्वतंत्र शिक्षणाच्या कित्येक होड्या हाकण्याची कित्येक लोक-नावाडी तयारी करीत आहेत. यांत हिताचा भाग किती आहे त्याचा आपण विचार करणें अवश्य आहे.

आपल्या सबंध राष्ट्राला नवें शिक्षण मिळालें पाहिजे आहे. जुन्यांतून नव्याचा उदय झाला पाहिजे. कात टाकून आम्हास पुनः नवें व्हावयाचें आहे. पण आमचा देश केवढा आहे, त्यांत निरक्षर लोक किती आहेत याचा विचार केला, आणि त्या बरोबरच आम्हांत एकमेकांत परकेपणा किती भरला आहे हेंही पाहिलें म्हणजे हें काम भूगोल उलथून टाकण्याऱ्या अजस्र विभूतींचें आहे असें वाटतें. हें अवाढव्य काम आम्हीं हातीं घ्यावयाचें ! आणि आम्ही कसे ? सर्वांशीं परभृत, सर्वांशीं पांगळे, आम्हांला एक राष्ट्र बनलें पाहिजे हें सुद्धां परक्यानें सांगावें लागलें. ब्राह्मो कालेज, दयानंद सरस्वतीचें अँग्लो-वेदिक कॉलेज, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या शाळा व कॉलेज हे आमचे लोकशिक्षणाचे प्रयत्न ! तीं चालवितां चालवितां आमच्या नाकीं नव येतात, त्यांच्याकरितां फंड गोळा होत नाहीं, माणसें हवीं तशीं मिळत नाहींत. मग आम्ही सगळ्या राष्ट्राचें शिक्षण हातीं घेणार कसे ? गांवोगांव—खेड्याखेड्यास प्राथमिक व दुय्यम शाळांचें जाळें आम्हांस पसरावयाचें आहे. दहा माणसांपैकीं नऊ माणसांस अजून शिकवायाचें आहे. सरकाराची येवढी मदत असूनही आज पन्नास वर्षांत दहांतला एकच लिहावाचायास शिकला. सरकार करावी तितकी शिक्षणाची काळजी करीत नाहीं हें कबूल; परंतु आज सरकार शिक्षणाचे पायीं जितका पैसा खर्च करीत आहे त्याचा शतांश तरी आह्मी करीत आहों काय ? इंग्लंडांत शिक्षणाचा निराळा कर आहे. असा कर आपसाआपसांत आह्मी बसवून घ्यायाला तयार आहों काय ? आम्हांला शिक्षण हवें कसलें हें तरी सांगणारे आमच्यापैकीं कितीसे तयार आहेत ? याचा विचार कितींनीं केला आहे ? आज प्रत्येक प्राथमिक शाळा म्हणजे महि-

ना पन्नास तरी रुपयांचा खर्च आहे. तो सोसणार कोण ? एखादें कॉलेज कायमचें चालविण्यासही—सरकाराच्या मदतीशिवाय—दहा पांच लाख रुपये सहज लागतील मग सगळ्या राष्ट्राचे शिक्षणाची व्यवस्था आह्मी कशी करणार ! बंगाल्यांत सध्याच्या आवेशाच्या भरांतही दहा बारा लाखाचे आंकडे पडत नाहींत. मग जेथें कोटीन्कोटी रुपये वर्षानुवर्ष लागणार तेथें आह्मीं काय करणार ? मला वाटतें हें वेड आहे. ही आकाशाला गवसणी आहे. सध्या तरी तें अशक्य आहे. हिंदुस्थानांतला माणूसन्माणूस एका कुटुंबांतल्या भांवडाप्रमाणें वागूं लागेल, त्या दिवशीं ही गवसणी घालतां येईल कदाचित्. आज आम्हांस ती हातांत घेण्याची बुद्धि बरी नाहीं. पायांवर उभे राहतां न येणाऱ्या पोराचा पांगुळगाडा किंवा आधार काढून घेऊन त्याला पाडण्यापैकीं हा प्रकार आहे. आज आमचें सरकाराच्या मदतीवांचून चालायाचें नाहीं. आणि सरकाराचा संबंध तोडून चालावयाचें नाहीं.

## मग करावें काय !

४३ मग करावें काय ? आम्हांस काय पाहिजे हें सरकारास कळत नाहीं, सरकारानें ठरविलेले अभ्यासक्रम आमच्या उपयोगाचे नाहींत—निदान त्यांत बदल करण्यास बरीच जागा आहे, उत्तम शिक्षक बाहेरून आणण्याइतके सरकारापाशीं पैसे नाहींत, आणि आम्हांस आमच्या मनाप्रमाणें गोष्टी घडवून आणण्याचें सामर्थ्य नाहीं, मग करावयाचें काय असें निराश होण्याचें कारण नाहीं. सरकाराच्या शिक्षण खात्यास मदत करण्याकरितां आणि लहान लहान प्रमाणावर शिक्षणप्रयोग करण्याकरितां आपल्यांतील पुढाऱ्यांनीं दर तालुक्यास, जिल्ह्यास, प्रांतास, इलाख्यास आणि मग अखल्यास सर्व देशास एकेक मंडळ स्थापावें. त्या मंडळानें आपापल्या हद्दींत लोकशिक्षणाविषयीं जागरूक रहावें. आपापल्या हद्दीपुरता खाजगी फंड गोळा करावा आणि सरकाराच्या मदतीनें, जेथें शाळा नसेल तेथें शाळा स्थापावी. मी म्हणतों तशा प्राथमिक शाळा, केवळ व्यवहारापुरतें लिहिणें—वाचणें—हिशेब करणें शिकविणाऱ्या शाळा स्थापन करण्यास फारसा खर्च लागणार नाहीं. गांवच्या बलुत्यांप्रमाणें गावांतला पंतोजीही एकदां ठरवावा आणि गांवकऱ्यांनीं कोणी तेल, कोणी तूप कोणी तांदूळ देऊन त्याचा निर्वाह चालवावा. त्यानें गांवकऱ्यांस हरएक बाबतींत सल्ला मसलत द्यावी व त्यांच्या मुलाला चार अक्षरें शिकवावीं. अशी व्यवस्था अगदींच अशक्य आहे असें वाटत नाहीं. या व्यवस्थेंत आरंभीं अगदीं नमुनेदार शाळा थाटावयाच्या नाहींत हें कबूल आहे;तरी शिक्षणाचे बाबतींत 'नाहीं' परीस ' कांहीं ' या न्यायानें येवढा आरंभही कांहीं वाईट नाहीं. या पंतोजीला सरकाराकडून आणि तालुक्यांच्या मंडळाकडून मिळून वरखर्चासाठीं पांच चार रुपये महिना मिळाला ह्मणजे बस होईल. यांत शिक्षणाचा खर्च वांटला जाईल. मुलाची फी द्यावयाची त्या ऐवजीं पंतोजीच्या निर्वाहाचे डाळ—तांदूळ गांवांतील ठळक माणसांकडून पंतोजीला मिळतील, व त्या मोबदला गांवांतील सगळ्या मुलांस व्यवहारापुरतें शिक्षण मिळेल. अशी व्यवस्था शक्य न झाल्यास सरकार आणि लोकमंडळ या दोघांनीं एकमेकांच्या सल्ल्यानें हळू हळू नवीन शाळा स्थापन कराव्या, आणि शिक्षकाच्या निर्वाहाला पुरे येवढा त्याला पगार द्यावा. या लिहिण्यावाचण्याच्या शाळेसच जोडून हातकामाचे कारखाने गांवांतील

उळक कारागिरांकडून घालवावे. आणि रोज कांहीं वेळ मुलांना त्या कारखान्यांत काम करावयास लावून त्यांना धंदा शिकवावा. या व्यवस्थेंत शिक्षणाचा खर्च दोन हिस्से सरकारानें सोसावा व एक हिस्सा लोकमंडळानें सोसावा. असें केल्यास अभ्यासक्रम आणि शाळेची व्यवस्था यांत लोकमंडळाचें मत सरकारास घ्यावें लागेल, आणि दोघांच्या विचारानें ज्या गांवास जें शिक्षण अवश्य तेंच त्याला मिळेल. सरकारानें इन्स्पेक्टरांची संख्या किंवा पगार वाढविण्याऐवजीं अशीं मंडळें आपल्या मदतीस घेतलीं तर सरकारावरचा लोकांचा गैरविश्वास कमी होईल, आणि लोकांनाही थोड्याफार अंशानें लोकशिक्षणाचा कल आपल्या मनासारखा करून घेतां येईल. शेतकऱ्यांच्या मुलांकरितां लिहायावाचायाच्या शाळांतील शिक्षकांशिवाय, शेतकीचा प्रांताप्रांतांतील शेतकीचा विशेषतः अभ्यास करून तयार झालेले कांहीं फिरते शिक्षक ठेवावे. त्यांनीं शेताचें काम चालतांनाच शेतकऱ्यांच्या मुलांस आणि शेतकऱ्यांसही थोडथोडी शेतकामाची शास्त्रशुद्ध पण सद्यःफलदायी माहिती सांगावी व शेतकऱ्याचें काम आपण चांगलें करून दाखवावें. अशीच व्यवस्था कोष्टी, साळी, लोहार, कातारी, नकसकाम करणारे, छापी कापड करणारे, वगैरेंच्या मुलांसाठीं सरकारानें व लोकमंडळांनीं मिळून केल्यास देशी उद्योगधंद्यांस बरीच मदत होईल, लोकशिक्षणाच्या प्रसारासही मदत होईल आणि लोकमंडळें सरकाराशीं सलोख्यानें वागत असल्यामुळें शिक्षणप्रयोग सरकार अंगावर घेण्यास तयार नसेल ते करून पहाण्यास लोकांना अडथळा येणार नाहीं. मात्र लोकशिक्षण म्हणजे सार्वजनिक चळवळी फुगविण्याचें साधन होतां नये. बुद्ध लोकांच्या भिक्षुंप्रमाणें सर्व देशभर मुलांच्या शिक्षणास वाहिलेलीं, मुलांस उत्साही, बळकट, करारी, ज्ञानलोलुप, सर्वांगसुंदर बनविण्याचा आणि स्वावलंबन व स्वतःचा प्रयत्न त्यांच्यांत वाढवून प्रत्येकाचें व्यक्तित्व कायम ठेवून राष्ट्राचा सामान्य ठसा सर्व बाळांवर उठविण्याचा अत्यंत पवित्र धर्म आचरणारीं माणसें तयार झालीं पाहिजेत. यांनीं येईल त्यास विद्या द्यावी; संसार निःसार नाहीं, आपलें दैव आपल्या हातांत आहे, आपण करूं तसा काळ होणार, असलें आशावंत अवसान नवीन मुलांत उत्पन्न करावें. मुलांना ज्ञानाचे नवे कण सोधण्याची स्फूर्ति देणें; स्वदेश—स्वभूमीविषयीं आस्था आणि जागृत ममता वाटूं लावणें, सत्य आणि न्याय यांनाच चिकटून राहण्याची संवय त्यांना जडविणें; मुलांचा व मुलींचा सर्वतः विकास होण्यासाठीं आईबापांना जागें करणें; निसर्गानें आपल्या हातीं दिलेलीं चैतन्याचीं रोपें-रागाच्या अविचाराच्या कडाक्यांत करपून जाऊं न देतां त्यांच्या सुंदर बागा तयार करणें; त्यांत प्रत्येक रोपाला आपापल्या फळ—पुष्प—पल्लवांनीं आपापलें अंतरंग अनिर्बंध प्रकटवूं देणें; एकमेकांच्या स्वतंत्रपणास प्रतिबंध न करतां त्यांना एकमेकांच्या वाढीस साहाय्य होऊं देणें आणि त्या सर्वांकरवीं एकंदर बागेला कृतकार्यता आणणें; याप्रमाणें निसर्गाच्या बागांत तयार झालेल्या रोपांची सर्व देशभर राष्ट्रीय बाग उठवून देणें, सारांश, अगदीं लहान मुलांचें तसेंच मोठ्या पोरांचें शिक्षण हातीं घेऊन हळुहळु भरतमातेच्या कन्यापुत्रांस बाणेदार, करारी, सत्यनिष्ठ, सरळ, प्रेमळ बनविणें; आपल्या देशमातेचे पांग फेडण्यास, शास्त्राच्या, व्यापाराच्या, उद्योगाच्या, विदग्धकलांच्या, संग्रामाच्या, उपयुक्त कसबांच्या, कोणत्याही

बाजूस स्वतःच्या पायावर उभे असणारे, सत्याची, न्यायाची आणि सरळपणाची कास धरून बेधडक चालणारे, आपलें बुद्धि-सर्वस्व, तसेंच शरीरसर्वस्व स्वताला धडधाकट जीवंत ठेवण्यांत आणि दुसऱ्याच्या जीवांचें रक्षणास कारण होण्यांत वेचणारे, स्वतः कोणाच्या वाटेस न जाणारे, पण कोणी गेल्यास क्षमा न करणारे, स्वांतरींच्या व विश्वांतरींच्या निसर्ग शक्तींचा, हिंदुस्थानाचा संसार-च त्याबरोबरच सर्व जगाचा संसार सुखानें चालविण्यासाठीं अभ्यास करणारे, आणि मानवाची सत्ता मानवेतर सृष्टीवर उत्तरोत्तर अधिकाधिक बसवून एकंदर उत्क्रान्तिचक्रास पुढें सारणारे सत्पुत्र तयार करणें, हें अत्यंत थोर, अत्यंत मंगळ, अत्यंत पवित्र काम आहे. आज इतर कोणत्याही कामापेक्षां याच कामाची किंमत फार आहे. या कामांत खपणाऱ्या कामाठ्यांची व्यक्तिशः कामगिरी अगदीं थोडी होईल. त्यांचें नांव किंवा मोल कोणाला कळणारही नाहीं. लोकांना त्यांची पर्वा वाटणार नाहीं. पायांखालीं चिरडणाऱ्या मुंग्यांप्रमाणें ते किती आले आणि किती गेले याची येथें मोजदादही कोणी करणार नाहीं. मानप्रतिष्ठा-लौकिकांच्या रूपानें या कामाचा मोबदला मिळावयाचा नाहीं. यक्षाच्या कांडीच्या फळाप्रमाणें या कामाचीं फळें तावडतोब दिसणार नाहींत. अनेक शतकांचे ठसे आमच्या लोकांच्या चित्तावरचे पुसून नवीन कालाला आणि नवीन स्वरूपाला अवश्य अशी मुद्रा त्यांवर उठवायाची आहे. या कामाला पांच पन्नास वर्षें म्हणजे कांहींच नव्हेत. शतकांचीं शतकें संथपणें, मुंगीच्या पावलानें हें लोकशिक्षणाचें काम करीत राहिलें पाहिजे. अल्पसंतुष्ट आणि सर्वसंन्यस्त लोक या कामास मिळाले तर हवेत; परंतु त्यास संन्यासच घ्यावयास नको, संसार सोडायास नको, नायकापोरांस उपाशीं मारायास नको. हें सर्व संभाळूनही लोकशिक्षणाचें पवित्र कामा करतां येईल. कचेऱ्यांतून दहा बारा रुपयांकरितां उमेदवारी करणारे तरुण किती आहेत? यांपैकीं शेंकडा दहा जर इकडे वळतील; जर्मनी-इंग्लंड-जपान वगैरे देशांत लोकशिक्षणाकरितां खाजगी प्रयत्न कसे झाले, ते करणारांस प्रथम किती प्रयास पडले, पण त्यांच्या श्रमानें एकंदर राष्ट्राची दानत-ऐपत-मगदूर-आणि जोम वाढून कसें चीज झालें हें पहातील, आणि आपणही हें काम करावयाचें पथकरतील, अगदीं लहानपणापासून बारा वर्षांपर्यंतच्या मुलांचें शिक्षण सुखाचें, सोपें, सर्व बाजूचें, त्यांचा स्वपणा कायम ठेवणारें आणि त्यांची शक्ति व उमेद न मारणारें कसें होईल याच चिंतनांत, याच्याच प्रयोगांत आणि अनुभवांत आपला सर्व वेळ घालवितील, स्वतांच्या मुलांची वाढ-स्वभाव-खोड पाहून त्यांना आपले शिक्षक करून सर्व मुलांस वाढवितील, शिकणें आणि शिकविणें जन्मभर चालू ठेवून आमच्या येथील बालशिक्षण सरकाराच्या डोळ्यांत न खुपतां सुधारतील तर आमच्या देशाच्या ऊर्जित काळाला ते बरींच वर्षें अलीकडे ओढतील यांत शंका नाहीं. आज जीं आमचीं तरुण मुलें सापाच्या शेंपटीवर पाय देऊन त्यास चिडविण्याच्या मार्गास लागत आहेत त्यांस माझें सांगणें आहे, 'बाबांनो सापाचा मंत्र सांपडल्याशिवाय किंवा त्याचें विष साफ नाहींसें करणारी वनस्पति हातीं आल्याशिवाय त्याच्या वाटेस जाऊन विनाकारण प्राणास कां मुकतां? दिव्याचा ग्रास करण्याची भलतीच हांव धरून स्वतांच जळून जाणाऱ्या पतंगाप्रमाणें प्रतिकूल काळाच्या वणव्यांत जाणून उडी कां टाक-

तां ? नसते संशय—नसती भीति-विनाकारण सरकाराचे मनांत उत्पन्न होईल असें निरर्गल वर्तन कां करतां ? आपल्या अविचारानें-आपल्या वेडेपणानें आपल्या वेळच्यांचे व आपल्या मागून येणारांचे मार्गही कठिण करून कां ठेवतां ? तुमची उत्कंठा, तुमची उमेद, तुमचा उत्साह, तुमचें कर्तृत्व हीं सारीं उतास जाणाऱ्या दुधाप्रमाणें फुकट जाऊं देऊं नका. तीं आवरून धरा आणि त्यांचा ओघ न बोलतां, गाजावजा न करतां, भलत्याच कामाला हात न घालतां, ज्यानें, उशिरानें परंतु खात्रीनें, तुमच्या देशाचें कल्याण होईल, अशा कामाला लावा. जगाच्या संसारांत तुमच्या हजारों कोस पुढें गेलेल्या लोकांकडे निर्विकार दृष्टीनें पहा. त्यांच्यांत काय आहे, आपल्यांत काय नाहीं याचा निश्चय करा आणि ज्या शरीराच्या व मनाच्या ताठरपणानें, मगरमिठीसारख्या चिकाटीनें, दूरदर्शी धोरणानें, निसर्गाशींसुद्धां टक्कर देणाऱ्या करारानें, यंत्रासारख्या अभंग शिस्तीनें, नियमप्रेरणांच्या यथातोल संयोगानें, पर्वतभेदी कर्तव्यनिष्ठेनें, कट्टया प्रयत्नवादानें, अचल संसारप्रीतीनें, सदाजागृत देशभक्तीनें त्यांनीं एवढी मजल मारिली आहे तो ताठपणा, ती चिकटी, तें धोरण, तो करार, ती शिस्त, तो नियमप्रेरणांचा संयोग, ती कर्तव्यनिष्ठा, तो प्रयत्नवाद, ती संसारप्रीति व ती जागृत देशभक्ति आपल्या मुलांत कालांतरानें तरी उत्पन्न होतील अशा खटपटीस लागा. अगदीं लहान मुलांचें शिक्षण हातीं घ्या आणि त्यांना योग्य त्या संवयी लावा; त्यांचे डोळे, कान, नाक, तोंड, अंग हीं ज्ञानार्जनास मोकळीं करा, बुद्धि—वृत्ति—प्रेरणा तीनही मनोव्यापारांना कसरत घडूं द्या आणि खुशाल वाढूं द्या. मुलांचें शिक्षण म्हणजे आजच्या फंदाछंदांत पडण्यास त्यांना तयार करणें नव्हे. त्यांच्या जीवनव्यापाराच्या दोऱ्या, आचरणाचे हेतु, मनोभावाचे झरे आणि बुद्धीचे उगमच नीट वळविले पाहिजेत. त्यांतील मळ, तेथील कीड काढिली पाहिजे आणि त्यांना स्वतंत्रपणें आपल्यापुढें येणाऱ्या प्रसंगास स्वतःच्या अकलेनें तोंड देतां येईल अशी त्यांच्या मनाची तयारी केली पाहिजे. शिक्षण देणें ह्मणजे अमुक कर, आणि अमुक करूं नको असें सांगणें नव्हे. हें शिक्षणाच्या अगदीं—अगदींच कांठावरचें काम आहे. मुलांचें अंतरंग पूर्णपणें विकसित करणें हें शिक्षण. त्याच्या विकासाला—वाढीला—किंवा व्यापाराला कोणत्याही कृत्रिम रूढीचा किंवा कृत्रिम चालीचा बंधारा घालणें हें शिक्षण नव्हे. चाकोरींतून गाडी हाकण्याप्रमाणें मुलांस हाकणें ह्मणजे शिक्षण नव्हे, हें लक्षांत ठेवा. किंवा आपणांस वाटेल तेव्हां वाटेल तशीं कामास यावीं अशीं यंत्रें त्यांना बनविणें हेंही शिक्षण नव्हे, हें ध्यानांत धरा. आणि इतर सर्व चळवळी—खटपटी सोडून मुलांचें शिक्षण हातीं घ्या. यांत पडल्यानें तुमच्या नांवाचा डंका नाहीं झाला तरी हरकत नाहीं; तुमच्या कृतीचा ठसा तुमच्या हाताखालीं तयार होणाऱ्या मुलांवर राहील. तेवढेंच तुमचें समाधान. नवीन पिढीच्या मुलांपैकीं दहा पांचांना तरी मीं सरळ मार्गाला लाविलें—दहापांचांच्या शक्तीचा उपयोग हिंदुस्थानच्या व जगाच्या मोठ्या संसाराला अंशतः होण्यास मी अंशतः तरी कारण झालों येवढेंच समाधान. इतर देशांतील शिक्षणप्रयत्नांचा नीट अभ्यास करून जें शिक्षण, ज्या पद्धती, तुम्हांला फायदेशीर वाटतील त्या शिक्षणाचें आणि पद्धतींचें धोरण पुढें ठेवून, मुलें म्हणजे उद्यांचें जग निसर्गानें तुमच्या हातीं दिलें आहे हें ध्यानीं धरून, आणि

तुमच्या देशाचें कल्याण मुलांस तुम्हीं याल त्या शिक्षणावर अवलंबून आहे हें मनांत बाळगून मुलांचें शिक्षण आपल्या हातीं घ्या. सरळ—सत्य बुद्धीनें तुमच्यानें होतील तितके प्रयत्न करा, आणि पुढचें सारें उद्यांवर ठेवा, असेंच माझें माझ्या तरुण बंधूंना आग्रहाचें सांगणें आहे. लोकशिक्षण हीच आजची देशसेवा.—खरी देशसेवा—कायमचें फळ देणारी देशसेवा—हीच आज पत्करा.'

REFBK-0000299

२९९